म. ग्रं. सं. ठाणे
विषय शास्त्र
सं. क्र.

शास्त्र

१३८

१९३६

मराठी ग्रंथ संग्रहालय,
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे.

# विज्ञान-प्रणीत समाजरचना.

लेखक

पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे, एम्. ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय.
का. ........ नं. ......
ता. ............
ठाणे.

Modern Book Depot
New & Second-hand Book-Seller
Opposite Ananda-Ashram Poona

प्रकाशक

मॉडर्न बुकडेपो आनंदाश्रमासमोर पुणे २.

मुद्रक-शंकर नरहर जोशी,
चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणे

सर्व हक्क स्वाधीन.

प्रकाशक—ना. त्रिं. भिडे, मॉडर्न बुकडेपो पुणे २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
वा. ग्रासां नं. २४
ता. ..............

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| १ विषयप्रवेश | १ ते ८ |
| २ समाजरचनेंत आनुवंशाचें महत्त्व | ९ ते २२ |
| ३ रक्तसंकर व वृत्तिसंकर | २३ ते ४३ |

—×—

| | |
| --- | --- |
| ४ लोक संख्येची वाढ व नियमन | १ ते १८ |
| ५ आधिभौतिक शास्त्रांचे अधिकार | १९ ते ३७ |
| ६ संस्कृति आणि प्रगति | ३८ ते ७१ |
| ७ विवाह संस्थेचें भवितव्य | ७१ ते ८७ |
| ८ गृहसंस्थेचें नवें स्वरूप | ८७ ते १०४ |
| ९ अपत्य संगोपन व इतर कांहीं प्रश्न | १०४ ते ११८ |
| (१) स्त्रीचें आर्थिक स्वातंत्र्य | |
| (२) सगोत्र विवाह | |
| १० पूर्वेचें पाश्चिमीकरण | ११८ ते १३५ |

पुढील प्रबंध प्रकरणशः चित्रमयजगत्-मध्यें प्रसिद्ध झालेला आहे. तींच प्रकरणें एकत्र करून आतां पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलीं आहेत. चित्रमयजगत्साठीं कंपोझ केलेला मजकूर पुन्हां वापरूं दिल्याबद्दल व सर्व प्रकरणें पुस्तकरूपानें त्वरित छापून दिल्याबद्दल चित्रमयजगत्चे मॅनेजर रा. शंकर नरहर जोशी यांचा मी फार आभारी आहे.—पु. ग. स.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ता. शा. नं. ७१९
ता.
ठा. नं.
मराठी ग्रंथ संग्रहालय
७४८६
ठाणे
५४७०

# विज्ञान-प्रणीत समाजरचना.

## विषय-प्रवेश.

समाजशास्त्र हा शब्द नवीन असला तरी ही कल्पना जुनीच आहे. हिंदुस्थान, चीन, इजिप्त वगैरे पुराण राष्ट्रांचा अतिप्राचीन इतिहास जरी पाहिला तरी, त्यांतही ज्याला आपण सध्यां समाजशास्त्र म्हणूं, त्यासारखे विशिष्ट हेतु मनांत धरून माणसांच्या वर्तनाला वळण घालणारे कांहीं नियम केलेले आढळून येतातच. आणि हें अगदीं स्वाभाविक आहे. माणसें संघानें राहूं लागलीं म्हणजे मग तो संघ कितीही लहान असला, तरी त्या संघांतील व्यक्तींचे परस्परांशीं संबंध कसे असावे, यासंबंधीं कांहीं ठरलेलें धोरण असणें अत्यंत अवश्यक असतें. सर्वांनीं मिळून कांहीं शिकार केली किंवा कांहीं फळें जमविलीं, तर तीं वाटावीं कशीं, ज्याला जशी भूक असेल तितकी त्यानें घ्यावी, कां ज्यानें जास्त अक्कल दाखविली असेल त्याला ज्यास्त मिळावी, यासंबंधीं कांहीं नियम हवेतच. अर्थशास्त्र येथूनच सुरू होतें. आपापसांत कांहीं भांडण झालें तर कोणाचें ऐकावें. किंवा सर्व संघाचेंच दुसऱ्या संघाशीं भांडण झालें तर धोरण काय असावें, असले राजकारणाचे नियमही तेथें असतात. स्त्रीपुरुषसंबंधाचें नियंत्रण करणारेही नियम त्या प्राथमिक अवस्थेंत अवश्यक असतात. सारांश समाजशास्त्र म्हणून ज्याला आपण म्हणूं, त्यासारखें कांहीं शास्त्र, अगदीं ढोबळ स्वरूपानें कां होईना, पण समाजाच्या प्राथमिक अवस्थेंतही असणें अगदीं अपरिहार्य आहे.

समाज जसजसा वाढूं लागतो व सुसंस्कृत होऊं लागतो, तसतसें त्याचें समाजशास्त्रही परिणत स्वरूपाला येऊं लागतें. मनूची स्मृति किंवा ॲरिस्टॉटलचें पॉलिटिक्स् हे ग्रंथ समाजशास्त्रावरचेच आहेत; आणि ज्या समाजांत माणसांचे बहुविध क्षेत्रांतले व्यापार फारच प्रौढ दशेला गेलेले आहेत, अशा समाजासाठीं ते सांगितलेले आहेत हें ते वाचतांच अगदीं स्पष्टपणें दिसून येतें.

पण वरील दोन्ही ग्रंथापेक्षांही आजचें समाजशास्त्र फार व्यापक आणि फार निराळ्या स्वरूपाचें होऊं पहात आहे. तेव्हांपेक्षां संख्येनें समाज फार वाढला आहे हें तर आहेच; पण आणखीही अनेक कारणें आहेत. माणसांच्या हालचालींचीं क्षेत्रें पूर्वीपेक्षां अनंत पटीनें आतां वाढली आहे. पूर्वी कधींच आला नसेल इतका दूरच्या राष्ट्रांशीं संबंध आतां हरघडी येतो. इहलोक व परलोक यांच्या कमीअधिक

महत्त्वासंबंधीं लोकांचा दृष्टिकोन विज्ञानानें पार बदलून गेला आहे. मानवाचें व देवाचें नातें बदललें आहे, इतकेंच नव्हे तर व्यक्तीव्यक्तींचें एकमेकाशीं असलेलें, व शेवटीं व्यक्तीचें समाजाशीं असलेलें नातेंही आतां बदलत आहे. जुनें समाजशास्त्र आमूलाग्र बदलून जाण्यास आणखीही एक कारण झालें आहे. या मध्यंतरींच्या काळांत, व विशेषत: गेल्या एकदोन शतकांत आधिभौतिकशास्त्रांनीं मानवाच्या ज्ञानांत कल्पनातीत भर टाकली आहे. आनुवंशशास्त्र, सुप्रजाशास्त्र, भूस्तरशास्त्र, मानवशास्त्र, जीवनशास्त्र, मानसशास्त्र, मनोविश्लेषणशास्त्र इत्यादि अनेक शास्त्रें व त्यांच्या अनेक शाखा–उपशाखा यांनीं मानवासंबंधाची अनेक प्रकारची नवीन माहिती उपलब्ध करून दिली आहे. आणि त्यामुळें जुन्या व आतां चुकीच्या ठरलेल्या माहितीच्या आधारें रचलेले नियम अर्थातच त्याज्य ठरून त्या जागीं नवे नियम करणें अवश्यक होऊन बसलें आहे.

समाजाचा अभ्यास करण्याच्या पद्धतींतही एक फार महत्त्वाचा फरक अलीकडे पडला आहे. बालविवाहानें जास्त मृत्यु होतात, संकरानें निर्वंश होतो, बुद्धिमान् वर्ग किंवा श्रीमंतवर्ग लवकर नष्ट होतो; हीं व यासारखीं कोणचींही विधानें करावयाचीं असलीं तरी त्यासाठीं त्या त्या समाजांत जाऊन तेथें झालेले परिणाम आकड्यांनीं मोजून मगच निर्णय करावयाचा, अशी पद्धत अलीकडे रूढ होत चालली आहे. या पद्धतीला आकडेशास्त्र असें म्हणण्याची चाल पडत आहे. तें कितपत युक्त आहे, हें मला सांगतां येत नाहीं. पण ही पद्धत समाजाच्या अभ्यासाला अत्यंत उपकारक झाली आहे, याबद्दल मात्र शंका नाहीं. आपल्या आसपास दृष्टि टाकून तेवढ्यावरूनच निर्णय काढण्याची माणसांना संवय झालेली असते. असले निर्णय किती भ्रामक असतात, तें आकडेशास्त्रानें दाखविलें आहे.

ज्ञानामध्यें भर पडली व अभ्यासाच्या नव्या आणि उत्तम पद्धति सांपडल्या, यामुळें समाजशास्त्राचा अभ्यास जास्त सूक्ष्म तऱ्हेनें व जास्त निश्चितपणें करतां येऊं लागला हें खरें; पण या दोन कारणांमुळेंच समाजशास्त्राचा व्याप अलीकडे अत्यंत वाढला आहे. बुद्धिबळाच्या खेळांत एकादें प्यादें जरी हलवावयाचें असलें तरी त्या हलविण्यानें पुढें काय काय परिणाम होतील, म्हणजे कोणाचा जोर निघून जाईल, कोण मरूं शकेल, नवा जोर कोणाला येईल, रिकाम्या पडलेल्या घरांत प्रतिपक्षाचें कोणचें मोहरें घुसूं शकेल, तें काय अनर्थ करील, शह कोणाला बसतील, इत्यादि परिणामपरंपरा ज्याच्या ध्यानांत येते, त्याला तें प्यादें हलवितांना फार विचार करावा लागतो. ज्याला या भानगडी ध्यानांत येत नाहींत, तो चटकन्

तें पुढें सारून मोकळा होतो. पण मग त्याचे परिणामही त्याला भोगावे लागतात. समाजशास्त्राचें कांहींसें तसेंच झालें आहे.

मानवीसमाज किती प्रकारांनीं हलतो, मनुष्याच्या मनाला प्रेरणा देणाऱ्या किती प्रकारच्या शक्ती आहेत, यासंबंधीं आज कितीतरी व्यापक प्रमाणावर अभ्यास चालू आहे. मानवाच्या प्रत्येक हालचालीच्या बुडाशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें अर्थशास्त्राचा म्हणजे भाकरीचा प्रश्न असतो, असें कांहीं लोक म्हणतात. अशोकानें अहिंसा स्वीकारली किंवा शिवाजीनें स्वराज्य स्थापना केली, याला मुळांत भाकरीच कारण असली पाहिजे, असें या पक्षाचें मत आहे. उलट प्रत्येक गोष्टीच्या बुडाशीं कामविकार असतो असें म्हणणारा दुसरा एक पंथ आहे. आईच्या अंगावर स्तनपान करणाऱ्या बालकाच्या मनांतही कामप्रेरणाच असते, म्हणजे भाकरीच्या बुडाशींही कामप्रेरणा असते, असें सांगणारे कांहीं पंडित आहेत. अर्थात् मानवी हालचालीची जो जशी भिन्न उपपत्ति लावील, तसें त्या समाजाच्या कल्याणासाठीं त्यानें सांगितलेले उपायही भिन्न असणार हें उघड आहे. अर्थ व काम याप्रमाणेंच आनुवंशानेंच माणसाचें भवितव्य ठरत असतें, असें समजणाराही एक पंडितवर्ग आहे. डार्विन हा सृष्टिशास्त्रज्ञ कां झाला, पाश्चर वैद्य कां झाला, याचीं कारणें त्यांच्या पूर्वजांच्या रक्तांतच सांपडतात असें त्यांना वाटतें. यांचे वडील, पितामह प्रपितामह, यापैकीं कोणीतरी पूर्वज सृष्टिशास्त्रज्ञ व वैद्य असलाच पाहिजे; तो नसला तर त्यांच्या आईकडचा कोणीतरी पूर्वज तसा असला पाहिजे, असें सांगितल्यावांचून या लोकांचें समाधान होत नाहीं. हें जसें व्यक्तीचें तसेंच समाजाचेंही भवितव्य रक्तावर अवलंबून आहे, मोठ्या रक्ताच्या कुळांतच मोठीं माणसें होणार, यस्मिन् कुले त्वमुत्पन्नः गजस्तत्र न हन्यते । या प्रकारचें यांचें तत्त्वज्ञान आहे. उलट बिहेवियरिस्ट नांवाचा एक अमेरिकेंत पंथ आहे, त्याचें मत असें आहे कीं, आनुवंश वगैरे तर कांहींच नाहीं; पण अमुक मुलगा बुद्धिमान्, अमुक मंद यालाही कांहीं अर्थ नाहीं. योग्य परिस्थितींत व योग्य संस्कार घडवले तर वाटेल त्या मुलाला वाटेल त्या उच्चनीच स्थितीला नेऊन पोचविता येईल. उत्क्रांतिवादी नांवाचा आणखी एक पक्ष आहे. त्यांच्या मताप्रमाणें मानवाचा व एकंदर सर्वच गोष्टींचा हळुंहळूं विकास होत जाण्याची सृष्टिरचनेंतच योजना आहे. म्हणजे मानवानें प्रयत्न कितीहि केला, तरी उत्क्रान्तीच्या त्या पायरीपर्यंत सृष्टिक्रमानें तो आला नसला,

तर त्याला इष्ट कार्यांत कधींच यश यावयाचें नाहीं. झाड जसें अकालीं फुलत नाहीं, व फळें धरीत नाहीं, खतपाणी घालून कितीहि निगा राखली तरी आंतून क्रमानें विकास होत तयारी झाली म्हणजे मगच योग्य हंगामीं त्याला फळेंफुलें येतात, त्याचप्रमाणें समाजाचें आहे. त्या त्या कालीं सर्व गोष्टी क्रमानेंच घडत जातात. आणि ह्या सृष्टीचा क्रम पाहिला तर उत्तरोत्तर मानवाची उन्नति होत जावी असा आहे, असें या पंथाचें म्हणणें आहे. याशिवाय भौगोलिक परिस्थिति, परमेश्वरी कृपा, पूर्वकर्म इत्यादि माणसाचीं भवितव्यें ठरविणाऱ्या अनेक शक्ति आहेत, असें सांगितलें जातें. यांत वाईट एवढेंच आहे कीं, प्रत्येक जण आपापली उपपत्ती पूर्णपणें खरी व इतरांची चुकीची असें समजून अगदीं एकांतिकपणा करतो. आणि त्यामुळेंच सर्व नुकसान होतें. वस्तुस्थिति अशी आहे कीं, भाक्री, कामविकार, संस्कार, आनुवंश, उत्क्रांति, भौगोलिक परिस्थिति आणि यदृच्छा (म्हणजे मानवांना ज्यांचें आकलन झालें नाहीं अशा शक्ति ) या सर्वच मानवाचें भवितव्य ठरवीत असतात. आणि म्हणूनच समाजशास्त्रज्ञांना या सर्व शक्ति विचारांत घ्याव्या लागतात. आणि येवढ्यानेंच हें भागत नाहीं. या सर्व शक्ति निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या प्रमाणांत मानवी मनावर कार्य करीत असल्यामुळें त्या त्या विशिष्ट काळचा अभ्यासही करावा लागतो. धर्माचा मागल्या काळीं लोकांवर विलक्षण पगडा असे. मनुस्मृतीमध्यें जे कित्येक दंडक घालून दिले आहेत, त्यासंबंधीं विवेचन करतांना पुष्कळ वेळां, हे मोडले तर चांडाळ योनिप्राप्त होईल, नरकांत जावें लागेल, असें सांगितलेलें आढळतें. आणि माणसांना ते शेकडोशें वर्षें खरें वाटत असे; आणि अजूनही पुष्कळांना तसें वाटतें. अलीकडे विज्ञानाचा पगडा जरा जास्त होऊं लागला आहे. यावरून निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या शक्ती माणसाला हलवीत असतात हें उघड दिसून येईल. या सर्वांचा विचार करून समाजशास्त्रज्ञानें मानवाला त्याच्या कल्याणाचा मार्ग दाखवावयाचा असतो. म्हणूनच हें कार्य फार जबाबदारीचें आहे.

गेल्या शंभर दीडशें वर्षांत या क्षेत्रांत युरोपमध्यें फार मोठें कार्य झालें आहे. ऑगस्टस् कोंट या फ्रेंच पंडितानें १८३८ सालीं प्रथम ( सोशिऑलजी ) समाजशास्त्र हा शब्द वापरला. हर्बर्ट स्पेन्सरनें तो पूर्ण रूढ केला. लेस्टर वार्ड हा अमेरिकन पंडित आहे. न्यूटन, फ्राईड यांची आपापल्या क्षेत्रांत जितकी योग्यता आहे तितकीच समाजशास्त्रांत याची आहे असें कांहींचें मत आहे. समाज शास्त्राचीं अंगोपांगें पाहिलीं तर आज हजारो नाणावलेले शास्त्रज्ञ या क्षेत्रांत काम करीत आहेत, असें दिसून येईल.

ता. २।। नं. १४१
ता. ९-८-१९१।३६



इकडील कांहीं पंडितांच्या मतें हिंदूंनीं मागें जो समाजशास्त्राचा अभ्यास केला आहे व [illegible] वून व विशेषतः मनुस्मृतींत जो प्रगट झाला आहे तो अगदीं पूर्ण असून जशाचा तसा आजच्या समाजाचे प्रश्न सोडविण्यास पुरेसा आहे. हें मत कसें भ्रामक आहे, हें पुढील शेदीडशें पानांच्या प्रबंधांत, ठायीं ठायीं दाखविलेंच आहे. पण त्या संबंधांत एक स्पष्टपणें खुलासा करणें अवश्य वाटतें, तो येथें करीत आहे.

( १ ) येथें असलेल्या निरनिराळ्या जाती तितक्या भिन्न गुणांसाठीं टिकवून धरणें अवश्य आहे म्हणून त्यांनीं आपआपसांत लग्नें करूं नयेत; ( २ ) जितका पैसा ( म्हणजे अन्न ) असेल तितकींच माणसें निर्माण व्हावीं व वरच्या गटांतील संख्या वाढून खालच्या गटांची संख्या कमी व्हावी, हें श्रेयस्कर असल्यामुळें या जातींनीं एकमेकांचे धंदे करूं नयेत, आणि (३) निसर्गाच्या निवडीला योग्य वाव मिळण्यासाठीं शक्य तितकी जास्त प्रजा व्हावी या दृष्टीनें व इतरही अनेक दृष्टीनें समाजांत बालविवाह व्हावेत हें हिंदूच्या सर्व समाजशास्त्राचें तात्पर्य आहे.

आणि या नियमाअन्वयें वागल्यानें आज भोवतालच्या अनेक संस्कृती नाश पावल्या असतांना हिंदू टिकून राहिले आहेत असें या लोकांचें म्हणणें आहे.

यांपैकीं प्रत्येक विधानाची स्वतंत्रपणें चर्चा करून तें कसें असिद्ध आहे, तें दाखविलेंच आहे. येथें पुन्हां एकदां सांगावेंसें वाटतें कीं भिन्न रक्तें म्हणजे काय, व येथें असलेल्या प्रत्येक जातीचा विशिष्ट गुण कोणता हें स्पष्टपणें त्या पंथाच्या लोकांनीं दाखविल्यावांचून त्यांच्या मताला म्हणजेच हिंदूंच्या जातिव्यवस्थेला काडीचाही अर्थ नाहीं. माझा लेख प्रसिद्ध झाल्यावर या विषयावर दोनतीन ठिकाणीं वादविवाद झाला. पण या प्रश्नाचें उत्तर देण्याचें दर ठिकाणीं टाळलें गेलें. तेव्हां वाचकांनीं एवढें नेमकें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं पंधराशे जातींचे पंधराशें विशिष्ट गुण स्पष्टपणें दाखविल्यावांचून जातिव्यवस्थेला कांहींही अर्थ नाहीं. वृत्तिसंकर व बालविवाह यांचा विचार पुढें केलाच आहे. पण हिंदू जगले म्हणजे काय ? या प्रश्नाची थोडी चर्चा करणें अवश्य आहे. ‘ रक्तें भिन्न म्हणजे काय,’ या विचारांत जसा घोटाळा आहे, तसाच ‘जगणें म्हणजे काय’ या विचारांतही घोटाळा आहे. आणि या दोन बाबतींत हेतुपुरस्सर घोटाळा करूनच त्यावर सनातनपंथाची अर्वाचीन उभारणी करण्यांत आली आहे,

जगणें याचे दोन अर्थ होतात. एक स्वाभिमानानें, पूर्वजांचा लौकिक कायम ठेवून जगणें असा अर्थ होईल; आणि दुसरा फक्त टिकून राहाणें, न मरणें, पूर्वींचे

सत्त्व नाहीसें झालें असूनही केवळ शरीरानें जगणें असा अर्थ होईल. आणि याच अर्थांचा घोटाळा सनातनी लोक करीत असतात. आपण या दोन्ही गोष्टींचा विलगपणें विचार करूं.

हिंदू आपल्या पूर्ण वैभवानिशीं आतांपर्यंत टिकून आहेत, असें स्पष्टपणें जुन्या पक्षालाही–कांहीं वेडगळ लोक सोडून दिल्यास–म्हणतां येणार नाहीं. वैभव नसतांना नुसते टिकून रहाणें, हीही कांहीं कमी महत्त्वाची गोष्ट नाहीं. अजिबात मरण्यापेक्षां तीं चांगलीच आहे. आणि भोंवतालच्या मिसरी, बाबीलोनी इत्यादि संस्कृती नष्ट झाल्या तरी हिंदू टिकून राहिले, नुसते जीव धरून कां होईना–पण टिकून राहिले, यांत कांहीं तरी विशेष आहे, हें मान्य केलेंच पाहिजे. पण याचा संबंध लोक जातिभेद आणि वर्णाश्रमव्यवस्था यांशीं जो जोडतात,तो मात्र मान्य होणें शक्य नाहीं. वर्णांची व जातींची कडक व्यवस्था आज तीन हजार वर्षेंच आहे. त्याच्या आधीं वेदाच्या संकलनापासून जरी काळ मोजला, तरी तीन हजार वर्षें हिंदू लोक जातिव्यवस्थेच्या अभावीं टिकून होतेच ! आणि त्यावेळेसही शक,यवन, पणी इत्यादि परकीयांच्या स्वाऱ्यां या देशावर होतच होत्या. तेव्हां जातिव्यवस्थेनंतर जसे हिंदू टिकले, तसेंच ते आधीं पण टिकून राहिले होते. म्हणजे हिंदू टिकले असें म्हणावयाचें असेल, तर ते आज सहासात हजार वर्षें टिकले आहेत. पण मनूचे गोडवे गाण्याच्या भरांत थापा देण्यास सोकावलेले लोक हिंदु दोनतीन हजार वर्षे टिकले आहेत, असें म्हणतात. कारण वर्णव्यवस्था नसतांना हिंदू आधीं टिकले होते, हें सांगणें त्यांना गैरसोयीचें असतें.

दुसरें असें कीं इतक्या पुरातन काळापासून टिकले आहेत,असे फक्त हिंदूच आहेत असें नाहीं. चिनी व जपानी लोक असेच टिकून राहिले आहेत. चिन्यांचा इतिहास तर इसवीसनापूर्वी चारहजारपर्यंत मागें पोचवितां येतो. ज्यू लोकांची तीच स्थिति आहे. गेल्या दोन हजार वर्षांत ज्यू लोकांचा जेवढा छळ झाला, तेवढा दुसरा कोणाचाच झाला नसेल. तरी ते टिकून आहेतच. पण या चिनी व ज्यू लोकांत वर्णव्यवस्था मुळींच नाहीं. तेव्हां टिकण्याचा आणि वर्णव्यवस्थेचा संबंध जोडणें केवळ हास्यापद होय. आणि केवळ टिकून राहाणें यांतच पराक्रम असेल तर आफ्रिकेंतल्या अनेक रानटी जाती टिकून राहिल्या नाहींत काय ? आणि इतकेंच काय–जगांतले सर्व लोक टिकून राहिले नाहींत काय ? हिंदू हिंदुस्थानांत आले तेव्हां ही सध्याच्या हिंदेतर लोकांचे पूर्वज कोठें तरी कोणच्या तरी नामरूपानें होतेच. हिंदूंची कारकीर्द सुरू झाल्यानंतर ते माकडाच्या योनींतून मनुष्य-

योनींत आले असें म्हणतां यावयाचें नाहींत. त्याच्या आधींच कित्येक सहस्रके हिंदू प्रमाणेंच ते मनुष्ययोनींत आलेले होतेच.आणि ते आतांपर्यंत टिकूनही राहिले आहेत.

येथें कांहीं लोक असें म्हणतील कीं, "हिंदूंचे जगणें व इतरांचें जगणें यांत फरक आहे. कारण हिंदूंनीं फार मोठी संस्कृति निर्माण केली आहे. हें उत्तर जर खरें असेल तर याचा अर्थ स्पष्टपणें असा होतो कीं केवळ जगण्याला महत्त्व नसून संस्कृतीला महत्त्व आहे. माझ्या मतानें रामायण, महाभारत, यांसारखीं महाकाव्यें रचणें; सांख्य, योग्य वेदान्त यासारखीं दर्शनें लिहून जगाच्या आदिकारणांचा ठाव पहाणें; गणित, रसायन, वैद्यक, ज्योतिष, यांसारखीं शास्त्रें हस्तगत करणें, अर्जुन, समुद्रगुप्त यांनीं केले तसें दिग्विजय करणें; नृत्य, नाट्य, गायन, शिल्प इत्यादि कलांची जोपासना करणें; आणि कोणापुढें मान न वाकवितां स्वातंत्र्यानें राहणें; हीं मोठ्या संस्कृतीचीं मुख्य लक्षणें आहेत. आणि या दृष्टीनें पाहिलें आणि संबंध हिंदुस्थानचा विचार केला तर, गेल्या पांचसातशें वर्षांत आपली स्थिति फार खालावली आहे असें कोणाही समंजस माणसाला मान्य करावें लागेल. महाराष्ट्राचाच फक्त इतिहास थोडासा उज्ज्वल आहे. पण तो चातुर्वर्ण्याचे सर्व नियम झुगारून ' प्रत्येकाला वाटेल ती संधी ' या तत्त्वाअन्वयें चालल्यामुळेंच उज्ज्वल झाला आहे, हें पुढील प्रबंधांत एकदोन ठिकाणीं दाखविलेंच आहे.

यावरून असें दिसेल कीं केवळ जगणें यांत कांहीं पराक्रम नाहीं. जगांतले सर्व लोक तसे जगून आहेतच. संस्कृतिसह मानानें जगणें असा अलीकडच्या जगण्याचा अर्थ असेल तर तें हिंदूंना साधलेलें नाहीं. जेव्हां साधलें होतें तेव्हां चातुर्वर्ण्य नव्हतें. मध्यंतरी थोडेसें पुन्हां साधलें तेव्हां चातुर्वर्ण्य मोडल्यामुळेंच तें साधलें. अर्धवट संस्कृतीनें कसेंबसें टिकून राहाणें असा जरी जगणें या शब्दाचा अर्थ केला तरीही चातुर्वर्ण्याचें समर्थन करतां येणार नाहीं. कारण चिनी व ज्यू हे चातुर्वर्ण्यरहित समाज तसें टिकलेले आहेतच.

यावरून निष्कर्ष असा निघतो कीं मन्वादि स्मृतिकारांनीं हिंदूंना सांगितलेले समाजशास्त्र हें मुळींच यशस्वी ठरलेलें नसून तें आमूलाग्र बदलावयास पाहिजे. तें बदलून कोणत्या नव्या तत्त्वावर समाजरचना करावयास पाहिजे याचें विज्ञानानें जें उत्तर दिलें आहे तें मराठींत सांगण्याचा प्रयत्न मी पुढील प्रबंधांत केला आहे.

आनुवंश, रक्तसंकर, वृत्तिसंकर, लोकसंख्येचें नियमन, समाजाचें अंतिम ध्येय, राष्ट्रकल्पना, भौतिकशास्त्रें व धर्म, विवाहसंस्था, गृहसंस्था पश्चिमेच्या उत्कर्षाचें

रहस्य इत्यादि अनेक प्रश्न येथें विचारासाठीं घेतले आहेत. आणि अनेक युरोपीय व अमेरिकन शास्त्रज्ञांनीं या बाबतींत जो अभ्यास केला आहे, त्याच्या आधारें त्याचें विवेचन केलें आहे. त्यांनीं दिलेले अनेक निर्णय आपल्या समाजाला कसे लागू पडतात, याचीं चर्चाही केली आहे. त्यांच्या पुष्टीकरणार्थ आपल्या समाजाच्या इतिहासांतील उदाहरणें दिलीं आहेत. तेवढ्यावरून समाजशास्त्राच्या मूलभूत तत्त्वांची वाचकांना बरीच कल्पना येईल असें वाटतें.

# समाज-रचनेंत आनुवंशाचें महत्त्व.

आफ्रिकेंतील शिद्दी, निग्रो किंवा हिंदुस्थानांतील कातकरी, वंजारी हा लेनिन्, रुसो, नेहरू, बोस यांच्या बरोबरीचा आहे व त्याची शिद्दीण, निग्रीण, कातकरीण किंवा वंजारीण ही मॅडम क्युरी, ग्रेटा गार्बो, अहल्याबाई किंवा नूरजहान यांच्या बरोबरीची आहे असें जगांतील एका पंथाचें मत आहे. त्या पंथाच्या प्रणेत्यांच्या डोळ्यापुढें कदाचित् हीं उदाहरणें नसतील, असतीं तर कदाचित् समतावाद त्यांनीं सांगितला नसता. त्यांच्या अनुयायांनीं त्या समतावादाची अंमलबजावणी करतांना मूलतत्त्वांना कांहीं मुरडी घातल्या असतील हें सगळें जरी खरें असलें तरी त्या पंथाचें शुद्ध तत्त्वज्ञान जर घेतलें तर वरील विधानाप्रत त्यांना घसरावें लागेल यांत शंकाच नाहीं. सर्व मानव, कोणच्याही प्रांतांतला वंशांतला, कुलांतला स्थितींतला कोणचाहि मनुष्य म्हटला कीं तो येथून तेथून मूल गुणांनीं सारखाच असतो. भिन्न परिस्थितींत सांपडल्यानेंच त्याच्यांत उच्चनीचता निर्माण होते, असें या पंथाचें मत आहे. फ्रेंच राज्यक्रांतींतून हें समतेचें तत्त्व निघालें. थोड्या निराळ्या स्वरूपांत अलीकडच्या कांहीं पंडितांनीं तेंच सांगितलें व त्या तत्त्वावर समाजरचना करण्याचा आज कोठें कोठें जारीनें प्रयत्न सुरू आहे.

याच्या अगदीं थेट उलट टोकाला जाणारा दुसरा एक पंथ आहे. कृष्ण मार्गे एकदां मोठा होऊन गेला म्हणून त्याच्या कुळांत आज कितीही शेळपट, अजागळ मनुष्य झाला असला तरी तो श्रेष्ठ, कितीहि हीन कर्म करीत असला तरी ब्राह्मण कुलांत देह जन्मला म्हणूनच केवळ तो मनुष्य वंद्य व आपल्या पराक्रमानें श्रेष्ठपद मिळविणारे महादजी, मल्हारराव इतकेंच काय पण शिवाजीसुद्धां ( कांहींच्या मतें ) हीन जातींत जन्मले म्हणून तो हीन, असें या पक्षाचें म्हणणें आहे. या तऱ्हेचें तत्त्वज्ञान आज हिंदुस्थानांत जारी आहे. मोठ्या जातींत जन्मलेला तो मोठा, लहान जातींत जन्मलेला तो लहान, या तत्त्वावर ही समाजरचना आहे. या तत्त्वाचा प्रणेता मनु होय.

कोठूनहि कोणचाहि मनुष्य उचलून घेतला तरी त्याच्या अंगीं सर्व गुण सुप्त स्थितींत खास असणारच; व संधि मिळतांच तो मनुष्य कोणत्याहि क्षेत्रांत चमकूं शकलेच असें एका पक्षाचें म्हणणें आहे. व उच्च गुण कुळांतच सांपडणार, अन्यत्र सांपडणारच नाहींत, असें दुसरा पक्ष म्हणतो.

Behaviourism या पुस्तकांत वॅटसन म्हणतो,–'Give me a dozen healthy infants, and my own specified world to bring them up in, and I will guarantee to take any one at random and train him to become any type of specialist I might select:—Doctor, Lawyer, Artist, Merchant Chief and yes even beggar-man and thief, regardless of his talents, peculiarities, abilities and race of his ancestors.'
( पान ८२ ) हें तत्त्व गृहीत धरून समतावादी समाजरचना करूं पाहातात.

कोणच्याही कुटुंबांत पाहिलें तरी साधारणतः वर्ण, स्वभाव, बुद्धिमत्ता या बाबतींत मुलें आईबापांच्या सारखीं असतात. सामान्य दृष्टीला सुद्धां हें साम्य पुष्कळ वेळां दिसून येतें. पित्याचे गुण पुत्राच्या ठायीं उतरण्याचा हा जो सृष्टीचा साधारण नियम दिसतो, त्याला आनुवंश असें म्हणतात. मनु व आपल्याकडचे इतर सर्व स्मृतिकार यांचा या आनुवंशाच्या तत्त्वावर निःसीम विश्वास असून त्या अन्वयेंच त्यांनीं आपली समाजरचना सांगितली आहे. रूसो, कार्ल मार्क्स वगैरे लोक या तत्त्वाला मुळींच किंमत देत नाहींत.

गेल्या पन्नाससाठ वर्षांत युरोपांत जीवनशास्त्राचा व तदंतर्गत आनुवंशाचाही पुष्कळच अभ्यास झाला व तेव्हांपासून बायॉलजी हें शास्त्र इतर शास्त्रांच्या तोडीचें किंबहुना त्यापेक्षांही जास्त महत्त्वाचें आहे असें तिकडील पंडितांना वाटूं लागलें आहे. आनुवंशाच्या शास्त्राचा मानवाच्या बाबतींत अभ्यास करून त्याचें जोरानें प्रवर्तन करणारा पंडित म्हणजे सर फ्रॅन्सिस गाल्टन हा होय. इंग्लंडमधील प्रसिद्ध शास्त्रज्ञ, सेनापती, वगैरे निरनिराळ्या क्षेत्रांतील कर्त्या, थोर पुरुषांच्या कुलांचा अभ्यास करून यानें असें सांगितलें कीं थोर व्यक्ति या अनियमितपणें वाटेल त्या कुळांत उत्पन्न होत नसून त्या व्यक्तीचे जवळचे आप्तसंबंधींही–पणज्या निपणज्यापर्यंतचे आप्तसंबंधींही–मोठे पुरुष असल्याचें आढळून येते. मानवाच्या मूल कर्तृत्वांत फारसा फरक नसून परिस्थितीलाच सर्व महत्त्व आहे हें जें साम्य-वाद्यांचें म्हणणें तें अगदीं भ्रामक असून मनुष्याचें कर्तृत्व वव्हंशीं तो कोणच्या

बा. शी. नं. १४
ता. १८।११।३६



कुळांत जन्मलो, यावर अवलंबून असतें, असें मत गाल्टननें आपल्या 'हेरिडिटरी-जीनियस' या पुस्तकांत प्रतिपादिलें आहे. इतकें करूनच तो थांबला नाहीं; तर ज्या अर्थी थोर कुळांतच थोर व्यक्ति निर्माण होतात असें दिसतें, त्या अर्थी त्या थोर कुलांचा हलक्या कुलांशीं लग्नसंबंध होणें हें घातुक आहे असें सांगून शंभर वर्षांपूर्वीच निघालेल्या समतेच्या तत्त्वावर त्यानें कुऱ्हाड घातली. व समाजाच्या प्रत्येक वर्गांतील थोर कुलें निवडून काढून त्यांचे आपआपसांत विवाह घडवून आणावे व समाजानें त्यांच्या भरणपोषणाची काळजी इतरांपेक्षां जास्त घ्यावी, असे विचार तो पसरवूं लागला. प्रथम त्याच्याकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. पण १८९० च्या सुमारास त्याला अनुयायी मिळूं लागले; व आनुवंशाचा—पित्याचे गुण पुत्राठायीं संक्रांत होतात—या सिद्धान्ताचा सर्वत्र अभ्यास सुरू झाला. याच सुमारास जननशास्त्र, वनस्पतिशास्त्र संकर, या विषयांतले शोधही पंडितांच्या हातीं आले व त्यावरून रक्ताला, आनुवंशाला सर्वस्वीं नाहीं तरी फार मोठी किंमत आहे व हें लक्षांत घेऊनच समाजरचना झाली पाहिजे, असें त्यांचें मत बनत चाललें. व समता, बंधुता, स्वातंत्र्य वगैरे शंभर वर्षें उराशीं बाळगलेलीं तत्त्वें ढासळूं लागून सुप्रसिद्ध 'सुप्रजाजननशास्त्राचा' उदय झाला.

आनुवंशाचा हा शोध आमच्याकडे मनु नांवाच्या महापंडितानें फार पूर्वीच लावला होता. घराण्याच्या व रक्ताच्या शुद्धतेला फार मोठी किंमत आहे, हें त्यानें ओळखलें होतें. ही आम्हांला फार अभिमानाची गोष्ट आहे. पण त्याबरोबर दुःखाची गोष्ट अशी कीं गाल्टनमागून त्याचा प्रत्येक सिद्धान्त तावूनसुलाखून घेऊन त्यांतल्या चुका, अतिशयोक्त्या टाकून देऊन शुद्ध शास्त्र सांगणारे अनेक पंडित त्यांच्याकडे होत आहेत. तशी परंपरा आमच्याकडे मुळींच झाली नाहीं. तर उलट आजही मनुवचन हें अक्षरशः शास्त्रशुद्ध व अनुकरणीय आहे, असें एकांतिक विधान करणारे रा. गो. म. जोशासारखे लेखक आमच्या समाजांत निघतात.

थोर घराण्यांतच थोर व्यक्ति निर्माण होतात, इतर घराण्यांत होत नाहींत, हा सिद्धान्त अत्यंत निराशजनक आहे. तो खरा असल्यास तेथें कोणाचाच इलाज नाहीं. पण तो तसा नाहीं व समाजरचनेंत त्याचा हिंदूंनीं केलेला उपयोग फारच घातुक आहे असें दाखविणें शक्य वाटत असल्यामुळें या लेखांत आनुवंश व त्या अन्वयें केलेली समाजरचना यांचा विचार करावा असें ठरविलें आहे. पण त्यापूर्वी दुसऱ्या एका महत्त्वाच्या मुद्याचा विचार करतों. ०

जन्मतः सर्व मानव सारखे नसले तरीही अनुवंशाला–घराण्याला–किंमत द्यावयास नको असें म्हणणारा एक पक्ष आहे. त्याचें म्हणणें असें कीं जरी जन्मतः एक श्रेष्ठ, एक कनिष्ठ, असा भेद असला तरी शिक्षण हें असें अमोघ साधन आहे कीं त्याच्या साह्यानें ही मूळची विषमता आपणास सहज काढून टाकतां येईल. व एका पिढींत हें साधलें नाहीं तरी अनेक पिढ्यांनीं साधेल यांत शंकाच नाहीं.

पण शास्त्रज्ञ या म्हणण्याचा पाठपुरावा करीत नाहींत. तर शिक्षणानें किंवा इतर संस्कारांनीं पिढ्या सुधारणें शक्य नाहीं, असेंच आजच्या जवळजवळ सर्व शास्त्रज्ञांचें मत आहे. एक उदाहरण घेऊन त्यांचें म्हणणें स्पष्ट करूं.

समजा 'क' ही व्यक्ति गवयाच्या घराण्यांतील आहे. आनुवंशाच्या नियमानें 'क' च्या अंगीं साहजिकच थोडें गाननैपुण्य येणार. आतां असें समजूं कीं 'क'नें आपल्या हयातींत अभ्यासानें गायनाखेरीज इतर कांहीं विद्या किंवा गुण (उदा. अचूक निशाण मारणें ) हस्तगत केला. शास्त्रज्ञ या दोन गुणांना दोन निरनिराळीं नांवें देतात; परंपरेनें म्हणजे घराण्यांतूनच आलेला गाननैपुण्य हा पिण्डगत गुण होय; व तिरंदाजी हा स्वतः अभ्यासानें मिळविलेला म्हणजे संस्कारप्राप्त गुण होय, असा भेद सांगून शास्त्रज्ञ म्हणतात कीं 'क' हा आपल्या पुत्राच्या ठायीं पिण्डगत गुणच तेवढा संक्रान्त करूं शकतो. संस्कारप्राप्त गुणाचा त्याच्या पुत्राला लवलेशही मिळणार नाहीं. अभ्यासानें 'क' चा पुत्र तिरंदाजी कदाचित् साध्य करील. पण गायनाच्या बाबतींत जसें त्याला आधींचें भांडवल मिळेल, तसें तिरंदाजीच्या बाबतींत मिळणार नाहीं. याचा अर्थ असा कीं आज समाजांत खालच्या थरांत असलेली जात कितीही पिढ्या उच्च शिक्षण घेत राहिली तरी सुधारणें, विशेष सुधारणें, शक्य नाहीं. कारण एका पिढीवर आपण कितीही संस्कार केले तरी ते पुढील पिढीवर रक्तांतून संक्रान्त होत नसल्यामुळें पुढल्या पिढीला पुन्हां श्रीगणेशापासूनच सुरवात करावयास हवी.

लामार्क नांवाचा पंडित संस्कारप्राप्त गुण संक्रान्त होतात असें मानीत असे. डार्विनही तसें थोडेसें मानी पण पण वेझमानपासून ही परंपरा बदलली व आजमितीला कॅमेरार, डरहॅम वगैरे कांहीं अपवाद सोडून दिले तर बाकीचे सर्व शास्त्रज्ञ पिण्डगत गुणच फक्त सक्रान्त होतात, संस्कारप्राप्तगुण सक्रान्त होत नाहींत असेंच मानतात.

कित्येक पिढ्यानें कां होईना पण वंश किंवा जात संस्कारानें सुधारतां येईल, या आशेला शास्त्रज्ञ असा धक्का देत असल्यामुळें मूळच्या निराशेंत अधिकच भर पडते.

तेव्हां ही निराशा खरोखरीच साधार आहे कीं काय, याचा कसोशीनें विचार व्हावयास पाहिजे.

थोर घराण्यांत थोर व्यक्ति निर्माण होतात व संस्कारप्राप्त गुण संक्रान्त होत नाहींत, हे दोन सिद्धान्त लक्षांत घेऊनच आपली चातुर्वर्ण्ययुक्त समाजरचना घडविलेली आहे, असें सांगितलें जातें. म्हणून ती समाजरचना कितपत यशस्वी होईल, याचा प्रथम विचार करूं.

विद्यावृद्धि, संरक्षण, वाणिज्य इत्यादि निरनिराळ्या कार्यासाठीं लागणारे निरनिराळे गुण भिन्न भिन्न मानवसमूहांत मनूला दिसून आले, ते आनुवंशिक आहेत असें त्यानें पाहिलें व म्हणून त्या त्या समूहावर–वर्णावर–ती ती जबाबदारी मनूनें टाकली; व त्यांच्या गुणांत बिघाड होऊं नये म्हणून त्यांनीं आपआपसांत विवाह करूं नयेत असें त्यानें ठरवून दिलें. त्याचप्रमाणें प्रत्येक वर्णाचें उपजीविकेचें साधनही त्याच्या कार्याला योग्य असें सांगून तें इतरांनीं घेऊं नये, म्हणजेच एका वर्णाचा धंदा दुसऱ्यानें करूं नये, असाही निर्बंध त्यानें घातला. व या दोन निर्बंधांमुळें झालेली रचना तेंच चातुर्वर्ण्य, अशी ही कल्पना आहे.

वरीलप्रमाणें समाजरचना करतांना पुढील गोष्टी गृहीत धराव्या लागतात.

आरंभीं व्यवस्था करतांना,

( १ ) ज्या वर्णावर त्याच्या गुणाअन्वयें जी जबाबदारी टाकली असेल, ती पार पाडण्यास तो वर्ण कायम--कितीही शतकें लोटलीं तरी तितकाच समर्थ राहील. त्याला कधींही दौर्बल्य येणार नाहीं.

( २ ) एका वर्णांत मनूनें जे गुण पाहिले त्या गुणांखेरीज अन्य गुण त्या वर्णांत कधींही दिसणार नाहीं.

( ३ ) आरंभीं जो मानवसमूह हीन, नाकर्ता, शूद्र म्हणून गणला गेला असेल त्याच्या अंगीं पुढें कधींही कर्तृत्व प्रगट होणार नाहीं.

मानवांतील जाती निसर्गजन्यच आहेत हें रा. गो. म. जोशी यांचें मत क्षणभर खरें मानलें तरीही त्या जातींची व्यवस्था मनुष्यकृत असल्यामुळें वरील तिन्ही गोष्टी गृहीत धराव्याच लागतात. ब्राह्मणाचे उद्योग दुसऱ्या कोणीही करावयाचे नाहींत, असा निर्बंध असल्यामुळें विद्यावृद्धीचें कार्य ब्राह्मण शतकानुशतकें सारख्याच जोमानें व यशानें करीत राहील असें गृहीत धरलें असलेंच पाहिजे. हीच स्थिति इतरांची. त्यामुळें वरील तीन गोष्टी गृहीत धरल्यावांचून चातुर्वर्ण्याची कल्पनाच अशक्य आहे.

गृहीत धरलेल्या या तीन गोष्टींपैकीं प्रत्येक गोष्ट खोटी आहे.

हिंदुस्थानचाच इतिहास पाहिला, तर असें स्पष्ट दिसून येतें कीं महाराष्ट्र, मद्रास, कनोज हे दोनतीन प्रांत सोडले तर इतर बहुतेक प्रांतात ब्राह्मण हा फार हीन व आपली विद्यावृद्धीची जबाबदारी पार पडण्यास सर्वस्वीं नालायक असाच झालेला आहे. महाराष्ट्र व रजपुताना यांखेरीज अन्य प्रांतांतले क्षत्रिय आपली स्वसंरक्षणाची जबाबदारी गेलीं पांच सातशें वर्षें पार पाडूं शकत नाहींत हें तितकेंच स्पष्ट आहे, व या दोन प्रांतांनाही पूर्ण यश आलेलें नाहीं तें नाहींच. खुद्द महाराष्ट्रांतला वणिग्वर्ग कोणच्याही कारणानें कां होईना नष्ट झालेला असल्यामुळें व इतरांनीं तें कार्य करावयाचें नाहीं, असा निर्बंध असल्यामुळें येथील लक्ष्मी धुवून गेली आहे. यावरून असें दिसतें कीं एकादा वर्ण शतकानुशतकें एक विशिष्ट जबाबदारी पार पाडण्यास समर्थ राहील, असें मानून त्याच्यावर तें कार्य सोपविणें समाजाला फार घातुक आहे.

चातुर्वर्ण्यरचनेंतला हा दोष तत्त्वतः नव्हे तरी निदान व्यवहारापुरता तरी ओळखून महाराष्ट्रांतील लोकांनीं ज्याला वाटेल त्यानें तलवार उचलावी व लागेल त्यानें परमार्थाचें अध्ययन–अध्यापन करावें अशी प्रथा पाडली व त्यामुळेंच सर्व जातींतील कर्त्या व्यक्तींच्या कर्तृत्वाला वाव मिळून महाराष्ट्र तरला. हीच दृष्टि वाणिज्याबद्दल ठेवून या बाबतींतही मराठ्यांनीं मनुस्मृतीला जरा बाजूला ठेवली असती तर महाराष्ट्र निर्धन झाला नसता. मोठमोठे सावकार महाराष्ट्रांत होऊन गेले; पण वाणिज्याच्या सर्व शाखा त्यांनीं व्यापल्या नाहींत एवढें खरें.

वंशधर्म किंवा जातिधर्म शाश्वत टिकून राहातात, हें मत किती भ्रामक आहे हें इतिहासाकडे पाहिलें तर स्पष्टपणें कळून येतेंच. पण जीवनशास्त्राचेंहि म्हणणें तसेंच आहे, असेंहि आपणांस दाखवितां येईल.

पुण्यामधले स्वयंमन्य समाजशास्त्रज्ञ रा. गो. म. जोशी हे पाश्चात्य पंडितांचें नांव घेऊन, व बायॉलजीचा आधार सांगून समाजविचाराच्या या प्रांतांत आज बरींच वर्षें गोंधळ घालीत आहेत. नवीन निघालेलें जीवनशास्त्र आनुवंशाच्या व त्यामुळें चातुर्वर्ण्याच्या सर्वस्वीं अनुकूल आहे व मनूचा प्रत्येक शब्द त्याअन्वयें खरा कसा ठरतो असें दाखविण्यासाठीं त्यांची बरीच सर्कस चालू आहे. तेव्हां पाश्चात्य जीवन शास्त्रज्ञ या बाबतींत काय म्हणतात तें पाहणें अगत्याचें आहे.

‘ Inequality of man ’ या पुस्तकांत प्रो. हाल्डेन म्हणतो कीं, Biology does not support the idea that the hereditary principle is a satisfactory method of choosing men or women to fill up

a post. ' ( पान १८ ) मानवावर परिस्थितीचा फार परिणाम होतो, त्याचे गुण कायम टिकत नाहींत म्हणून तो म्हणतो—

If human beings could be propagated by cutting ( कलम करून ) like apple treεs, aristrorcacy would be biologically sound.

एच्. एस. जेनिंग्ज यानेंहि असेंच मत दिलें आहे.

Biological Basis of Human Nature या पुस्तकांत एका प्रकरणांत बॉयालजीच्या नांवावर विकणाऱ्या अनेक भ्रामक समजुतींची त्यानें एक यादी दिली आहे. त्यांतील दोन भ्रम असे आहेत.

(1) The fallacy that showing a characteristic to be hereditary proves that it is not alterable by environment. (2) The fallacy that superior individuals must have come from superior parents and that it will continue to happen. ( पानें २१४ व १६. )

थोर पुरुषांचे वाडवडीलही थोर होते, असें दाखविण्याचा चरित्रलेखकांचा जो अट्टाहास असतो, त्याच्या बुडाशीं हीच समजूत असते. तसें असणें पूर्णपणें शक्य आहे हें खरें; पण नसणेंहि तितकेंच शक्य आहे हें आतां लोकांनीं ध्यानांत घ्यावयास हरकत नाहीं.

एक जात किंवा एक कुल शतकानुशतकें सारखें कार्यक्षम राहील, असें मानून तिच्यावर एकादें महत्त्वाचें कार्य कायमचें सोपविणें हें इतिहास व शास्त्र या दोघांनाही कसें संमत नाहीं हें दाखविलें. चातुर्वर्ण्याच्या बुडाशीं असलेल्या दुसऱ्या दोन्ही कल्पनाहि कशा भ्रामक आहेत तें आतां पाहूं.

वर्णव्यवस्था कायमची करून टाकण्यांत दुसरें असें गृहीत धरावें लागतें कीं मूळ व्यवस्थेच्या वेळीं ब्राह्मण हे बुद्धीसाठीं व क्षत्रिय शौर्यासाठीं जर निराळे केले तर त्यांच्यांत अनुक्रमें बुद्धि व शौर्य या गुणांखेरीज अन्य गुण दिसणार नाहीं. व नियत कर्मांखेरीज अन्य कर्में त्यांस साधणार नाहींत. असें गृहीत न धरावें तर एक तर आनुवंशाला कांहींच किंमत नाहीं असें होईल. व दुसरें असें कीं नियत गुणाखेरीज भिन्न गुण त्या वर्णांत उत्पन्न होऊं शकतील असें धरूनहि मनूनें त्यांचा विकास होऊं न देण्याची व्यवस्था केली असें म्हणावें लागेल. पण मनूवर असला आरोप करावा असें मला वाटत नाहीं. आनुवंशावरील असीम विश्वासामुळें एका वर्णांत अन्य गुण निर्माण

होऊं शकणार नाहींत असेंच त्याला वाटत असावें व म्हणूनच, त्यानें कायमची व्यवस्था केली असावी. पुढील अनुभवानें ती कल्पना चूक ठरल्यामुळें ती व्यवस्था बदलणें हें पुढीलाचें कर्तव्य होय. यांत मनूवर कांहीं दोषारोप करितां येईल असें मला वाटत नाहीं. पण मनूवर दुष्टपणाचा आरोप करणारे जसे त्याचे शत्रु होत, तसेंच आपल्या कल्पना त्याच्यावर लादून त्याचा आधार घेतांना त्याला हास्यास्पद करून टाकणारे अर्वाचीन समाजशास्त्रज्ञहि त्याचे शत्रुच आहेत असें मला वाटतें.

एक वर्ण एकच गुण दाखवील, अन्य कर्म त्यास साधणार नाहीं ही कल्पना पहिल्या कल्पनेइतकीच खोटी आहे. महाराष्ट्रांतील ब्राह्मणवर्ग पहा. कर्तृत्वाची एकहि शाखा अशी नाहीं कीं ज्यांत ब्राह्मण अलौकिक पदाला चढला नाहीं. भास्कराचार्य, ज्ञानेश्वर, रामदास, रामचंद्रपंत अमात्य, रामशास्त्री प्रभुणे, डॉ. भिसे, रँ. नारळीकर, प्रि. महाजनी, डॉ. कोकटनूर, श्रीमत् कुवलयानंद, नाना फडणीस, आगरकर, डॉ. गोखले ( अमेरिका ), टिळक, रानडे, राजवाडे, लिमये ( निधोन ) हे लोक ब्राह्मणांच्या बुद्धिवैभवाची साक्ष देतील. पेशवे, प्रतिनिधि, पटवर्धन, पानसे, गोखले, मेहेंदळे, विंचुरकर हीं घराणीं क्षात्रतेज दाखवितील. रामचंद्र नाईक परांजपे (सावकार), बारामतीकर जोशी, गोखले, गद्रे, किर्लोस्कर, ओगले, टिकेकर हे लोक सरस्वतीप्रमाणेंच लक्ष्मीलाहि ब्राह्मण प्रसन्न करूं शकेल हें सिद्ध करतील. त्रैवर्णिकांची ही त्रिविध विद्या तर ब्राह्मणांत दिसतेच; पण ज्या कलांची उपासना ब्राह्मणानें मुळींच करूं नये, असें मनूनें सांगितलें आहे,(३-६४) त्याही हस्तगत करून ब्राह्मण तेथेंहि शिखराला गेला आहे. शिल्पकार करमरकर, फडके; नट गणपतराव जोशी, दाते; गवई पलुस्कर, गंधर्व, वझले; नकलाकार भोंडे या मंडळींनीं कलांचें क्षेत्रहि व्यापलें आहे. अमुक एक वर्ण अमकेच गुण दाखवितो हें समजणें किती चूक आहे व त्या अन्वयें त्याला इतर कामें करण्याची मनाई करणें कसें घातुक आहे, हें सिद्ध करण्यास आणखी पुरावा पाहिजे काय ?

आणि पाहिजेच असला तर ज्यू लोकांचा इतिहास पहा. युरोपमध्यें प्रत्येक देशांत यांचा अनन्वित छळ झाला. प्रत्येक ठिकाणाहून त्यांना हाकालण्यांत आलें. त्यांच्या कत्तलीहि झाल्या. समाज त्यांना जवळजवळ अस्पृश्य लेखी व ते अगदीं अस्सल कवडीचुंबक व उलट्या काळजाचे सावकार आहेत, असें म्हणून त्यांना अगदीं खायला उठे. पण त्यांचा छळ बंद झाल्याबरोबर त्यांनीं एवढें अलौकिक बुद्धिवैभव प्रगट केलें कीं, आज जगांतल्या प्रत्येक सुशिक्षिताचा श्वासोच्छ्वास ज्यूंनीं चालविला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. रिलेटिव्हिटीचा सिद्धान्त सांगणारा जगन्मान्य

गणितीं आइन्स्टाइन्, अंतर्मन–बहिर्मन ही उपपत्ति बसविणारा मानसशास्त्रज्ञ फ्राइड, एलान्व्हाइटल हें तत्त्व सांगणारा तत्त्ववेत्ता बर्गसन्, व ज्याचें अर्थशास्त्र जग आकंठ पिऊन राहिलें आहे, तो कम्युनिझमचा प्रणेता कार्ल मार्क्स हे सर्व ज्यू आहेत. डिझरायलीसारखे राजकरणी यांच्यांत होतात. युरोपअमेरिकेचीं कित्येक न्यायासनें यांनीं मंडित केलीं आहेत. फ्रेड्रिक एन्जल्स, त्रात्स्की, हेहि ज्यूच आहेत. राशेल, बर्नहार्ट यांसारख्या नट्यांनीं रंगभूमिवरही अलौकिक यश मिळविलें आहे. एकीकडे युरोपांत ज्यू असे वैभवाला चढत असतांना इकडे कोंकणांत कुलाबा जिल्ह्यांतील आवास गांवीं त्यांचेच पुष्कळ जातभाई लंगोट्या नेसून तेलाचा धंदा करीत आहेत.

मूळ विभागणीच्या वेळीं जे गुण ज्या वर्णांत दिसतात, ते त्यांत कायम टिकत नाहींत व त्याशिवाय अन्य गुणांची निपज त्यांत होते, या दोन गोष्टींमुळें तर कायमची वर्णव्यवस्था घातुक आहेच; पण या व्यवस्थेवर याहीपेक्षां बलवत्तर आक्षेप येतो तो असा कीं, त्या विभागणीच्या वेळीं ज्या जाती हीन, नाकर्त्या, शूद्र असतील त्या पुढें वाटेल तितक्या पराक्रमी होऊं शकतात, ही इतिहाससिद्ध गोष्ट त्या व्यवस्थेंत दृष्टीआड केली जाते.

शतकानुशतकें हीन स्थितींत असलेल्या जाती एकदम कसा अतुल पराक्रम करूं शकतात, याचीं उदाहरणें इतिहासांत थोडीं नाहींत. मोंगल व तार्तर लोक कित्येक शतकें धनगराचा पेशा पाळून होते; पण त्यांनीं एके काळीं तलवार उचलून सर्व जगाला त्राहि भगवान् करून सोडलें. आरबांचें उदाहरण याहिपेक्षां निर्णायक आहे. तेहि असेच धनगर होते. पण महंमदानें त्यांच्यांत जी कांहीं अद्भुत जीवनशक्ति भरली, तिच्या प्रभावानें त्यांनीं त्रिखंड जिंकलें, एवढेंच नव्हें तर आर्य ब्राह्मणांच्या तोडीची विद्वत्ताही प्रगट केली. महंमद बीन जबीर, अरकाझेल, चंद्राच्या विषमगतीचा शोध लावणारा महंमद अबूल फीझल, हे ज्योतिर्विद, दृक्शास्त्रवेत्ता अल्हाझेन, रसायनशास्त्री गीबर, कायदेपंडित शफी व मलिक हे सर्व पंडित आरब होते. सुप्रसिद्ध हरूण अल् रशीद् हा राजा त्यांचाच व जगाला दिव्य मोहिनीनें भारणारें अरेबियन नाईटस् त्यांचेंच. अरबस्तानांत किंवा तुर्कस्तानांत मनुस्मृति असती, व त्यांनीं ती पाळली असती तर या जातींचा उदयच झाला नसता. व असें अनेक वेळां मनांत येतें कीं, ज्यांना आम्ही निकृष्ट वर्ग म्हणून ठरवून टाकले आहेत, त्यांच्यांतूनहि, येथें मनुस्मृतीचे आंधळे अनुयायी नसते तर, आरबांसारखेच पराक्रमी लोक निर्माण झाले असते. बाजीरावानें संधि दिल्याबरोबर धनगरांनीं मल्हाररावासारखा वीरमणी निर्माण केलाच ना ?

वंशाचे, वर्णाचे, जातीचे गुण शतकानुशतकें कायम टिकतात असें म्हणणारे, वंशधर्म शाश्वत व न बदलणारे आहेत असें मानणारे युरोपांतही कांहीं पंडित आहेत. व ते नाचलेले पाहून आपणांहि नाचणारे रा. गो. म. जोश्यासारखे आमच्याकडेहि लोक आहेत. वंशधर्मामध्यें फरक पडला तर फक्त संकरानेंच पडेल असें हे लोक म्हणतात. त्यांना एवढेंच सांगावयाचें कीं, त्यांनीं हिंदुस्थानांतील नाकरत्या झालेल्या ब्राह्मणजातींत, भिन्न गुण दाखविणाऱ्या कोंकणस्थ, देशस्थ वगैरे महाराष्ट्रांतील ब्राह्मणांत, ज्यू लोकांत, शूद्रत्वांतून क्षत्रियत्वास चढणाऱ्या मोंगल व तार्तर लोकांत व ब्राह्मणत्वास येणाऱ्या आरब लोकांत संकर झाला आहे असें प्रथम सिद्ध करावें व नंतर संकरानें इतक्या उत्कृष्ट प्रजेची निर्मिती होत असल्यास संकराचा निषेध ते कां करतात त्याचा खुलासा करावा.

चातुर्वर्ण्याच्या बुडाशीं असलेल्या पहिल्या गृहीत गोष्टीप्रमाणेंच दुसऱ्या व तिसऱ्या गोष्टीही इतिहासविरुद्ध आहेत असें दिसून आलें. आतां शास्त्र त्या बाबतींत काय म्हणतें तें पाहूं.

एका घराण्यांत किंवा जातींत अमुक एकच विशिष्ट गुण वाढेल, अन्य वाढणार नाहीं असें धरून त्या लोकांना अन्य कर्में करण्याची बंदी करणें हें इतिहासाप्रमाणेंच जीवनशास्त्रालाही नामंजूर आहे. जेनिंग्ज म्हणतो—

Each individual has the possibility of many diverse careers.

आरंभींच दिलेला वॅटसन्चा उतारा देऊन त्यावर टीका करतांना तो म्हणतो कीं ( भिन्न वंशासंबंधीं हें म्हणणें खरें नसलें तरी )

'Such a population identical as to genesis in all its components would realize the situation postulated by Watson.'

म्हणजे एकाच रक्ताचीं दहा मुलें घेतलीं तर त्यांतल्या वाटेल त्याला वकील, डॉक्टर, व्यापारी, शास्ता, भिकारी किंवा चोरसुद्धां करण्याची करामत शक्य आहे.

गाल्टननें असेंच मत दिलें आहे. 'Moreover as statistics have shown that the best qualities are largely co-related, the youths who become judges, bishops, statesmen and leaders of progrees could have furnished, formidable athletic

teams in their times ( Life and letters of Sir Francis Galton by Karl Pearson Vol. III pp. 273. )

एकाच कुलांत धर्म, न्याय, राजकारण, शिल्प, वगैरे अनेक कार्याला लागणारे गुण निर्माण होणें शक्य असतांना त्या कुलावर तुम्ही अमुकच काम करा व इतर गुण वाया घालवा, फार तर आपत्प्रसंगींच उपयोगा, असा निर्बंध घालणें म्हणजे त्या गुणांचा जाणूनबुजून नाश करण्यासारखें आहे.

अनेक पिढ्या असें करीत राहिलें तर तो एकच निवडलेला गुण शुद्ध होत जाऊन जास्त प्रबळ होत जाईल असें म्हणणें असेल तर तेंही खरें नाहीं. सर्वसामान्य कर्तृत्व वाढत जाईल; पण अमुकच एक गुण वाढत जाईल, हें इतिहासावरून दिसत नाहीं. ब्राह्मणांच्या कर्तृत्वासंबंधीं वर सांगितलेंच आहे. अनेक शतकांच्या शुद्धतेनें बुद्धि हा एकच गुण शुद्ध झाला असें नसून सर्व कर्तृत्वच वाढलें असें दिसतें. यावरून वर्णाप्रमाणें श्रमविभाग करणें अत्यंत चुकीचें असून प्रत्येकाला सर्व क्षेत्रें मोकळीं ठेवलीं पाहिजेत, या विधानाबद्दल शंका राहीलसें वाटत नाहीं.

एका वेळेला ज्यांच्यांत मुळींच गुण दिसत नाहींत, जे आरब तार्तार, धनगर यांच्यासारखे अगदीं हीन असतात, त्यांच्यांत पुढें कधींही उत्तम गुणांची पैदास होणार नाहीं, ते उच्च पदाला चढूं शकणार नाहींत, म्हणून त्यांना संधि देण्याचें मुळींच कारण नाहीं, ही जी चातुर्वर्ण्याच्या बुडाशीं असलेली तिसरी कल्पना ती इतिहासाला संमत नाहीं,हें वर आपण पाहिलेंच आहे.आतां थोडें बायॉलजींत शिरूं.

पित्याप्रमाणेंच पुत्र होतो हें जरी सामान्यतः खरें असलें तरी पितापुत्रांत, किंवा एकाच पित्याच्या अनेक पुत्रांत जमीनअस्मानाचें अंतर असूं शकतें, हेंही खरें आहे. हें अंतर–हा फरक कां पडत जातो, याचा विचार करून शास्त्रज्ञांनीं त्याचीं अनेक कारणें दिलीं आहेत.

( १ ) परिस्थिति—दोन सख्खे भाऊ, इतकेंच नव्हे तर जुळे भाऊहि जर भिन्न परिस्थितींत वाढले तर त्यांच्यांत वाटेल तितका फरक पडूं शकतो, हें म्यूलर, न्यूमन वगैरे ' जुळ्यांच्या ' अभ्यासकांनीं सांगितलें आहे. ( २ ) संकरानें फरक पडतो हें सर्वमान्य आहे. ( ३ ) ज्या जीवन गोलकांपासून एका पुत्राचा जन्म झाला, त्या जीवन गोलकाच्या रचनेंतच एकाद वेळीं फरक होऊन दुसऱ्या पुत्राचे गुणधर्म बदलतात. अशीं हीं तीन कारणें झालीं. याहून निराळें व चौथें कारणही शास्त्रज्ञांनीं मान्य केलें आहे, व तें (४) म्हणजे जीवनगोलकांतच अजीबात-फरक पडणें हें होय. कांहीं एक ज्ञात कारण नसतांना असे फरक पडतात असें शास्त्र

ज्ञांचें म्हणणें आहे. फरकांचे वरील तिन्ही प्रकार सांगून Gene Mutation नांवाचा चौथा प्रकार सांगतांना सिनॉट.अँड् ड्न आपल्या Principles of Genetics या पुस्तकांत म्हणतात—

A gene mutation is a sudden change in a restricted region of a chromosome, resulting in the appearance of a **new** gene while other germinal variations may be due to changes in numbers, arrangement or balance of chromosomes. ( आवृत्ति सन १९३५ पान ३२३ )

Evolution of living organism या पुस्तकांत ( सन १९१२ पान ४८ ) E. S. Goodrich F. R. S. हा म्हणतो कीं,—At some period in evolution **new** factors must have been introduced into the inheritance and the process is presumably still going on.

ज्यूलिअन हक्स्ले व एच्. जी. वेल्स यांनीं आपल्या Science of Life या ग्रंथांत ( १९३० पान ३६० ) या फरकांचा विचार केला आहे. कांहीं विशिष्ट प्रकारच्या प्रकाशकिरणांनीं प्राण्यांच्या जीवन गोलकांत फरक पाडतां येतो, असें सिद्ध झालें आहे, असें सांगून ही प्रक्रिया सृष्टींतही चालू असावी असें त्यांनीं आपलें मत दिलें आहे. व हीच उपपत्ति एच्.एस्. जेनिंग्ज् यानें आपल्या The Biological Basis of Human Nature या पुस्तकांत मान्य केली आहे. तो म्हणतो—

There is no reason for doubting that gene mutations occur in man as they do in other organisations. A race of men will in the course of time become heterogenous through occurance of mutations, quite without mixture with another race. Doubtless much of the varieity in human population is due to this cause.

नसलेले गुण निर्माण होतात असें फार तर म्हणूं नये, पण हजारों वर्षे ज्ञात नसलेले गुण एकदम दिसूं लागून वंशाचे गुणधर्म बदलतात असें शास्त्रज्ञ स्पष्ट म्हणत आहेत. आणि हजारों वर्षें जे गुण दिसले नाहींत, ते नव्हते असें म्हणण्यास तरी अडचण कोणची. संकर न होतां एका शुद्ध वंशांत फरक पडत जाईल हें जेनिंग्जूचें वचन अगदीं निःसंदेह आहे. तरी ' आपोआप फरक पडत नाहींत, नसलेले गुण निर्माण होत

नाहींत, ' अशी वर सांगितलेल्या गो. म. जोश्यांची भुणभुण चालूच आहे.(हिं. स. शास्त्र पानें ४०३–४ ).वर सांगितलेला फरक हा एका पिढीपुरता नसून आनुवंशिक होत जातो, असें या सर्व शास्त्रज्ञांनीं सांगितलें आहे. ( जेनिंग्ज् पान ३०१–३०२).

वंशाच्या गुणधर्मांत कधींच फरक पडत नाहींत हा सिद्धान्त हीन जातींना अत्यंत निराश करणारा आहे.व त्यामुळें दैवाला हात लावण्यापलीकडे त्यांना कांहींच करतां येण्यासारखें नाहीं असा समज पसरण्याचा संभव आहे. आणि याला जीवन-शास्त्राचा आधार आहे, असे कांहीं वेडगळ लोक सांगत फिरूं लागल्यानें समाजाचें मोठें नुकसान होईल असें वाटतें. याबद्दल जेनिंग्ज् म्हणतो—

The fallacy appears popularly in the notion of inevitableness, the fatality of what is heredity.

पण हा निराशाजनक विचार अगदीं निराधार आहे असें त्यानें स्पष्ट सांगि-तलें आहे.

वर्णांच्या बाबतींत जें दिसलें तेंच कुलांच्याहि बाबतींत दिसून येईल. थोर कुलांतच थोर व्यक्ति निर्माण होतात असें नाहीं आणि थोर कुलांत थोर व्यक्ति निर्माण होतातच असेंहि नाहीं. पिल्ग्रिम्स् प्रोग्रेसचा कर्ता बन्यन हा कल्हईवाल्याचा मुलगा, कोलंबस कोष्ट्याचा, क्रॉमवेल कलालाचा, डेफो खाटकाचा, डेमॉस्थेनीस, शिकलगाराचा, होमर शेतकऱ्याचा, शेक्सपीयर विणकऱ्याचा, वूल्से खाटकाचा, साक्रेटीस पाथरवटाचा, वाशिंग्टन शेतकऱ्याचा मल्हारराव धनगराचा, राणोजी स्वतः पैजार उचलणारा, ही ' अस्पृष्टांच्या प्रश्नांत ' माटे यांनीं दिलेली यादी पाहिली व त्यांत कोळ्याचा वाल्मिकी, लोहाराचा मुसोलिनी, चांभाराचा स्टॅलिन्, सुतारीचा धंदा स्वतःकरणारा हिटलर, पाकिटावर पत्ते लिहून पोट भरणारा मॅक्डोनॉल्ड प्रथम हुजऱ्या असून पुढें फील्ड मार्शल झालेला राबर्टसन् यांची भर घातली म्हणजे ' यस्मिन् कुले त्वमुत्पन्नः गजस्तत्र न हन्यते ' हा पशूंचा सिद्धान्त माणसांना लावणें कसें चूक आहे तें ध्यानांत येईल. व आनुवंशाचा सिद्धांत कांहीं एका मर्यादेबाहेर खेचणें किती हास्यास्पद आहे तें कळून येईल.

कॅटेल नांवाच्या अभ्यासकानें हेच मत दिलें आहे. तो म्हणतोः—

थोर घराण्यांतच थोर व्यक्ति निर्माण होतात हें खरें असलें तर एक उच्च वर्ग समाजांत कायमचा निराळा ठेवण्यास तें पुरेसें कारण आहे. आईबापांच्या पिण्डगत गुणावरून ती व्यक्ति पुढें कशी होईल हें निश्चित ठरवतां येईल तर सर्वांना सारखी

संधि ( Equality of opportunity ), शिक्षण, सामाजिक सुधारणा यांतल्या कशालाच अर्थ नाहीं. पण हें एकांतिक मत टिकणें शक्य नाहीं. उलट वाटेल त्या मुलाला शिक्षण व संस्कार या साधनांनीं वाटेल त्या पदाला चढवतां येईल, हेंही मत तितकेंच एकांतिक आहे.

[ Study of America's one thousand leading Scientists' families; Popular Science monthly 1915. ]

कोणाही समंजस व अनाग्रही माणसाला हें म्हणणें पटेल असें वाटतें. आनुवंशाला मुळींच किंमत नाहीं असें मी म्हणत नाहीं. त्यामुळें उच्च कुलांना जपूं नये असेंही नाहीं. उच्च कुलांना जपणें, त्यांच्या रक्तांत हीन रक्ताची मिसळ न होऊं देणें याबद्दल समाजानें फार खबरदारी घ्यावयास पाहिजे यांत शंकाच नाहीं; पण एकदां ज्यांना उच्च म्हटलें तीं कायम उच्च व हीन हीं कायम हीन राहतात हा समज चुकीचा आहे. व त्यामुळें चातुर्वर्ण्य ही समाजव्यवस्था चुकीची व घातुक ठरते.

हिंदुस्थानचा जो अधःपात झालेला दिसतो त्याला चातुर्वर्ण्य व जातिभेद सर्वस्वीं जबाबदार आहेत, असेंही मला म्हणावयाचें नाहीं. पण अनेक कारणांपैकीं तें एक आहे यांत शंकाच नाहीं. सर्वांच्या गुणविकासाला येथें संधीच न मिळाल्यामुळें येथें गुणांची पैदास फारच थोडी होऊं लागली. ब्राह्मणादि जातींत जास्त कर्ते पुरुष निर्माण होतात हें जरी खरें असलें तरी इतरांना ब्रह्मक्षत्रांचीं कर्में करूं देण्यास कांहींच हरकत नाहीं. ब्रह्मक्षत्रांनीं इतके गुण निर्माण केलें कीं आतां जास्त पराक्रम झाला तर तोटा होईल, अशी स्थिति खास आलेली नाहीं. त्यामुळें प्रत्येकास वाटेल त्या क्षेत्रांत कर्तृत्व दाखविण्यास मोकळीक असणें व जें घराणें कांहीं पिढ्या तसें दाखवील त्याला श्रेष्ठ समजून त्याला जपणें हें समाजरचनेंत आद्य तत्त्व असावयास पाहिजे.

हॉल्डेननें आपल्या Inequality of Man या निबंधाच्या शेवटीं हेंच सांगितलें आहे. 'विषमता दिसून आल्यानें 'सर्वांना सारखी संधी' हें तत्त्व कमी तर नव्हेंच पण जास्तच जोरानें प्रतिपादावयास पाहिजे असें तो म्हणतो.

आपला समाज चातुर्वर्ण्य पूर्णपणें पाळण्याइतका वेडगळ कधीं होता कां नाहीं तें नक्की सांगतां येत नाहीं. पण महाराष्ट्रांत गेल्या एक हजार वर्षांत तरी तें बहुतेक सर्व वर्णांनीं व्यवहारांत तरी मोडलें आहे.

तत्त्वतः मोडण्याइतकी बुद्धीची रग आगरकरापर्यंत कोणींच दाखविली नाहीं ही फारच दुर्दैवाची गोष्ट आहे. पण हें दुर्दैव येथेंच संपत नाहीं. व्यवहारांत तें कोणीच

पाळींत नसतांना व पाळणें शक्य नाहीं, वेडेपणाचें आहे, हें स्पष्ट दिसत असतांना बहुतेक सर्व सुशिक्षित–अशिक्षित हिंदूंमध्यें चातुर्वर्ण्याचा अभिमान मात्र ओतप्रोत भरलेला आहे. वर्णाश्रमस्वराज्यसंघ हीं एक विलक्षण चीज आहे. साठी उलटून गेल्यावरही सावकारी किंवा व्यापार करणारे ब्राह्मण, क्षत्रिय, चातुर्वर्ण्याचा अभिमान सांगतांना पाहिले म्हणजे ती चीज खरोखर पहावीशी वाटतें. वर्ण व आश्रम या दोहोंची कल्पना यांना नसली पाहिजे किंवा हे लोक ढोंगी, लुच्चे असले पाहिजेत, असें प्रथम मनांत येतें. पण आपलीं मतें पारखून घेऊन तीं आपल्या आचरणाशीं विसंगत नाहींतना, हें पाहणें हजारांत एकही मनुष्य करीत नसतो, हें ध्यानांत आलें म्हणजे तो विचार मागें पडतो.

पण चातुर्वर्ण्याचा हा भ्रम जितक्या लवकर जाईल, तितकें समाजाच्या हिताचें आहे. प्रत्येकाच्या गुणविकासाला पूर्ण संधि मिळून कुजत पडलेल्या व पाडलेल्या अनेक जातींचें कर्तृत्व वाढीस लागेल. व या मृतप्राय झालेल्या सनातन पुरुषाच्या अंगीं थोडें तरी चैतन्य त्यामुळें खेळूं लागेल.

---

# रक्तसंकर व वृत्तिसंकर

फार पुरातन काळापासून आपल्याकडे संकर हा अत्यंत निंद्य मानला आहे. एकाद्या समाजाला फार भयंकर भीति घालावयाची असली तर वर्णसंकर होईल असें म्हटलें कीं झालें. पुराण कालांत संकर मान्य होता, पण त्याचे दुष्परिणाम दिसल्यामुळें स्मृतिकारांनीं तो निषिद्ध ठरविला व याज्ञवल्क्याच्या काळापर्यंत अनुलोम, प्रतिलोम वगैरे सर्व प्रकारचे विवाह बंद झाले. दोन रक्तांच्या मिश्रणासंबंधीं आजही जवळजवळ तीच भावना आपल्याकडे कायम आहे. मिश्रविवाहाची चळवळ चालू असली तरी दोन पोटजातींत विवाह होण्यास हरकत नाहीं, असें कांहीं सुशिक्षितांचें मत व त्याहूनही थोड्यांची कृति यापलीडे मजल गेलेली नाहीं. यावरून आपल्या समाजाला मिश्रविवाहाची अजून भीति वाटते असें दिसतें.

आपल्या पूर्वजाप्रमाणें आज जर्मन लोकांनींही रक्तशुद्धीची चळवळ सुरू केली आहे. जाती, पोटजाति, उपपोटजाति पाडण्याचा हिटलरचा विचार आहे कीं

नाहीं, तें अजून कळलें नाहीं. पण आर्यन् रक्त सोवळें ठेवण्याचे त्याचे प्रयत्न आहेत एवढे खास. पण त्या आर्यन रक्तांत हिंदूंची तो गणना करीत नाहीं; एवढेंच नव्हे तर फ्रेंच किंवा इंग्रज हेही त्यांत तो धरीत नाहीं.

रायव्हलस ऑफ व्हाईट मॅन या निबंधांत डीन इंग यानें म्हटलें आहे कीं, 'सर्व समाज एका पातळीवर आणूं पाहाणाऱ्या साम्यवादापेक्षां किंवा लोकशाहीपेक्षां युरोपांत परवापर्यंत असलेली जातिसंस्थाच समाजाचें तारण करूं शकेल, असें वाटतें. मात्र ती जातिसंस्था हिंदुस्थानांतल्याप्रमाणें कडक असावी असें मला वाटत नाहीं. ( औट स्पोकन एसेज पान २३० ) या लेखकानें आपल्या या मताची चर्चा कोठेंच केलेली नाहीं. वर सर्व निबंधांत जातिसंस्थेचा कोठें उल्लेखही नाहीं. पुढील निबंधात रक्तसंकर हितावह आहे असें यानेंच सांगितलें आहे. तरी पण ' A modified caste system may have a greater survival value than either democrcy or socialism ' असें त्यानें म्हटलें आहे हें खरें.

बर्ट्रांड रसेल यानें आपल्या सायंटिफिक औटलुक या ग्रंथांत असेंच म्हटलें आहे, असें रा. गो. म. जोशी यांचें म्हणणें आहे व स्वतः जोशी यांनीं आपल्या हिंदूसमाजरचनाशास्त्रांत तर देशस्थ, कोकणस्थ या पोटजातींत सुद्धां विवाह होणें अनिष्ट आहे, असें जोरानें प्रतिपादलें आहे ( पान २३१ ).

येणेंप्रमाणें या पंडितांनीं निंद्य, निषिद्ध व भयावह मानलेला जो रक्तसंकर त्याबद्दल म्हणजे तो घडवून आणणें हितावह आहे कीं विनाशक आहे, याबद्दल या निबंधांत विचार करावयाचा आहे.

संकराचा विचार करूं लागतांच संकर म्हणजे काय असा प्रश्न पुढें येतो. दोन भिन्न रक्तांच्या घराण्यांतील स्त्रीपुरुषांचा विवाह असें उत्तर चटकन् देतां येईल. पण भिन्न रक्त म्हणजे काय हाच तर महत्त्वाचा प्रश्न आहे. भिन्न रक्त दाखवावयाचें म्हणजे ज्या दोन जाती किंवा वंश यांच्याबद्दल आपण बोलत असूं, त्यांच्यामध्यें शरीराची ठेवण, मनाचे कल व बुद्धीची ऐपत ही एकमेकांहून फार निराळी आहे, असें दाखविलें पाहिजे व असें दाखवितां आलें तरी, पुढें त्या दोन रक्तांचें मिश्रण झालें तर पुढील संतती हीन प्रकारची होईल हें सिद्ध करतां आलें पाहिजे. नाहींतर वरील तिन्ही गोष्टी दाखवितां आल्या तरी त्यावरून त्या दोन जातींमध्यें रक्तसंकर अनिष्टच आहे असें निश्चयानें म्हणतां यावयाचें नाहीं.

कांहीं रक्तें म्हणजे कांहीं वंश परस्परांपासून अगदीं भिन्न आहेत, हें साध्या

डोळ्यालाही दिसतें. इंग्रज व शिद्दी यांच्यामध्यें शरीर, मन व बुद्धि यांत कोणच्याही प्रकारचें साम्य नाहीं व त्या दोघांमध्यें मिश्रण व्हावें, असें कोणीही मनुष्य म्हणत नाहीं. इंग्रज व निग्रो किंवा आफ्रिकेंतल्या इतर जाती, किंवा स्पॅनिश व दक्षिण अमेरिकेंतल्या जाती, किंवा ब्राह्मण व हिंदुस्थानांतल्या अस्पृष्ट जाती, यांच्यामध्यें विवाह घडवून आणावे कीं काय, असा प्रश्न आज कोणी नेटानें उपस्थित करीत नाहीं. त्याचाही विचार करावयाचा आहेच. पण तो प्रश्न जरा गौण आहे. या प्रश्नाला फार महत्त्व येतें तें इंग्रज, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, इटालियन वगैरे युरोपांतले गट किंवा देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे, सारस्वत, प्रभु, क्षत्रिय, मराठे हे महाराष्ट्रीय गट यांच्यामध्येंही रक्तमिश्रण होऊं नये असें सांगतात त्यावेळीं. संस्कृति, रूप, गुण, परंपरा या बाबतींत या दोन संघांतील गटांमध्यें बरेंच साम्य आहे. यांचे मिश्र-विवाह निषिद्ध म्हणून सांगितले म्हणजे यांचींही रक्तें भिन्न आहेत काय व असल्यास तीं कशावरून असा प्रश्न निर्माण होतो.

हिंदुस्थानांत रक्तें भिन्न आहेत याचा एक ढोबळ अर्थ तरी सांगतां येईल. येथें ज्या दोनचार हजार जाति आहेत, त्यांच्यामध्यें आज दोन अडीच हजार वर्षे लग्नें होत नाहींत. आणि म्हणूनच त्यांचीं रक्तें भिन्न आहेत असें म्हणावें असें कोणी म्हणतात. एकाच रक्ताच्या लोकांचे दोन गट केले व एकमेकांत लग्नें न करतां ते गट बरींच वर्षे राहिले तर त्यांच्यांत कांहीं वैशिष्ट्य निर्माण होतें, त्यांच्या रक्तांत भिन्नपणा येतो, असें गेट्सनें म्हटलें आहे. ( हेरीडिटी व युजेनिक्स ) व त्याच्याच आधारानें गो. म. जोशी यांनीं पण म्हटलें आहे. पण गेट्सनें याचा अर्थ कोठेंच स्पष्ट केलेला नाहीं. व जोशांनीं फक्त करतां येईल असें म्हटलें आहे. ( पान ८९ ) एके ठिकाणीं ( पान २३१ ) त्यांनीं कोंकणस्थ व देशस्थ यांच्यांतील वैशिष्ट्यें दाखवावयाचा प्रयत्न केला आहे. तो क्षणभर खरा मानला तरी दोन हजार जातींपैकीं निदान सातआठशें जातींचीं तरी वैशिष्ट्यें म्हणजे इतरांत नाहींत. असे त्यांच्या ठायीं स्पष्टपणें आढळून येणारे गुण दाखविल्यावांचून हीं इतकीं रक्तें भिन्न आहेत असें म्हणतां येणार नाहीं.

निसर्गांतच रक्तें भिन्न करण्याची प्रवृत्ति आहे, असें जोशांनीं आपल्या पुस्तकांत म्हटलें आहे. गेट्सच्या पुस्तकांतून त्यांनीं एक उदाहरण घेतलें आहे. सेबल बेटांत पोर्तुगिजांनीं कांहीं घोडे नेले. तेथें ते जंगलांत वाढले. पुढें तीनशें वर्षांनीं गिल्पिन नांवाचा प्रवासी तेथें गेला. त्याला असें आढळलें कीं त्या घोड्यांची संतति सदा

भिन्न गटांत राहते. व त्यांना एकत्र हाकून आणले तरी ते घोडे फिरून सहा ठिकाणीं विभक्त होतात. इतकें सांगून जोशांनीं मुळांत नसतांना ' ते घोडे सह-भोजन व सहविवाह करण्यास तयार नव्हते' असें खोटेंच वाक्य अवतरण चिन्ह देऊन त्याच्या तोंडीं घातलें आहे. गिल्पिन किंवा गेट्स कोणीही तसें म्हणत नाहीं. मुळांत नसतांना अवतरणांत वाक्य घालणें हें चूक आहे व गणितागत पद्धतीच्या चाहत्यांनीं एकाच उदाहरणावरून स्वतंत्रपणें आपणच अनुमान काढणें अशास्त्रीय आहे.

निसर्गातच रक्तें भिन्न करण्याची योजना आहे, म्हणजे एकदां एक असलेली रक्तें भिन्न करण्याची योजना आहे असें कोणी सिद्ध केलेलें नाहीं व हिंदुस्थानांत बेटीबंद जातिभेद असला तरी त्या जातीचीं रक्तें भिन्न म्हणजे काय, हेंही कोणी सांगितलें नाहीं. पण वर सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानांत रक्तें भिन्न आहेत, या बोलण्याला, भाषेच्या सोयीपुरता तरी अर्थ आहे. युरोपांत तर यांपेक्षांहि गोंधळ आहे. युरोपांत नॉर्डिक, मेडिटरेनियन, डिनॅरिक, अल्पाइन व ईस्ट बाल्टिक असे पांच भिन्न वंश आहेत असे म्हणतात. त्या सर्वांचे भिन्न गुणहि, म्हणजे तोंडवळा, केंस, उंची, स्वभाव, बुद्धि हे गुणहि गुंथुर यानें रेशल एलेमेंटस् इन युरोपियन हिस्टरी या पुस्तकांत दिले आहेत.

रक्ताचे हे विशिष्ट गुणधर्म सांगून त्यानेंच पुढें म्हटलें आहे कीं, इतिहासपूर्व-कालापासून या सर्वांचें सारखें मिश्रण होत आहे. तरी पण मौज अशी कीं, युरोपांत कोणच्या देशांत कोणचें रक्त प्रबळ आहे हें सांगण्याची त्याला हौस आहेच. डीन इंग, मॅक डुगल, गेट्स वगैरे आणखी अनेक पंडितांनीं याचा विचार केला आहे. मिश्रण सारखें अगदीं अनिर्बंध चालू आहे याबद्दल फारसा कोणाचा वाद नाहीं; पण तरी-सुद्धां आमच्या देशांत अमुक रक्त प्रबळ आहे हें सांगण्यासाठीं त्यांचा अट्टाहास आहे आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्यांच्यांत मुळींच एकवाक्यता नाहीं. ब्रह्म मुळींच दिसत नसल्यामुळें तें त्रिकोणी, चौकोनी कीं वाटोळें याबद्दल वाद होणें सहाजिक आहे. पण मोजमापें, फोटो, कर्तृत्वाचा इतिहास इतकी सामुग्री पुढें घेऊन बसल्यानंतर ज्याला एक नार्डिक म्हणतो, त्यालाच जर दुसरा अल्पाइन म्हणूं लागला तर त्या फरक सांगण्यांत कांहीं जीव नाहीं हें उघड आहे. नॉर्डिक हा वंश या पांचांमध्यें श्रेष्ठ आहे, याबद्दल सर्वांचें एक मत आहे. जगांत जेथें कोठें पराक्रम झाला असेल तेथले लोक मुळांत नॉर्डिकच असले पाहिजेत, हा गुंथुरचा सिद्धान्तच आहे. हिंदु हे मुळांत नॉर्डिकच होते, असे तो म्हणतो आणि असा हा प्रभावशाली नार्डिक वंश त्याच्या मतें आज मुख्यत्वेंकरून जर्मनींत आहे. तो अगदीं शुद्ध आहे असें नव्हे. पण जर्मन रक्तांत मोठें प्रमाण नार्डिक रक्ताचें एवढें खास. डीन

इंगच्या मतें इंग्लंमध्यें नार्डिक रक्ताचें प्रमाण फारच मोठें आहे व वाटोळ्या डोक्याची अगदीं कनिष्ठ जात जी अल्पाइन त्या जातीचे जर्मन लोक आहेत, याबद्दल त्याला संदेहच नाहीं. (औट स्पोकन एसेज पान ८३) मॅक डुगलच्या मतानें इंग्रजांत शें.७० नार्डिक व ३० मेडिटरेनियन रक्त आहे. फ्रेंचांत नार्डिक २५ अल्पाइन ४० व मेडिटरेनियन ३५ असें प्रमाण आहे.व जर्मन लोक अगदीं अल्पाइन.(नॅशनल वेलफेअर अँड डिके पान १५१) अल्पाइन लोकांत विभतिपूजा फार, ते लोकशाहीला नालायक असें मॅक डुगल म्हणतो; व कैसर आणि हिटलर यांच्या सत्तेचीं उदाहरणें हेतो. पण इंग्लंडांत सॅक्सन लोक जर्मनींतूनच आले असल्यामुळें त्या दोघांच्या म्हणजे इंग्रज व जर्मन, यांच्या प्रवृत्ति सारख्या आहेत असें इतर कांहीं जणाचें म्हणणें आहे. ज्या नॉर्मन लोकांचा प्रभाव इंग्लंडमध्यें फार आहे, असे म्हणतात, ते नॉर्मनच मुळांत भिश्र रक्ताचे होते व त्यांचा वुइल्यम हा अकुलीन बाईचा मुलगा होता असे हॅवेलाक् एलिसनें सांगितलें आहे. या सर्व माहितीवरून रक्तें भिन्न आहेत व अमक्या रक्ताचें अमकें वैशिष्टय हें कितपत निश्चयानें सांगतां येईल, याचा वाचकांनींच विचार करावा. युजेनिक्स रिव्ह्यू या मासिकाच्या १९३५ च्या जानेवारीच्या अंकांत या वादावर एकानें फार सुंदर टीका केली आहे. तो म्हणतो, ऑस्ट्रियामध्यें गुंथुरनें शे. ३०–३५ नार्डिक रक्त आहे असें मागें लिहिलें होतें; पण तेव्हां जर्मनी व ऑस्ट्रिया यांचें भांडण झालें नव्हतें. आतां बहुतेक हें प्रमाण कमी होईल.

वर सांगितलेंच कीं युरोपांत रक्ताचें मिश्रण चालू आहे, याबद्दल वाद मुळींच नाहीं. तरी पण प्रत्येक जातीचें वैशिष्टय टिकून आहे असें सगळे म्हणतात. कांहीं शतकें गट निराळे राहिले तर वैशिष्टय वाढत जातें, असें म्हणणाऱ्या गेट्सलाही मिश्रविवाहानें वैशिष्टय नाहींसें होतें असें वाटत नाहीं. तो म्हणतो आज एक हजार वर्षें सारखें रक्तमिश्रण चालू असूनही इंग्रजांत भिन्नभिन्न वांशिक गुण अजूनही दिसून येतात. ( हेरिडिटी व युजेनिक्स पान २३२ )

या सर्व विवेचनावरून निघणारा निर्णय, मला वाटतें, अगदीं स्पष्ट आहे. युरोपांत पांची वंशांचें मिश्रण सारखे चालू आहे. अमुक एक वंश अमक्या ठिकाणीं जास्त प्रमाणांत आहे, असें निश्चयानें सांगतां येत नाहीं. अमक्या वंशाचा अमुक गुण याबद्दलही एकमत नाहीं. आणि इंग्रज, फ्रेंच, जर्मन, इटालियन यांच्यांत स्वभावाचे भिन्न कल असले तरी रक्तमिश्रणाचा व त्याचा कांहींएक संबंध नाहीं. रक्तें मिसळलीं तरी विशिष्ट गुण टिकून राहूं शकतात. भिन्न गुण असलेच तर परिस्थितीमुळें

असतील, परंपरेमुळें, किंवा संस्कारामुळें असतील. ते रक्तामुळें आहेत, या म्हणण्याला पुरावा नाहीं. व मिश्रविवाह झाल्यास वाईट असें म्हणण्याला तर अगदींच नाहीं. म्हणूनच इंग्रज, फ्रेंच वगैरे लोकांत आपापसांत विवाह करूं नये असें कोणचाहि पंडित किंवा शास्त्रज्ञ सांगत नाहीं. रक्तशुद्धीची चळवळ आज युरोपांत जोरानें सुरू झाली आहे हें खरें; पण ती रक्तशुद्धि वरील प्रकारची नाहीं. ती फक्त कुळापुरती आहे. अमक्या जातींत किंवा वर्गांत लग्न करणें निषिद्ध आहे, असें जर्मन लोकांखेरीज कोणी म्हणत नाहीं; त्याचें विवेचन पुढें येणारच आहे.

आतांपर्यंत असें दिसलें कीं, आर्य, मंगोल, शिद्दी वगैरे अगदीं साध्या डोळ्याला स्पष्टपणें भिन्न दिसणारे वंश घेतले तर त्यांच्यापुरतें रक्त भिन्न म्हणजे काय हें सांगतां येतें. पण इंग्रज–फ्रेंचादि किंवा कोकणस्थ–देशस्थादि जवळजवळचे समूह घेतले तर, म्हणजे बाह्यतः संस्कृतीनें व रूपगुणांनीं साधारण सारखे दिसणारे समूह जर घेतले तर त्यांच्यामध्यें रक्तें भिन्न आहेत म्हणजे काय, हें निश्चयानें सांगतां येत नाहीं.

पण हें जरी सांगतां येत नसलें तरी कोणच्याहि कारणामुळें कां होईना, जे समूह निरानिराळे वर्ग म्हणून किंवा जाति म्हणून किंवा वंश म्हणून आज मानले गेले आहेत, त्यांच्यामध्यें रक्तसंकर होणें कितपत इष्टानिष्ट आहे याचा आपण विचार करूं. प्रथमतः डोळ्याला स्पष्टपणें दिसत असल्यामुळें जे वंश अगदीं भिन्न मानले गेले आहेत त्यांचा संकर झाला तर काय होईल ते पाहूं.

संकर वाईट असें म्हणणारे असें सांगतात कीं १ संकरानें निर्वंश होतो. २ संकरज प्रजा नाकर्ती होते. ३ व संकरप्रजेच्या अंगीं विशिष्ट तऱ्हेचे दुर्गुण निर्माण होतात. अत्यंत भिन्न वंशांत संकर झाला तर वरील अनिष्ट परिणाम घडून येतात कीं काय, हें त्या क्षेत्रांतल्या अभ्यासकांच्या म्हणण्यावरून ठरवूं.

ए. डी. क्वाट्री फेजेस यानें ह्यूमन स्पेसीज ( सन १८७९ ) या पुस्तकांत मेक्सिको, पेरू, आफ्रिकेंतले प्रांत या ठिकाणीं कित्येक वर्षे राहून आलेल्या प्रवाशांचे अनुभव दिले आहेत. त्यावरून या प्रश्नावर बराच प्रकाश पडेल. वेस्ट इंडीज, मेक्सिको व पेरू या देशांत आज ३०० वर्षें युरोपीय व तद्देशीय यांच्यामध्यें संकर चालू आहे. तरी १८७९ सालीं तेथील प्रजा एक कोटी ऐंशी लक्ष होती. ( पान २६१ ) केप कॉलनीमध्यें डच व हाटेंटाट यांच्यांत व मॅनिला येथें चिनी व स्पॅनिश यांच्यांत संकर चालू आहे. प्रजा कमी नाहीं. ली व्हेलियंट या प्रवाशाच्या

तपासाअन्वयें हाटॅंटाट व युरोपी यांच्या संकरापासून मूळ हाटॅंटाट व हाटॅंटाट यांच्यातल्या विवाहापेक्षां जास्तच संतति होते. हँबोर्ननें ब्राझीलाबद्दल असेंच सांगितलें आहे. वाईट रोग, मुद्दाम केलेला संहार या आपत्ति नसतील तर जगांतला कोणचाही संकर निष्प्रज होत नाहीं असें कॅसलनें म्हटलें आहे. ( जेनेटिक्स व युजेनिक्स सन १९२७ पान ३३१ ) वर्क, वेल्थ व हॅपिनेस या पुस्तकांत एच. जी. वेल्सनेंही हेंच मत प्रगट केले आहे. म्हणजे असें दिसतें कीं, संकरानें निर्वंश होतो असें कोणीच म्हणत नाहीं.

अमक्या अमक्याच्या संकरापासून अमुक एक गुणाची प्रजा निर्माण होते, असें सांगण्याचा मनूचा प्रयत्न आहे व तो बरोबर आहे असें जोशी म्हणतात. व बुगलचा आधार घेतात. ब्राझीलमध्यें संकरापासून झालेले लोक कोणी चित्रकार, कोणी वजवय्ये, कोणी वैद्य असे होतात असें बुगलनें सांगितलें आहे. अमक्या अमक्यापासून झाला तर तो चित्रकार, दुसऱ्या अमक्या दोघांमध्यें संकर झाला तर तो वैद्य अशी विभागणी बुगल करीत नाहीं. आणि कोणीच करीत नाहीं. ' गायनेझेस लोक व पोर्तुगीज यांचा ब्राझीलमध्यें संकर होतो. त्यांची संकरप्रजा सर्व बौद्धिक व नैतिक क्षेत्रांत पुष्कळच उन्नतीला गेलेली दिसते. कलेप्रमाणेंच राजकारण व शास्त्र या क्षेत्रातही त्या लोकांची प्रगति झालेली दिसते. असें लॅगस या प्रवाशाचें मत ह्यूमन स्पेसीज या पुस्तकांत लेखकानें उध्दृत केलें आहे. पण याहूनही स्पष्ट मुद्दा असा कीं वैद्यकी, चित्रकला, गायनवादन, वक्तृत्व हे गुण असंकरज प्रजेमध्यें-सुद्धां दिसतात. तेव्हां ते संकरज प्रजेचें वैशिष्टय असें सांगण्यांत काय अर्थ आहे. जातिधर्म याचा पिंडगत गुण असा अर्थ मनूच्या मनांत असेलच तर अमक्या संकर जातीचा अमका नैसर्गिक गुण हें त्याचें विवेचन सर्वस्वी चूक आहे असें दिसतें.

अत्यंत भिन्न वंशांतील संकराची प्रजा नाकर्ती होते कीं काय याबद्दल फारसा वाद नाहीं. वरील प्रवाशांचीं वचनें पाहिलीं तर ती तशी होत नाहीं असें त्याचें मत आहे, असें दिसतें. पण या बाबतींत बहुतेक सर्व पंडित असा संकर होऊं नये असें म्हणणारे आहेत. स्पॅनिश × चिनी, फ्रेंच × तांबडे इंडियन, नार्डिक × मंगोल हे संकर अगदीं अनिष्ट असें गेटस्‌नें सांगितलें आहे. स्पॅनिश लोकांचा अधःपात अशाच संकरामुळें झाला असें हेकॅफ्ट म्हणतो. मॅकडुगलनें व इतर अनेक पंडितांनीं शुद्ध युरोपी प्रजा व युरोपी × निग्रो यांची प्रजा यात तुलना करून संकरज लोक फार हीन प्रतीचे असतात, असें दाखविलें आहे. कॅसल व डीन इंग यांनीही फार

असतील, परंपरेमुळें, किंवा संस्कारामुळें असतील. ते रक्तामुळें आहेत, या म्हणण्याला पुरावा नाहीं. व मिश्रविवाह झाल्यास वाईट असें म्हणण्याला तर अगदींच नाहीं. म्हणूनच इंग्रज, फ्रेंच वगैरे लोकांत आपापसांत विवाह करूं नये असें कोणचाहि पंडित किंवा शास्त्रज्ञ सांगत नाहीं. रक्तशुद्धीची चळवळ आज युरोपांत जोरानें सुरूं झाली आहे हें खरें; पण ती रक्तशुद्धि वरील प्रकारची नाहीं. ती फक्त कुळापुरती आहे. अमक्या जातींत किंवा वर्गांत लग्न करणें निषिद्ध आहे, असें जर्मन लोकांखेरीज कोणी म्हणत नाहीं; त्याचें विवेचन पुढें येणारच आहे.

आतांपर्यंत असें दिसलें कीं, आर्य, मंगोल, शिद्दी वगैरे अगदीं साध्या डोळ्याला स्पष्टपणें भिन्न दिसणारे वंश घेतले तर त्यांच्यापुरतें रक्त भिन्न म्हणजे काय हें सांगतां येतें. पण इंग्रज–फ्रेंचादि किंवा कोकणस्थ–देशस्थादि जवळजवळचे समूह घेतले तर, म्हणजे बाह्यत: संस्कृतीनें व रूपगुणांनीं साधारण सारखे दिसणारे समूह जर घेतले तर त्यांच्यामध्यें रक्तें भिन्न आहेत म्हणजे काय, हें निश्चयानें सांगतां येत नाहीं.

पण हें जरी सांगतां येत नसलें तरी कोणच्याहि कारणामुळें कां होईना, जे समूह निरनिराळे वर्ग म्हणून किंवा जाति म्हणून किंवा वंश म्हणून आज मानले गेले आहेत, त्यांच्यामध्यें रक्तसंकर होणें कितपत इष्टानिष्ट आहे याचा आपण विचार करूं. प्रथमतः डोळ्याला स्पष्टपणें दिसत असल्यामुळें जे वंश अगदीं भिन्न मानले गेले आहेत त्यांचा संकर झाला तर काय होईल ते पाहूं.

संकर वाईट असें म्हणणारे असें सांगतात कीं १ संकरानें निर्वंश होतो. २ संकरज प्रजा नाकर्ती होते. ३ व संकरप्रजेच्या अंगीं विशिष्ट तऱ्हेचे दुर्गुण निर्माण होतात. अत्यंत भिन्न वंशांत संकर झाला तर वरील अनिष्ट परिणाम घडून येतात कीं काय, हें त्या क्षेत्रांतल्या अभ्यासकांच्या म्हणण्यावरून ठरवूं.

ए. डी. क्वाट्री फेजेस यानें ह्यूमन स्पेसीज ( सन १८७९ ) या पुस्तकांत मेक्सिको, पेरू, आफ्रिकेंतले प्रांत या ठिकाणीं कित्येक वर्षे राहून आलेल्या प्रवाशांचे अनुभव दिले आहेत. त्यावरून या प्रश्नावर बराच प्रकाश पडेल. वेस्ट इंडीज, मेक्सिको व पेरू या देशांत आज ३०० वर्षें युरोपीय व तद्देशीय यांच्यामध्यें संकर चालू आहे. तरी १८७९ सालीं तेथील प्रजा एक कोटी ऐंशी लक्ष होती. ( पान २६१ ) केप कॉलनीमध्यें डच व हाटेंटाट यांच्यांत व मॅनिला येथें चिनी व स्पॅनिश यांच्यांत संकर चालू आहे. प्रजा कमी नाहीं. ली व्हॅलियंट या प्रवाशाच्या

तपासाअन्वयें हाटेंटाट व युरोपी यांच्या संकरापासून मूळ हाटेंटाट व हाटेंटाट यांच्यातल्या विवाहापेक्षां जास्तच संतति होते. हॅबोर्नेनें ब्राझीलाबद्दल असेंच सांगितलें आहे. वाईट रोग, मुद्दाम केलेला संहार या आपत्ति नसतील तर जगांतला कोणचाही संकर निष्प्रज होत नाहीं असें कॅसलनें म्हटलें आहे. ( जेनेटिक्स व युजेनिक्स सन १९२७ पान ३३१ ) वर्क, वेल्थ व हॅपिनेस या पुस्तकात एच. जी. वेल्सनेंही हेंच मत प्रगट केले आहे. म्हणजे असें दिसतें कीं, संकरानें निर्वंश होतो असें कोणीच म्हणत नाहीं.

अमक्या अमक्याच्या संकरापासून अमुक एक गुणाची प्रजा निर्माण होते, असें सांगण्याचा मनूचा प्रयत्न आहे व तो बरोबर आहे असें जोशी म्हणतात. व बुगलचा आधार घेतात. ब्राझीलमध्यें संकरापासून झालेले लोक कोणी चित्रकार, कोणी वजवय्ये, कोणी वैद्य असे होतात असें बुगलनें सांगितलें आहे. अमक्या अमक्यापासून झाला तर तो चित्रकार, दुसऱ्या अमक्या दोघांमध्यें संकर झाला तर तो वैद्य अशी विभागणी बुगल करीत नाहीं. आणि कोणीच करीत नाहीं. ' गायनेझेस लोक व पोर्तुगीज यांचा ब्राझीलमध्यें संकर होतो. व ती संकरप्रजा सर्व बौद्धिक व नैतिक क्षेत्रांत पुष्कळच उन्नतीला गेलेली दिसते. कलेप्रमाणेंच राजकारण व शास्त्र या क्षेत्रातही त्या लोकांची प्रगति झालेली दिसते. असें लॅगस या प्रवाशाचें मत ह्यूमन स्पेसिज या पुस्तकांत लेखकानें उध्दृत केलें आहे. पण याहूनही स्पष्ट मुद्दा असा कीं वैद्यकी, चित्रकला, गायनवादन, वक्तृत्व हे गुण असंकरज प्रजेमध्यें-सुद्धां दिसतात. तेव्हां ते संकरज प्रजेचें वैशिष्ट्य असें सांगण्यांत काय अर्थ आहे. जातिधर्म याचा पिंडगत गुण असा अर्थ मनूच्या मनांत असेलच तर अमक्या संकर जातीचा अमका नैसर्गिक गुण हें त्याचें विवेचन सर्वस्वी चूक आहे असें दिसतें.

अत्यंत भिन्न वंशांतील संकराची प्रजा नाकर्ती होते कीं काय याबद्दल फारसा वाद नाहीं. वरील प्रवाशांचीं वचनें पाहिलीं तर ती तशी होत नाहीं असें त्याचें मत आहे, असें दिसतें. पण या बाबतींत बहुतेक सर्व पंडित असा संकर होऊं नये असें म्हणणारे आहेत. स्पॅनिश × चिनी, फ्रेंच × तांबडे इंडियन, नार्डिक × मंगोल हे संकर अगदीं अनिष्ट असें गेटस्नें सांगितलें आहे. स्पॅनिश लोकांचा अधःपात अशाच संकरामुळें झाला असें हेकॅफ्ट म्हणतो. मॅकडुगलनें व इतर अनेक पंडितांनीं शुद्ध युरोपी प्रजा व युरोपी × निग्रो यांची प्रजा यात तुलना करून संकरज लोक फार हीन प्रतीचे असतात, असें दाखविलें आहे. कॅसल व डीन इंग यांनींही फार

भिन्न वंशांत संकर होऊं नये असेंच सांगितलें आहे. एवंच संकर प्रजेचा निर्वंश होतो किंवा तिच्यांत विशिष्ट गुणधर्म येतात हें जरी कोणास मान्य नसले तरी अत्यंत भिन्न वंशातलें संकर हीन प्रतीचे होतात व त्यामुळें ते अगदीं अनिष्ट आहेत, असें सर्वांचे मत आहे.

या ठिकाणीं विचारासाठीं एक मुद्दा सुचवावासा वाटतो. भिन्न वंशांतील संकर प्रजा नाकर्ती होते असें जें या पंडितांनीं अनुमान काढलें तें काढतांना त्यांनीं अवलोकनासाठीं जे वंश जे घेतले होते ते परस्परापासून अत्यंत भिन्न होते हें खरें पण जसे ते रक्तानें भिन्न होते तसेच संस्कृतीनें व दर्जानेंही अत्यंत भिन्न होते. युरोपी हा संस्कृतीच्या व कर्तृत्वाच्या शिखरावर पोचलेला मनुष्य व अमेरिका आणि आफ्रिका येथील मूळचे लोक पायथ्यापर्यंतही न आलेले. यामुळें संकरप्रजा हीन व्हावी हें ठीकच आहे. पण जेथें संस्कृतीनें व पराक्रमानें दोन्ही वंश सारखे, पण रक्तानें मात्र अत्यंत भिन्न अशा वंशांत जर संकर झाला तर त्यांची प्रजा निश्चयानें हीन होईलच, असें म्हणण्याइतका पुरेसा पुरावा पुढें आला आहे असें वाटत नाहीं. हिंदुस्थानच्या इतिहासांत जो थोडासा पुरावा मिळतो तो या संकराला अनुकूलच आहे. आपल्याकडे तुर्क, अफगाण, व मोंगल यांचें रक्त रजपूत रक्ताशीं वारंवार मिसळलेलें आहे व त्याचे परिणाम वाईट तर नाहींच, पण बहु अंशीं चांगलेच दिसून आलेले आहेत. अकबर, सेलीम, शहाजहान व अवरंगजेब या चारी मोंगलांच्या स्त्रिया रजपूत होत्या. व सेलीम, खुश्रू, कामबक्ष यांच्या सारखे त्यांचे मुलगे पराक्रमी होते. यूसफ आदिलशाहाची बायको मुकुंदराव म्हणून त्याचा मंत्री होता त्याची बहीण. त्यांचा मुलगा इस्माइल हा न्यायी दूरदर्शी, रसिक व विद्वान् होता असें इतिहासांत आहे. लोदी बहुलोल याची बायको एका सोनाराची मुलगी होती त्यांचाही मुलगा असाच होता. येथें अफगाण व मराठी रक्ताचें मिश्रण आहे. काश्मीरचें राज्य व राणी बळकावणारा शम्सुद्दिन व ती राणी कवलेदेवी, यांचे पांची पुत्र पराक्रमी होते. सबंध तुघ्लख वंश हा तर तुर्क व रजपूत यांच्या मिश्रणानेंच झाला होता. बाबर हा तुर्क व मोंगल यांच्या संकरापासून झालेल्या वंशांत जन्मला होता. बाजीरावमस्तानी यांचा मुलगा समशेर बहाद्दर व त्याचा मुलगा अलिझाबहाद्दर हेही पराक्रमी होते. समुद्रगुप्त हा चंद्रगुप्त व शूद्रकुळांतली लिच्छवी घराण्यांतली कुमारदेवी यांचा मुलगा. सर्वांत महत्त्वाचे उदाहरण म्हणजे व्यासांचें. सर्व जगाला वंद्य झालेला हा पुरुष ब्राह्मण पिता व कोळीण माता यांच्यापासून झालेला आहे. या थोड्याश्या

१४१ ता. ता.

उदाहरणावरून अगदीं निर्णायक असें जरी कांहीं सांगतां येत नसलें तरी व कर्तृत्व सारखें असतांना अत्यंत भिन्न वंशांतील संकर [illegible] संस्कृति [illegible] आहेच, असें म्हणण्यापूर्वी बराच विचार करावा लागेल एवढें तरी निदान वाटतें. जेनिंग्जनें म्हटले आहे कीं संकर निंद्य समजला गेल्यामुळें संकरज मुलाला वाईट वागविण्यांत येतें. व त्यामुळें तो हीन ठरतो. त्याला जर चांगली, संधि मिळाली तर तोही मोठ्या पदाला जाणें शक्य आहे. ( बायॉलॉजिकल बेसीस ऑफ ह्यूमन नेचर; पान २८७ )

हा विचार अत्यंत भिन्न रक्तासंबंधीं झाला. त्यांचा संकर तज्ज्ञांना अमान्य आहे असें धरून आतां जवळच्या रक्तामध्यें, व जास्त निश्चित बोलावयाचें म्हणजे कोकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे, सारस्वत, प्रभु, क्षत्रिय मराठे, इतर प्रांतांतले ब्राह्मण, क्षत्रिय यांच्यामध्यें विवाह होण्यास या शास्त्रज्ञांची कांहीं हरकत आहे काय तें पाहूं.

या विषयाचा विचार गाल्टन, एलिस, फ्रीमन, मॅकडुगल, इंग, कॅसल, डेव्हन-पोर्ट या अनेक शास्त्रज्ञांनी केला आहे. व जवळजवळच्या रक्तामध्यें संकर होणे अनिष्ट तर नाहींच पण तें समाजाला अत्यंत हितावह व आवश्यक आहे असें यांनीं प्रतिपादलें आहे. जेव्हां जेव्हां हे रक्तशुद्धीबद्दल बोलतात तेव्हां ते फक्त कुलाबद्दल बोलत असतात. म्हणजे एकदां फार भिन्न वंश सोडून दिले म्हणजे मग जात, वर्ग वगैरे विभाग ते मुळींच करीत नाहींत. फक्त ज्या कुलांतली मुलगी तुम्हीं करीत असाल किंवा जेथें देत असाल, त्या कुलांत आनुवंशिक रोग, मनोदौर्बल्य, वेडेपणा, कांहीं दुष्ट प्रवृत्ति या नाहींत ना एवढें पाहा, असें त्यांना सांगावयाचें आहे. अशीं कुलें चांगल्या कुलांचा नाश करतात. म्हणून जीं चागलीं कुलें असतील त्यांनीं विवाह करतांना अत्यंत काळजी घेतली पाहिजे. पण हा उपदेश ते लोक कोंकणस्थ किंवा देशस्थ, यांचें आपआपल्या जातींत जरी विवाह चालले असले तरी त्यांना सुद्धां करतील. त्यांचा कटाक्ष कुलापुरता आहे. समान संस्कृती, समान रूपगुण, समान कर्तृत्व असें दिसेल व कुळांमध्यें इतर कांहीं दोष नसेल तर कोणच्याही दोन कुलांनीं जात किंवा वर्ग यांचा विचार न करतां आपापसांत विवाह करण्यास हरकत नाहीं, असें त्यांचे मत आहे.

( १ ) औट स्पोकन एसेज ( पान १६१ ) यामध्यें डीन इंगनें असेंच मत दिलें आहे. Continued inbreeding in a small society is certain-ylp rejudicial. Probably alternate periods of fusion with

immigrants and stabilising the results, give a nation the best chance of producing a fine type of men and women ( कायम आपल्या जातींत विवाह करणें हा दुराग्रह आहे. मधून मधून बाह्यांशीं विवाह करावें, तें रक्त चांगलें मिसळूं द्यावें व मग पुन्हां मिश्रण करावें. अशानें देशांत तेजस्वी स्त्रीपुरुष निर्माण होण्याचा जास्त संभव आहे.

( २ ) कॅसलनें हेंच मत जेनेटिक्स व युजेनिक्स या ग्रंथांत दिलें आहे. ( पान २७२ ). The mixture of elements, not too dissimilar, provided the social heritage is not unduly disturbed, is on the whole beneficial. It results in the increase of vigour and energy in the offspring. सामाजिक पीठिका मोडत असल्या तर विवाह करूं नये हा मुद्दा कॅसलनें चांगला सांगितला आहे. पण हा सोईचा प्रश्न आहे. एरवीं असल्या संकरानें पुढील प्रजा जास्त कर्ती व तेजस्वी होते असेंच तो म्हणतो.

( ३ ) आपल्या देशात ( अमेरिकेंत ) हीन प्रतीचे लोक येऊं देऊं नये, हें सांगून कोणाला बंदी करावी हें सांगतांना डेव्हन पोर्ट म्हणतो. In fact no race is dangerous and none undesirable; but only those individuals whose germinal determiners are, from the stand point of life, bad. In other words immigrants are desirable who are of good blood and undesirable who are of bad blood. ( हेरिडिटी इन् रिलेशन् टु युजेनिक्स पान २२१ ). येथें डेव्हन पोर्टनें अमुक व्यक्ति त्याज्य असें म्हटलें आहे. जात त्याज्य असें सांगितलें नाहीं, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. रक्तशुद्धि त्यास हवी आहे; पण त्यासाठीं कुलें तपासावीं, अमेरिकेनें युरोपांत एजंट नेमावें व जे कोणी अमेरिकेंत येण्यासाठीं अर्ज करतील, त्यांच्या कुलांचे इतिहास तपासावे व चांगले असल्यास मगच त्यांना प्रवेश द्यावा असें त्याचें म्हणणें आहे. ( पान २२४ ).

( ४ ) गट बेटिबंद राहिले तर त्याच्यांत विशिष्ट गुणांची वाढ होते असें सांगणारा गेट्स सुद्धां मिश्रविवाहाला अनुकूलच आहे. Intermarriage of diverse strains is important, both from point of view mentioned above, and on account of the increased vigour

resulting from the heterozygous condition, but there are important limitations to the width of crosses which are desirable. ( हेरिडिटी व युजेनिक्स पान २२२ ). रक्ताच्या भिन्नतेला मर्यादा असाव्या हा गेट्सचा इषारा आहे; पण त्या मर्यादा पाळल्यानंतर भिन्न जातींत किंवा वर्गांत मिश्रविवाह अगदीं इष्ट आहे असेंच त्याचें मत आहे.

मॅक् डुगल, गाल्टन, फ्रीमन या सर्वांचें मत हेंच आहे. सम संस्कृतींच्या व सारख्या रूपगुणांच्या कुलांत विवाह अवश्य घडवून आणले पाहिजेत, असें त्यांचें म्हणणें आहे. त्यांच्या मतांनीं समाजांत जाती दोनच. एक कर्त्या कुळाची व एक नाकर्त्यांची; व त्या सुद्धां कायम नाहींत. परीक्षण सदोदित चालू ठेवावयाचें व वरच्यापैकीं कोणी हीन प्रवृत्ति दाखवूं लागले तर त्यांना बाहेर घालवून खालच्यापैकीं कोणी कर्तृत्व दाखविलें तर त्यांना वर घ्यावयाचें. अशी त्यांच्या मतें समाजरचना असावी. हा क्रम कायमचा चालू ठेवावयाचा असल्यामुळें समाजांत कायमच्या जाती राहाणारच नाहींत.

[ ५ ] समाज जगण्यासाठीं त्यांत संघ व उपसंघ असलेच पाहिजेत ही जोशांची कल्पना या शास्त्रज्ञांना मान्य नाहीं. वर सांगितलेली कल्पना मॅक डुगलनें एथिक्स आणि सम् वर्ल्ड प्रॉब्लेम्स या पुस्तकांत सांगितली आहे. आणि नॅशनल वेलफेअर आणि डिके या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत संवादरूपानें हाच विचार त्यानें मांडला आहे. उत्कृष्टांची जी जात तयार करावयाची तींत नवी माणसें घेतांना त्यांचा कुलेतिहास पाहिला जाईल. एकदां निवडलेल्या घराण्यांतील मुलेंसुद्धां परीक्षेवाचून श्रेष्ठ वर्गांत घेतलीं जाणार नाहींत. जास्त संधी त्यांना मिळेल यांत शंकाच नाहीं. पण सर्व कसोट्या उतरल्या नंतर जगांतल्या कोणच्याहि व्यक्तीला त्यांत मज्जाव नाहीं. ( Admitting new members selected from the whole world ) असें त्यांचें म्हणणें अगदीं निःसंदेह आहे.

[ ६ ] समाजांतील प्रत्येक थरांतून चांगलीं माणसें निवडून काढावीं व त्यांचीं आपापसांत लग्नें घडवून आणून त्यांची एकजात तयार करावी अशीं स्वप्नें गाल्टनला नेहमीं पडत, असे त्याच्या चरित्रांत पिअरसननें म्हटलें आहे. [ विभाग २ पान १२१ विभाग ३ पान २३४ ]

हेरिडिटरी जीनियस या पुस्तकांत गाल्टननें एके ठिकाणीं ३१ न्यायाधिशांच्या घराण्यांची माहिती दिली आहे. लक्षाधिशांच्या एकुलत्या एक मुलींशीं

यांतील पुष्कळांनीं लग्नें केल्यामुळें व कांहीं अविवाहित राहिल्यामुळें या घराण्यांचा नाश झाला असें सांगितलें आहे. या नाशाची मीमांसा करतांना तो म्हणतो श्रीमंत एकुलत्या एक मुलींशी विवाह केल्यामुळें हीं घराणीं नाश पावलीं. आईच्या व मुलीच्या प्रसव-शक्तींत आनुवंशिक संबंध असतो. आईला मुलगा नाहीं म्हणून मुलीलाही झाला नाहीं. या विवेचनांत जातीचा, वर्गाचा किंवा भिन्न रक्तांचा मुळींच संबंध नसतांना जोशांनीं नेहमींच्या पद्धतीप्रमाणें गाल्टनच्या तोंडीं अवतरणें देऊन 'अशा तऱ्हेनें असवर्ण विवाह हें निर्वंशाला म्हणजे नाशाला कारण झालें.' असें खोटेंच वाक्य घातले आहे. गाल्टनचे तसे मत मुळींच नाहीं. आणि जी मीमांसा त्यानें दिली आहे, व जी दुसऱ्या एका ठिकाणीं याच पुस्तकांत जोशांनीं पत्करली आहे, तीहि चूक आहे. असें कार्ल पिअरसनचें मत आहे. आईच्या व मुलीच्या प्रसवशक्तींत आनुवंशिक संबंध नाहीं असें सांगून नैतिक दुराचरणामुळें असल्या घराण्यांचा नाश होतो, हें इरॅसमस डार्विनचें मत त्यानें मान्य केलें आहे.

( ७ ) हॅवेलॅक् एलिसची जोशांनीं गाल्टनप्रमाणेंच मौज केली आहे. ए स्टडी ऑफ ब्रिटिश जीनियस या पुस्तकांत त्यानें हजार कर्त्या पुरुषांच्या घराण्याचा अभ्यास केला आहे. त्यांत आयरिश × इंग्लिश व वेल्श × इंग्लिश या दोन संकरांपासून ज्या प्रमाणांत कर्ते पुरुष निर्माण झाले त्या प्रमाणांत स्कॉच हे जवळचे असूनही त्यांच्या व इंग्रजांच्या संकरांतून झाले नाहींत असें त्याला दिसलं म्हणून तो म्हणाला कीं, 'The Irish and the welsh are much better adopted for crossing with the English than the more closely related scotch' ( २३ ). संकर प्रजा नाकर्ती होते असें त्यानें मुळींच अनुमान काढलेलें नाहीं. जोशांनीं ते खोटें लिहिले आहे. ( हिंदू स. शास्त्र पान २२५ )

- ( ८ ) समाजाच्या सर्व थरांतून चांगलीं कुलें निवडून काढून त्याची एक जात करावी व तिच्यांत सारखी भर घालीत जावें, याचा विचारी इंग्रज लोकांना ध्यासच लागलेला दिसतो. गाल्टन, मॅकडुगल यांचे विचार वर सांगितलेच आहेत. ऑस्टिन फ्रीमनचीहि तशीच कल्पना आहे. मात्र ती जी एक जात होणार तिच्यांत एक राष्ट्रीयत्व राहण्यासाठीं इंग्रजाखेरीज बाहेरचा कोणी घेऊं नये, असें त्यानें सांगितलें आहे. पण एकदां या मर्यादा पाळल्यानंतर बाकी विचार फक्त कुळशुद्धाचा 'No restrictions in respect of class or caste would

be entertained' ( सोशल डिके आणि रिजनरेशन पान ३१८ )- वर्ग किंवा जात यांचीं बंधनें मुळींच पाळावयास नको, वाटेल त्या वर्गांतील घराणें चालेल.

सम संस्कृतीच्या दोन समूहामध्यें मिश्रविवाह निषिद्ध तर नाहींच पण अतिशय इष्ट आहे. पुढील पिढीचा जोम व कर्तृत्व त्यामुळें वाढतें असें या पंडितांचें स्पष्ट मत असल्याबद्दल वरील उतारे वाचल्यानंतर, कोणासही संशय राहील असें वाटत नाहीं. गेटस्नें एक पाऊल पुढें जाऊन या मर्यादित संकराचा आणखि एक फायदा सांगितला आहे. पर्ल व लिट्ल या दोघांनीं केलेल्या अभ्यासाच्या आधारानें त्यानें असें सांगितलें आहे कीं इंग्रज, आयरिश, रशियन, इटालियन, जर्मन, ग्रीक यांचे मिश्रविवाह पाहिले तर त्यांच्यांत निदान पहिल्या पिढीला तरी पुत्रसंततीचें प्रमाण पुष्कळच वाढलेलें दिसतें. शुद्ध संतति व मिश्र संतति यांतील मुली व मुलगे यांचें प्रमाण पुढीलप्रमाणें आहे शुद्धः—मुली १०० मुलगे १०६.२७. मिश्रः—मुली १०० मुलगे १२१.५६ In crosses between European races there is a higher ratio of male births at least in first generation ( हेरिडिटी व युजेनिक्स पान २३० ) संकराचा हा फारच मोठा फायदा आहे हें सनातन्यांनीं तरी मान्य केलें पाहिजे.

संकरानें प्रजा नाकर्ती होत नाहीं, तिचा नाश होत नाहीं व तिच्यांत दुर्गुणही येत नाहींत. इतकेंच नव्हे तर संकर हा समाजाला अत्यंत हितावह असून त्यानें कर्तृत्व व जोम हीं वाढून शिवाय पुत्रसंततीचें प्रमाणही वाढतें असें आपण पाहिलें. संकरविरोधि लोक आणखी एक मुद्दा पुढें आणीत असतात. त्यांचें मत असें कीं 'क' या समूहांत एकादा विशिष्ट गुण वास करीत असला व त्याच्या रक्ताशीं 'ख' या समूहाच्या रक्ताचें मिश्रण झालें तर त्याचा तो विशिष्ट गुण नाहींसा होईल. व 'क' ला जर आपला विशिष्ट गुण राखून ठेवावयाचा असेल तर त्यानें आपल्या समूहांतलीच मुलगी केली पाहिजे.

आनुवंशासंबंधींच्या चुकीच्या कल्पनांनीं हे वरच्यासारखे समज निर्माण होत असतात. एक विशिष्ट कर्तृत्वशाली मानवसमूह घेतला तर त्याची पुढली पिढी किती कर्ती होईल एवढेंच सांगतां येईल अमक्याच तऱ्हेनें तिचें कर्तृत्व प्रगट होईल, असें सांगतां येणार नाहीं. पिढ्यान्‌पिढ्या एकाद्या समूहांत एकाचप्रकारचें कर्तृत्व राहाणार नाहीं असें नाहीं. पण तें परंपरेमुळें व परिस्थितीमुळें राहतें. पारशांचें तसें उदाहरण आहे. पण ब्राह्मण, आरब, ज्यू यांचीं उदाहरणें अगदीं निराळीं आहेत. परिस्थिति

बदलली कीं, निरनिराळ्या प्रकारचें कर्तृत्व तोच समाज दाखवूं शकतो. आणि तरच त्याला पराक्रमी म्हणतां येईल. म्हणजे एकाच समूहांत मूलतःच अनेक प्रकारचें कर्तृत्व असतें. म्हणून दुसऱ्या समूहाशीं त्याचा संकर झाला तर त्याला आपलें विशिष्ट कर्तृत्व जाईल ही भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. कुलांच्या बाबतींत असेंच आहे. एका कुलांत अनेक प्रकारचें कर्तृत्व असूं शकतें, म्हणून त्यांतील लोकांनीं कोणत्याही क्षेत्रांतल्या पण वरच्या दर्जाच्या कुळाशीं विवाहसंबंध घडवून आणले म्हणजे झालें. अर्थात् रूपगुणसंस्कृति हीं बंधनें आहेतच हें केव्हांही विसरून चालणार नाहीं. व्यक्तीच्या बाबतींत या बाबतींतल्या मर्यादा आकुंचित होतात हें खरें. म्हणजे पुष्कळ वेळां गवयाचा मुलगा उत्तम गवई होतो. पण तो नियमानें होतोच असें नसल्यामुळें त्यांची जात करण्याइतकें महत्त्व या विचाराला मुळींच नाहीं. म्हणून शरीर, मन व बुद्धि या दृष्टीनें सुदृढ कुलाशीं संबंध करावयाचा एवढी सावधगिरी बाळगली कीं, मग कोणत्याही कुळांत लग्न केलें तरी गुणांचा लोप होईल ही भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

रक्तसंकराचा असा विचार झाला. आतां वृत्ति संकराचाही थोडक्यांत विचार करूं. व तोही रक्तसंकराप्रमाणेंच हितावह आहे असें दाखवून देऊं. म्हणजे चातुर्वर्ण्याच्या बुडाशीं असलेल्या दोन्ही कल्पना कशा फोल आहेत तें दिसेल. एका जातीनें दुसऱ्या जातीचा धंदा करणें याचें नांव वृत्तिसंकर. रक्तसंकराइतकी याची कोणी निंदा करीत नसलें तरी वृत्तिसंकर अगदीं निषिद्ध मानला आहे ह्यांत शंका नाहीं.

ब्राह्मणांनीं वैद्यविद्या, शिल्प, व्याजबट्टा, पशुविक्रय व राजसेवा हीं करूं नये असें मनूनें एके ठिकाणीं सांगितलें आहे. ( ३-६४,६५ ) गायन वादन करूं नये असेंही सांगितलें आहे. ( ४-१५ ) व्यापार करावा; पण तीन वर्षांचा धान्याचा पुरवठा करण्या इतकाच करावा. ( ४-६ ) अशी परवानगी दिली आहे. राजसेवा करूं नये असें वर म्हटलें आहे. पण उलट राजाचा मंत्री ब्राह्मण असावा. ( ७-५८-५९ ) न्यायाधीश ब्राह्मण असावा ( ८-११ ) असेंही मनूनें सांगितलें आहे.

मनुस्मृतींत असे परस्परविरोध पुष्कळच आहेत. मला वाटतें मनूचा आनुवंशाचा शोध हा मनुस्मृतींतला अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. तें तत्त्व व्यवहारांत आणतांना मनू किंवा बहुशः मनूचे शिष्य अगदीं एकांतिक झाले आहेत. कोणच्याही नवीन तत्त्वाचा उत्पादक एकांतिकच असतो असें आपणास कार्ल मार्क्स,

रूसो यांच्या उदाहरणांवरून दिसते. आनुवंशाचा इंग्रज प्रणेता सर फ्रॅन्सिस गाल्टन हाही असाच होता. याचा पुष्कळशीं मतें अगदीं न पटणारीं आहेत. त्याच्या ग्रंथाबद्दल कार्ल पिअरसननें जें म्हटलें आहे तेंच आपणांस मनुस्मृतीबद्दल म्हणतां येईल. Hereditary Genius is one of the greatest books of the world, not so much by what it proves but by what it suggests हेरिडिटरी जीनियस हा जगांतला एक फार मोठा ग्रंथ आहे. त्यांतला प्रत्येक सिद्धांत खरा आहे म्हणून त्याला महत्त्व आलें असें नसून त्यानें सुचविलेल्या तत्त्वाला सर्व महत्त्व आहे.

पण हा सुविचार सोडून देऊन वृत्तिसंकर हा अत्यंत निंद्य होय, यानें कुलांचा समूळ नाश होतो. वगैरे जें मनूचें म्हणणें आहे तें अगदीं अक्षरशः खरें आहे असें कांहीं लोक सांगत सुटले आहेत. त्याचा आतां विचार करावयाचा आहे.

वृत्तिसंकर केला म्हणजे एका जातीनें दुसऱ्या जातीचा धंदा केला तर त्या लोकांचा निर्वंश होतो असें गो. म. जोशी सांगतात. पेशव्यांनीं ब्राह्मण्य सोडलें व क्षात्रवृत्ति धरली. त्यामुळें त्यांचें कुल पांचव्याच पिढीला नष्ट झालें, हें उदाहरण त्यांनीं घेतलें आहे. ( पान १६१ ) व असा कुलाचा नाश होतो म्हणून ब्राह्मणांनीं समाजसुधारणा, राजकारण, वगैरे करूं नये ( पान २३६ ), त्यांनीं क्षत्रियाचा धंदा करूं नये ( २५१ ) इ. उपदेश केला आहे.

रा. गो म. जोशी यांच्या या वेडगळ बडबडीचा एरवीं कोणी विचारही केला नसता पण युरोपी पंडितांचा आपल्या सांगण्याला आधार आहे; असें ते भासवीत असल्यामुळें व त्या पंडिताच्या शब्दाला वजन असल्यामुळें आपल्या लोकांची दिशाभूल होऊं नये म्हणून, जोशांच्या लिखाणाचा विचार करण्याचें मी योजिलें आहे.

आज युरोपीय समाजावर एक मोठें संकट येऊं पहात आहे. उच्च राहणीचें मान फार वाढल्यामुळें महत्त्वाकांक्षी कर्त्या पुरुषांना लवकर लग्नें करतां येत नाहींत. व उशीरा केल्यानंतरही राहाणी हीन होईल, या भीतीनें त्यांना अपत्यांच्या संख्येवर नियमन ठेवावें लागतें. उलट गरिबांना मदत करणाऱ्या नाना प्रकारच्या संस्था, इस्पितळें हीं परोपकार बुद्धीनें समाजानें चालविलीं असल्यामुळें दीनदुबळयाना चांगला आश्रय मिळतो व त्यांची प्रजा भराभर वाढत जाते. अशा रीतीनें कर्त्या माणसांना प्रजा कमी व दुबळ्यांनीं जास्त असा विपरीत प्रकार सुरू होऊन आज

त्यांच्या समाजांत कर्त्या पुरुषांचें प्रमाण घटत चाललें आहे. या संकटाचा विचार आज जवळजवळ प्रत्येक विद्वान् मनुष्य करीत आहे. हॅवलॉक एलिस व मॅक् डुगल हे त्यांच्यापैकीं पुष्कळ श्रेष्ठ दर्जाचे पंडित आहेत. त्यांनी अनुक्रमें ' टास्क ऑफ सोशल हायजीन, ' व ' नॅशनल वेलफेअर ॲंड डिके ' ह्या पुस्तकांत या प्रश्नाचा पुष्कळ विचार केला आहे.

मॅक् डुगलनें म्हटले आहे कीं, खालच्या वर्गांतील पुरुष महत्त्वाकांक्षी होतो, वर चढतो, तेथें तो कर्तृत्व दाखवितो; पण तेथें त्यांच्या फार पिढ्या टिकत नाहींत. लवकरच त्याचा निर्वंश होतो. या विधानावर जोशीबुवांनीं उडी मारली व त्यांनीं सांगितलें कीं, पहा. वर्गांतर, वर्णांतर, जात्यंतर हें हानिकारक आहे असें इंग्रज पंडितही म्हणतात; पण खालच्या वर्गांतला मनुष्य वरच्या वर्गांत गेला म्हणून त्याचा नाश झाला असें मॅक् डुगलला मुळींच म्हणावयाचें नाहीं. आपल्या समाजात कर्त्या महत्त्वाकांक्षी पुरुषांचाच नेमका कसा वंश–नाश होतो तें त्याला दाखवावयाचें आहे. वरच्या थरांतल्या कर्त्या पुरुषांचा वंश–नाश तर चालूच आहे. त्याबरोबर खालच्या थरांतले लोक वर आले व कर्तृत्व दाखवूं लागले म्हणजे त्यांचाही नाश होतो. असें त्याला सांगावयाचें आहे. जात्यंतर, वर्णांतर, वृत्तिसंकर याचा येथें कांहीं एक संबंध नाहीं. तर उच्च पदाला जो जातो तो—मग तो कोणच्याही थरांतला असो–नाश पावतो, त्याच्या फार पिढ्या टिकत नाहींत असें हें मत आहे. त्यांतही महत्त्वाकांक्षेमुळें व मोठेपणामुळें वंशनाश असा कार्य-कारण संबंध नाहीं तर महत्त्वाकांक्षेमुळें उशीरा विवाह, उशीरा विवाहामुळें कमी संतती व कमी संततीमुळें पुढें वंशनाश असा हा परिस्थितीमुळें, व आर्थिक अडचणी-मुळें निर्माण झालेला संबंध आहे ( पान १५५ ). येथें आनुवंशाचा संबंध नाहीं. वर्णांतराचा नाहीं. तसा असता तर खालच्यांना वर चढूं देऊं नये असें त्यानें सांगितले असतें. पण तो तर उलट खालच्यांना वर चढविण्याची ही सोपानपरंपरा ( Social ladder ) समाजाच्या प्रगतीला फार आवश्यक आहे असें सांगतो. संस्कृती कशी नाश पावते हें सांगतांना कोणच्या क्रमानें नाश होतो, एवढेंच फक्त त्यानें सांगितलें, त्यांत वरील वाक्य आलें आहे. व प्रथम वरच्या थरांतलें व मग खालच्याही थरांतले कर्तृत्व एकाच कारणामुळें नाश पावतें असें त्याचें विधान आहे. आणि त्या नाशाचें कारण आर्थिक आहे, जीवनशास्त्रीय नाहीं.

हॅवेलॉक एलिसचें हेंच म्हणणें आहे. त्याची कारण मीमांसा मात्र जरा निराळी आहे. तो म्हणतो समाजांत जी जबाबदारीची फार मोठीं कामें आहेत,

ती कोणीही, कोणच्याही वर्गांतल्या माणसानें केली तरी त्याच्या घराण्याचा लवकरच केवळ जास्त दगदगीमुळें नाश होतो. ' As a family attains highest culture and refinement which civilization can yield that family tends to die out at all events in the male line ' येथें घराणें असें त्यानें म्हटलें आहे. अमुक जातींतलें घराणें असें नाहीं. व तें नाश पावतें तें दगदगीमुळें, अती ताण पडल्यामुळें. ( Increased work for nervous system ) वर्णांतरामुळें नव्हे. जो कोणी हें दगदगीचें काम करील तो ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र कोणीही असो, तो नाश पावेल; म्हणजे त्याचें घराणें लवकर निपुत्रिक होईल असें तो म्हणतो; पण म्हणून वरच्या वर्गांचें काम खालच्या वर्गांतील घराण्यांनीं करूं नये, असें तो कोठेंच सांगत नाहीं. उलट शेक्सपीयर, गटे यांच्यासारखे होऊन तीन पिढयांत नष्ट झालेले पुरवले; पण सालमन मासा होऊन युगानुयुगें जगणें नको असेंच तो सांगतो. ( पान २० ) प्रत्येक वर्गाला त्याचें एक विशिष्ट गुरुत्व असतें व त्यांतच तो जगूं शकतो असें त्यानें म्हटलें आहे खरें, पण मला त्याचा नेमका बोध झाला नाहीं. त्यानेंही तें कोठें स्पष्ट केलें नाहीं. जोशांनीं अर्थातच धंदा बदलणें म्हणजे विशिष्ट गुरुत्व घालविणें असा अर्थ केला आहे. तसेंच एकादा खालच्या वर्गांतला मनुष्य वरच्या वर्गांत चढतो तेथें तो लग्न करतो. त्याची भरभराटही होते; पण दोन तीन पिढयांतच त्याचें घराणें नाश पावतें असेंही त्याच पानांवर टीपेंत त्यानें म्हटलें आहे. पण असें कधीं कधीं घडतें असें त्यानें सांगितलें आहे. म्हणून त्याचा विचार करण्याचें कारण नाहीं. जोशांनीं मात्र Occassionally it happens याचें ' कित्येक वेळां असें घडतें कीं ' असें खोटें भाषांतर करून तो आधार जुळतासा करून घेतला आहे.

इतिहासकार सरदेसाई यांनीं ' मराठे शाहींत एकंदरींत पाहतां ब्राह्मणांचा नाश फार झाला ' असें म्हटलें आहे. पण तेथेंही ब्राह्मणांचीं कामें ज्यांनीं सोडलीं त्यांचा झाला, व मनुस्मृतींत जीं ब्राह्मणाचीं कामें म्हणून सांगितलीं आहेत तीं ज्यांनीं सोडलीं नाहीं त्यांचा झाला नाहीं असें कांहीं एक सांगितलेलें नाहीं. अर्थात् वर्णांतराशीं त्याचा कांहीं एक संबंध नाहीं. पण जोशी हाही आधार आपल्या बाजूला घेत असतात.

सायंटिफिक् औट लुक म्हणून बर्ट्रांड रसेलचें एक पुस्तक आहे. त्यांत ' एक ध्येय डोळ्यापुढें ठेवून तें साधण्याच्या धोरणानें ज्याची रचना केली असेल, ती

शास्त्रशुद्ध समाज ' ( सायंटिफिक सोसायटी ). अशी त्यानें व्याख्या केली आहे, त्या समाजाचें वर्णन त्यानें एकंदर सहा प्रकरणांत केलें आहे. त्यांत जाति असाव्या. प्रत्येकाला आपल्या खुषीप्रमाणें धंदा करतां येणार नाहीं, उच्च वर्गानें ज्ञान गुप्त ठेवावें, खालच्या वर्गाला बोलण्याचा हक्क नसावा, अशी जोशांनीं उध्दृत केलेलीं वाक्यें आहेत. पण त्याच्या पुढच्याच प्रकरणांत त्यानें सांगितलें आहे कीं, सायन्स सायन्स करून हृदय व भावना यांना विसरून जाणाऱ्या लोकांच्या समाजाचें कसें विकृत स्वरूप होईल तें मीं मागल्या प्रकरणांत दाखविलें आहे. तें कोणींही परमार्थानें मानूं नये. समाजाची ती काळी बाजू आहे. पण पुढची ही सूचना गाळून टाकून जोशांनीं मधलींच वाक्यें रसेलचीं मतें म्हणून उचलून घेऊन मनुस्मृतीला आधार घेतला आहे.

हें युरोपांतलें झालें. आपल्याकडे अगदीं बेटीबंद जाति आहेत. आपल्याकडे कदाचित मनूचें म्हणणें खरें असेल असें पुष्कळांना वाटण्याचा संभव आहे. त्यांच्यासाठीं पुढील विवेचन केलें आहे. मनुप्रणीत धंदे कायम ठेवले तरी ज्यांचे वंश टिकले नाहींत व मनुप्रणीत धंदे सोडले तरी ज्यांचे वंश हयात आहेत, अशा सुमारें तीस घराण्याचें इतिहास एका कोष्टकांत मीं बसविले आहेत. तें कोष्टक जरा बोधप्रद होईल. कोष्टकांत जेथें अमुक पिढ्या जगल्या असें म्हटलें आहे तेथें दत्तक न घेतां जगल्या असा अर्थ आहे. दत्तक घेऊन जगलेलीं घराणीं जमेस धरलीं नाहींत.

घराणें किती पिढ्या जगलें म्हणजे तें जगलें म्हणावयाचें, वर्णांतर केल्यानंतर किती पिढ्यांनीं नाश झाला तर तो वर्णांतरामुळें झाला, असें मानावयाचें याचा खुलासा जोशीबुवानीं केलेला नाहीं. एके ठिकाणीं ' जातीय संकरानें समाजाचा नाश, हा जो सृष्टीचा नियम तो कांहीं प्रभावी झाल्यावांचून राहणार नाहीं. मग तो होण्याला किती पिढ्या लागतील त्या लागोत ' ( पान १७७ ) असें एक वेडगळ वाक्य त्यांनीं लिहून ठेवलें आहे. त्यानीं नक्की सांगितलें असतें तर, त्याच्या उलट उदाहरणें वाटेल तितकीं देतां आलीं असतीं.

ज्यांनीं मनुप्रणीत धंदे कायम ठेवले तरी घराण्याचा नाश झाला, त्यांची यादी पुढें दिली आहे घराण्याच्या नांवापुढें दिलेले धंदे मनुप्रणीत आहेत.

( पुढील माहिती परांजपे, बरवे, गोखले वगैरे घराण्यांचे इतिहास, सरदारांच्या कैफियती वंशावळी, पेशवे दप्तर, रियासती यांवरून घेतली आहे. )

| | घराण्याचें नांव व जात. | धंदा | किती पिढ्या टिकल्या |
|---|---|---|---|
| १ | त्रिंबकराव दाभाडे मराठा क्षत्रिय | सेनापती | मुलगा नाहीं, पिढी १ |
| २ | नाना फडणीस ब्राह्मण | मंत्री | मुलगा नाहीं १ |
| ३ | भास्कराचार्य ब्राह्मण | शास्त्रज्ञ | मुलगा नाहीं १ |
| ४ | बापुभट परांजपे ब्राह्मण | वैदिक व याज्ञिक | नातू नाहीं २ |
| ५ | जयपूरचें घराणें क्षत्रिय | राजे | नातू नाहीं २ |
| ६ | हरी धोंडदेव परांजपे ब्राह्मण | दशग्रंथी | नातू नाहीं २ |
| ७ | कागलकर घाटगे क्षत्रिय | योद्धे, कारभारी | ३ पिढ्या |
| ×८ | बाळकृष्ण नारायण दीक्षित पाटणकर | अग्निहोत्री | आज वंश नाहीं |
| ९ | न्या. रानडे ब्राह्मण [ब्राह्मण | न्यायाधीश | मुलगा नाहीं १ |
| १० | रामशास्त्री प्रभुणे ब्राह्मण | ,, | आज वंश नाहीं |
| ११ | रामचंद्रपंत आमात्य ब्राह्मण | मंत्री | ६ पिढ्या. आज दत्तक |
| १२ | साळुंखे पाटणकर क्षत्रिय | लढवय्ये सरदार | ६ पिढ्यानंतर एक शाखा सोडून सर्व निर्वंश |
| १३ | डफळे सटवाजीराव क्षत्रिय | लढवय्ये सरदार | नातू नाहीं २ पिढ्या |
| १४ | गायकवाड क्षत्रिय | राजे | ५ पिढ्या. आज दत्तक |
| १५ | मोरया गोसावी ब्राह्मण | संत | ८ पिढ्या. ,, |

[ येथें गणितागत पद्धतीबद्दल थोडासा खुलासा केला पाहिजे. मला ती मुळींच येत नाहीं. पण ज्यांनीं त्या पद्धतीनें अभ्यास केला आहे, त्यांचेच आधार मीं घेतले आहेत. आपल्याकडे हा शब्द गो. म. जोशी बराच वेळ म्हणतात. त्यांना त्यांत कांहीं समजतें असा पुरावा अजून कोठेंच उपलब्ध नाहीं. त्यांच्या ग्रंथांत ' शक्य तर हा हिशेब परिशिष्टांत देऊं ' असें अनेक वेळां त्यांनीं नुसतेंच म्हटलें आहे. दिला नाहीं. व्याख्यानांतही ग्राफ, कोइफिशंट वगैरे शब्द सांगण्यापलीकडे त्यांनीं अजून जास्त पुरावा दिलेला नाहीं. वर दिलेल्या कोष्टकावरून एकदम कांहीं निर्णय करावा असें माझें मुळींच म्हणणें नाहीं. पण गणितागत पद्धतीच्या नुसत्या बडबडीपेक्षां हा पुरावा जास्त निर्णायक आहे यांत शंकाच नाहीं. शिवाय मी घेतलेला प्रत्येक आधार गणितागत पद्धतीनें अभ्यास करणाऱ्या पंडिताचाच घेतला आहे हें वर सांगितलेंच आहे. ]

---

× टीप:—यांचे बंधु यांनीं ब्राह्मण्य सोडून सरदेशमुखी घेतली. त्यांचा वंश आहे.

ज्यांनीं आपले मनुप्रणीत धंदे सोडले तरी त्यांचा वंश टिकला अशांचीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत. यांनल्या प्रत्येक घराण्यांतले वंशज आज आहेत.

| | घराण्याचें नांव व जात | धंदा हे मनुप्राणित धंदे नाहींत | किती पिढ्या टिकल्या |
|---|---|---|---|
| १ | बाळाजी आबाजी चिटणीस क्षत्रिय | लिखाणी | ९ पिढ्या |
| २ | बारामतीकर जोशी ब्राह्मण | सावकार | १० पिढ्या |
| ३ | मेहेंदळे ब्राह्मण | सरदारकी | सुमारें ८ पिढ्या |
| ४ | पटवर्धन ब्राह्मण | ,, | सुमारें १० पिढ्या |
| ५ | खांडेकर ब्राह्मण | ओरिसाचे सुभेदार | ७ पिढ्या |
| ६ | रामचंद्र गणेश कानडे ब्राह्मण | लढवय्ये [सरदार | ७ पिढ्या |
| ७ | रामचंद्र नाईक परांजपे ,, | सावकार | ७ पिढ्या |
| ८ | केशव भास्कर परांजपे ,, | कापडाचा व्यापार | ११ पिढ्या |
| ९ | परांजपे कुलांतील १५वें घराणें ,, | सावकार [देशमुख | १० पिढ्या |
| १० | बाळाजी महादेव परांजपे ,, | वसईच्या किल्यावर | ७ पिढ्या |
| ११ | गोखले ,, | आदिलशाहीपासून सावकारी पुढें पेशवाईंत सरदारकी | सुमारें २० पिढ्या |
| १२ | वरवे घराणें ,, | सरदारकीव सावकारी | पुष्कळ शाखा ९ पिढ्या |
| १३ | पानसे ,, | शिवाजीच्या वेळेपा | सुमारें-१२ पिढ्या |
| १४ | पुंडे ,, | सूनसरदार[सावकारी | वंश चालू आहे [चालू |
| १५ | रावळंकर सरदेसाई | सरदेशमुख | ३३ पिढ्या अनेक शाखा |

वरील कोष्टक पाहून असें ध्यानांत येईल कीं, वृत्तिसंकर व वंशनाश यांचा कांहीं एक संबंध नाहीं.

वाटेल त्यानें वाटेल तो धंदा करावा, व आपलें कर्तृत्व दाखवून मोठ्या पदाला चढण्यास समाजानें त्याला अवश्य संधि द्यावी, यामुळेंच समाजाची उन्नति होईल. त्याचप्रमाणें समसंस्कृति व कर्तृत्व पाहून वाटेल त्या सुदृढ कुळाशीं विवाहसंबंध करावे. त्यायोगेंहि समाजाची पुढील पिढी जास्त तेजस्वी होईल असा या दोन बाबतींत आपल्याला वरील विवेचनावरून निर्णय करावयास हरकत नाहीं; रक्तशुद्धि व वृत्तिशुद्धि आजपर्यंत आपण पुष्कळ केली. पण हिंदूंचें साम्राज्य बाह्य प्रदेशावर तर नाहींच पण त्याच्या देशावरही अविच्छिन्न असें गेल्या दीड हजार वर्षांत नाहीं. महाराष्ट्रापुरतेंच बोलावयाचें तर कोकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे, सारस्वत, प्रभू, मराठे वगैरे जाती जर रक्तानें एक झाल्या, तर साठ सत्तर लाख लोकांचा एक बलवान

समूह या देशांत तयार होईल, व मग आज जो अनेक कारणांनीं सामर्थ्याचा व्यय होत आहे तो थांबून या देशाचा भाग्योदय होईल असें वाटतें.

[ या प्रकरणांत train, Germinal determiners यांसारखे कांहीं पारिभाषिक शब्द आलेले आहेत. त्यांचा अर्थ अगदीं नेमका निश्चित करणें कठीण असतें. माझा अर्थ कोठें चुकला आहे असें मला आढळलेलें नाहीं. पण क्वचित् तसें होणें शक्य आहे. पण तेवढ्यावरून सर्व प्रतिपादन लटकें पडेल असें नाहीं. तसें म्हणण्याचा एकानें प्रयत्न केल्याचें मला आढळलें आहे. म्हणून खुलासा करून ठेवला आहे. ]

# लोकसंख्येची वाढ व नियमन.

सन १७९८ मध्यें माल्थस नांवाच्या पंडितानें लोकसंख्येवरील आपला ग्रंथ प्रसिद्ध केला. व त्यानें विचारी लोकांना लोकसंख्येसंबंधींच्या एका भयानक प्रश्नाची जाणीव करून दिली. त्यानें सांगितलें कीं जमिनींतून उत्पन्न होणाऱ्या अन्न-वस्त्राला मर्यादा आहे. दहाच्या ऐवजीं वीस माणसें तेवढयाच जमिनींत खपलीं, व त्यांनीं साधनसामुग्री दुप्पट वाढविली, तर पूर्वीच्या दुप्पट अन्नवस्त्र निर्माण होतें, हें खरें; पण विसाच्या ऐवजीं तीस खपली तर तिप्पट उत्पन्न होईल हें खरें नाहीं. कोठें तरी याला मर्यादा पडतेच. व मग जास्त श्रम किंवा खतें यांचा उपयोग होत नाहीं. जमिनीच्या या स्वभावामुळें नवीन जन्माला आलेला मनुष्य आपल्यापुरतें अन्नवस्त्र निर्माण करूं शकणार नाहीं. व अशा रीतीनें अन्नाचा तुटवडा पडत जाईल. ज्या मानानें प्रजेची वाढ होते, त्या मानानें अन्नवस्त्राची वाढ कधींच होणें शक्य नाहीं. प्रजा भूमिति-श्रेढीनें वाढते, तर अन्न, गणितश्रेढीनें वाढतें. तेव्हां लवकरच आतां अशी वेळ येईल कीं माणसांना खावयास अन्न नाहीं. ही आपत्ती टाळण्यासाठीं लोकसंख्येचें नियमन करणें अत्यंत आवश्यक आहे.

मागल्या काळीं रोगराई, दुष्काळ इत्यादि आपत्तींमुळें लोकसंख्येवर नियंत्रण पडे. व शिवाय अनेक देशांतील लोकांत बालहत्येची चाल अगदीं सर्रास चालू होती. हल्लीं विज्ञानानें माणसांना पहिल्या दोन आपत्तींपासून वचावलें आहे. व बालहत्येची चाल तर कायद्यानेंच बंद केली आहे. त्यामुळें व गेल्या शतकांत उत्पादनाचीं यांत्रिक साधनें वाढल्यामुळें प्रजावाढीस मर्यादा राहिली नाहीं. व कांहीं देशांतील संख्या पांच पांच पटींनें वाढली. १८०१ सालीं इंग्लंडची संख्या सुमारें ९० लक्ष होती ती १९२१ सालीं तीन कोटी अठ्याहत्तर लक्ष झाली. विचारी लोकांचें याकडे पन्नाससाठ वर्षांपूर्वीपासून लक्ष गेलेलें आहे. व संततिनियमनाचीं चांगलीं साधनेंहि अलीकडे सांपडलीं आहेत. त्यामुळें पूर्वींचीं नियमनें जरी बंद झालीं तरी या नव्या उपायांनीं लोक-संख्येच्या वाढीस आळा बसूं लागला.

पण या नवीन पद्धतीमध्यें एक फारच मोठा दोष लोकांना दिसूं लागला. नवीं साधनें घेण्याला मन अनुकूल होणें, पैसे देऊन तीं घेणें व वापरणें हें समाजांतल्या

शिकलेल्या लोकांनाच तेवढें आरंभीं शक्य होतें. अडाण्यांना तें पटतहि नसे व त्यांना तें शक्यहि नव्हतें. पण यामुळें समाजावर एक भलतीच आपत्ती आली. शिकणाऱ्या, महत्त्वाकांक्षी व संस्कृत लोकांचीच प्रजा तेवढी कमी होऊं लागली. अडाणी, मंद लोकांची प्रजा पूर्वीच्याच भरमसाट गतीनें वाढत होती. त्यामुळें समाजांत नाकर्त्या लोकांचें प्रमाण वाढून तो अधोगतीला चालल्याचीं स्पष्ट लक्षणें दिसूं लागलीं. तेव्हां संततीच्या बाबतींत मानवानें हात घालणें चूक आहे, असें कांहीं लोक म्हणूं लागले. रोगराई, दुष्काळ हीं निसर्गाचीं नियमनें योग्य आहेत. रोग हटवणें, पीडितांना मदत करणें इत्यादि जे उपाय मानव करीत आला आहे, त्यानें समाजाची हानि होत आहे, असें या पक्षाचें मत आहे.

आज या विषयावर अनेक विचार आपणास ऐकावयास सांपडतात. माल्थसनें दाखविलेलें वाढीचें प्रमाण तेथल्या विशिष्ट परिस्थितींत व त्या काळींच फक्त होतें. तें नेहमींचें नाहीं तेव्हां त्याला भिण्याचें कारण नाहीं, असें कांहीं म्हणाले. कांहीं शास्त्रज्ञ म्हणाले कीं, जमिनींतून अन्न किती निघेल, याला सांगितलेल्या मागल्या मर्यादा शास्त्राच्या साह्यानें खूपच वाढवितां येतील. कोणी अर्थशास्त्री म्हणतात कीं, आज अन्न कमी असें वाटतें तें खरें नाहीं. अन्न वाटेल तितकें आहे. त्याची वाटणी योग्य होत नाहीं, म्हणून हें सर्व दुःख आहे. संततिनियमन एकदां मान्य केलें तर लोक त्यापासून कधींच परावृत्त होणार नाहीत व मग तो देशच अजीबात नाहींसा होईल अशीहि भीति कांहींनीं व्यक्त केली. आपण संख्या कमी केली तरी आपल्या शेजारचें राष्ट्र तसें करणार नाहीं व मग लढाईच्या वेळीं आपला पराजय होईल, असे राजकीय प्रश्नही यांत उपस्थित झाले. लोकसंख्येवर नियंत्रण आवश्यक असलें तरी तें मानवानें घालणें हें हानिकारक असून तो प्रश्न निसर्गावरच सोपविणें योग्य आहे असेंहि एक मत असल्याचें वर सांगितलेंच आहे. धर्म दृष्ट्या हें पापकृत्य आहे असें धार्मिक लोकांनी सांगितलें. आपली प्रजा पोसण्याचें सामर्थ्य नसणें म्हणजे नामर्दपणा आहे, असा धिःकारहि कोणीं केला. अशा तऱ्हेनें धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, जीवनशास्त्र, राजकारण इत्यादि अनेक शास्त्रांतून या नियमनासंबंधीं अनुकूल–प्रतिकूलचर्चा सुरू झाली. त्यापैकीं जीवन-शास्त्र व राजकारण यांचे आक्षेप फार महत्त्वाचे आहेत. म्हणून त्यांचा या लेखांत प्रामुख्यानें विचार करावयाचा आहे.

आज लोकसंख्येच्या बाबतींत समाजापुढें दोन प्रश्न आहेत. अन्न कमी पडेल, इतकी लोकसंख्या न वाढूं देणें हा एक, व ती न वाढूं देण्यासाठीं अशीं नियमनें शोधून काढावयाचीं कीं त्यामुळें उत्कृष्टांची प्रजा वाढून निकृष्टांची कमी होईल, हा दुसरा.

## नैसर्गिक निवड.

या दोहीला नैसर्गिक निवड ( Natural Selection ) हा एकच उपाय आहे असें कांहीं पंडितांचें मत आहे. हेक्रॅफ्ट हा त्यांत विशेष प्रमुख आहे. डार्विनिझम व रेस-प्रोग्रेस या आपल्या पुस्तकांत ह्यानें आपले विचार अगदीं निर्भयपणें मांडले आहेत. रोगराई, दुष्काळ, थंडी, वारा हे समाजाचे शत्रु नसून मित्र आहेत. योग्य तीं माणसें जगवून बाकीचीं मारून टाकणें हें काम निसर्ग रोगजंतूंच्या सहाय्यानें चांगलें करूं शकतो व आपण वैद्यकी ज्ञानानें रोगजंतू मारीत आणल्यामुळें समाजाची हानि होत आहे, असें त्याचें मत आहे. तो म्हणतो, बॅसिलस ट्युबरक्युलोसिस हा क्षयजंतु मानवाचा मित्र आहे. कारण तो दुर्बल लोकांनाच ग्रासतो. समर्थांना कांहीं करूं शकत नाहीं. ( पान ५७ ) त्याचप्रमाणें महारोग. Hideous as are its aspects, it must be looked upon as a friend of humanity; for the microbe of leprosy feeds upon those who are debilitated from conditions under which wealthy & strong racial development is impossible. ( दुर्बळांचा तेवढा नाश करीत असल्यामुळें क्षयाप्रमाणेंच महारोगहि मानवाचा मित्र आहे. पान ५१ ). त्याच्या मतें दारू ही पण समाजाची मैत्रीण आहे. चंचल, अस्थिर प्रकृतीच्या लोकांना व गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांनाच ती प्यावीशी वाटते. ती जर बंद केली तर हे लोक मरण्याचें साधनच नाहींसें केल्यासारखें होईल. (पान ७५) रा. गो. म. जोशी यांनीं याच तऱ्हेचीं मतें आपल्या हिंदूचें समाजरचनाशास्त्र या ग्रंथांत प्रगट केलीं आहेत. बालमृत्यु पुष्कळ होणें हें समाजाला हितप्रद आहे असें ते म्हणतात, ( पान ३३३ ). आहे ती लोकसंख्या टिकविण्यास प्रत्येक जोडप्यास दोन तरी मुलें झालीं पाहिजेत. त्यांना तेवढींच मुलें झालीं तर तीं दुर्बल व हीन प्रतीचीं असलीं तरी दोन्हीं जगविणें त्यांना प्राप्तच आहे. त्यांत निसर्गाला निवड करण्यास वाव नाहीं. त्यांना जर पांच सहा मुलें झालीं तर त्यांतली दुर्बल, नालायक तेवढीं निसर्ग मारून टाकून सबल तेवढीं ठेवील. व त्यामुळें समाजांत कर्त्या पुरुषांचें प्रमाण वाढेल. अशी ही विचारसरणी आहे. तेव्हां प्रत्येकानें शक्य तेवढी प्रजा निर्मून निसर्गाच्या निवडीला वाव देणें हें त्याचें कर्तव्य आहे हें ओघानेंच आलें. जीवांचें कृत्रिम तऱ्हेनें रक्षण करणें जोशांना मान्य नाहीं. अनाथ विद्यार्थिगृहासारख्या संस्थांना त्यांचा विरोध आहे. शाळेंतल्या सर्व विद्यार्थ्यांना दूध मिळण्याची व्यवस्था करून कांहीं एक उपयोग नाहीं

अस त्यांना वाटतें. नैसर्गिक निवडीचा पूर्ण अंमल होऊं दिल्यास ' अशा समाजांतील स्त्रीपुरुष काटक, बलवान्, शूर, उद्योगी, साहसप्रिय असेच निर्माण होतील ' असें ते म्हणतात( पान १२० ).

जोशांच्या बाबतींत एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ते अमुक म्हणतात असें बोलण्याची सोयच त्यांनीं ठेवली नाहीं. गीतेप्रमाणेंच आपल्याहि ग्रंथांतून वाटेल तीं मतें निघावीं अशी त्यांची महत्त्वाकांक्षा दिसते. तुम्ही नैसर्गिक निवडीवर सर्व भर देतां असें कोणी म्हटल्यास, रॅशनल म्हणजे मानवकृत निवडही मला मान्य आहे, असें म्हणून त्यालाहि ते आधार काढून देतील. तरी पण अनाथ विद्यार्थीगृहाच्या व एकंदर कृत्रिम तऱ्हेनें पिण्ड जगवण्याच्या आपण कां विरुद्ध आहों, हें ते मुळींच सांगणार नाहींत. दोन चार मुलें झाल्यावर मग संततिनियमन करूं असें कोणी म्हणतील, तर संततीपैकीं पहिल्या दोन तीन मुलांत वेड लागणें, गुन्हेगारी, क्षयरोग, मनोवैकल्य हीं जास्त प्रमाणांत असतात असें हे सांगतील. ( पान ३३१ ) पण पुढें बालविवाहाचे फायदे सांगतांना चटकन् मोहरा फिरवून असेंहि सांगतील कीं, ' कोणाहि मनुष्याची जी कांहीं संतती शिल्लक राहते, त्यामध्यें आधीं झालेल्यांची जीवनशक्ति पुढें झालेल्या मुलांच्या जीवनशक्तीपेक्षां जास्त असते. आणि आधीं झालेल्या संततीची संततीहि पुढें झालेल्या संततीच्या संततीपेक्षां जास्त सुदृढ असते. ' ( पान ३६५ )

असो. तर नैसर्गिक निवड व्हावी, अशा मताच्या लोकांचें म्हणणें काय आहे, हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. क्षय, महारोग, दारू हे समाजाचे मित्र आहेत- बालमृत्यु पुष्कळ असणें चांगलें आणि लोकांना दुधासारखे सकस अन्न पुरवून किंवा अनाथ विद्यार्थीगृहासारख्या संस्था चालवून जीवांचें कृत्रिम रीतीनें रक्षण करणें हें समाजाला घातुक आहे. कारण त्यामुळें निसर्गाच्या निवडीला वाव मिळत नाहीं, अशा मताचा हा पक्ष आहे.

मला वाटतें नैसर्गिक निवड या तत्त्वाचा अर्थ नीट न समजल्यामुळें वरच्या-सारखीं विपर्यस्त विधानें लोक करूं शकतात. हें तत्त्व प्रथम डार्विननें सांगितलें. एका जीवकोटीपासूनच अनेक जीवकोटी झाल्या, मत्स्यकच्छादि जीवकोटीमध्यें फरक पडत जाऊनच आजचा मानव झाला; मानवाच्या मागली अवस्था माकड ही होती; इ. त्याच्या प्रसिद्ध उत्क्रान्तिवादांत येणाऱ्या गोष्टी आतां सर्वांच्या परिचयाच्या आहेत. एका जीवकोटीपासून दुसरी जीवकोटी तयार होणें याचेंच नांव उत्क्रान्ति. ही जी उत्क्रान्ति निसर्गांत घडून येते, ती घडतांना नैसर्गिक निवड या तत्त्वाची अंमलबजावणी होत असते. एक उदाहरण घेऊन याचा अर्थ स्पष्ट करूं. लांडग्याच्या

वर्गांत कुत्रा हा प्राणी आहे. लांडग्याचा कुत्रा होणें ही उत्क्रान्ति आहे. असा चमत्कार कसा होतो तें आतां पाहूं.

आपणांस हें ठाऊक आहे कीं एकाच आईबापांच्या संततींत पुष्कळ फरक असतो. दोन सख्खे भाऊ एकमेकांपासून अगदीं भिन्न गुणाचे असतात. माधवराव व नारायणराव पेशवे हें उदाहरण प्रसिद्ध आहे. लांडग्यामध्येंही असेंच होणार. कांहीं अगदीं भयंकर क्रूर, कांहीं जरा गरीब, असा फरक पडणारच. आतां हे लांडगे मनुष्यांच्या नजीक आल्यावर मनुष्य अर्थातच क्रूर लांडग्यांना मारून टाकणार त्यामुळें गरीब तेवढे शिल्लक राहाणार व त्यांचीच पुढली पिढी होणार. त्या पिढींत पुन्हां क्रूर, गरीब असा फरक होणारच. अर्थात् क्रूरांचें प्रमाण यांत कमी होईल हें उघडच आहे. या पिढींतलेही क्रूर लांडगे मनुष्य मारून टाकील. असें होत होत कांहीं शतकांनीं त्या प्रांतांत गरीब लांडगेच फक्त राहतील. संततीच्या मनोरचनेंत ज्याप्रमाणें फरक पडत जातात, त्याचप्रमाणें शरीररचनेंतही पडतात. व ज्यांची शरीररचना भोंवतालच्या परिस्थितींत टिकण्यास जास्त अनुकूल ते टिकतात व बाकीचे मरतात. मनोवृत्ति व शरीररचना यांमध्यें अकारण फरक पडत जाऊन, भोंवतालच्या परिस्थितीच्या दृष्टीनें ज्यांची शरीर व मनोरचना टिकण्यास योग्य ते टिकणें व बाकीचे मरणें व अशी प्रक्रिया हजारों वर्षें चालून, लांडग्याचा कोल्हा किंवा एका माशांचेच निरानिराळे प्रकार हे निर्माण होतात. सृष्टींतल्या या प्रक्रियेलाच डार्विननें नॅचरल सिलेक्शन किंवा सर्व्हायव्हल ऑफ दि फिटेस्ट असें नांव दिलें आहे.

येथें अत्यंत महत्त्वाची एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. व ती ही कीं सिलेक्शन किंवा फिटेस्ट या शब्दांनीं आपल्या मनांत जो श्रेष्ठ, समर्थ, वरच्या दर्जाचा असा अर्थ येतो तसा डार्विनच्या मनांत पुसट सुद्धां नाहीं. त्या परिस्थितींत जगण्यास योग्य इतकाच अर्थ आहे. ससासारखा एक बारीक प्राणी आहे. त्या जातींत कांहीं गवताच्या रंगाचे असतात; कांहीं काळे व कांहीं पांढरे असेही असतात. भोंवतीं गवत वाढलें कीं घार गिधाड वगैरे प्राण्यांना गवताच्या रंगाचे प्राणी निवडून दिसत नाहींत. काळे व पांढरे प्राणी मात्र भिन्न रंगामुळें त्यांच्या नजरेंत भरून त्यांना ते खाऊन टाकतात. येथें नैसर्गिक निवडीनें जे शिल्लक राहिलें त्यांच्यांत श्रेष्ठपणा कोणचाच नव्हता. त्या परिस्थितींत ते ' फिटेस्ट ' इतकेंच. हिरवे व पांढरे किडे झाडावर असले तर बर्फ पडल्याबरोबर हिरवे किडे पक्ष्यांना दिसूं लागतात व त्यांचा फन्ना उडतो. उलट बर्फ जाऊन पालवी फुटली कीं पांढरे मरतात. हें नॅचरल सिलेक्शन आहे. यावरून निसर्ग

ज्यांना निवडील ते साहसी, शूर, उद्योगी, काटक असें असतील हें म्हणणें अगदीं भ्रामक आहे हें ध्यानांत येईल. म्हणजे निसर्गशक्ति ही आंधळी आहे. तिच्या मारामारींत समाजदृष्टीनें आपण ज्यांना चांगले म्हणूं तेच टिकतील असें नाहीं. त्यांच्या योग्य परिस्थिति आली तर तेही टिकतील. पण तेच टिकतील असें नाहीं. अत्यंत दुर्बल, अत्यंत घाणेरडे, असेहि टिकतात. जीवनशास्त्रांतील अनेक तज्ज्ञांनीं ही गोष्ट स्पष्ट केली आहे. ( १ ) सायन्स ऑफ लाइफ मध्यें ज्यूलियन हक्सले म्हणतो— Evolution has achieved much that is definitely bad. It has brought into being, not only strong, beautiful and intelligent creatures, but also degenerate parasites and loathsome diseases. [ उत्क्रांतीमध्यें प्रबल, सुंदर, व बुद्धिमान प्राणीच वर आले ,असें नसून अत्यंत किळसवाणे रोगजंतू व अधम परपुष्ट प्राणीहि टिकले आहेत— पान ३८७ ]

( २ ) आयडिया ऑफ प्रोग्रेस या निबंधांत डीन इंगनें सांगितलें आहे कीं, Survival of the fittest does not mean that the most virtuous, or the most useful or the most beautiful survive. There is no moral or aesthetic judgement pronounced on the process or any part of it. जीवनार्थ कलहांत समर्थतम टिकून राहातात याचा अर्थ असा नव्हे कीं, जें सुंदर, उपयुक्त गुणशाली असेल तेंच टिकेल. नीति किंवा रसिकता यां दृष्टीनें या ( नैसर्गिक निवडीच्यां ) पद्धतीवर कांहीं एक मत सांगतां येणार नाहीं.

नॅचरल सिलेक्शनचा अर्थ जर बरोबर ध्यानांत आला तर नैतिक मूल्य ( Moral Value ) मनांत धरून आपण ज्या चांगल्यावाईटाच्या किंवा श्रेष्ठ-कनिष्ठाच्या कल्पना करतो तसल्या कल्पना येथें अगदीं गैरलागू आहेत असें ध्यानांत येईल. मानवप्रजा निसर्गाच्या हवालीं केली म्हणजे नैसर्गिक निवडीला जर इतर सृष्टी-प्रमाणेंच मानव–सृष्टींतही पूर्ण वाव दिला, तर शिवाजी, बाजी, टिळक, रानडे असलीं माणसेंच फक्त टिकतील अशी जी आपली कल्पना आहे ती अगदीं चुकीची आहे जोशांना हें म्हणणें अगदीं पूर्णपणें मान्य आहे. ' अनेकविध पिंड निर्माण करून त्यांतले प्रबल तेवढे शिल्लक ठेवणें अशी सृष्टीची प्रक्रिया दिसते. येथें प्रबल या शब्दानें जीवनक्षम एवढाच अर्थ अभिप्रेत आहे. मग तो कोणत्याही कारणानें जगलेला असो ' असें त्यांनींच म्हटलें आहे. ( पान १२८ ). पण नॅचरल सिलेक्शनचा हा खरा अर्थ

ग्रंथ संग्रहालय
(७४) १४१
वा. २ाा नं.

त्यांना मान्य असण्याचा कांहीं एक उपयोग नाहीं. कारण त्यांच्याबरोबर उलट व कुठला अर्थ तोही त्यांना मान्य आहे. निसर्गाच्या निवडीनें जे टिकतील ते काटक, बलवान, शूर, उद्योगी, साहसप्रिय असेच असतील असें त्यांनी ... सांगितलेंच आहे.

नैसर्गिक निवड या तत्त्वाचा ख़रा अर्थ ध्यानांत आला म्हणजे हेक्रॅफ्ट, स्नो, जोशी, वगैरे पंडितांनीं सांगितलेला प्रत्येक मुद्दा कसा चुकीचा आहे हें ध्यानांत येईल. हेक्रॅफ्ट म्हणतो क्षयजंतु, महारोगजंतु दुर्बलांनाच तेवढे मारतो, प्रबलांना तो कांहीं करूं शकत नाहीं. पण या म्हणण्याला काडीचाही अर्थ नाहीं. दुर्बल म्हणजे कोण ? शरीरानें दुर्बल तो, कां मनानें दुर्बल तो ? कित्येक बुद्धिमान् व कर्ते पुरुष हे शरीरानें अगदीं दुर्बल असतात. हॅवलॉक एलिसनें एक हजार कर्त्या पुरुषांच्या कुलांचा अभ्यास करून असें सांगितलें कीं शरीरदौर्बल्य हे या कर्त्या पुरुषांचें वैशिष्ट्यच दिसलें. एलिसचा हा सिद्धान्त नियम म्हणून घ्यावा असें मी म्हणत नाहीं. पण विशिष्ट उदाहरणें म्हणून त्याकडे पाहिलें तरी तीं अगदीं निर्णायक आहेत. कारण त्यानें म्हटलें आहे कीं या हजारांपैकीं चाळीस लोक क्षयानें लहानपणींच मेले. व सुमारें साठ लोक जन्मभर क्षयी होते. क्षय प्रबलांना कांहीं करूं शकत नाहीं हें खरें मानलें तरी शरीरानें प्रबल एवढाच अर्थ करावा लागेल. मनानें प्रबल पण शरीरानें दुर्बल अशा लोकांना क्षय मारूं शकतो. आणि समाजाला यांची जरूर निःसंशय आहे. तेव्हां क्षयरोग मोकळा सोडावा कीं काय याचा समाजानें विचार करावा.

दुसरें असें कीं कांहीं लोक लहानपणीं दुर्बल असतात. व मोठेपणीं शरीरानें सुद्धां राक्षसासारखे होतात. बेंथॅम, बर्क, डिकन्स हे लोक असे होते. आणखी एकशें तीस लोकांचीं उदाहरणें एलिसनें दिलीं आहेत. व त्यांत न्यूटन आहे. ज्या रेड इंडियनांचा जीवनक्रम जोशांनीं वाखाणला आहे, त्यांत हे बिचारे केव्हांच मरून गेले असते. दुर्बल ते मरतात या म्हणण्यांत फसवेगिरी आहे. दुर्बल कोण हे आधीं कोणी सांगत नाहीं. दुर्बल ते मेले असें म्हणावें, कां मेले ते दुर्बल असें म्हणावें, याचें उत्तर या पंडितांना देतां येणार नाहीं.

निसर्गाप्रमाणें आपला जीवनक्रम ठरवावा असें पुष्कळ लोक सांगत असतात. पण या सांगण्याला कांहींच अर्थ नाहीं. प्रश्न असा येईल कीं गाढवाप्रमाणें आपला जीवनक्रम ठरवावा कीं वाघाप्रमाणें ? क्षयजंतूप्रमाणें कां दह्यांतल्या जंतूप्रमाणें ? सर्वच निसर्गांतले. उत्क्रान्तीमधली प्रणाली पाहून ठरवावें असें कोणी म्हणेल; पण हें सर्व त्या प्रणालीचा अर्थ बसवण्यावर अवलंबून आहे, असें दिसून येईल. अनंत जीव निर्माण

करणें व फारच थोडे शिल्लक ठेवणें हें निसर्गांत दिसतें. म्हणून मानवानेंही तसें करावें असें कांहीं म्हणतात. उलट उत्क्रांतीकडे पाहिले तर वनस्पति, जंतु, जलचर, स्थलचर, या पायऱ्यावर उत्तरोत्तर प्रजा कमी करून तिच्या संगोपनाकडे जास्त लक्ष देणें हीच पद्धति दिसते असें दुसरे म्हणतात. अर्थात् मानव ही शेवटची पायरी असल्यामुळें तेथें प्रजा कमी करून संगोपन शक्य तितकें जास्त करणें हें ओघानेंच आलें. नैसर्गिक व कृत्रिम या शब्दांना बोलण्याच्या सोयीपुरता अर्थ आहे. पण आपण जर तो शास्त्रांत आणूं लागलों तर पदरीं वेडेपणाच बांधून घ्यावा लागेल. कृत्रिम तऱ्हेनें पिंडाचें रक्षण करूं नये म्हणजे काय ? इस्पितळें, अनाथगृहें हीं कृत्रिम, मग घरें बांधणें व कपडे घालणें हें कृत्रिम नव्हे काय ? जेनिंग्ज म्हणतो ज्या क्षणीं मानवाला अग्नीचा उपयोग ध्यानांत आला तेव्हांच त्यानें निसर्गनिवडींत हात घातला आहे. कारण तेव्हांपासून थंडी-वाऱ्यापासून मनुष्य आपलें व आपल्या मुलांचें रक्षण अग्नीच्या साह्यानें म्हणजे कृत्रिम तऱ्हेनें करूं लागला. कृत्रिमता टाकून द्यावयाची असेल तर नग्न होऊन झाडाखालीं राहणें याशिवाय गत्यंतरच नाहीं. पण हा सगळा वेडेपणा मानवाला निसर्गाबाहेर टाकण्यामुळें होत असतो. वास्तविक मानव हा निसर्गांतलाच आहे व किड्यांचें किंवा पक्ष्यांचें कृत्य जितकें नैसर्गिक तितकेंच मानवाचेंही कृत्य नैसर्गिक समजण्यास मुळींच हरकत नाहीं. एलिस म्हणतो संततिनियमन हें पूर्ण नैसर्गिक असून ती उत्क्रान्तीमधली एक पायरीच आहे !

बालमृत्यु पुष्कळ होणें चांगलें, यानें नैसर्गिक निवडीस वाव मिळून नालायक जीव मारले जातात व लायक तेवढेच शिल्लक राहातात. म्हणून प्रत्येकानें शक्य तितकी जास्त मुलें होऊं द्यावी वगैरे या पंडितांचें सांगणें असेंच भ्रामक आहे.

रशियामध्यें सर्वांत जास्त बालमृत्यू होतात ( १९१७ पूर्वी ) व नार्वेमध्यें सर्वांत कमी होतात. तरी रोगानें जास्त संहार रशियांतच होतो. जन्मलेल्या बालकांपैकीं शेकडा पन्नास बालकें रशियांत मरतात. तेव्हां ही निवड फारच कसोशीनें होते, असें दिसतें; व उरलेली प्रजा मोठी सुदृढ असेल असें वाटतें. पण या उरलेल्या पैकीं लढाईच्या कामास शेकडा ३७ इतकेच लायक ठरले. एलिसनें म्हटलें आहे कीं, Natural selection is not a satisfactory operation from any point of view. It kills off the unfit no doubt, but it goes farther and tends to render the fit unfit. ( नैसर्गिक निवड ही कोणच्याहि दृष्टीनें चांगली नाहीं. ती नालायकांना मारते हें खरें, पण लायकांना नालायक करून ठेवते हेंहि तितकेंच खरें आहे. ) डॉ. जॉर्ज कार्पेंटरचें

असेंच मत आहे. सर फ्रॅन्सिस गाल्टन आपल्या आत्मचरित्रांत असेंच म्हणतो (पृ. ३२२-२३). Natural selection rests upon excessive production and wholesale destruction. Eugenics rests upon bringing no more individuals into the world than can be properly cared for and these only of the best stock. ( असंख्य प्रजा निर्माण करणें व सर्रहा संहार करणें ही नैसर्गिक निवड, जेवढ्यांचें संगोपन नीट करणें शक्य आहे तेवढ्याच उच्च कुळांतल्या मुलांना जन्माला आणणें याचें नांव सुप्रजाशास्त्र ).

लिओनार्ड डार्विन म्हणतो कीं, Parents ought not to bring more children in the world than they can reasonably hope to bring up in accordance with certain standard of living ( What is Eugenics? ).

कार सॉंडर्स यानें आपल्या पॉप्युलेशन या पुस्तकांत असें दाखवून दिलें आहे कीं, राष्ट्राला प्रजा कमी करणें असेल तर संततिनियमन आवश्यक आहेच; पण वाढ-वावयाची असेल तरीहि तें आवश्यक आहे. कारण ज्या स्त्रियांना जास्त मुलें होतात; त्यांचीं जितकीं मुलें जगतात, त्यापेक्षां ज्यांना कमी होतात त्यांचीं जास्त जगतात. म्हणजे दहांपैकीं चार जगलीं तर सातापैकीं पांच जगतात. याचें कारण अगदीं उघड आहे-दोन अपत्यांमध्यें जितकें अंतर जास्त तितकी मातेची प्रकृति जास्त चांगली राहून त्यामुळें अपत्याचें संगोपनहि तिला जास्त चांगलें करतां येतें. मागल्या काळीं जेव्हां संततीनियमनाचीं अर्वाचीन साधनें नव्हतीं, तेव्हां कित्येक जमातींत बालहत्येची चाल सर्रास चालू होती. त्यापेक्षां अर्वाचीन पद्धति बरी हें कोणाहि सूज्ञ व अनाग्रही माणसाला पटेल असें वाटतें.

वरील सर्व विवेचनावरून असें ध्यानांत येईल कीं, कोणच्याहि काळीं व स्थळीं लोकसंख्येवर नियमन ठेवणें हें समाजाचें कर्तव्य आहे. तें नैसर्गिक पद्धतीनें होऊं द्याव-याचें कीं आपण करावयाचें एवढाच प्रश्न. त्यालाहि आपण तज्ज्ञांच्या आधारें उत्तर काढलेंच आहे. नैसर्गिक निवड ही आंधळी आहे. ती वाटेल त्याला मारील. तेव्हां ती टाकून देऊन सुप्रजेचा अभ्यास करून मानवानें आपल्या हातांत ही व्यवस्था घेतली पाहिजे. यानेंच भावी पिढी सुदृढ व कार्यक्षम होईल.

अन्न कमी पडेल इतकी प्रजा वाढूं देऊं नये, या दृष्टीनें विचार झाला. आतां समाजांतील कर्त्या पुरुषांची प्रजा कशी वाढेल व नाकर्त्यांची

करणें व फारच थोडे शिल्लक ठेवणें हें निसर्गांत दिसतें. म्हणून मानवानेंही तसें करावें असें कांहीं म्हणतात. उलट उत्क्रांतीकडे पाहिले तर वनस्पति, जंतु, जलचर, स्थलचर, या पायऱ्यावर उत्तरोत्तर प्रजा कमी करून तिच्या संगोपनाकडे जास्त लक्ष देणें हीच पद्धति दिसते असें दुसरे म्हणतात. अर्थात् मानव ही शेवटची पायरी असल्यामुळें तेथें प्रजा कमी करून संगोपन शक्य तितकें जास्त करणें हें ओघानेंच आलें. नैसर्गिक व कृत्रिम या शब्दांना बोलण्याच्या सोयीपुरता अर्थ आहे. पण आपण जर तो शास्त्रांत आणूं लागलों तर पदरीं वेडेपणाच बांधून घ्यावा लागेल. कृत्रिम तऱ्हेनें पिंडाचें रक्षण करूं नये म्हणजे काय ? इस्पितळें, अनाथगृहें हीं कृत्रिम, मग घरें बांधणें व कपडे घालणें हें कृत्रिम नव्हे काय ? जेनिंग्ज म्हणतो ज्या क्षणीं मानवाला अग्नीचा उपयोग ध्यानांत आला तेव्हांच त्यानें निसर्गनिवडींत हात घातला आहे. कारण तेव्हांपासून थंडीवाऱ्यापासून मनुष्य आपलें व आपल्या मुलांचें रक्षण अग्नीच्या साह्यानें म्हणजे कृत्रिम तऱ्हेनें करूं लागला. कृत्रिमता टाकून द्यावयाची असेल तर नग्न होऊन झाडाखालीं राहणें याशिवाय गत्यंतरच नाहीं. पण हा सगळा वेडेपणा मानवाला निसर्गाबाहेर टाकण्यामुळें होत असतो. वास्तविक मानव हा निसर्गांतलाच आहे व किड्यांचें किंवा पक्ष्यांचें कृत्य जितकें नैसर्गिक तितकेंच मानवाचेंही कृत्य नैसर्गिक समजण्यास मुळींच हरकत नाहीं. एलिस म्हणतो संततिनियमन हें पूर्ण नैसर्गिक असून तो उत्क्रान्तीमधली एक पायरीच आहे !

बालमृत्यु पुष्कळ होणें चांगलें, यानें नैसर्गिक निवडीस वाव मिळून नालायक जीव मारले जातात व लायक तेवढेच शिल्लक राहातात. म्हणून प्रत्येकानें शक्य तितकी जास्त मुलें होऊं द्यावी वगैरे या पंडितांचें सांगणें असेंच भ्रामक आहे.

रशियामध्यें सर्वांत जास्त बालमृत्यू होतात ( १९१७ पूर्वी ) व नार्वेमध्यें सर्वांत कमी होतात. तरी रोगानें जास्त संहार रशियांतच होतो. जन्मलेल्या बालकांपैकीं शेकडा पन्नास बालकें रशियांत मरतात. तेव्हां ही निवड फारच कसोशीनें होते, असें दिसतें; व उरलेली प्रजा मोठी सुदृढ असेल असें वाटतें. पण या उरलेल्या पैकीं लढाईच्या कामास शेकडा २७ इतकेच लायक ठरले. एलिसनें म्हटलें आहे कीं, Natural selection is not a satisfactory operation from any point of view. It kills off the unfit no doubt, but it goes farther and tends to render the fit unfit. ( नैसर्गिक निवड ही कोणच्याहि दृष्टीनें चांगली नाहीं. ती नालायकांना मारते हें खरें, पण लायकांना नालायक करून ठेवते हेंहि तितकेंच खरें आहे. ) डॉ. जॉर्ज कार्पेंटरचें

असेंच मत आहे. सर फ्रॅन्सिस गाल्टन आपल्या आत्मचरित्रांत असेंच म्हणतो (पृ. ३२२-२३). Natural selection rests upon excessive production and wholesale destruction. Eugenics rests upon bringing no more individuals into the world than can be properly cared for and these only of the best stock. (असंख्य प्रजा निर्माण करणें व सर्रहा संहार करणें ही नैसर्गिक निवड, जेवढ्यांचें संगोपन नीट करणें शक्य आहे तेवढ्याच उच्च कुळांतल्या मुलांना जन्माला आणणें याचें नांव सुप्रजाशास्त्र ).

लिओनार्ड डार्विन म्हणतो कीं, Parents ought not to bring more children in the world than they can reasonably hope to bring up in accordance with certain standard of living ( What is Eugenics? ).

कार सॉंडर्स यानें आपल्या पॉप्युलेशन या पुस्तकांत असें दाखवून दिलें आहे कीं, राष्ट्राला प्रजा कमी करणें असेल तर संततिनियमन आवश्यक आहेच; पण वाढ वावयाची असेल तरीहि तें आवश्यक आहे. कारण ज्या स्त्रियांना जास्त मुलें होतात; त्यांचीं जितकीं मुलें जगतात, त्यापेक्षां ज्यांना कमी होतात त्यांचीं जास्त जगतात. म्हणजे दहांपैकीं चार जगलीं तर सातांपैकीं पांच जगतात. याचें कारण अगदीं उघड आहे- दोन अपत्यांमध्यें जितकें अंतर जास्त तितकी मातेची प्रकृति जास्त चांगली राहून त्यामुळें अपत्याचें संगोपनहि तिला जास्त चांगलें करतां येतें. मागल्या काळीं जेव्हां संततीनियमनाची अर्वाचीन साधनें नव्हतीं, तेव्हां कित्येक जमातींत बालहत्येची चाल सर्रास चालू होती. त्यापेक्षां अर्वाचीन पद्धति बरी हें कोणाहि सूज्ञ व अनाग्रही माणसाला पटेल असें वाटतें.

वरील सर्व विवेचनावरून असें ध्यानांत येईल कीं, कोणच्याहि काळीं व स्थळीं लोकसंख्येवर नियमन ठेवणें हें समाजाचें कर्तव्य आहे. तें नैसर्गिक पद्धतीनें होऊं द्यावयाचें कीं आपण करावयाचें एवढाच प्रश्न. त्यालाहि आपण तज्ज्ञांच्या आधारें उत्तर काढलेंच आहे. नैसर्गिक निवड ही आंधळी आहे. ती वाटेल त्याला मारील. तेव्हां ती टाकून देऊन सुप्रजेचा अभ्यास करून मानवानें आपल्या हातांत ही व्यवस्था घेतली पाहिजे. यानेंच भावी पिढी सुदृढ व कार्यक्षम होईल.

अन्न कमी पडेल इतकी प्रजा वाढूं देऊं नये, या दृष्टीनें विचार झाला. आतां समाजांतील कर्त्या पुरुषांची प्रजा कशी वाढेल व नाकर्त्यांची

कमी कशी होईल, हा जो लगतचा उत्तरार्ध त्याचा अगदीं थोडक्यांत विचार करूं. अलीकडे वेडे, दुर्बल, नाकर्ते असल्या लोकांना निरपत्य करून टाकण्याचे अगदीं सोपे वैद्यकी उपाय निघाले आहेत. त्याचा अवलंब जर्मनी व अमेरिकेंतील कांहीं संस्थानें, येथें केला जात असून तो सफल होत आहे असें दिसून येतें. त्याचप्रमाणें कर्त्या, बुद्धिमान् तरुणावर सरकारनें लक्ष ठेवून त्यांच्या मागची संसाराची काळजी नाहींशी करण्याची जर त्यांनीं व्यवस्था केली, तर त्याच लोकांची प्रजा कमी होणें ही जी आपत्ती तीही नाहींशी होईल. गाल्टन वगैरे पंडित आज कित्येक वर्षें हा उपदेश करीत आहेत. पण साम्यवाद, लोकशाही यांच्या पुरस्कर्त्यांना तो पटत नाहीं. व राजकीय अधिकार त्यांच्याच हातीं असल्यामुळें पंडितांचा उपदेश अजून तरी वाया जात आहे असें कष्टानें म्हणावें लागतें.

नैसर्गिक निवडीच्या पुरस्कर्त्यांना आणखी एक मुद्दा सुचवावासा वाटतो. क्षयजंतु आपला मित्र आहे, बालमृत्यु पुष्कळ होणें चांगलें, हें सांगतांना समाजाची सुदृढता वाढविण्याचेच मार्ग आपण सांगत आहों अशा भ्रमांत राहून ते समाजांच्या दुसऱ्या एका फार मोठ्या शक्तीवर घाव घालीत आहेत, हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. एका माणसाला दुसऱ्याबद्दल आपलेपणा वाटणें व दोघांनीं एकमेकाला संकटांत मदत करणें, या आद्य भावनेवरच तर समाज उभारलेला आहे. व क्षयरोग पसरूं द्यावा, बालमृत्यु होऊं द्यावे, असें जर समाजाला पटलें तर प्रेम, दया, स्नेह, सहानुभूति या समाजधारणेच्या ज्या आद्य शक्ति त्याच ओहटीस लागतील. हा विचारहि अनेक पंडितांनीं सांगितला आहे. पण सामान्य माणसालाहि आपला आपण विचार करून तो समजण्याजोगा असल्यामुळें अवतरणें देऊनच तो पटवून द्यावा असें वाटत नाहीं. आपल्याला पुष्कळ मुलें होऊन त्यांतलीं पुष्कळ मरणें हेंच समाजाला आवश्यक आहे, हें ज्या स्त्रीला पटेल तिचें वात्सल्य काय प्रकारचें होईल याची कल्पनाहि करवत नाहीं. माझ्या माहितीचे एक समाजशास्त्री आहेत. आपल्या घराण्यांत या पिढीला पुत्रसंख्या कां कमी हें ते मला सांगत होते. ते म्हणाले, ' माझ्या धाकट्या भावानें लग्नच केलें नाहीं, वडीलबंधू लवकरच वारले व माझ्या मुलांच्या बाबतींत ' डेथ रेट ' जास्त झाला. आपल्या स्वतःच्या अपत्यांच्या बाबतींत समाजिक अभ्यासकाच्या निर्विकार मनानें हा गृहस्थ बोलूं शकतो, हें पाहून माझ्या अंगावर अगदीं शहारे आले. समाजांतल्या स्त्री-पुरुषांचें वात्सल्यच या पद्धतीनें नष्ट होत असेल, तर सुप्रजाशास्त्राचे सगळे नियम पाळूनहि तो समाज पृथ्वीतलावरून लवकरच नाहींसा होईल यांत शंका नाहीं. मला तर आणखी असें वाटतें कीं जरी तो नाहींसा होणार नसेल तरी त्या समाजांत जगण्यामध्यें सौंदर्य तरी

काय ? प्रेम, दया, वात्सल्य या समाज जगवण्याच्याच केवळ शक्ति आहेत असें नव्हे. संसाराला त्यांनींच रम्यता येते. व जीवनशास्त्राच्या नादीं लागून भावी पिढ्या सुदृढ करण्यासाठीं आमचें जीवित जर असें वाळवंट करावयाचें असेल तर Eugenics and other evils हें नांव पुस्तकाला देण्यांत चेस्टरटननें जी मनोवृत्ति दाखविली ती खास समर्थनीय आहे असें म्हणावें लागेल.

पण सुदैवानें असें कांहीं नाहीं. कांहीं पिसाट लोक सोडून दिले तर या क्षेत्रांतले बहुतेक पंडित अत्यंत समंजस बुद्धीनेंच याचा विचार करतात. व आपणास विचित्र वाटेल, आपल्या मृदु, नाजुक भावनांना धक्का बसेल असें सुप्रजाशास्त्रांत ते कांहींहि सांगत नाहींत.

प्रजा जास्त होणें व ती लवकर होणें यानें आणखी एक तोटा होतो. यानें समाज नेहमीं अस्थिर अवस्थेंत राहातो. पिढ्या लवकर पालटतात व नवीन जीव सारखे येत राहातात त्यामुळें समाजाच्या शारीरिक व मानसिक रचनेंत तारखी हालचाल सुरू राहते. स्थिरता येणें शक्यच होत नाहीं. व ही अवस्था समाजाला फार अनिष्ट आहे. थारेपालट व्हावी हें खरें; पण तिलाही कांहीं मर्यादा आहेच. एकदां बसविलेलें थर कांहीं काल तरी स्थिर टिकले म्हणजेच त्यांचे कार्य ते करूं शकतील. वारंवार घडी उसकटणें हे केव्हांहि अनिष्टच ठरेल. A community which is reproducing itself rapidly must always be in an unstable state of disorganization highly unfavourable to the welfare of its members and especially of the new comers. A community which is reproducing itself slowly is in a stable and organized condition which permits it to undertake adequately, the guardianship of new members. ( एलिस; टास्क ऑफ सोशल हायजीन्. पान १५१ ) या मताचा जाणत्या लोकांनीं अवश्य विचार केला पाहिजे.

लोकसंख्येची वाढ व तिचें नियमन यांचा जीवनशास्त्रदृष्ट्या येथवर विचार झाला. आतां हिटलरादि राजकारणी पुरुष या बाबतींत जे विचार प्रगट करीत आहेत व जें धोरण ठेवित आहेत, त्याचा विचार करावयाचा आहे.

आज युरोपांत लोकसंख्या वाढविण्याचा कित्येक राष्ट्रांतील लोकांना नुसता ध्यास लागल्यासारखा दिसतो. मुसोलिनीनें सोळा वर्षांचे मुलगे व चौदा वर्षांच्या मुली आणून वीस हजार लग्नें लावून दिलीं. हिटलरनें तीन लक्ष लग्नांचा संकल्प

सोडला आहे. फ्रान्समध्यें अनेक पुत्र प्रसवणाऱ्या स्त्रीला बक्षीस आहे. या व यासारख्या बातम्या वाचून युरोपांत कांहीं भयंकर वंशक्षय झाला आहे कीं काय असें आपल्याला वाटूं लागतें. इंग्लंडांत व अमेरिकेंत संततिनियमनामुळें आणि उशीरा लग्नामुळें प्रजा जशी वाढावी तशी वाढत नाहीं अशी कांहीं लोकांची तक्रार आहे. लोकसंख्या जगावयास हवी असल्यास प्रत्येक जोडप्यास निदान चार तरी मुलें व्हावयास पाहिजेत. त्या ठिकाणीं नव्या सुशिक्षित जोडप्यास सरासरी ३ ही होत नाहींत. तेव्हां लवकरच युरोपची लोकसंख्या नष्ट होईल अशी भीतिही कांहींनीं प्रगट केली आहे. हें सर्व वाचलें म्हणजे मोठी मौज वाटूं लागते. १८०० च्या सुमारास माल्थसला भीति वाटली कीं लोकसंख्या भूमितिश्रेढीनें वाढणार आतां कसें करावें ! त्याला सव्वाशें वर्षें झालीं नाहींत, तों लोकसंख्या अजीबात नष्ट होणार कीं काय अशी भीति कांहीं लोकांना वाटूं लागली. माल्थसला दिसलेलें वाढीचें प्रमाण तेवढयाच काळापुरतें व तेवढयाच स्थळापुरतें खरें होतें, पुढें तें खरें ठरलें नाहीं, व त्याची भीतीही निराधार ठरली, हें ध्यानांत घेऊन या नव्या लोकांनीं तरी उलट बाजूचीं अनुमानें काढतांना थोडा धीर धरावयास हवा होता. एक दिवस एकाद्यानें लंघन केलें तर लगेच 'असें तूं रोज करीत गेलास तर तूं मरशील, सावध रहा' असें त्याला बजावण्यासारखेंच हें आहे. वाढीचें प्रमाण जसें नेहमीं टिकत नाहीं तसेंच ऱ्हासाचेंही टिकत नाहीं. वाढावयास वाव मिळाला तर लोकसंख्या किती झपाटयानें वाढूं शकते, हें ज्यानें पाहिलें आहे, त्याला ऱ्हासाची भीति बाळगण्याचें वास्तविक मुळींच कारण नाहीं. १८०० ते १९२० या कालांतली निरनिराळ्या देशांची लोकसंख्या कशी वाढली व आज प्रत्येक देशाच्या क्षेत्रफळाशीं लोकसंख्येचें प्रमाण काय आहे हें पाहिलें, तर या प्रश्नावर पुष्कळच प्रकाश पडेल.

पुढें कोष्टक दिलें आहे त्यांतील आकडे लक्षांत घेतले तर लोकसंख्येसंबंधीं जे अवास्तव गैरसमज पसरविण्यांत येत आहेत, ते जरा दूर होतील. हिंदुस्थानची लोकसंख्या फार आहे म्हणजे प्रमाण फार आहे असें सर्वांना वाटतें. पण ज्या फ्रान्ससंबंधीं आपण अगदीं हाहाःकार ऐकतो, तेथलें लोकसंख्येचें प्रमाण हिंदुस्थानपेक्षां थोडेसें जास्तच आहे. व ज्या अमेरिकेच्या सामर्थ्याबद्दल आपणास संशयसुद्धां येत नाहीं, तेथलें प्रमाण हिंदुस्थानच्या एक चतुर्थांशही नाहीं. इंग्लंडमध्यें दर चौ. मैलीं ६४९ लोक आहेत. आतां प्रश्न असा येतो कीं जरी सध्यां कांहीं जोडप्यांचें संततीचें प्रमाण इष्ट प्रमाणापेक्षां अगदीं कमी पडलें तरी बिघडलें काय ? शंभर वर्षांपूर्वी हें प्रमाण २३९ होतें

तेव्हां इंग्लंडच्या वैभवांत काय कमी होतें? त्यांच्या आधींच म्हणजे मैलीं १७५ प्रमाण असतांनाच इंग्लंडनें साम्राज्य उभारीत आणलें होतें. आणि मैलीं ३४६ लोकसंख्या झाली तेव्हां, म्हणजे आज जर्मनी किंवा इटलीइतकें प्रमाण होतें तेव्हां, साम्राज्य पुरें झालें होतें. वरें एकदां लोकसंख्या कमी झाली म्हणजे पुन्हां वाढूं शकणार नाहीं असें नाहीं. संपत्ती–समृद्धी आली व वाढावयास वाव असला तर पन्नास किंवा पंचवीस वर्षांत प्रजा दुप्पट होऊं शकते, हेंच तर माल्थसनें दाखविलें. असें असतांना संततीचें आज जें प्रमाण आहे, तेंच प्रजा कितीही कमी झाली तरी तसेंच राहील, लोक ऐकणार नाहींत अशी पोक्त भाषा कांहीं लोक वापरतांना ऐकलें म्हणजे ही भावी पिढ्यांची फाजील, व आपल्या अधिकाराबाहेरची काळजी आहे असें वाटतें. लोकसत्ता, स्त्रीस्वातंत्र्य, साम्यवाद इ. अगदीं दृढमूल व दुर्भेद्य विचारांना हिटलर, मुसोलिनी यांनीं कलाटणी दिलेली आपण पाहतोच. तेव्हां ६४९ वरून लोकसंख्येचें प्रमाण ६४८ वर आलें व आणखी खालीं जाणार असें दिसूं लागले कीं लगेंच हाहाःकार करून टाकण्यांत कांहीं अर्थ आहे, असें मला वाटत नाहीं.

| देशाचें नांव | दर चौरस-मैली माणसें | १९२० नंतर मोजलेली लोक सं. | | लोक संख्या १८०० सालीं | लोकसंख्या १९१० सालीं |
|---|---|---|---|---|---|
| | | कोटी | लक्ष | | |
| इंग्लंड व वेल्स | ६४९ | ३ | ७८ | ९० लक्ष | ३ कोटी ७८ लक्ष |
| जपान | ४१३ | ६ | ५० | | |
| जर्मनी | ३४६ | ७ | ० | २॥ कोटी | ६॥ कोटी |
| इटली | ३४६ | ४ | ११ | १॥। कोटी | ३ कोटी |
| फ्रान्स | १९८ | ४ | १८ | | |
| हिंदुस्थान | १९५ | ३५ | २८ | | |
| अमेरिका | ४५ | १२ | २७ | ६ लक्ष | ९। कोटी × |
| अफगाणिस्थान | २४ | ० | ६३ | | |
| रशिया (सैबेरिया धरून) | १९ | १६ | १० | ४ कोटी | १४ कोटी |
| इराण | १२·५ | ० | ९० | | |

× अमेरिकेंत बाहेरून लोक पुष्कळ येतात. म्हणून हें वाढीचें प्रमाण धरतां येणार नाहीं.

लोकसंख्या कमी होत आहे, अशी तक्रार करतांना दर चौ. मैलीं अमुक एक लोकसंख्या असलीच पाहिजे, असें जणुं कांहीं आधीं ठरवूनच ते लोक लिहितात, असें वाटतें. पण मनांत नक्की ठरविणें कांहींच शक्य नाहीं. कारण इंग्लंडप्रमाणें ६४९ असावी, कां जर्मनीप्रमाणें ३४६ असावी, कां अमेरिकेप्रमाणें ४५ असावी, याचें उत्तर कसें देणार ? कार सॉंडर्स हा नियमनाचा कट्टा पुरस्कर्ता आहे. त्यानें सांगितलें आहे कीं सायन्सच्या प्रगतीच्या विशिष्ट पायरीला लोकसंख्येचें एक विशिष्ट प्रमाण आवश्यक आहे. त्याहून कमी किंवा जास्त चालणार नाहीं. कमी झालें तर ती सायन्सची उभारणी लोकांना पेलणार नाहीं व परागति होईल. जास्त झालें तर सरासरीं माणशीं उत्पन्न कमी होऊन दुसऱ्या बाजूनें परागति होईल. या म्हणण्यांतला मथितार्थ मान्य होण्याजोगा आहे. पण त्याचा उपयोग असा कांहींच नाहीं. कारण तें प्रमाण कोणचें हें सांगणें शक्य नाहीं असें त्यानेंच म्हटलें आहे. आणि आपण स्वतः कांहीं पाहूं लागलों तर ६४९, ३४६, व ४५ इतकी भिन्न प्रमाणें असलीं तरी सायन्सच्या प्रगतीला बिलकूल अडथळा येत नाहीं असें स्पष्ट दिसतें.

राष्ट्रांमध्यें कर्त्यापेक्षां नाकर्त्यांचें प्रमाण वाढूं नये, याबद्दल कोणत्याही काळीं व कितीहि लोकसंख्या असली तरी लोकांनीं दक्ष असलें पाहिजे याबद्दल वाद नाहीं. पण तें आपापसांतलें प्रमाण आहे. पण इंग्लंडमध्यें ६४९ प्रमाण आहे म्हणून सायन्स, व्यापार या बाबतींत अणुमात्र प्रगति नसतांना हिंदुस्थानानें लोकसंख्यावाढीची काळजी करावी हें अगदीं असमंजस आहे असें वाटतें.

लोकसंख्येच्या वाढीच्या बाबतींत आंतरराष्ट्रीय प्रश्न निर्माण होतात. त्यांचा विचार आपण करूंच. पण तो प्रश्न बाजूला ठेवला तर राष्ट्राची अंतर्गत सुधारणा, सायन्सची प्रगति, किंवा संस्कृतीची जोपासना यासाठीं लोकसंख्येचें एक विशिष्ट प्रमाण आवश्यक आहे, असें मुळींच वाटत नाहीं. दर मैलीं ८६ या प्रमाणावर इंग्लंडनें १६०० सालीं जग आक्रमणासाठीं बाहेर पाऊल टाकलें. व दर मैलीं ३४६ या प्रमाणांवर १८६१ सालीं तें आक्रमण पुरें केलें. तेवढ्या अवधींत शेक्सपीअर, बर्क, न्यूटन, डार्विन यांची संस्कृति निर्माण होण्यास अडचण पडली नाहीं; किंवा साम्राज्यवाढीस खळ पडला नाहीं. पराक्रमाबरोबर लोकसंख्या वाढत गेली हें खरें, पण एक तर ती अवश्यकच होती असें अमेरिकेकडे पाहिलें तर म्हणावेसें वाटणार नाहीं. दुसरें असें कीं सायन्स, साम्राज्य, व समृद्धि यांच्या वाढीबरोबर लोकसंख्या वाढली एवढें तरी निदान लक्षांत ठेवलें पाहिजे. म्हणजे तें कांहींच नसतांना लोकसंख्या वाढविणें हे चूक

आहे हें ध्यानांत येईल; व तिसरें म्हणजे इंग्लंडवरून कांहीं अनुमान बसवावें असें वाटलेंच तर मैलीं ३४६ प्रमाण आवश्यक आहे एवढेंच फार तर म्हणतां येईल. ३४९ प्रमाण झालें तरीही लोकसंख्येबद्दल ओरड कायम ठेवणें म्हणजे अशी ओरडण्याची लोकांना संवय लागली आहे इतकाच त्याचा अर्थ आहे, या पलीकडे कांहीं नाहीं. हा विचार ध्यानांत घेतला म्हणजे ज्यांची लोकसंख्या आजच मैलीं ३४६ आहे त्या जर्मनी किंवा इटाली या देशांची ओरड अगदीं फुकट आहे, तोफेला बळी निर्माण करण्यापलीकडे त्यांच्या मनांत दुसरें कांहीं नाहीं, असें वाटूं लागतें व त्याचाच म्हणजे लोकसंख्येमुळें निर्माण होणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा आतां विचार करावयाचा आहे.

लोकसंख्या हें राष्ट्राचें सामर्थ्य आहे व शेजारचें राष्ट्र जर लोकसंख्या वाढवील, किंवा ती आधींच वाढलेली असेल, तर प्रसंग आल्यावर रक्षण करण्यासाठीं आपलीही लोकसंख्या वाढविली पाहिजे असें कोणाही जबाबदार माणसास वाटणें साहजिक आहे. पण हा विचार वरवर वाटतो तितका सोपा नाहीं. निवळ लोकसंख्येच्या जोरावर एकादें राष्ट्र पराक्रमी ठरेल असें कोणीहि म्हणत नाहीं. इंग्लंड–हिंदुस्थान, जपान—चीन किंवा इंग्लंडमधलेच शेदोनशें भांडवलवाले व लाखों मजूर हीं उदाहरणें या बाबतींत अगदीं निर्णायक आहेत व तीं सर्वांना मान्यही आहेत. म्हणून लोकसंख्या हे सामर्थ्य आहे असें सांगतांना Other things being equal म्हणून एक शब्दप्रयोग करीत असतात. त्याचा अर्थ असा कीं इंग्लंड व हिंदुस्थान या देशांमध्यें म्हणजे ज्यांच्यांत राज्ययंत्र विज्ञान, शिस्त, एकरक्तता इत्यादि प्रत्येक बाबतींत जमीनअस्मान फरक आहे तेथें लोकसंख्या हें सामर्थ्य विचारांत घेण्याजोगें नाहीं हें खरें; पण जेथें या इतर गोष्टी म्हणजे राज्यव्यवस्था, विज्ञान वगैरे गोष्टी दोन्ही देशांत सारख्या असतील तेथें मात्र लोकसंख्या हीच निर्णायक ठरेल. इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स व जपान हीं राष्ट्रें संस्कृतीच्या किंवा कर्तृत्वाच्या दृष्टीनें अगदीं सारखीं आहेत. तेव्हां यांच्यामध्यें जर लढाई जुंपली तर तेथें मात्र लोकसंख्याच निर्णायक ठरेल असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे.

पण याही म्हणण्यांत फारसा जीव नाहीं असें ध्यानांत येईल. जगांत दोनच राष्ट्रें भांडत असलीं तर कदाचित् हें म्हणणें खरें धरतां येईल. पण पुष्कळ राष्ट्रें किंवा चारपांच राष्ट्रें जरी जगांत महत्त्वाकांक्षी व वर्धिष्णु असलीं तर दोनच राष्ट्रांमध्यें तीं सहसा युद्ध होऊं देत नाहींत. आपण त्यांत पडतात. कारण त्यांना सत्ता समतोल ठेवावयाची असते. तेव्हां एकाद्या राष्ट्राची लोकसंख्या जरी दोन कोटींनीं कमी असली

तरी ती वाढविण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां आपल्या बाजूला युद्धांत इतर राष्ट्रें कशीं वळवून आणतां येतील, याचा प्रयत्न करणें हें जास्त आवश्यक आहे. कारण एक तर कोटीनें लोकसंख्या वाढविणें ही कांहीं गंमत नव्हे. त्यासाठीं स्त्रीला किती दुःख सहन करावें लागतें, राष्ट्राला किती खर्च सोसावा लागतो, व राहणीचें मान कसें उतरवावें लागतें याची फारच थोड्यांना कल्पना असते. व इतकें करूनहि दुसऱ्या राष्ट्रांतल्या मुत्सद्यांनीं दोन तीन कोटींचें एक राष्ट्र जरी आपल्या बाजूला वळवून घेतलें तरी यांच्या सर्व प्रयत्नावर पाणी पडणार. तेव्हां 'इतर गोष्टी सारख्या असल्या तर' युद्धामध्यें लोकसंख्या निर्णायक होईल हें खरें. पण त्यासाठीं आपली लोकसंख्या वाढविणें हा उपाय नाहीं. तर दोस्तीचे तह घडवून आणणें यावर सर्व मदार आहे. व दोस्तीचे तह घडवून आणणें ही गोष्ट कठीण असली तरी अशक्य तर नाहींच. कारण सत्तेचा समतोलपणा या तत्त्वामुळें प्रत्येक बाजूला मिळायला कांहीं राष्ट्रें उत्सुक असणारच. राष्ट्रांराष्ट्रांतलीं भांडणें राष्ट्रसंघ मिटवूं लागला तर लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्नच नाहीं पण ती कल्पना मृगजळ म्हणून सोडून दिली तरी सुद्धां युद्ध प्रसंगासाठीं, तोफेला बळी म्हणून प्रजा वाढवून ठेवण्याचा फारसा उपयोग नाहीं. निदान त्यासाठीं जी किंमत द्यावी लागते तितका तर खासच नाहीं. कारण एक दोस्त इकडला तिकडे झाला तरी कोटी दोन कोटींचा फरक चटकन् पडतो. युद्धप्रसंगीं एक चतुर मुत्सद्दी कोटी दोन कोटींचें काम सहज करूं शकेल.

अन्नाचा पुरवठा असेल, राहणीचें मान कमी करावें लागणार नसेल, तर लोकसंख्या वाढविण्यास कांहींच हरकत नाहीं. पण तसें नसतांना, लोकसंख्या वाढविण्याचा अट्टाहास हा केवळ राक्षसी प्रवृत्तीचाच द्योतक आहे. कारण त्यामुळें युद्ध हें अपरिहार्य होऊन बसतें. ही कांहीं मोठी आपत्ती आहे असें कांहीं लोकांना वाटत नाहीं. उलट ते म्हणतात, संततिनियमन करून प्रजा कमी करण्याचा नामर्द उपाय अवलंबिण्यापेक्षां वाटेल तितकी प्रजा निर्माण करून, साम्राज्यमहत्त्वाकांक्षेनें तिला मारून देऊन युद्धांत तिला मरण्याला सवड देणें हेंच शौर्याचें लक्षण आहे.

युद्धासंबंधीं घरीं बसून गप्पा मारणाऱ्या लोकांना हें बोलणें शोभेल. किंवा भांडवलवाल्यांच्या हातांतली बाहुलीं म्हणून राज्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना हें बोलणें शोभेल. पण ज्यानें या बाबतींत कळकळीनें विचार केला आहे त्याच्या असें ध्यानांत येईल, कीं प्रजेच्या नियमनाला युद्ध हा उपाय अत्यंत भयंकर आहे. संतति नियमनानें होणारी प्रजा सुदृढ होते. नैसर्गिक निवडीनें सुदृढहि टिकतात व दुर्बलहि टिकतात. पण युद्धांमध्यें मात्र शूर, धाडसी, कर्ते, व प्रबल लोक तेवढेच नेमके मारले जाऊन दुर्बलांचें

प्रमाण देशांत एकदम भलतीकडे वाढतें. युद्धावर उत्तम तेवढेच लोक निवडून पाठवून द्यावे लागतात. व त्यांनाच मरावें लागतें. तेव्हां संततीनियमन करून प्रजा कमी करण्यापेक्षां लढाईकरून मेलेली काय वाईट हा विचार क्षणभरहि टिकणार नाहीं.

पण या सर्व विचाराच्या बुडाशीं Other things being equal हें जें विचार करण्यापुरतें गृहीत धरलें आहे तेंच भ्रामक आहे. कारण असें कधींच नसतें. इंग्लंड, जपान, फ्रान्स, जर्मनी, इटली यांना समबल मानणें हें अगदीं भ्रामक आहे. म्हणजे अमुक देश श्रेष्ठ असें आज मुळींच सांगतां येणार नाहीं. पण प्रत्येकाची परिस्थिति, भौगोलिक रचना, राज्यव्यवस्था, स्त्रीपुरुषसंबंध, कर्त्यापुरुषांचें प्रमाण, आर्थिक व्यवस्था या इतक्या भिन्न आहेत कीं, या सर्वांचा समुच्चय युद्धप्रसंगीं अगदींच भिन्न प्रकारचा होत असतो. आणि हीं राष्ट्रें सारखीं धरलीं तरी अमुक एका विशिष्ट प्रसंगीं कशीं आहेत, हा विचार पुन्हां महत्त्वाचा ठरतो. १८०० ते १८१० च्या सुमारास फ्रान्समध्यें जर्मनीपेक्षां पंचवीस तीस लक्ष लोकच जास्त होते. पण एकट्या नेपोलियनच्या शक्तीमुळें फ्रान्सनें जर्मनीलाच काय पण सर्व युरोपला धूळ चारली. उलट १८७० सालीं जर्मनी ४ व फ्रान्स ३॥। कोटी असा फरक असतांना, म्हणजे लोकसंख्या जवळजवळ सारखी असतांना जर्मनीनें फ्रान्सचें निर्दाळण केलें. पंचवीसतीस लक्षाच्या फरकानें असें झालें असें म्हणावयाचें असल्यास मग ती आपत्ती कधींच टाळतां येणार नाहीं असें होईल. कारण अगदीं माणसाला माणूस बरोबर असे दोन राष्ट्रांत कधींच होणार नाहीं. १९१४ सालीं जर्मनीनें केमिस्ट्रीला लढाईंत घेतली व दोस्तांचीं सैन्यें शेतकऱ्यानें गवत कापावें तशीं आरंभीं आपलीं असें लॉइड् जार्जनेंच आपल्या आठवणींत म्हटलें आहे. तेव्हां other things equal हें कधीं काळीं शक्य आहे हेंच खोटें आहे. लोकसंख्येपेक्षां त्या इतर गोष्टीच निर्णायक ठरतात. म्हणून लोकसंख्या वाढविण्यापेक्षां विज्ञान, शिस्त, शिक्षण, यांच्या साह्यानें लोकांना समर्थ करून ठेवणें हा एकच उपाय राष्ट्रधुरीणांना शिल्लक आहे. अर्थात पुष्कळ वेळां राष्ट्रधुरीण हे भांडवलवाल्यांच्या ताब्यांत असतात व म्हणून त्यांना लढाई हवी असते. पण तो प्रश्न अगदींच निराळा. कारण भांडवलवाले हे राष्ट्रहिताचा विचार कधींच करीत नसतात. अप्टन सिंक्लेअरचें 'ब्रास चेक' हे पुस्तक व लॉइड जार्जच्या आठवणी या वाचाव्या. म्हणजे या मुद्यावर जास्त प्रकाश पडेल.

संततिनियमनाचा प्रश्न हा सामाजिक आहे, खाजगी नाहीं म्हणून व्यक्तीला या बाबतींत स्वतंत्रपणें कांहीं ठरविण्याचा अधिकार नाहीं हें म्हणणेंही खोटें आहे.

कारण समाजाला पुत्र देऊन त्यानें जसें ऋण फेडावयाचें असतें तसें स्वतः मोठ्या पदाला जाऊन व्यक्तीचें महत्त्व वाढवूनही फेडावयाचें असतें. या दोहोमध्यें बाधा आल्यास ज्याचा त्यानें निकाल करावा हें अगदीं योग्य आहे. सर्व पृथ्वीतलें धान्य मोजलें तर प्रत्येकाच्या वाट्याला खूप येईल, तेव्हां संततिनियमन करण्याची जरूर नाहीं हा उपदेशही त्या माणसाला करणें अयोग्य आहे. कारण या तात्त्विक विचारावर त्याची भूक भागत नाहीं, व त्याच्या अपत्त्याला कोणी दूध देत नाहीं. ती वाटणी कधींच सारखी होणें शक्य नाहीं. व दहापांच हजार वर्षांनीं झाली तर तेव्हां तो उपदेश करण्यास कांहींच हरकत नाहीं.

दहा अपत्यांना जन्म देऊन त्यांतलीं चार पांच जगणें या आपत्तीनें स्त्रीला केवढे शारीरिक व मानसिक कष्ट सोसावे लागतात, व ते बंद झाल्यास तिच्या सुखांत केवढी भर पडेल, याची ज्याला कल्पना येईल तो लोकसंख्येच्या वाढीवर नियमन घालावें असें एकट्या त्या विचाराच्या बळावरच म्हणावयास तयार होईल. मग भावी पिढी सुदृढ होणें, हवी तर लोकसंख्याही वाढवितां येणें व राष्ट्रावर येणाऱ्या अनेक आपत्ती, बालहत्येसारख्या रानटी उपायाशिवाय टाळतां येणें इत्यादि अनेक शक्यता यांत दिसल्यावर- तो लोकसंख्येच्या वाढीवर मानवाचें नियंत्रण असावयास पाहिजे या विचारास आनंदानें संमति देईल यांत तिळमात्र शंका नाहीं.

# आधिभौतिक शास्त्रांचे अधिकार.

गेल्या पांचसहा शतकांत, व विशेषतः गेल्या पन्नाससाठ वर्षांत युरोपमध्यें विज्ञानाची अगदीं अपरिमित वाढ झाली आहे. रसायन, पदार्थविज्ञान, जीवनशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, मानसशास्त्र या विज्ञानाच्या एकेक शाखामध्येंच इतकें संशोधन व अभ्यास झाला आहे कीं, एकेका शाखेच्या अभ्यासासही मानवाचें सबंध आयुष्य पुरणार नाहीं. अगदीं आरंभीं जड व अचेतन अशा वस्तूंचाच या शास्त्रांत अभ्यास होत असे. पुढें वनस्पती व पशू यांच्या अभ्यासासहि सुरवात होऊन आतां विज्ञान हें मानवाबद्दलही कांहीं नियम सांगूं लागलें आहे. हजारदोनहजार वर्षांपूर्वीची कोणच्याहि संस्कृतीची स्थिति पाहिली तर, त्या संस्कृतीच्या बहुतेक सर्व ज्ञानाचा समावेश धर्मग्रंथांतच असे असें दिसून येईल. जगदुत्पाति कशी झाली, मूलतत्त्वें काय होतीं, याचा विचार सांख्यकारिका, मनुस्मृति या धर्मग्रंथांप्रमाणेंच बायबलांतहि केलेला आढळतो. पृथ्वीचा आकार, तिची गति, सूर्य, ग्रहमाला व आकाशांतील इतर गोल या संबंधींची माहितीहि धर्मग्रंथांतच असे. राजाचीं कर्तव्यें काय, कायदे कसे असावे हे राजकारणांतले प्रश्न, कोणी कोणचे धंदे करावे, पैशाची वाटणी कशी करावी इ० अर्थशास्त्रांतले प्रश्न, कोणच्या प्रकारच्या स्त्रीपुरुषांची संतती काय प्रकारची होईल, संकरज प्रजेच्या अंगीं काय गुण दिसतील इ० जीवनशास्त्रांतले प्रश्न यांचाहि विचार धर्मग्रंथांत आपणांस केलेला दिसतो. सारांश, तत्त्वज्ञान नीति व आचार हे जे तीन विषय आज आपण धर्माच्या कक्षेंतले म्हणून मानतों, त्याखेरीज भूगोल, खगोल, राजकारण, अर्थशास्त्र, या विज्ञानाच्या ज्या अनेक शाखा त्यांचाहि धर्मग्रंथांत समावेश होत असे. आणि असें होणें अगदीं स्वाभाविक होतें. विज्ञानाच्या या शाखांची स्वतंत्र शास्त्र म्हणून गणना करण्याइतकी वाढ झालेलीच नव्हती. आपल्याकडे ती वाढ पुढें फारशी झालीच नाहीं. युरोपांत ती झाल्याबरोबर त्या शास्त्रांच्या शाखा निराळ्या होऊं लागल्या.

पण वाढ पुरी न झाल्यामुळें असो कीं, अन्य कांहीं कारणांमुळें असो, विज्ञानाचा समावेश धर्मग्रंथांत झाला या गोष्टीचे अत्यंत भयंकर परिणाम जगाला भोगावे लागले यांत शंका नाहीं. विज्ञानाची वाढ होऊं लागली, तेव्हां धर्मग्रंथांत त्या त्या विषयांत जे सिद्धांत सांगितलेले होते, ते चुकीचे ठरूं लागले. व धर्मग्रंथांतले शब्द हे पर-

मेश्वराचे शब्द अशी धर्माधिकाऱ्यांची समजूत असल्यामुळें तो शब्द चुकीचा ठरणें म्हणजे आपल्या पायाखालची जमीनच जाण्यासारखें आहे, असें त्यांना वाटूं लागलें. व युरोपांत त्या वेळीं धर्मगुरूंच्या हातीं कर्तुमकर्तुम् सत्ता असल्यामुळें नवीन ज्ञान सांगणाऱ्यांचा त्यांनीं अनन्वित छळ सुरू केला. बायबलाहून भिन्न मत सांगितल्याबद्दल हॅपाशिया नांवाच्या मुलीला दहाबारा धर्मगुरूंनीं तुकडेतुकडे करून मारली. पृथ्वीप्रमाणेंच आकाशांत आणखी गोल आहेत, असें म्हटल्याबद्दल ब्रूनोला जिवंत जाळून मारलें. पृथ्वी गोल असून सूर्य हा ग्रहमालेचा केंद्र आहे असें सांगितल्याबद्दल गॅलिलिओचा भयंकर छळ केला व इन्क्विझिशन् नांवाचीं कोर्टें स्थापन करून बायबलविरोधी ज्ञान पसरविण्याच्या आरोपावरून १४८१ ते १८०८ या काळांत सुमारें ३ लक्ष ४० हजार लोकांना ठार मारलें. ज्ञानाचा नायनाट करण्यासाठीं येशूच्या शांतताप्रिय धर्मानें मानवांचा जेवढा भयंकर संहार केला, तितका जगांत कोणींहि केला नसेल. पण या भयंकर छळाला न जुमानतां एक पाय सतत अग्नीमध्यें ठेवून शास्त्रज्ञांनीं आपलें संशोधनाचें व ज्ञानप्रसाराचें काम अविच्छिन्न चालू ठेवलें, व त्यांच्या त्या उग्र तपश्चर्येमुळेंच युरोपमध्यें विज्ञानाचीं मधुर फळें आज चाखावयास मिळत आहेत.

विज्ञानाच्या विलक्षण प्रगतीमुळें पूर्वीच्या बरोबर उलट स्थिति आतां येणार असा रंग दिसूं लागला आहे. विज्ञानाच्या शाखा मागें धर्मग्रंथांनीं व्यापल्या होत्या. तेथें आतां विज्ञान हेंच, तत्त्वज्ञान, नीति व आचार या धर्मशास्त्राच्या शाखा व्यापूं पहात आहे. जीवनशास्त्रांतल्या उत्क्रांतिवादासारख्या सिद्धांतांनीं नीतीच्या जुन्या कल्पना ढांसळून पडल्या व नीति हें सामाजिक नियमांचें शास्त्र आहे, यांत धर्माचा कांहीं संबंध नाहीं, असें लोक म्हणूं लागले. मानसशास्त्रांतल्या संशोधनामुळें आत्म्याच्या स्वरूपाबद्दल व पुढेंपुढें अस्तित्वाबद्दलहि संशय निर्माण होऊन तत्त्वज्ञानाचाहि प्रांत विज्ञानानें आपल्या कबजांत घेतला. व आत्मा, देव वगैरे सर्व मिथ्या असून मानवाच्या देहाचे व मनाचेहि सर्व व्यापार जडसृष्टीच्या नियमांनीं बद्ध आहेत, असे सांगणारे शास्त्रज्ञ पुढें येऊं लागले व त्यामुळें सर्व समाजांत मोठी खळबळ उडून गेली.

जडसृष्टि सोडून अत्यंत सूक्ष्म असें मन व आत्मा यांच्यासंबंधांतहि विज्ञान बोलूं लागल्यामुळें सामान्य जनतेपर्यंत त्याचे धक्के पोचूं लागले. स्त्री-पुरुषसंबंध, आहारविहार यांच्या बाबतींत धर्म व विज्ञान यांच्या आज्ञांमध्यें पावलोपावलीं खटका उडूं लागला. व यांपैकीं कुणाचें ऐकावें, हा लोकांपुढें मोठाच प्रश्न येऊन पडला. कांहीं अगदीं जुन्या मताचे धर्मनिष्ठ लोक आहेत. त्यांच्या मतें विज्ञान हें घातक असून शाळांतील

मुलांना तें शिकविणें बंद केलें पाहिजे, असें त्या पंथाचे पंडित अमेरिकेंत सांगूं लागले आहेत. दुसऱ्या कांहीं पंडितांच्या मतें विज्ञानाचा प्रसार होण्यास हरकत नाहीं, पण विज्ञानानें धर्माच्या राखीव क्षेत्रांत ढवळाढवळ करतां कामा नये. ऑसबॉर्न, मॅकालिकन् वगैरे प्रोफेसरांचा तिसरा पक्ष आहे. त्यांच्यामतें धर्मशास्त्र व विज्ञान यांच्यांत मुळीं विरोधच नाहीं. धर्मानें सांगितलेल्या म्हणजे बायबलांत लिहिलेल्या गोष्टी विज्ञानाच्या पायावरच उभारलेल्या आहेत व त्यांचा वरवर दिसणारा अर्थ जरी विज्ञानाशीं विसंगत दिसत असला तरी तो खरा अर्थ नव्हे, असें सांगून ते बायबलाचा नवा अर्थ बसवूं पाहातात. या गटांत ऑलिव्हर लॉज्सारखे जगविख्यात शास्त्रज्ञहि आहेत. चवथा पक्ष अगदीं मूलभेदक आहे. तडजोड, समन्वय इत्यादि प्रकार त्यास मुळींच मान्य नसून धर्माचें युग आतां संपलें; आतां विज्ञानाचें युग सुरूं झालें असें त्या पक्षाचे लोक म्हणतात. जोसेफ् मॅक्केब, बर्ट्रांड रसेल वगैरे लोक या मताचे आहेत.

आपल्याकडे हे चारी पक्ष थोड्याफार प्रमाणांत सर्वत्र दिसून येतात. पण विज्ञानाच्या क्षेत्रांत स्वतंत्र शोध व विचार करणारे पंडितच आपल्याकडे फार थोडे असल्यामुळें, जुनी धर्मश्रद्धा व कर्मठपणा जरी सपाट्यानें ढासळत असला, तरी पूर्ण जडवादी असे लोक आपल्याकडे फार थोडे आहेत. ख्रिस्तीधर्माचें व सायन्सचें जरी वैर असलें तरी आमच्या वेदान्ताचें व सायन्सचें मुळींच वैर नाहीं. उलट भौतिकशास्त्रांना मागें टाकून वेदांत पुढें गेला आहे असें मानणारेच लोक सुशिक्षितांत पुष्कळ आहेत. व आपले सर्व व्यवहार, मोक्षधर्मशास्त्राचें ध्येय पुढें ठेवूनच झाले पाहिजेत असें मत त्यांच्यांत रूढ आहे.

आज आपल्या समाजांतील या सुशिक्षित लोकांपुढें अनेक प्रकारचे प्रश्न उपस्थित झालेले आहेत. जातिभेद मोडावे कीं नाहीं, एकपत्नी, बहुपत्नी यांपैकीं कोणचा प्रकार स्वीकारावा, संततिनियमन करावें कीं नाहीं, समाजांत कोणचा धंदा कोणी करावा याला कांहीं नियम असावे कीं काय, गाय हा उपयुक्त पशु समजावा, कां तिच्या ठायीं देवत्व पाहावें, सुशिक्षितांनीं स्नानसंध्या सोडून दिली आहे तिचा जीर्णोद्धार करणें कितपत आवश्यक आहे, कुटुंबसंस्था टिकवावी कां मोडावी, व्याभिचारांत मागले लोक म्हणत होते तसें खरोखरीच कांहीं भयंकर आहे काय; हे व या तऱ्हेचे प्रश्न सुशिक्षित मनाला केव्हां ना केव्हां तरी भंडावून सोडतात. भंडावून सोडण्याचें विशेष कारण असें कीं सर्व तऱ्हेचीं बंधनें झुगारून देऊन युरोपीय तरुण तरुणी बेहोष उन्मादानें स्वैर–संचार करीत आहेत व जीवन हें आनंदाचें धाम करून सोडीत आहेत तरी त्यांच्या पराक्रमांत तिळभरही उणेपणा येत नाहीं. मग ही नीति-

बंधनें पाळून त्यांच्या तुलनेनें अगदीं सुतक्यासारखें वाटणारें जीवन आम्हीं कां कंठावें असें वाटूं लागतें व त्यामुळें वरील प्रश्नांचीं उत्तरें धर्मशास्त्राकडून मागवावीं, कां विज्ञान सांगेल त्याप्रमाणें वागावें, असा प्रश्न विचारी मनापुढें येऊन पडतो. याच प्रश्नाचा विचार प्रस्तुत निबंधांत करावयाचा आहे.

धर्मशास्त्र व आधिभौतिक शास्त्रें यांपैकीं कोणाचा सल्ला आपण घ्यावा हें निश्चित करावयाचें असेल तर या दोघांची सल्ला देण्याच्या बाबतींतली लायकीनालायकी आपण प्रथम तपासून पाहिली पाहिजे; यांनीं निर्माण केलेलें ज्ञान कोणच्या पद्धतीनें निर्माण केलें आहे, तें कितपत विश्वासार्ह आहे, व जें अंतिम डोळ्यापुढें ठेवून हीं शास्त्रें आपणांस उपदेश करणार तें अंतिमच आपणांस मान्य आहे कीं नाहीं, याचा विचार झाला तरच वरील प्रश्न सोडविणें शक्य आहे. म्हणून या दोन सल्लागारांचें ज्ञान मिळविण्याचे मार्ग व त्याची विश्वसनीयता आपण प्रथम तपासून पाहूं.

आधिभौतिक शास्त्रांत प्रत्यक्ष अनुभव, प्रयोग व अवलोकन यांवर सर्व भिस्त असते. या तीन साधनांनीं जी माहिती जमा होते, तिच्यावरून यांतील सिद्धान्त सांगितलेले असतात. हे अनुभव किंवा प्रयोग एकस्यादुकट्याचे असून चालत नाहीं. या क्षेत्रांत काम करणाऱ्या हजारों अभ्यासकांचे अनुभव एकत्र करावे लागतात. एकाला आलेला अनुभव दुसऱ्यांना पटवून द्यावा लागतो. व त्याचे बाह्य परिणाम तर जगांतल्या कोणच्याही माणसाला दिसतील, असे असतात. या शास्त्रांमध्यें हजारों सिद्धान्त असे आहेत कीं त्यांबद्दल जगांतल्या एकाही पंडिताला संशय नाहीं. इलेक्ट्रॉन्, प्रोटॉन् यांच्या गतिस्थितींबद्दल व जडवस्तूंच्या मूलस्वरूपाबद्दल मतभेद आहे. तसेंच प्रत्येक शास्त्रांतल्या कांहीं नवीन सिद्धान्ताबद्दलही मतभेद आहे. पण हें सर्व खरें असलें तरी प्रत्येक शास्त्रांत वादातीत असे पुष्कळच सिद्धान्त आहेत. याशिवाय या शास्त्रांत पुष्कळ प्रयोग असे आहेत कीं ते अगदीं सामान्य सुशिक्षिताच्या बुद्धीलाही पटवून देतां येतात. व्यक्तीच्या पापपुण्यावर ते समजणें न समजणें मुळींच अवलंबून नाहीं. आणि यापेक्षांही विशेष म्हणजे या शास्त्रानें आपल्या सत्यतेचे पुरावे म्हणून आगगाडी, तारायंत्र, विमान, रेडीओ, सिनेमा इत्यादि जे प्रकार समाजापुढें मांडले आहेत, त्याबद्दल जगांतल्या दोनशें कोटी लोकांपैकीं एकालाही शंका घेणें शक्य नाहीं.

धर्मशास्त्राची स्थिति याच्याबरोबर उलट आहे. त्याचें ज्ञानाचें मुख्य साधन म्हणजे अंतर्दृष्टि होय. परमेश्वर, आत्मा, पुनर्जन्म, स्वर्ग, नरक इत्यादि सर्व गोष्टी ज्ञानेंद्रियाच्या पलीकडच्या आहेत. डोळे मिटल्यावर त्या दिसूं लागतात. कान मिटल्यावर ऐकूं येतात. व बुद्धि थांबल्यावर त्याचें ज्ञान होतें असें त्यांचें म्हणणें आहे.

डोळे व कान थांबल्यावर येणारे हे अनुभव प्रत्यक्षाइतकेच विश्वसनीय आहेत असें त्यास वाटतें. पण हे अनुभव भौतिक शास्त्रांतल्याप्रमाणें हजारो जणांचें नसून एकन्या-दुकन्या पुण्यपुरुषांचे असतात. यांत एकाला झालेला अनुभव दुसऱ्याला पटवून देतां येत नाहीं. ज्याची त्यालाच फक्त खूण पटते. पण अंतरीं पटलेल्या खुणांवरून उभारलेल्या धर्मशास्त्रांत असा एकही सिद्धान्त नाहीं, कीं ज्यावर जगांतल्या सर्व धर्मनिष्ठांचें एकमत आहे. परमेश्वर हा कपिल व बुद्ध यांना मान्य नाहीं. आत्मा बुद्धाला मान्य नाहीं. हे दोन्ही ज्यांना मान्य आहेत, त्यांच्यामध्येंही त्यांच्या स्वरूपाबद्दल अनंत मतभेद आहेत. जगताचें मिथ्यात्व तर फारच थोड्यांना मान्य आहे. अंतिम प्राप्तव्याबद्दल तर याहीपेक्षां जास्त वाद आहेत. नीति व आचार यांची अशीच स्थिति आहे. तेथें तर एकाच धर्माच्या पंडितांतही शेकडो मतभेद आहेत. शास्त्रीय संशोधनाचीं प्रत्यक्ष फळें म्हणून रेडिओ, विमान हीं जशीं जगापुढें मांडलीं जातात व ज्यांच्याबद्दल एकही मानव संशय घेऊं शकत नाहीं, अशीं फळें धर्मशास्त्रांत मुळींच नाहींत. धर्मशास्त्रज्ञ तुम्हांला एकही गोष्ट पटवून देण्याच्या भानगडींत पडत नाहींत. ते फक्त आज्ञा करतात. ब्राह्मणांनीं यज्ञ करावे, तेलतूप विकूं नये, किंवा एका गालांत मारली तर दुसरा पुढें करावा यासारखे विधिनिषेध जसे कारणावांचून सांगितले जातात-तसेच जगाच्या आरंभीं एकदम जल निर्माण झालें व त्यांत एक सुवर्णाचें अंडें परमेश्वराच्या लीलेमुळें उत्पन्न झालें, किंवा पृथ्वी चौकोनी असून तिच्याभोंवतींच सर्व ग्रहगण फिरतात, हे सिद्धान्तही पुराव्यावाचून सांगितले जातात.

आपण बोलावलेल्या सल्लागारांची लायकीनालायकी ही अशी आहे. वस्तुस्थिति अशी आहे याबद्दल कोणाचाच वाद नाहीं. या इतिहाससिद्ध गोष्टी असल्यामुळें धर्मनिष्ठांनाही याबद्दल शंका घेतां येत नाहीं. पण यावरून भौतिक शास्त्रेंच व्यवहारांत प्रमाण धरलीं पाहिजेत असा जर तुम्ही निष्कर्ष काढाल तर तो मात्र धर्मशास्त्राला संमत नाहीं. आहे ही स्थितीच धर्मशास्त्राच्या श्रेष्ठत्वाला कारण आहे व भौतिक शास्त्रांना मानवाच्या वर्तनाच्या बाबतींत अगदीं हीन दर्जाचें स्थान आहे असें सांगणारे पुष्कळ विद्वान् लोक आहेत. म्हणून त्यांच्या म्हणण्याचा आपणास विचार केला पाहिजे.

धार्मिक लोक बुद्धिनिष्ठ लोकांवर नेहमीं असा एक आक्षेप घेत असतात कीं, ज्या प्रत्यक्ष प्रमाणावर तुमचा सर्व भर आहे, तें प्रमाणच विश्वसनीय नाहीं. एकादी गोष्ट खरी कीं खोटी हें तुम्ही डोळ्यानें पाहून ठरवतां. पण डोळा आपणांस नेहमीं

खरेंच ज्ञान करून देईल हें कशावरून ? डोळ्याला अंधेरांत एक दिसतें उजेडांत दुसरेंच दिसतें. मन भ्यालें असेल तर झाडाच्या ठायीं भूत दिसेल. दोरीच्या ठायीं सर्प दिसेल. फार उन्हांतून चाललों तर पाणी नसेल तेथें पाणी दिसतें. एका माणसाला एका ठिकाणाहून वस्तु एका प्रकारची वाटली तर दुसऱ्याला दुसऱ्या ठिकाणाहून दुसऱ्याच प्रकारची वाटते. डोळ्यांना विकार झाले तर मग पहावयासच नको. तेव्हां डोळ्यांतल्या विकारामुळें अगर बाह्य परिस्थितीमुळें वस्तु मुळांत जशी नाहीं तशी ती दिसूं शकते किंवा पुष्कळ वेळां मन अन्य व्यवसायांत गढून गेलेलें असतांना वस्तु पुढें असूनही दिसत नाहीं. हीच गोष्ट इतर ज्ञानेंद्रियांची. असें असतांना या ज्ञानेंद्रियांनीं दिलेलें ज्ञान विश्वसनीय कसें मानावें ?

ज्ञानेंद्रियांची स्थिति वर सांगितल्याप्रमाणें आहे यांत शंकाच नाहीं. पण यावरून प्रत्यक्ष ज्ञान घेतांना फार काळजीपूर्वक घेतलें पाहिजे असें फारतर म्हणतां येईल. कारण त्या प्रत्यक्षाच्या जागीं जें अंतर्दृष्टीचें प्रमाण धार्मिक लोक आणूं पहातात व उपनिषदांतील ऋषींनीं आणि शंकराचार्यासारख्या तत्त्ववेत्त्यांनीं ज्या साधनानें ब्रह्माचें व जगाचें स्वरूप जाणलें असें त्यांचें म्हणणें आहे, तें प्रमाण याहीपेक्षां फसवें आहे. डोळ्याच्या अंगचे सर्व दोष त्या अंतर्दृष्टीच्या ठायीं असून शिवाय इतरही अनेक दोषांनीं ती भरलेली आहे. डोळ्यांला जसें निरनिराळ्या अवस्थेंत निरनिराळें दिसतें तसें या दृष्टीला भास होत असतातच पण शिवाय मुख्य गोम अशी आहे कीं तिच्या साह्यानें दोन माणसांना झालेलें ज्ञान पुष्कळ वेळां सारखें नसतें. शंकराचार्य, रामानुज, मध्व, कपिल, वसिष्ठ, याज्ञवल्क्य, बुद्ध, जीझस् या सर्वांना अंतर्दृष्टीनेंच ज्ञान झालेलें असतांना त्यांपैकीं प्रत्येकानें मत इतकें भिन्न कां असावें ? ब्रह्म व आत्मा एकरूप आहेत व ते भिन्न आहेत, हीं ज्ञानें अंतर्दृष्टीनेंच मिळालेलीं आहेत. देव अनेक आहेत व देव एकच आहे हें तिनेंच सांगितलें. आत्मा आहे व नाहीं हें ज्ञान तिजपासूनच झालेलें आहे. याशिवाय धर्मशास्त्रांतला फारच मोठा दोष म्हणजे या आंतल्या दृष्टीपासून झालेलें ज्ञान पडताळून पहाण्यास मुळींच साधन नाहीं. ईश्वर, आत्मा-परलोक हें पाहून कोणीहि परत येत नाहीं. एकमेकांना एकमेकांचे अनुभव कधींहि पटत नाहींत. डोळ्यानें दिलेल्या ज्ञानांत ही तरी सोय आहे. तें इतर इंद्रियांनीं तपासतां येतें व इतरांच्या अनुभवाशीं तोलतां येतें. आणि हजारो जणांचें अनुभव जमले म्हणजे मगच तें खरें ज्ञान असें समजलें जातें. पडताळून पाहातां येईल असें जें ज्ञान या दिव्य दृष्टीनें प्रगट केलें आहे तें बहुतेक सर्व चुकीचें ठरलें आहे. त्याचें विवेचन पुढें येईलच. पण वरील विवेचनावरून पाहातां अंतर्दृष्टि हें ज्ञानसाधन अगदीं अवि-

श्वसनीय आहे हें ध्यानांत येईल. बुद्धिनिष्ठ माणसाबद्दल आणखी कांहीं गैरसमज उत्पन्न करून देण्याची अलीकडे पद्धत पडत चालली आहे. रा. गो. म. जोशी यांनीं त्यांच्या पुस्तकांत यासंबंधीं बरेंच अर्थशून्य विवेचन केलें आहे (पान ३९९) बुद्धिनिष्ठ मनुष्य अनुमान किंवा आप्तवाक्य मानीत नाहीं असें उगीचच कांहीं लोक म्हणतात. व दुसरें कांहीं म्हणतात कीं न्यूटन डार्विन यांचा शब्द तुम्ही खरा मानतां मग शंकराचार्य, वसिष्ठ यांचा कां खरा मानीत नाहीं ? पण याचें उत्तर अवघड नाहीं. येथें न्यूटन किंवा शंकराचार्य असा प्रश्न नसून ज्ञान मिळविण्याची पद्धत कोणची असा प्रश्न आहे. अंतर्दृष्टीनें पाहिलेले सिद्धान्त खरे नसतात असें आढळल्यामुळें त्या दृष्टीचा उपयोग करून जो कोणी ज्ञान सांगूं लागेल त्याच्यावर विश्वास बसत नाहीं. प्रत्यक्ष अनुभवाचा उपयोग करून कोणीही कोणचाही सिद्धान्त सांगितला तरी बुद्धिनिष्ठ मनुष्य तो मानण्यास तयार असतो. तेव्हां ज्ञानेंद्रियांचा पुरावा केव्हां केव्हां सदोष असला तरी मानवाला उपलब्ध असलेल्या ज्ञानसाधनांमध्यें तें सर्वांत श्रेष्ठ साधन आहे, हें विसरून चालणार नाहीं. त्यापेक्षां निर्दोष साधन सांपडेपर्यंत त्याचाच आश्रय केला पाहिजे. व अचिंत्य भावांचें तर्कानें आकलन करूं नये असें सांगावयाचें असेल तर दुसऱ्या कशानेंच तें आकलन होणार नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

भौतिक शास्त्रांवर दुसरा असा आक्षेप येतो कीं त्यांचे सिद्धांत स्थिर नाहींत. दर दहावीस वर्षांनीं कांहीं तरी नवीन शोध लागतो व पूर्वीचा ढासळून पडतो. त्यामुळें अस्थिर, नित्य पालटणाऱ्या अशा भौतिक शास्त्राच्या पायांवर समाजाचे नियम न रचतां, सनातन शाश्वत अशा धर्मग्रंथांच्या आधारेंच समाजशास्त्र रचलें पाहिजे असें ते म्हणतात. या लोकांच्या मतानें भौतिक शास्त्रें अजून बाल्यावस्थेंत आहेत व त्यामुळें त्यांच्यावर विश्वास ठेवणें धोक्याचें आहे. पण यावर अशी शंका येते कीं, भौतिक शास्त्रें हीं बाल्यावस्थेंत आहेत व अस्थिर आहेत असें जरी क्षणभर मानलें तरी धर्मशास्त्र हें प्रौढ व स्थिर आहे, या म्हणण्याला तरी कांहीं अर्थ आहे काय ? सर्व जगाचे धर्म पाहिले तर तत्त्वज्ञान, नीति व आचार या विषयांत त्या धर्मांच्या जन्मापासून आतांपर्यंत कायम राहिलेला एकहि सिद्धांत सांगतां येणार नाहीं. इतर धर्म सोडून दिले तरी सनातन म्हणविणाऱ्या हिंदुधर्मांत तरी वेदकाळापासून आतांपर्यंत अगदीं स्थिर राहिलेला असा कोणचा विचार आहे ? अगदीं खेळीमेळीनें वागणारे इंद्र–वरुणादि देव जाऊन तेथें निर्गुण, निराकार, परब्रह्म आलें. त्याच्या स्वरूपाबद्दल पुन्हां मतभेद सुरू झाला. आत्मा व ब्रह्म पूर्ण एक, थोडेसें भिन्न व पूर्ण भिन्न अशीं निरनिराळीं मतें सुरू झालीं. हें ब्रह्म प्राप्त करून घेण्याच्या मार्गाबद्दल अशीच चंचल मनःस्थिति दिसते. ज्ञान-

मार्ग, भक्तिमार्ग, कर्ममार्ग, ज्ञानयुक्त, भक्तिप्रधान, कर्मयोग असे अनेक पंथ यांत आहेत. नीतिच्या बाबतींत हेंच आहे. अनेक स्मृति होऊन त्यांनीं पूर्वीच्यांचीं मतें रद्द केलीं, यापेक्षां अस्थिरतेचा पुरावा आणखी कोणचा पाहिजे ? आचारहि असेच पालटत आले आहेत. गाईचें मांस खाणें हा एका काळीं धर्म होता. आतां तिला पशू म्हणणें हाहि अधर्म आहे. आपलें स्वरूप सर्व अंगानें असें नित्य पालटत असतांना या धर्मानें स्थिरतेची प्रौढी मिरवावी, यांत काय अर्थ आहे. नाहीं म्हणावयास आत्म्याचें अस्तित्व व तदनुषंगिक कर्मवाद हीं आतांपर्यंत कायम राहिलीं आहेत असें म्हणतां येईल. पण येथें असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, एखादें मत दोन हजार वर्षें लोकांनीं उराशीं धरून ठेवलें, एवढ्यासाठींच तें खरें मानावयाचें कीं काय ? ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म, कर्मवाद हे मोक्षधर्मशास्त्राचे सिद्धांत पडताळून पहाण्याला साधनच नसल्यामुळें ते हजारों वर्षें टिकले या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जाखाई, जोखाई, मरीआई यांची पूजा वेदपूर्व-काळापासून आतांपर्यंत म्हणजे हिंदूच्या अत्यंत श्रेष्ठ तत्त्वज्ञानापेक्षांहि जास्त वेळ टिकून राहिली आहे. पण तेवढ्यावरून तिला कोणीच श्रेष्ठ समजत नाहीं. तेव्हां भौतिक शास्त्रें अस्थिर आहेत व धर्मशास्त्र हें स्थिर आहे, या म्हणण्यांत कांहीं जीव नाहीं. बरें, भौतिक शास्त्रांचा सिद्धांत काल निघाला कीं आज अमलांत आणावा, असें कोणीच म्हणत नाहीं. शास्त्रज्ञ सांगतील तो योग्य काल गेल्यानंतरच तो अमलांत आणावा असेंच कोणीहि विचारी मनुष्य म्हणेल. योग्य काल म्हणजे पन्नास पाऊणशें वर्षें ठरविला तर त्यानंतरहि म्हणजे दोनशें वर्षांनीं किंवा चारशें वर्षांनीं सुद्धां सिद्धांत बदलूं शकतो हें खरें आहे. व त्यामुळें मधलीं चारशें वर्षें ज्यांनीं तो पाळला त्याचें नुकसानहि होईल. पण ही आपत्ती कोणच्याच मार्गानें टाळणें शक्य नाहीं. गीतेचा ज्ञानयोग निर्माण होईपर्यंत वेदवादरत होऊन काम्य कर्मे करीत राहणाऱ्या लोकांच्या आत्म्याचें नुकसान झालेंच कीं नाहीं ? शंकराचार्यांचा संन्यासपर अर्थ ज्यांनीं मान्य केला, त्या लोकांनीं कर्मे सोडून दिल्यामुळें टिळकांचें गीतारहस्य निर्माण होईपर्यंत समाजाचें नुकसान होतच होतें ना ? प्रतिलोमविवाह मान्य करणाऱ्यांचें मनु येईपर्यंत व आनुलोम चालूं ठेवणाऱ्यांचें याज्ञवल्क्य सांगेपर्यंत नुकसान झालें त्याची काय वाट ? हें जसें नुकसान माणसांनीं सोसलें, तसेंच भौतिकशास्त्रें मान्य करून त्याअन्वयें समाजरचना केली तर सोसावें लागेल, यापेक्षां जास्त कांहीं नाहीं. पण एवढ्यासाठीं प्रत्यक्ष प्रमाणानें ज्ञान मिळविणाऱ्या भौतिक शास्त्रांचे सिद्धांत टाकावे व अंतर्दृष्टीसारख्या सर्वस्वीं अविश्वसनीय साधनानें ज्ञान मिळविणाऱ्या मोक्षधर्मशास्त्राचे सिद्धांत मान्य करावें, असें मुळींच ठरत नाहीं. ( धर्मशास्त्रांत अवलोकन, अनुभव, प्रयोग यांवरून जे सिद्धांत सांगितले

असतील त्याबद्दल हें बोलणें नाहीं. पण डोळे मिटल्यानंतर जें दिसलें त्याच्या आधारानें, किंवा वेदांतील स्वल्पविराम व अवग्रह चिन्हें यांवर मारामारी करून त्यांवरून जे सिद्धांत सांगितले जातात त्याबद्दल हें लिहिलें आहे ).

आधिभौतिक शास्त्रें हीं मानवकृत व म्हणून दिक्कालांनीं मर्यादित आहेत; धर्मग्रंथ हे साक्षात् परमेश्वरानें सांगितले असल्यामुळें त्यांना दिक्कालाची मर्यादा नाहीं. तेव्हां धर्मशास्त्रापुढें दिक्कालांनीं मर्यादित अशा भौतिक शास्त्राची मुळींच मातब्बरी नाहीं, असा एक मुद्दा नेहमीं पुढें येत असतो. येथें पहिल्या प्रथम परमेश्वराच्या अस्तित्वाचाच प्रश्न उपस्थित होईल. पण तो न करतांहि असें विचारतां येईल कीं अमुक एक ग्रंथ परमेश्वरानें सांगितला हें कशावरून ठरवावयाचें ? वेद व उपनिषदें हींच परमेश्वरानें सांगितलीं हें कशावरून ? पण लक्षांत कोण घेतो, निबंधमाला, हे ग्रंथ किंवा टिळक, रामन्, बोस यांचें ग्रंथ यांना परमेश्वरवाणी कां म्हणूं नये ? मधुच्छंद, श्यावाश्व, सप्तवध्रि, श्रुष्टिगु या लोकांनीं लिहिलेलीं सूक्तें ती परमेश्वराची वाणी, मग गीतगोविंद किंवा गीताञ्जली हीं कां नव्हत ? रामन्, बोस हे लोक आपल्या म्हणण्यास पुरावा देतात, नुसत्या आज्ञा करीत नाहींत; आणि जयदेव किंवा रवींद्रनाथ आम्हीं हें काव्य पाहिलें असें न म्हणतां रचलें असें म्हणतात एवढाच त्यांचा दोष न। ? पण पुरावा न देणें किंवा ‘ पाहिलें ’ असें म्हणणें हें कोणीहि करूं शकेल. अंतर्दृष्टि हें साधन योग्य कीं अयोग्य हा वाद जरी क्षणभर मिटतां घेतला, तरी अंतर्दृष्टीनें पाहून लिहिलेला ग्रंथ कोणचा व तसा नाहीं कोणचा, हें ठरविणें अशक्य आहे. असें असतांना अमुक एक ग्रंथ परमेश्वरप्रणीत आहे, व त्यामुळेंच त्यांतील धर्मशास्त्र सर्वव्यापी व सर्वज्ञ आहे असें म्हणणारे लोक त्या ग्रंथांवर नसत्या आपत्ती ओढवीत आहेत असें म्हटलें पाहिजे. वेद, उपनिषदें, मनुस्मृति हे ग्रंथ मनोहर काव्य, प्रगल्भ तत्त्वज्ञान, व आनुवंशाचा शोध यासाठीं निरतिशय आदरणीय आहेत. महाभारत, रामायण यासारखें काव्य त्रिखंडांतहि सांपडणें शक्य नाहीं. पण हें म्हणणें निराळें व ते ग्रंथ सर्वज्ञ आहेत व त्यांतील प्रत्येक वाक्य हें प्रमाण मानलें पाहिजे हें म्हणणें निराळे. ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म, कर्म या अतींद्रिय सृष्टींतल्या विषयासंबंधीं त्यांनीं जीं विधानें केलीं आहेत त्यांत परस्परविरोध वाटेल तितका आहे. व विज्ञानाच्या कक्षेत येऊन ऐहिक विषयासंबंधीं त्यांनीं जें ज्ञान सांगितलें आहे, त्यांतलें पुष्कळसें चूक आहे. जगदुत्पत्तीसंबंधीं, व मानवाच्या उत्पत्तीसंबंधीं यांनीं जी माहिती दिली आहे ती चूक आहे, असें डार्विननें दाखविलें आहे. यज्ञापासून पर्जन्य होतो हेंहि मनूचें विधान चूक आहे कारण कांगो व्हॅलींत व ब्राझीलमध्यें यज्ञ नाहींतच; पण माणसेंहि फारशी नाहींत. संकरापासून निर्माण झालेल्या

प्रजेचे विशेष गुण त्यानें सांगितलें आहेत तेंहि आतां रा. गो. म. जोशी याखेरीज कोणी खरे मानीत नाहींत. सूर्याला स्वर्भानु म्हणजे राहू ग्रासतो व त्यामुळें ग्रहण लागतें, हें ऋग्वेदांतलें ( ५-४०-७ ) विधान चूक आहे, हेंहि सर्वांना माहीत आहेच. त्याचप्रमाणें घटामध्यें वीर्य पडल्यानें पुत्रोत्पत्ती होऊं शकते, ही ऋग्वेदांतली कल्पनाही ( ७-३३ ) बरोबर नाहीं, याबद्दलही वाद नाहीं. जेथें जेथें पडताळा पहातां येतो, तेथें तेथें श्रुतिस्मृतींचें ज्ञान हें बहुतेक चूक ठरतें. त्या जर सर्वज्ञ आहेत व ईश्वरप्रणीत आहेत, तर असें कां व्हावें. श्रुतिस्मृतींचें हें जें अज्ञान वर दाखविलें आहे त्यांतील हेतूबद्दल कोणीही गैरसमज करून घेऊं नये. या चुकांमुळें त्या ग्रंथांचें वैभव रतिमात्रही कमी होत नाहीं असें माझें मत आहे. असल्या आणखी पांचशे चुका जरी आढळल्या तरी त्यांतील अलौकिक काव्यप्रतिभा व बुद्धीची विशालता यांना अणुइतका सुद्धा दोष देतां येणार नाहीं. ते ग्रंथ सर्वज्ञ आहेत, दिक्कालाच्या अतीत आहेत व म्हणून दिक्कालांनीं मर्यादित भौतिक शास्त्रांची त्यांच्यापुढें किंमत नाहीं, असें म्हणणाऱ्यांना उत्तर देण्यासाठीं व अंतर्दृष्टी हें ज्ञानसाधन कसें अविश्वसनीय आहे, हें दाखविण्यासाठीं ही खटपट केली आहे. वेद व स्मृति यांत चुका सांपडतात म्हणून अंतर्दृष्टी अविश्वसनीय मानावयाची तर प्रिन्सिपियांत चुका सांपडतात, म्हणून प्रत्यक्ष प्रमाणें कां अविश्वसनीय मानूं नयेत, असा एक प्रश्न येथें विचारतां येण्याजोगा आहे. पण त्याचें उत्तर वर आलें आहे. प्रत्यक्ष प्रमाण हें पूर्ण निर्दोष व सर्वंकष आहे, असें कोणीच कधीं म्हणत नाहीं. ते कमींत कमी निर्दोष आहे एवढेंच म्हणणें आहे. शिवाय त्याला बाह्य साधनांची अपेक्षा असते. त्यांत जसजशी सुधारणा होत जाईल, तसतसें प्रत्यक्ष ज्ञान जास्त चांगलें होणार. अंतर्दृष्टीचें तसें नाहीं. वेदपूर्वकालापासून पृथ्वीच्या अंतापर्यंत तिची शक्ति कायम असावयास पाहिजे. तिच्यांतही सुधारणा होते आहे, असें म्हणावयाचें असेल तर मागील ग्रंथांची सर्वज्ञता लटकी ठरेल. सर्वज्ञतेचा हेका भौतिक शास्त्रें कधींच धरीत नाहींत. प्रत्यक्ष प्रमाणाच्या व मानवी बुद्धीच्या मर्यादा आधिभौतिक शास्त्रज्ञांच्या नेहमीं ध्यानांत असतात. शास्त्रें हीं धूर्त असतात व आपल्यांला न कळणाऱ्या गोष्टी जगांत आहेत, अशी कबुली देणें त्यांना कमीपणाचें वाटतें, असें रा. गो. म. जोशी लिहितात ( पान ६६ ). स्वतःला शास्त्रज्ञ म्हणविणाऱ्या या माणसाची ही वृत्ति खरोखर अत्यंत मनोरंजक आहे. शास्त्रें जर नेमकी एकादी गोष्ट करीत नसतील तर हीच. आपल्या ज्ञानाच्या मर्यादा स्पष्टपणें ओळखून इतकें कळतें, इतकें कळत नाहीं असें सांगण्याची प्रथा प्रथम याच शास्त्रांनीं पाडली. ठायीं ठायीं अज्ञान आणि विसंगती दिसत असूनही सर्वज्ञतेची ऐट आणणें हें धर्मग्रंथांनाच साजतें. शास्त्रांनीं ते कधींही केलेलें नाहीं.

पण अमुक एक आपणांस कळत नाहीं हें सांगण्याची शास्त्राची जी सत्य व नम्र वृत्ति आहे तिचा फायदा घेऊन कांहीं लोक म्हणतात कीं मानवी बुद्धीला मर्यादा आहे असें जर तुम्हीच कबूल करतां, तर जेथपर्यंत ती बुद्धि जाईल तेथपर्यंत जाऊन तेथून पुढें श्रद्धेचें क्षेत्र आहे असें कबूल करावें. पण श्रद्धेचें क्षेत्र आहे असें कबूल करावयाचें म्हणजे काय करावयाचें ? जडाच्या पलीकडे आपल्याला समजत नाहीं असें शास्त्रें सांगतातच. पण आपल्याला समजत नाहीं एवढ्याचसाठीं तें दुसऱ्या कोणाला तरी समजतें, असें मानवयाचें कीं काय ? आपलें अज्ञान हाच दुसऱ्यांच्या ज्ञानाचा पुरावा कसा होतो तें कळत नाहीं ! श्रद्धा कोणावर व कां ठेवावयाची ? श्रद्धेचें क्षेत्र मानणारे लोक तरी वाटेल त्यावर श्रद्धा ठेवतील काय ? आप्तवचनावर श्रद्धा ठेवावी हें मान्य केलें तरी आप्त कोण हा प्रश्न पुन्हां राहतोच. कपिल महामुनी, व्यास, श्रीकृष्ण, गौतमबुद्ध, शंकराचार्य, समर्थ, टिळक या महा विभूतींनीं जें सांगितलें त्यावर श्रद्धा ठेवावी, हें म्हणणें वाटेल त्या बुद्धिनिष्ठाला मान्य होण्याजोगें आहे. कारण या विभूतींचें चारित्र्य, त्यांचा त्याग, सागरासारखी त्यांची बुद्धि व महामेरू-सारखें कर्तृत्व यांबद्दल कोणालाही शंका नाहीं. पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं या थोर पुरुषांच्या सांगण्यामध्यें अंतिम हेतु, जगाचें स्वरूप, व मार्ग याबद्दल इतके मतभेद आहेत कीं त्यांच्या अलौकिक बुद्धीमुळें त्यांच्यावर श्रद्धा ठेवावी असें वाटण्याऐवजीं त्यांची बुद्धि अलौकिक होती याच कराणासाठीं ते ज्या विषयांत संचरत होते त्या विषयांत निश्चित असें कांहींच नाहीं, तेव्हां आपण त्या नादीं लागण्यांत अर्थ नाहीं असेंच कोणालाही वाटेल. भौतिक शास्त्रांत व अध्यात्मांत हाच तर मुख्य फरक आहे. पहिल्यामध्यें हजारो सिद्धान्त असे आहेत कीं ज्याबद्दल एकही भौतिक शास्त्री शंका घेऊं शकत नाहीं. व दुसऱ्यांत असा एकही सिद्धान्त नाहीं कीं ज्यावर सर्वांचें--एकाच धर्मांतील सर्वांचें सुद्धां एकमत आहे. आणि म्हणूनच श्रद्धेचें क्षेत्र याला कांहीं अर्थ नाहीं. मानवी बुद्धि खुंटली कीं त्यापलीकडे समजत नाहीं, म्हणून स्वस्थ बस-ण्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं.

सर जेम्स जीनस् यानें आपल्या ‘ मिस्टीरियस युनिव्हर्स ’ या पुस्तकांत एक चमत्कारिक प्रश्न उपस्थित केला आहे. पदार्थविज्ञानशास्त्रांत अलीकडे अशा कांहीं गोष्टी आढळतात कीं, त्यामुळें आतांपर्यंत भौतिक शास्त्रज्ञांनीं मानलेला कार्यकार-णाचा दुर्लंघ्य नियम ढासळून पडत आहे, असें तो म्हणतो. ( पान १७ ) रेडियम या धातूंतील अणूंचें हेलियम व शिसें या धातूंत नित्य रूपांतर होत असतें. पण दोन

हजार अणू घेतले तर त्यांतील अमकाच अमुक वेळेला कां रूपांतरित व्हावा, हें शास्त्रज्ञांना सांगतां येत नाहीं. कोणचेही कार्यकारणाचे नियम या ठिकाणीं लागू पडत नाहींत. म्हणूनच याला रूदरफोर्ड व सॉडी यांनीं Sponatneous disintegration असें म्हटलें आहे. शिवाय आइन्स्टाइनच्या रिलेटिव्हिटीच्या सिद्धान्तामुळें विश्वाची पोकळी किंवा अवकाश ( Space ) हा मर्यादित आहे असें सिद्ध झालें आहे. अवकाश मर्यादित आहे म्हणजे काय याचा अर्थ कल्पनेनें सुद्धां जाणणें शक्य नाहीं. कारण पृथ्वीला सोडून एका रेषेंत आपण कोट्यवधि नव्हे असंख्य मैल जरी लांब गेलों तरी तेथून पुढें पोकळी नाहीं म्हणजे काय हें समजणें शक्य नाहीं. यावर हे गणिती उत्तर देतात कीं तर्कदृष्ट्या तुमचा प्रश्न बरोबर आहे. पण विश्व आतां तर्काच्या कक्षेंत राहिलें नाहीं. गणिताच्या नियमानें अवकाश हा सान्त ठरला आहे. तेव्हां तो तसा धरलाच पाहिजे. ( पान १२३ )

कार्यकारणभाव व तर्कशास्त्र प्रत्यक्ष भौतिक शास्त्रांनींच लाथाडल्यावर मग उरलें काय असें वाटून विचारवंताचें मन अस्वस्थ होऊन जातें. पण यासंबंधीं एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. एक तर स्वतः जीनस्नेंच म्हटलें आहे कीं बाह्यतः दिसणारा निसर्गाचा हा लहरीपणा कदाचित् अधिक संशोधनाअंतीं खरा नाहीं असें ठरून कार्यकारणाच्या कैचींत वरील रेडियमचें रूपांतर बसवितां येईलही. इतिहासांत मागें असें अनेक वेळां झालें आहे. अगदीं गति खुंटली असें वाटल्यानंतरही पुन्हां कार्यकारणभाव लागतो असें आढळलें आहे. व या बाबतींतही इतिहासाची पुनरावृत्ति होण्याचा संभव आहे. ( पान १९ ) या म्हणण्याप्रमाणें थोडेसें होऊंही लागलें आहे. प्रकाशाची गति कोणत्याही अवस्थेंत बदलत नाहीं असें धरून रिलेटिव्हिटीचा सिद्धान्त सांगितलेला आहे. पण तें गृहीतकृत्यच चूक आहे. प्रकाशाच्या गतींत फरक पडतो असें आतां आढळलें आहे.

पण याहीपेक्षां या प्रश्नाला निराळें उत्तर देतां येण्याजोगें आहे. आपण असें समजूं कीं शास्त्रज्ञांच्या अपेक्षेप्रमाणें रेडियममधील अणूंचें रूपांतर कार्यकारणाच्या कैचींत कधींच बसलें नाहीं. जडसृष्टींतले व्यापारही कार्यकारणाला न जुमानतां बेबंद होऊं लागले; व तर्काला वेडेपणाचे वाटतील असे सिद्धान्त गणितामुळें गृहीत धरावे लागले. पण असें झालें तरी धार्मिक लोकांना यात आनंद वाटण्याजोगें काय आहे तें कळत नाहीं. जीवनाच्या नियमांच्या कार्यकारणांचा जसा अजून उलगडा झाला नाहीं, मनाचे व्यापार शास्त्रांच्या कठोर नियमांना जसे अजून दाद देत नाहींत, त्याचप्रमाणें जड सृष्टींतलीं अंतिम तत्त्वेंही कार्यकारणाला वश नाहींत, असें म्हणून

शास्त्रज्ञांना दुर्दैवानें हात टेकावे लागतील व इतर सृष्टीप्रमाणेंच जड सृष्टिही अनिर्बंध आहे म्हणून कोणचाच नियम कोणीं कोणाला सांगूं नये असें फार तर ठरेल. यापेक्षां निराळें काय ? जड सृष्टीच्या अभ्यासकांना पूर्ण ज्ञान होऊं शकत नाहीं, यावरूनच दुसऱ्या कोणाला तरी तें ज्ञान होतें, ( म्हणजेच येथून पुढें श्रद्धेचें क्षेत्र लागलें ) असें म्हणणें म्हणजे वेडगळपणाचा कळस आहे. कुणालाच कांहीं कळत नाहीं—अंतर्दृष्टीला कधींच कळत नव्हतें, व प्रत्यक्ष प्रमाणांनीं जडवस्तूंचें तरी स्वरूप पूर्णपणें कळेल असें वाटलें होतें तीही आशा नष्ट झाली एवढाच खेदजनक सिद्धान्त फारतर यावरून निघेल. पण तुम्हांला येत नाहीं येवढ्याचसाठीं तें आम्हांला येतें असें माना, असें सांगणें यानें मनोरंजन होण्यापलीकडे कांहींच साधणार नाहीं.

धर्मशास्त्राचा एकेक प्रांत काबीज करीत विज्ञानानें ऐहिक विषयाचें तर सर्व क्षेत्र व्यापलेंच आहे व आतां मोक्षधर्मशास्त्राला त्याच्या स्वतःच्या घरांतच विज्ञानानें शह दिला आहे. जडवस्तूंचे व्यापार उकलतां उकलतां मानवाचाही अभ्यास विज्ञानानें सुरू केला. त्याच्या जड देहाचें सर्व शास्त्र हस्तगत झालेंच आहे व आतां मनाबद्दलही विज्ञान कांहीं सिद्धान्त सांगूं लागलें आहे. मन हा धर्मशास्त्राचा बालेकिल्ला आहे. त्याचे जे व्यापार चालतात ते आत्म्याचें अस्तित्व मानल्यावांचून स्पष्ट करणें अशक्य आहे असें धर्मशास्त्र म्हणतें. पण तेंही चुकीचें आहे, असें अलीकडचे शास्त्रज्ञ म्हणूं लागले आहेत. त्यांचें म्हणणें असें. मनाचे व्यापार आम्हांस सर्वस्वीं उकलतां आले आहेत असें आम्ही म्हणत नाहीं. पण आतांपर्यंत जो कांहीं अभ्यास झाला आहे, त्यावरून एवढें मात्र खास सांगतां येतें कीं, तें उकलण्यासाठीं आत्मा म्हणून एक कांहीं देह नाशानंतर टिकून राहाणारें व अविनाशी तत्त्व आहे, असें मानण्याची मुळींच जरूर नाहीं. आत्मा किंवा परमेश्वर यांच्याबद्दल आम्ही कांहीं सागूं शकत नाहीं. तुम्ही ज्या गोष्टीवरून ते सिद्ध होतात असें म्हणतां त्या गोष्टीवरून ते सिद्ध होत नाहींत इतकेंच आम्ही म्हणतों. व आम्हाला पटेल अशा इतर कोणच्याही रीतीनें आत्म्याचें अस्तित्व तुम्ही सिद्ध केलें नसल्यामुळें आम्ही तो मानावयास तयार नाहीं. तो नसेलच असें आम्ही म्हणत नाहीं. त्याचें अस्तित्व सिद्ध झालें नाहीं एवढेंच आमचें म्हणणें आहे.

अलीकडच्या भौतिक शास्त्रज्ञांच्या मतानें मन ही जडाहून कांहीं निराळी वस्तु नाहीं. आगगाडीच्या इंजनापेक्षां रेडीओचे व्यापार सूक्ष्म असतात. रेडीओपेक्षां सजीव अशा झाडाच्या वाढीचे व्यापार सूक्ष्म असतात. त्यापेक्षां मानवाच्या देहाच्या वाढीचे व्यापार सूक्ष्म असतात. देहांतल्या देहांतच हातापेक्षां कानाचे, व कानापेक्षां

डोळ्याचे व्यापार सूक्ष्म असतात. याच रीतीनें अत्यंत सूक्ष्म व्यापार असलेलें मन हें एक यंत्र आहे. परमाणूंच्या संघटनविघटनाचेंच तें कार्य आहे. त्याचे व्यापार अत्यंत सूक्ष्म आहेत, इतकाच काय तो इतर जड गोष्टींत व त्याच्यांत फरक आहे. गुलाबाच्या फुलांतून सुगंधाचे जसे अत्यंत सूक्ष्म पण मधुर कण निघत असतात, कण्हेरीच्या फुलांतून त्याचप्रमाणें सूक्ष्म पण उग्र कण जसे निघत असतात, व हिरव्या चाफ्याच्या फुलांतून जसे भिन्न भिन्न गंधाचे कण निघत असतात त्याचप्रमाणें मनांतून त्याही-पेक्षां सूक्ष्म असे रागद्वेषाचे कण निघत असतात. व विचारविकारांच्या लहरी म्हणजे याच कणांचे आघात किंवा प्रत्याघात होत.

यावर धर्मशास्त्रज्ञांचें म्हणणें असें कीं, शरीराप्रमाणेंच मन हेंहि जड आहे व तेंहि जड वस्तुप्रमाणेंच कार्यकारणांनीं बद्ध आहे असें जर तुम्ही म्हणाल, तर नीति-अनीतिबद्दल एक चकार शब्दहि तुम्हाला काढतां येणार नाहीं. मन हें जर कार्य-कारणभावानें बद्ध असेल, तर त्याची स्थिति दगडाप्रमाणेंच आहे. मागल्या क्षणाच्या अवस्थेवर त्याची पुढल्या क्षणाची अवस्था अवलंबून असणार. ती पालटण्याचें दगडांत जसें सामर्थ्य नाहीं, तसें मनांतहि नाहीं. व मनांत जर हें सामर्थ्य नाहीं म्हणजे कोणचीच क्रिया किंवा विचार करण्याचें स्वातंत्र्य जर त्याला नाहीं तर त्याला अमुक कर, तमुक कर, असा उपदेश करणें हें दगडाला उपदेश करण्याइतकेंच अर्थशून्य आहे. तेव्हां आत्मा नाहीं किंवा मनाला स्वातंत्र्य नाहीं, असें तुम्हांस मानावयाचें असल्यास माना; पण मग नीति-अनितीचा विचार तुम्हांला मुळींच सांगतां येणार नाहीं. नीति-शास्त्रप्रवेश या आपल्या ग्रंथांत प्रो. वा. म. जोशी यांनीं याच तऱ्हेचे विचार सांगितले आहेत. ते म्हणतात कीं, आत्म्याला जड मानलें तर नीतिशास्त्राच्या मुळावरच कुठार घातल्यासारखें होईल. रसेलच्या जडवादावर टीका करतांना रा. गो. म. जोशी यांनीं असेंच म्हटलें आहे. इतरहि अनेक पंडितांचें असेंच मत आहे.

नीतिविशारदांच्या या आक्षेपाला दोन प्रकारे उत्तर देतां येईल. एक म्हणजे मन जड कोटींत घातलें तर नीति-अनितीचा उपदेश व्यर्थ आहे हें त्यांचें विधान बरोबर नाहीं. त्याची मीमांसा पुढें येईलच; पण दुसरें असें कीं, जडवादावर त्यांनीं जो आक्षेप घेतला आहे तो त्यांच्यावरहि तितक्याच जोरानें परत फिरतो हें ते विसरतात. धर्मशास्त्रामध्यें कर्मविपाकाचें महत्त्व फार आहे. आणि कर्माचे नियम कठोर व दुर्लंघ्य आहेत असें म्हणतात. कर्मचक्र एकदां सुरू झालें म्हणजे त्यांत कधीं खळ पडत नाहीं. जीं जीं कृत्यें मानव करतो त्या त्या कृत्यांचीं फलें म्हणजेच त्याचें कर्म हें मेल्यानंतरहि त्याच्याबरोबर जात असतें.' इतकेंच काय, पण एका महाप्रलया-

नंतरहि तें नष्ट न होतां प्रत्येक जीवाच्या वाटणीला तें जसेंच्या तसें येतें; आणि जीव एकदां कर्मबद्ध झाला म्हणजे चांगलें वाईट करणें हें सुद्धां त्याच्या हातीं नाहीं; इच्छा नसतांहि मनुष्याच्या हातून पापें होतात, असें गीताकारच म्हणतात. मनुष्याला वासना होतात त्याहि पूर्वकर्मानुसारच होतात व त्याची बुद्धि हीसुद्धां कर्मानुसारिणीच असते. जडवादामध्यें मागल्या क्षणाच्या कारणामुळें पुढच्या क्षणाचें कार्य होत असतें व मनाला स्वातंत्र्य नसतें; तीच स्थिति कर्मवादांत निर्माण होते. मागल्या कारणावर पुढचें कार्य असें न म्हणतां मागल्या कर्मावर पुढची वासना व वर्तन अवलंबून असतें असें म्हणावयाचें इतकाच फरक. कर्माचा हा नियम न मानावा तर कृतकर्माचीं फळें भोगावीं लागत नाहींत, असें होऊन पुण्य कर असें सांगण्याला कांहींच अर्थ राहाणार नाहीं; आणि जन्मतःच एक दरिद्री, एक श्रीमंत, एक शूर तर दुसरा भ्याड कां व्हावा याची उपपत्तीहि नीट लावतां येणार नाहीं. व मग मोक्षधर्मशास्त्राचा पायाच उखडला जाईल. यांतून सुटण्यासाठीं वेदान्ती आत्म्याची साक्ष घेतात. मी स्वतंत्र आहे, वाटेल तें करूं शकेन असें जें मनुष्याला वाटत असतें, त्यावरूनच कर्मानें बद्ध अशा सृष्टीच्या पलीकडे स्वतंत्र अशी ब्रह्मसृष्टी आहे व आत्मा त्या ब्रह्माचाच अंश असल्यामुळें त्यालाहि स्वातंत्र्य आहे असें ते मानतात; पण आत्म्याची ही साक्ष फुकट आहे. मी स्वतंत्र आहें, हें जसें आत्म्याला वाटतें तसेंच मी ब्रह्माहून निराळा आहे असेंहि आत्म्याला वाटतें; पण या दुसऱ्या वाटण्याला मात्र वेदान्ती भ्रम आहे असें म्हणतात. हा जर भ्रम आहे तर ' मी स्वतंत्र आहे ' असें वाटणें हाहि भ्रम असणें शक्य आहे. आणि दुसरें असें कीं, ब्रह्माचा अंश म्हणून आत्मा जर स्वतंत्र धरावयाचा तर तो मुळांतच बद्ध कां व्हावा असा प्रश्न उत्पन्न होतो. पण मुळांत तो बद्ध कां होतो, हें आम्हांस सांगतां यावयाचें नाहीं असें वेदान्ती म्हणतात. आतां हा केवढा द्राविडी प्राणायाम आहे पहा. ब्रह्म हें अविभाज्य व स्वतंत्र आहे. असें असतांना प्रथम आत्मा त्यांतून विभक्त होतो असें मानावयाचें. मग तो कर्माच्या कठोर कायद्यांनीं बद्ध होतो असें मानावयाचें, मग मोक्षधर्माला जरूर म्हणून त्या आत्म्याची भ्रामक साक्ष घ्यावयाची व तिच्या जोरावर तो स्वतंत्र आहे ( तोहि थोडासाच-कारण फार स्वतंत्र मानला तर नीतिशास्त्र ओरडेल ) असें मानावयाचें; आणि मग त्या अर्धवट बद्ध मानलेल्या आत्म्याला म्हणावयाचें कीं, बाबारे, तूं पूर्ण स्वतंत्र आहेस, आपण बद्ध आहों असें तुला वाटतें तो भ्रम आहे, हें ध्यानांत घेतांच तूं मुक्त होतील. अद्वैत सांगतांना म्हणावयाचें कीं, ब्रह्म व आत्मा हे एकच आहेत व आत्म्याला आपण निराळे आहोंत असें वाटतें तो भ्रम आहे. कर्मवाद सांगतांना म्हणावयाचें कीं, कारणें सांगतां येत

नाहींत हें खरें; पण आत्मा बद्ध होतो हें खास, आणि पुन्हां मोक्ष कसा मिळेल असें विचारतांच आत्म्याची साक्ष काढून तो स्वतंत्र आहे असें ठरवावयाचें. वेदान्ताचा हा असा गोंधळ आहे, आणि वेदान्ताचाच आहे असें नाहीं. तत्त्वज्ञानाची कोणचीहि शाखा गोंधळावांचून अशक्य आहे.

कर्मांच्या नियमांनीं आत्मा बद्ध होतो, असें तरी म्हणावें किंवा होत नाहीं असें तरी म्हणावें; किंवा कर्मांचे नियम तितकेसे कठोर नाहींत, कांहीं कर्मांचीं फलें कदाचित् न मिळणें शक्य आहे असें तरी म्हणावें. पण यांतला कोणताही पक्ष धर्मशास्त्राला स्वीकारणें शक्य नाहीं. ते आपल्या सोयीप्रमाणें आत्म्याला थोडासा स्वतंत्र मानणार, आणि सगळें मानण्या न मानण्यावरच अवलंबून असेल तर शास्त्र कशाला सांगतां असें विचारलें तर उत्तर मिळणार नाहीं. यावरून असें दिसेल कीं कार्यकारणभाव पतकरण्यानें जी अडचण येते तीच कर्मवादांत येते आणि याच्याही पुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं कार्यकारणभाव पतकरण्यानें वरील अडचण नाहींशी होते. इतकेंच नव्हे तर नीतिनियम हें जडवादालाच फक्त शक्य आहेत. कसे ते पहा.

जडवाद्यांच्या मतानें मन व इतर पदार्थ यांत तात्त्विक फरक मुळींच नाहीं मनाचे व्यापार फार सूक्ष्म व इतरांचे स्थूल इतकाच फरक. हें ध्यानांत ठेवलें तर नीतिनियम याच पंथांत कसे शक्य आहेत, तें ध्यानांत येईल. फुलांचा जसा वास, शब्दांचा जसा नाद, तशाच मनाच्या रागद्वेषाच्या उर्मी आहेत. एखाद्या झाडाच्या कुजक्या फांद्या तोडून टाकून त्याच्या बुडाशीं खतपाणी घालणें हें जितकें साधें आहे तितकेंच मनाच्या उर्मी म्हणजे रागद्वेष हे तितक्याच सूक्ष्म अशा दुसऱ्या रागद्वेषानें बदलणें साधें आहे. झाडांच्या कुजलेल्या फांद्या म्हणजे कांहीं कणांचा समूह चाकूनें म्हणजे दुसऱ्या कांहीं कणांच्या समूहानें जसा आपण दूर करतो, तशाच मनांतल्या अधम किंवा कुत्सित भावना हा जो अत्यंत सूक्ष्म कणांचा समूह तो प्रेमानें किंवा क्रोधानें म्हणजे दुसऱ्या तसल्याच सूक्ष्म कणसमूहानें दूर करावयाचा म्हणजेच नीतिशास्त्र सांगावयाचें.

येथपर्यंतच्या विवेचनावरून असें ध्यानांत येईल कीं प्रत्यक्ष अनुभव, अवलोकन व प्रयोग यांच्या साह्यानें मिळविलेलें जें ज्ञान तेंच सर्वांत जास्त विश्वसनीय असतें. व आधिभौतिक शास्त्रें हीं याच पद्धतीनें ज्ञान मिळवीत असल्याकारणानें धर्म-अधर्म, नीति-अनीति हें सर्व त्यांच्याच आधारानें ठरविलें पाहिजे. अतींद्रिय सृष्टींतलें ज्ञान मिळविण्यास आपणास कांहींच साधन नाहीं. "अंतर्दृष्टि हें साधन अगदींच भ्रामक

व अविश्वसनीय आहे असेंही आपण पाहिलें. त्याचप्रमाणें भौतिक शास्त्रावर त्यांच्या विरोधकांनीं किंवा अर्धवट मित्रांनीं जे आक्षेप घेतले आहेत त्यांतही कांहीं जीव नाहीं असेंही आपल्या ध्यानांत आलें. आतां या भौतिकशास्त्रांचा सल्ला दर ठिकाणीं आपणास कसा कल्याणकारक होईल हें निरनिराळ्या क्षेत्रांतलीं उदाहरणें घेऊन विशद करून दाखविलें कीं या प्रकरणाचें काम संपलें.

एक विवाह हाच विषय घेतला तर त्यांत शरीरविज्ञान, अर्थशास्त्र, जीवनशास्त्र मानसशास्त्र इत्यादि अनेक शास्त्रांचा सल्ला घेऊनच काय तें निश्चित करावें लागेल. कोणाच्या दोन गटांतील स्त्रीपुरुषांचा विवाह व्हावा, हे तसले विवाह जेथें झाले असतील तेथें त्याचें परिणाम काय झाले हें पाहूनच ठरवावयास पाहिजे. आपल्या स्मृतींत याचा विचार केला असेलच असें म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. कारण केला आहे कीं नाहीं तें त्यांनीं दिलें नाहीं. व विचार करून कारणमीमांसा ठरवून जर त्यांनीं नियम सांगितले असतील, तर ते नियम पुन्हां तपासून पाहून नव्या परिस्थितींत हितावह आहेत कीं नाहीं हें पहाण्यास कांहींच हरकत नाहीं. तेव्हां स्मृतींतलि विधानें विचारांत घ्यावीं हें खरें. आधिभौतिक शास्त्रांच्या कसोटीवर घासल्यावांचून तीं प्रमाण मानूं नयेत इतकाच भावार्थ. कारण ब्राह्म, गांधर्व वगैरे विवाहपद्धति सांगून अमक्या वर्णाला अमकी हितकर असें जें मनूनें सांगितलें आहे, त्यांत कांहीं अर्थ नाहीं. कोणचेंहि विज्ञान त्याला पाठिंबा देणार नाहीं. वधूवरांच्या वयाबद्दलचें, तसेंच संकरजप्रजेसंबंधींचें मनूचें म्हणणें टिकण्याजोगें नाहीं. या व इतर बाबतींत अर्वाचीन संशोधकांनीं पुष्कळच अभ्यास केला आहे. आतेमामेबहिणीशीं जे लग्न करतात, त्यांच्या संततींत वेडेपणा, मानसिक दौर्बल्य फार अढळतें असें एक शास्त्रज्ञ म्हणतो. वधूवरांच्या वयांत दहापेक्षां जास्त अंतर असूं नये असें दुसऱ्यानें म्हटलें आहे. आईच्या व मुलीच्या प्रसवशक्तींत आनुवंशिकसंबंध कांहीं नाहीं असें तिसऱ्यानें सांगितलें आहे. तेव्हां या सर्व गोष्टींचा विचार विवाह–प्रकरणीं व्हावयास पाहिजे. धर्मशास्त्रांत अमुक सांगितलें आहे एवढा आधार कोणच्याहि गोष्टीला पुरेसा नाहीं. पुनर्विवाह करावा कीं न करावा हें त्या विवाहानें त्या स्त्रीच्या अपत्यावर, व एकंदर समाजावर परिणाम काय होईल तें पाहूनच फक्त ठरविलें पाहिजे. परलोकाचा कोणताहि विचार समाजविचारांत घुसूं देतां कामा नये. कारण परलोक अजून सिद्ध झाला नाहीं. व तो असला तरी तो व त्याचे इहलोकाशीं असलेले संबंध जाणण्यासाठीं अंतर्दृष्टि या अत्यंत अविश्वसनीय साधनाखेरीज दुसरें साधन नसल्यामुळें त्याचा विचार करणेंच शक्य नाहीं.

नीतिकल्पनांचा उदय व वाढ या आपल्या ग्रंथांत वेस्टरमार्कनें निरनिराळ्या धर्मांमध्यें–अगदीं रानटी टोळ्यापासून अत्यंत सुसंस्कृत समाजापर्यंत सर्व लोकांमध्यें— कित्येक विचित्र नीतिकल्पना कशा रूढ होत्या तें सांगितलें आहे. तें सर्व वाचलें

म्हणजे कारणमीमांसा न करतां केवळ धर्मक्षेत्रांतल्या काल्पनिक कारणावर विसंबून समाजाचे नियम बनविणें कसें घातुक आहे, हें चांगलें दिसून येईल.

बालहत्येची चाल तर जुन्या काळीं अगदीं सर्रहा चालू होती. आणि ती केवळ रानटी टोळ्यांत नसून ट्युटॉनिक, चिनी, आरब, रजपूत यांसारख्या सुधारलेल्या लोकांमध्येंहि होती. त्यांतल्या त्यात एक फरक मोठा ध्यानांत घेण्याजोगा आहे. अथेन्स स्पार्टा, रोम या संस्कृत राष्ट्रांमध्येंहि बालहत्या मान्य असे. प्लेटो, ॲरिस्टॉटल यासारखे पंडितहि तिचा पुरस्कार करीत. पण हे लोक अलौकिक धर्मविचारांनीं बालहत्या करीत नसल्यामुळें दुर्बल, रोगी अशीं मुलें मारावीं, असा तरी विवेक ते पहात. पण धार्मिक समजुतीनेंच जेथें बालहत्या होत असे, तेथें दुर्बल मूल जगविण्यासाठीं त्याच्याच सशक्त भावंडाला मारून त्याचें मांस दुर्बलाला भरविण्याची चाल असल्याचें आपणास दिसून येतें. एक सोडून एक मूल मारावें अशीहि पद्धत पुष्कळ ठिकाणीं होती. यावरून धार्मिक समजुतीच्या बुडाशीं कारणमीमांसा असणें किती जरूर आहे, हें ध्यानांत येईल.

वैवाहिक नीतिसंबंधीं वरील प्रमाणेंच हकीगत आहे. ज्या चाली आपल्याला अत्यंत किळसवाण्या वाटतात, तसल्या कित्येक चाली रानटी व सुधारलेल्या लोकांतसुद्धां धर्माच्या आज्ञा म्हणून पाळल्या जात असत. एकाच काळीं स्त्रीनें अनेक पती करणें, वधूचा प्रथम संभोग गुरु, राजा किंवा टोळीचा नायक यांना देणें, मित्राला इतर आदरातिथ्याबरोबरच कांहीं दिवस बायको किंवा मुलगी देणें या व असल्या कित्येक चाली किती तरी देशांत रूढ होत्या. प्रत्येक मुलीनें ॲफ्रोडाइटच्या मंदिरांत जाऊन प्रथम भेटेल त्या पुरुषाशीं संगत व्हावें अशी बाबिलोनमध्यें रूढी होती. ( जोसेफ मॅक्केब्कृत Evolution of Marriage व लिओ मार्केनूकृत Prostitution in the ancient world हीं पुस्तकें पहा ). पण मागच्या चालींचींच उदाहरणें देण्याची जरूर आहे असें नाहीं. आपली पत्नी व कन्या भक्तिभावानें सद्गुरुला अर्पण करून मोक्ष मिळविणारे लोक आजच्या सुशिक्षित समाजांतहि सांपडतात. तेव्हां सायन्स हे मानवी संस्कृतीचें थडगें रचणार आहे असें सांगणाऱ्यांनीं धर्मानें काय रचलें आहे हें पाहणें जरूर आहे.

आज सुशिक्षित म्हणविणारे जे आपण त्यांच्यांतही अमक्या वारीं अमुक खाऊं नये, तमक्या वारीं तमुक करूं नये, परदेशांत गेल्यानें पाप लागतें व गोमूत्र प्यायल्यानें तें जातें, असल्या वेडगळ समजुती दृढमूल होऊन बसल्या आहेत. या सर्वांचें कारण हेंच कीं आपला आचार चांगला कीं वाईट हें ठरविण्याची कसोटी कांहीं तरी अलौकिक, आपल्याला न समजेल अशी, केवळ अंतर्दृष्टीनेंच जाणतां येण्याजोगी अशी असावी असें लोकांना वाटतें. ही समजूत दूर होऊन प्रत्येक गोष्ट विज्ञानाच्या

वा. क्रा. नं. १४९

पायावर उभारून त्याअन्वयें आचार ठेवावा असें लोकांना वाटूं लागलें तर समाजाच्या शक्तीचा चाललेला अपव्यय थांबेल असें वाटतें.

धर्म, नीति, आचार हे सर्व आधिभौतिक शास्त्रा[illegible] स्वीकारल्यानंतर आपल्या समाजांत एकदम क्रान्ति होऊन जाईल व नंदनवनाचें सुख खाली येईल असें म्हणण्याचा मुळींच उद्देश नाहीं. मानवाची बुद्धि मर्यादित आहे व विचारांपेक्षां विकारांची सत्ता त्याच्या मनावर जास्त चालते. त्यामुळें भौतिक शास्त्रें प्रमाण मानल्याबरोबर सुखाचें साम्राज्य पसरेल असें कधींच कोणी म्हणणार नाहीं. पण अंतर्दृष्टीपेक्षां अवलोकन, अनुभव व प्रयोग हीं ज्ञानसाधनें श्रेष्ठ असल्यामुळें त्यांनीं मिळविलेल्या ज्ञानावरून कांहीं निष्कर्ष काढले तर ते जास्त सुखावह होतील, एवढेंच सांगावयाचें आहे. चातुर्मासांत कांदेलसूण खावे कीं नाहीं, शुद्धीसाठीं गोमूत्र घ्यावें कीं काय हें अंतर्दृष्टीवर उभारलेल्या धर्मशास्त्राला विचारण्यापेक्षां प्रयोगावर उभारलेल्या वैद्यकशास्त्राला विचारणें जास्त चांगलें. धर्मशास्त्र हेंहि प्रयोगावरच उभारलें आहे असें कांहीं लोक सांगतात. तसें असलें तर उत्तमच. कारण मग भौतिक शास्त्रांत जसें आपण नित्य प्रयोग करून जुनें चुकीचें ठरल्यास किंवा कमी हितावह ठरल्यास तें टाकून देऊन नवीन घेतो, तसेंच धर्मांतही करतां येईल. पण धर्मनिष्ठ लोक त्यालाच तयार होत नाहींत. म्हणून तर सर्व प्रश्न उद्भवतो. आहार, स्नानसंध्या, येथपासून पुनर्विवाह, जातिभेद येथपर्यंत सर्व प्रश्न जर धर्मानें विज्ञानाच्या साह्यानें सोडविले तर मग वादच राहाणार नाहीं.

भौतिक शास्त्रें हीं मानवाची वासना पूर्ण करण्याच्याच कामीं फक्त उपयोगी पडतात, व मानवाची वासना पूर्ण करूं पाहणें हें सशाच्या शिंगाचा शोध करण्यासारखें आहे. म्हणून तीं शास्त्रें फार कमी दर्जाचीं आहेत, असें रा. गो. म. जोशी यांनीं म्हटलें आहे. पण मानवाची वासना मुळांतच नाहींशी करून टाकणें, इतकेंच काय पण तिला इष्ट वळण लावणें, हें जें धर्मशास्त्राचें काम तें कितपत शक्य आहे व शक्य झालें आहे तें कोणास सांगावयास नकोच आहे. तेव्हां धर्माचा हा प्रयत्न कोणाचें शिंग शोधण्यासारखा आहे तें जोशांनीं एकदां जाहीर करावें. वास्तविक नीति व विज्ञान या दोन्ही गोष्टी समाजाला सारख्याच महत्त्वाच्या आहेत. विज्ञानानें सामर्थ्य निर्माण होतें. व त्याचा मानवाला कल्याणप्रद उपयोग कसा करावा हें नीतिशास्त्र सांगतें. पण उलट नीति काय व अनीति काय हें ठरविण्याला परिस्थितीचें जें ज्ञान लागतें तें विज्ञानावांचून अशक्य आहे. म्हणून या दोहोंचें महत्त्व ज्या समाजांत सारखेंच मानलें जाईल, व धर्म, नीति, व आचार हे विज्ञानाच्या पायावरच जेथें उभारले जातील तोच समाज समर्थ व सुखी होईल यांत शंका नाहीं.

---

# संस्कृति आणि प्रगति.

पशुपेक्षां मनुष्य श्रेष्ठ असें आपण म्हणतों, त्या वेळीं सर्व पशू सारखे व सर्व मानव सारखे असे आपल्या मनांत मुळींच नसतें. पशूमध्येंही आपण प्रतवारी लावतोंच. गाढव, टोणगा यांच्यापेक्षां घोडा, हत्ती व त्यांच्यापेक्षां वाघ, सिंह हे पशू आपण श्रेष्ठ समजतों. माणसांतही तसेंच आहे. निग्रोपेक्षां रेड इंडियन, त्याच्यापेक्षां चिनी व चिन्यापेक्षां युरोपी श्रेष्ठ अशी प्रतवारी लावली जाते. व्यक्तीव्यक्तीमध्येंसुद्धां आपण मनानें तुलना करीत असतों. चंगीझ-खानापेक्षां नेपोलियन व नेपोलियनपेक्षां शिवाजी श्रेष्ठ असें कांहीं लोक समजतात. व्यक्तीप्रमाणेंच राष्ट्राराष्ट्रामध्येंही श्रेष्ठकनिष्ठता लाविली जाते. कांहींच्या मतानें हिंदुस्थान, चीन हीं मागासलेलीं राष्ट्रें असून इंग्लंड, जर्मनी, अमेरिका आज श्रेष्ठ आहेत. पण उलट, इंग्लंडजर्मनीपेक्षां आजही हिंदुस्थान श्रेष्ठ आहे असें कांहींचें मत आहे. याहीपेक्षां मोठे विभाग करून पाश्चात्य संस्कृति श्रेष्ठ कीं पौर्वात्य असा वाद घातला जातो व त्यावरही उलट सुलट मतें आपण देतों व ऐकतों.

हा श्रेष्ठकनिष्ठतेचा रूढ झालेला विचार पाहिला म्हणजे असें पक्कें वाटूं लागतें कीं अमुक श्रेष्ठ व अमुक कनिष्ठ असें जो ठरवितो त्याच्याजवळ त्या श्रेष्ठ-कनिष्ठतेचें मोजमाप करतां येईल असें कांहीं तरी साधन खास असलें पाहिजे. तें साधन कोणचें व तेंच तूं कां वापरतोस असें विचारलें तर प्रत्येकाला सांगतां येईल असें नाहीं. पण प्रत्येकाच्या मनांत त्या वेळीं तें अस्पष्टपणें कां होईना ठरलेलें असलें पाहिजे यांत शंका नाहीं. पण हें साधन आपण तपासून पाहूं लागलों तर मात्र आपला गोंधळ उडून जातो. गाढवापेक्षां बैल श्रेष्ठ कां तर बैलाचा उपयोग जास्त म्हणून. म्हणजे येथें उपयुक्तता हें माप आहे. पण गाढवापेक्षां सिंह श्रेष्ठ असें म्हणतांना उपयुक्तता हें माप लावून बोलतो असें म्हणतां येईल काय ? माणसामाणसांत श्रेष्ठकनिष्ठ ठरवितांना असेच प्रश्न निर्माण होतात. शेतकरी सर्व जगाला अन्न पुरवितो व कोष्टी वस्त्र देतो. पण शिरप्या किंवा काळ्या यांच्यापेक्षां कोणाचेंही पोट न भरणारे जे गंधर्व किंवा रविवर्मा त्यांना आपण श्रेष्ठ समजतो व त्यांचाच मानसन्मान करतो. शास्त्रज्ञांमध्यें सुद्धां धान्यासाठीं उत्तम खत शोधून काढून एका खंडीच्या जागीं दोन खंडी पिकवून देणाऱ्या संशोधकापेक्षां एका ताऱ्यावरचा

प्रकाशकिरण दुसऱ्या ताऱ्यावर जात असतांना एक दश कोट्यांश सेंटी मीटर वांकडा होतो कीं नाहीं हें सांगणारे आइन्स्टाइन् किंवा रामन् यांनाच लोक श्रेष्ठ समजतात. नूरजहानला श्रेष्ठ म्हणतांना जे माप असतें तें झाशीच्या लक्ष्मीबाईला श्रेष्ठ म्हणतांना नसतें. सीतेला ज्या कारणासाठीं आपण मान देतो, त्याच कारणासाठीं जिजाबाईला मानतों असें नाहीं. स्वार्थत्यागावर श्रेष्ठता ठरते असें म्हणावें तर रणांगणांत आत्मबलिदान करणाऱ्या कोणच्याही सैनिकापेक्षां शिवाजीला आपण श्रेष्ठ समजतो. पित्राज्ञा पालन करणारा रामचंद्र व तिचा भंग करणारा प्रल्हाद, मातेची पूजा करणारा पुंडलीक व तिची हत्या करूं पाहाणारा, भरत, सत्यासाठीं राज्य घालविणारा हरिश्चंद्र व पावलोपावलीं त्याला हरताळ फासणारा व फासा म्हणून भर देणारा श्रीकृष्ण, या सगळ्यांना आपण श्रेष्ठच समजतो. हें सर्व लक्षांत घेतलें म्हणजे अमुक श्रेष्ठ व अमुक कनिष्ठ हें जरी चटकन् आपल्या मनांत येत असलें तरी त्या श्रेष्ठकनिष्ठतेची कारणमीमांसा करणें हें अत्यंत अवघड काम आहे हें ध्यानांत येईल.

संस्कृति व प्रगति यांच्या अर्थाबद्दल व अर्थ ठरल्यानंतर त्यांच्या इष्टानिष्टतेबद्दल पंडितांमध्यें जीं रणें माजून राहिलीं आहेत, त्यांच्या बुडाशीं श्रेष्ठकनिष्ठतेसंबंधीं वर सांगितलेली अनिश्चितता हीच आहे. कोणाला संस्कृत समजावें व कोणाला प्रगतिमान् समजावें व तसें समजल्यानंतर तें मोठेपणाचें लक्षण समजावें कीं अधःपाताचें, याही बाबतींत पंडितांचें एक मत नाहीं. एडवर्ड कार्पेंटरच्या मतें संस्कृति हा समाजाचा एक मोठा रोग आहे. व तो नाहींसा होईल तो सुदिन. संस्कृति म्हणजे काय हें मला समजत नाहीं असें हॅवेलॉक् एलिस यानें म्हटलें आहे. प्रोग्रेस ( प्रगति ) हा एक भ्रम आहे पण तो आवश्यक भ्रम आहे असें एकाचें मत आहे. यूरोपमधून येणाऱ्या लोकांखेरीज आफ्रिकेंत रानटी लोकच नाहींत असें ब्रिक् म्हणतो. आपल्या ज्ञानांत वाढ झाली असली तरी शक्ति किंवा बुद्धि या दृष्टीनें गेल्या चाळीस हजार वर्षांत मानवाची अणु इतकीसुद्धां प्रगति झाली नाहीं असें ऑसबॉर्न व इतर अनेक पंडित यांचें मत आहे. दया, प्रेम, सत्याचरण या दृष्टीनें चार हजार वर्षांपूर्वीच्या आपल्या पूर्वजांपेक्षां आपण कांकण भरही पुढें गेलेलों नाहीं असें डीन् इंग, अल्फ्रेड, रसेल वॅलेस् वगैरे पंडित म्हणतात. सुख हें माप धरलें तरी आगगाडी, विमान, टेलिफोन, सिनेमा इत्यादि साधनें असून मानवाचें सुख सुईच्या अग्राइतकेंही वाढलेलें नाहीं असें कित्येक म्हणतात. व कांहीं आणखी पुढें जाऊन म्हणतात कीं, खातेऱ्यांत लोळणाऱ्या गाढवाच्या सुखांत, गणितांत

# संस्कृति आणि प्रगति.

पशुपेक्षां मनुष्य श्रेष्ठ असें आपण म्हणतों, त्या वेळीं सर्व पशू सारखे व सर्व मानव सारखे असे आपल्या मनांत मुळींच नसतें. पशूमध्येंही आपण प्रतवारी लावतोंच. गाढव, टोणगा यांच्यापेक्षां घोडा, हत्ती व त्यांच्यापेक्षां वाघ, सिंह हे पशू आपण श्रेष्ठ समजतों. माणसांतही तसेंच आहे. निग्रोपेक्षां रेड इंडियन, त्याच्यापेक्षां चिनी व चिन्यापेक्षां युरोपी श्रेष्ठ अशी प्रतवारी लावली जाते. व्यक्तीव्यक्तीमध्येंसुद्धां आपण मनानें तुलना करीत असतों. चंगीझखानापेक्षां नेपोलियन व नेपोलियनपेक्षां शिवाजी श्रेष्ठ असें कांहीं लोक समजतात. व्यक्तीप्रमाणेंच राष्ट्राराष्ट्रामध्येंही श्रेष्ठकनिष्ठता लाविली जाते. कांहींच्या मतानें हिंदुस्थान, चीन हीं मागासलेलीं राष्ट्रें असून इंग्लंड, जर्मनी, अमेरिका आज श्रेष्ठ आहेत. पण उलट, इंग्लंडजर्मनीपेक्षां आजही हिंदुस्थान श्रेष्ठ आहे असें कांहींचें मत आहे. याहीपेक्षां मोठे विभाग करून पाश्चात्य संस्कृति श्रेष्ठ कीं पौर्वात्य असा वाद घातला जातो व त्यावरही उलट सुलट मतें आपण देतों व ऐकतों.

हा श्रेष्ठकनिष्ठतेचा रूढ झालेला विचार पाहिला म्हणजे असें पक्कें वाटूं लागतें कीं अमुक श्रेष्ठ व अमुक कनिष्ठ असें जो ठरवितो त्याच्याजवळ त्या श्रेष्ठकनिष्ठतेचें मोजमाप करतां येईल असें कांहीं तरी साधन खास असलें पाहिजे. तें साधन कोणचें व तेंच तूं कां वापरतोस असें विचारलें तर प्रत्येकाला सांगतां येईल असें नाहीं. पण प्रत्येकाच्या मनांत त्या वेळीं तें अस्पष्टपणें कां होईना ठरलेलें असलें पाहिजे यांत शंका नाहीं. पण हें साधन आपण तपासून पाहूं लागलों तर मात्र आपला गोंधळ उडून जातो. गाढवापेक्षां बैल श्रेष्ठ कां तर बैलाचा उपयोग जास्त म्हणून. म्हणजे येथें उपयुक्तता हें माप आहे. पण गाढवापेक्षां सिंह श्रेष्ठ असें म्हणतांना उपयुक्तता हें माप लावून बोलतो असें म्हणतां येईल काय? माणसामाणसांत श्रेष्ठकनिष्ठ ठरवितांना असेच प्रश्न निर्माण होतात. शेतकरी सर्व जगाला अन्न पुरवितो व कोष्टी वस्त्र देतो. पण शिरप्या किंवा काळ्या यांच्यापेक्षां कोणाचेंही पोट न भरणारे जे गंधर्व किंवा रविवर्मा त्यांना आपण श्रेष्ठ समजतो व त्यांचाच मानसन्मान करतो. शास्त्रज्ञांमध्यें सुद्धां धान्यासाठीं उत्तम खत शोधून काढून एका खंडीच्या जागीं दोन खंडी पिकवून देणाऱ्या संशोधकापेक्षां एका ताऱ्यावरचा

प्रकाशकिरण दुसऱ्या ताऱ्यावर जात असतांना एक दश कोट्यांश सेंटी मीटर वांकडा होतो कीं नाहीं हें सांगणारे आइन्स्टाइन् किंवा रामन् यांनाच लोक श्रेष्ठ समजतात. नूरजहानला श्रेष्ठ म्हणतांना जे माप असतें तें झाशीच्या लक्ष्मीबाईला श्रेष्ठ म्हणतांना नसतें. सीतेला ज्या कारणासाठीं आपण मान देतो, त्याच कारणासाठीं जिजाबाईला मानतों असें नाहीं. स्वार्थत्यागावर श्रेष्ठता ठरते असें म्हणावें तर रणांगणांत आत्मबलिदान करणाऱ्या कोणच्याही सैनिकापेक्षां शिवाजीला आपण श्रेष्ठ समजतो. पित्राज्ञा पालन करणारा रामचंद्र व तिचा भंग करणारा प्रल्हाद, मातेची पूजा करणारा पुंडलीक व तिची हत्या करूं पाहाणारा भरत, सत्यासाठीं राज्य घालविणारा हरिश्चंद्र व पावलोपावलीं त्याला हरताळ फासणारा व फासा म्हणून भर देणारा श्रीकृष्ण, या सगळ्यांना आपण श्रेष्ठच समजतो. हें सर्व लक्षांत घेतलें म्हणजे अमुक श्रेष्ठ व अमुक कनिष्ठ हें जरी चटकन् आपल्या मनांत येत असलें तरी त्या श्रेष्ठकनिष्ठतेची कारणमीमांसा करणें हें अत्यंत अवघड काम आहे हें ध्यानांत येईल.

संस्कृति व प्रगति यांच्या अर्थाबद्दल व अर्थ ठरल्यानंतर त्यांच्या इष्टानिष्टतेबद्दल पंडितांमध्यें जीं रणें माजून राहिलीं आहेत, त्यांच्या बुडाशीं श्रेष्ठकनिष्ठतेसंबंधीं वर सांगितलेली अनिश्चितता हीच आहे. कोणाला संस्कृत समजावें व कोणाला प्रगतिमान् समजावें व तसें समजल्यानंतर तें मोठेपणाचें लक्षण समजावें कीं अधःपाताचें, याही बाबतींत पंडितांचें एक मत नाहीं. एडवर्ड कार्पेंटरच्या मतें संस्कृति हा समाजाचा एक मोठा रोग आहे. व तो नाहींसा होईल तो सुदिन. संस्कृति म्हणजे काय हें मला समजत नाहीं असें हॅवेलॉक् एलिस यानें म्हटलें आहे. प्रोग्रेस ( प्रगति ) हा एक भ्रम आहे पण तो आवश्यक भ्रम आहे असें एकाचें मत आहे. यूरोपमधून येणाऱ्या लोकांखेरीज आफ्रिकेंत रानटी लोकच नाहींत असें ब्रिक् म्हणतो. आपल्या ज्ञानांत वाढ झाली असली तरी शक्ति किंवा बुद्धि या दृष्टीनें गेल्या चाळीस हजार वर्षांत मानवाची अणु इतकीसुद्धां प्रगति झाली नाहीं असें ऑसबॉर्न व इतर अनेक पंडित यांचें मत आहे. दया, प्रेम, सत्याचरण या दृष्टीनें चार हजार वर्षांपूर्वीच्या आपल्या पूर्वजांपेक्षां आपण कांकण भरही पुढें गेलेलों नाहीं असें डीन् इंग, अल्फ्रेड, रसेल वॅलेस् वगैरे पंडित म्हणतात. सुख हें माप धरलें तरी आगगाडी, विमान, टेलिफोन, सिनेमा इत्यादि साधनें असून मानवाचें सुख सुईच्या अग्राइतकेंही वाढलेलें नाहीं असें कित्येक म्हणतात. व कांहीं आणखी पुढें जाऊन म्हणतात कीं, खातेऱ्यांत लोळणाऱ्या गाढवाच्या सुखांत, गणितांत

मग्न होणाऱ्या न्यूटनच्या सुखांत व समाधी लावून ब्रह्मलीन होणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या सुखांत कांहीं फरक असेल असें आम्हांस वाटत नाहीं. व गाढवाच्या सुखाची तुम्हांला मुळींच जाणीव नसल्यामुळें तुम्हांला त्यांत कांहीं सांगण्याचा अधिकार नाहीं. याच्या उलट आजच्या मानवानें बुद्धीला प्रमाण मानून परमार्थाचा भ्रम झुगारून दिल्यामुळें तो फार सुखी झाला आहे, असेंही म्हणणारे लोक आहेत. हें सर्व पाहिलें म्हणजे आपल्या सामान्य बुद्धीचा मोठा गोंधळ उडून जातो. आपल्या स्थिर कल्पना पाचोळ्यासारख्या उडून गेल्यामुळें मनाला मोठा खेद होतो. व संस्कृति म्हणजे हे लोक म्हणतात तरी काय, असा प्रश्न उत्पन्न होतो.

त्यालाही उत्तर देण्याचा अनेकांनीं प्रयत्न केला आहे. कोणत्या समाजाला सुसंस्कृत म्हणावें असें विचारतांच ( १ ) ज्यांत माणुसकीची वाढ झाली आहे तो. [ अर्नोल्ड ] ( २ ) ज्यांत बुद्धीच्या विकासाला वाव आहे तो. [ मॉंटेस्क्यू ] ( ३ ) परिस्थितीशीं जमवून घेण्याची ज्यांत जास्त शक्ति आहे तो. ( ४ ) चिकित्सकबुद्धी व परमेश्वरी इच्छा यांना प्राधान्य देणारा. ( ५ ) विज्ञान व प्रेम यांच्या नेतृत्वानें चालणारा. [रसेल] ( ६ ) एकमेकांच्या फायद्यासाठीं ज्यांत लोक झटतात तो. ( ७ ) वासना मारून टाकून कर्मसंन्यासमार्गानें मोक्ष साधणारे लोक जास्त आहेत तो ( ८ ) कर्मयोग मार्गानें मोक्ष साधणारे ज्यांत जास्त आहेत तो; अशीं अनेक उत्तरें आपणांस पंडितांच्याकडून मिळतात. व पुन्हां मन गोंधळून जाऊन इतक्या भिन्न व्याख्या करण्याजोगीं अशीं काय भिन्न धोरणें यांनीं मनांत धरली होतीं, म्हणजे कोणच्या मापांनीं हे समाजाला मोजावयास प्रवृत्त झाले होते हा पहिलाच प्रश्न पुन्हां उभा राहातो.

अमुक व्यक्ति किंवा समाज श्रेष्ठ असें सांगतांना आपल्या मनांत जसें कांहीं माप असावें लागतें त्याचप्रमाणें अमकें राष्ट्र प्रगतिमान् आहे तमकें, मागासलेलें आहे असें म्हणतांना आपल्या मनांत कांहीं ध्येय ठरलेलें असावें लागते. तसें असलें म्हणजे त्या ध्येयापासून तें राष्ट्र किती मागें किंवा जवळ आहे, हें मोजून त्यावरून प्रगति किंवा परागति ही ठरवितां येईल. स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीची होणें ही रशियांत प्रगति समजतात तर जर्मनींत परागति समजतात. धर्म नाहींसा होत चालला तर रशियाला ती प्रगति वाटेल, तर हिंदुस्थानांत त्यालाच अधःपात म्हणतील. कारण दोघांचीं ध्येयें दिसावयास तरी भिन्न दिसत आहेत.

तेव्हां प्रथम अखिल मानवजातीचें ध्येय काय आहे, निरनिराळ्या समा-

जाचीं निरनिराळीं ध्येयें असतात किंवा काय, असल्यास त्या भिन्न पणांत कितपत अर्थ आहे, हें पाहून त्यावरून संस्कृति मोजण्याचें कांहीं माप सापडतें कीं काय तें ठरवून मग त्यावरून कोणचें राष्ट्र श्रेष्ठ व कोणचें कनिष्ठ हें ठरवावें लागेल. त्याचीच चर्चा प्रस्तुत निबंधांत करावयाची आहे.

सर्व मानवजातीचें सुख हें ध्येय आहे. सुखाच्या कल्पना व्यक्तिपरत्वें भिन्न होतात हें खरें. दुसऱ्याच्या देहाला आग लावून देऊन त्याच्या किंकाळ्या ऐकत बसण्यांत कांहींना सुख वाटतें, तर दुसऱ्याच्या किंकाळ्या थांबविण्यासाठीं स्वतःचा देह अग्नीला अर्पण करण्यांत कांहींना सुख वाटतें. सुखाच्या कल्पनांत जरी असें दोन ध्रुवाइतकें अंतर असलें तरी मानव जी कोणची क्रिया करीत असतो ती त्याच्या कल्पनेप्रमाणें सुख मिळविण्यासाठींच करीत असतो यांत शंका नाहीं. मजूर शेतांत राबतो, तो त्याला राबण्यांत सुख वाटतें म्हणून राबतो असा याचा अर्थ नव्हे. पण या राबण्यानें संध्याकाळीं भाकरी मिळेल, ही त्याला खात्री असते म्हणूनच तो राबतो हें निर्विवाद आहे. ती खात्री नाहींशी झाली तर तो काम करणार नाहीं. गुलाम अशाही स्थितींत काम करीत राहातो. भाकरी मिळेलच अशी त्याला खात्री नसते. पण येथेंही नीट विचार केला तर असें दिसेल कीं काम न केलें तर जे फटके बसतील, ते टाळण्यासाठीं म्हणजे एक प्रकारच्या सुखासाठींच तो काम करीत असतो. या प्रकाराला सुख म्हणणें विचित्र दिसेल. पण फटके खाणें ही स्थिति व काम करणें ही स्थिति यांत काम करणें ही स्थिति गुलामाला बरी वाटत असते. म्हणजे तो सुखासाठीं काम करतो असें जरी म्हटलें नाहीं तरी दुःख टाळण्यासाठीं करतो असें म्हणावेंच लागेल. या प्रकारच्या सुखाला दुःखाभावरूप सुख असें टिळकांनीं म्हटलें आहे. या अगदीं कनिष्ठ सुखापासून खाणेंपिणें, नाचरंग, वाचन, मनन, चिंतन अशा सुखाच्या श्रेष्ठ प्रती सुरू होतात. शारीरिक, मानसिक, व आध्यात्मिक असे सुखाचे तीन प्रकार आहेत. अध्यात्मिक आनंदाला सुख हें नांव देऊन धर्मानेंही सुख हेंच मानवजातीचें ध्येय आहे हें मान्य केलें आहे. इतकेंच नव्हे तर तेंच असावें असें सांगितलें आहे. शारीरिक सुखापेक्षां मानसिक व मानसिकांपेक्षां आध्यात्मिक सुख श्रेष्ठ असें जरी म्हटलें असलें तरी अंतिम ध्येय सुख, याबद्दल कोणाचाच वाद नाहीं. पुनःपुन्हा ही गोष्ट सांगण्याचा हेतु असा. कांहीं लोक धर्माच्या मतें सुख हें मानवाचें ध्येय नसून हित हें आहे असें म्हणतात. सुख व हित या शब्दांचा विचार केला तर पुढील फरक दिसून येतो. आज कष्ट करण्यांत तुला सुख वाटत नसलें तरी त्यांतच तुझें

हित आहे असें, आपण विद्यार्थ्याला म्हणतो. पण येथें हित याचा अर्थ उद्यांचें सुख एवढाच आहे. व सुख कीं हित असा वाद करणाऱ्यांच्या मनांत एवढाच फरक असेल तर अधिक ऊहापोह करण्याची जरूरी नाहीं. कारण मानसिक सुख मान्य करणाऱ्यांच्या मनांत आजचेंच सुख अभिप्रेत असणें शक्य नाहीं. अमुकच प्रकारचें सुख हें ध्येय असा आग्रह कोणीच धरीत नाहीं. तेव्हां धर्मानें सुख हेंच ध्येय मान्य केलें आहे असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. निःश्रेयस, हित, कल्याण या शब्दांनीं आध्यात्मिक सुख एवढेंच अभिप्रेत आहे, असें गीतारहस्यांत स्पष्ट म्हटलें आहे. ( पान ११६ )

आतां शारीरिक सुख सोडून आध्यात्मिक सुख म्हणजे मोक्ष तूं मिळव, असें सांगण्यांत धर्माचा काय हेतु आहे असा प्रश्न येतो. पण याचें उत्तर अगदीं सोपें आहे. तूं आतां भटक्या मारूं नको, अभ्यास करण्यांत तुला दुःख वाटत असलें तरी अभ्यासच कर; त्यानेंच तुला सुख मिळेल असें ज्या कारणासाठीं आपण विद्यार्थ्यास सांगतों त्याच कारणासाठीं ऐहिक सुख सोडून तूं मोक्षसुख मिळव असें धर्म सांगत असतो. आपल्या सांगण्याचें कारण उघड आहे. आतां तूं खेळलास तर तुला दहा मिनिटें सुख लागेल, पण अभ्यास केलास तर पुढील आयुष्यांत दहा वर्षें सुखाचीं जातील, असा आपल्या सांगण्यांतील आशय असतो. म्हणजे अल्पकाल टिकणारें सुख सोडून देऊन दीर्घ काल टिकणारे सुख तूं घे एवढेंच आपण म्हणत असतों. समाजाच्या दृष्टीनें याचें बरे-वाईटपण आपण पुढें पाहाणारच आहों. पण येथें येवढें स्पष्ट दिसतें कीं सुखाच्या ऱ्हस्व दीर्घत्वावरच आपला उपदेश अवलंबून असतो. शारीरिक सुखापेक्षां मानसिक सुख श्रेष्ठ म्हणतात त्याचें कारण हेंच आहे. सामाजिक दृष्टीनें त्याची आणखीहि कांहीं कारणें आहेत. पण व्यक्तीच्या दृष्टीनें पाहिलें तर शारीरिक सुखापेक्षां मानसिक सुख श्रेष्ठ असें म्हणण्याचें कारण इतकेंच कीं तें दीर्घकाल टिकतें. व त्याचा आरोग्यावर वाईट परिणाम होत नाहीं. आहार, निद्रा, मैथुन या सुखांचें सुखत्व फारच थोड्या काळांत नष्ट होतें. गोड खाण्याचा कंटाळा आपणास अर्ध्या तासाच्या आंतच येतो. निद्रा ही विश्रांति पुरी झाल्यावर सुखद होऊं शकत नाहीं. पण मानसिक सुखाचें तसें नाहीं. वाचन, लेखन, सृष्टीच्या नियमांचा अभ्यास, गूढ प्रश्नावर चिंतन यांचा आनंद, ज्याला त्याची गोडी लागली आहे,तो मनुष्य वर्षानुवर्षें अखंड घेऊं शकतो. शारीर सुखाची मर्यादा थोडी जरी ओलांडली तरी व्याधी जडतात. ती भीति मानसिक सुखांत नाहीं. शारीरिक सुखाच्या मानानें मानसिक सुख भोगण्याची आपल्या ठायीं असलेली शक्ति अमर्याद आहे असें म्हटलें तरी चालेल.

आणि म्हणूनच तें सुख श्रेष्ठ असें आपण म्हणतों. धर्माची पायरी याच्या पुढची आहे. ब्रह्मांत विलीन झालास म्हणजे तुला कायमचें सुख, शाश्वत सुख मिळेल एवढेंच धर्माला सांगावयाचें आहे. आणि तें खरें असेल तर व्यक्तीच्या दृष्टीनें मोक्ष हें परमोच्च साध्य होय यांत शंका नाहीं. आणि म्हणूनच मोक्षसुख किंवा आध्यात्मिक सुख असें ज्याला म्हणतात त्याचें स्वरूप काय आहे, व त्याच्याही अगोदर तसा कांहीं प्रकार शक्य आहे, कां तो उगीचच एक भ्रम आहे, याचा विचार आपणास केला पाहिजे.

हें जग सोडून, जिवलगांचें संबंध तोडूनही तुम्ही मोक्षाच्या मागें लागा, असें जेव्हां धर्म सांगतो, तेव्हां त्यामुळें तुम्हाला कायमचें सुख प्राप्त होईल असें आश्वासन तो देत असतो. पण मोक्षाच्या स्वरूपाचें जें वर्णन करण्यांत येतें तें पाहिलें तर तें ' मला सुख मिळावें ' हा जो मानवाचा हेतू व ' तुला सुख मिळेल ' हें जें धर्माचें आश्वासन त्यांशीं अगदीं विसंगत आहे असें ध्यानांत येईल. मनुष्य म्हणतो ' मला सुख पाहिजे ' धर्म म्हणतो हें मला मान्य आहे. आणि येवढ्यासाठींच अत्यंत श्रेष्ठ व कायम टिकणारें सुख मिळविण्याचा मार्ग मी तुला सांगतों. तो कोणचा ? तर ' तूं नाहींसें होणें ' हा. मोक्ष म्हणजे दुसरें काय आहे ? आत्मा ब्रह्मांत विलीन करून टाकावयाचा. देह तर सोडावयाचाच; पण मी ही जाणीवही नष्ट करून टाकावयाची. आणि मी ही भावनाच नष्ट करून टाकल्यानंतर, म्हणजे देह व आत्मा या दोन्ही दृष्टीनें ' मी ' निखालस नाहींसा झाल्यानंतर ' मला ' सुख मिळणार आहे असें धर्म सांगतो. मोक्ष जरी क्षणभर खरा मानला तरी ही सुखाची कल्पना मोठी अजब वाटते. सुख भोगणाराच नाहींसा झाला, म्हणजे त्याला सुख लागेल असें हें उत्तर आहे. आकाशांतल्या ताऱ्याकडे पहाण्यांत आपण दंग होऊन गेलों असलों, किंवा गायनाच्या लकेरींनीं आनंदून गेलों असलों तर त्यावेळीं क्षणभर देहभान विसरतों ( असें म्हणतात ). पण त्या क्षणीं मी हें सुख अनुभवीत आहे, ही जाणीव स्पष्ट असते. आणि म्हणूनच तसलें सुख तूं घे असें कोणीं सांगितलें तर त्यांत कांहीं विचित्र वाटत नाहीं. मला सुख हवें असें जेव्हां मी म्हणतों तेव्हां इतराहून निराळें असें जें माझें व्यक्तित्व तें ठेवूनच, म्हणजे देह, आत्मा व मन हें निराळें ठेवूनच मला सुख हवें असा माझ्या म्हणण्याचा आशय असतो. पण हें व्यक्तित्वच तूं नाहींसें कर म्हणजे तुला ( ? ) सुख लागेल असें धर्म सांगतो. धर्माचें हें सुख माझ्या देहालाही नाहीं, मनालाही नाहीं व आत्म्याला तर मुतराम् नाहीं. कारण तो पूर्ण विलीन झाला, निराळेपणा अगदीं नाहींसा झाला म्हणजेच

मोक्षसुखाला सुरवात होत असते. यातना असह्य झाल्या म्हणजे मनुष्य आत्महत्या करतो, त्यांत जी प्रवृत्ति असते तीच मोक्षांत आहे. आत्महत्या केली तरी देहच फक्त जातो, आत्मा तसाच रहातो अशी कोणाची तरी कल्पना झाल्यामुळें तोही नाहींसा करून टाकण्याची युक्ति त्यानें सांगितली. व ती म्हणजेच मोक्ष होय. मोक्ष हा आत्यंतिक नाश आहे. त्याखेरीज दुसरें कांहीं नाहीं. बुद्धाचें निर्वाण म्हणजे हेंच. आणि भाषेंत थोडाफार फरक केला तरी तेवढ्यावरून मोक्ष, निर्वाण व आत्यंतिक नाश यांत फरक आहे असें म्हणतां येणार नाहीं. पूर्ण नाशाहून मोक्षस्थिति कांहीं निराळी आहे, असें सिद्ध करण्यासाठीं कांहीं साधुपुरुषांचे ब्राह्मी स्थितीचे अनुभव सांगितले जातात. पण एक तर हे अनुभव सर्वांचे सारखे नसतात. व ती स्थिति म्हणजेच मोक्ष असें म्हणण्यास कांहींच पुरावा नाहीं. समाधींतून परत आल्यानंतर त्या स्थितीची आठवण राहाते व त्यावरून ती स्थिति नाशापेक्षां निराळी आहे हें जाणतां येते हें जरी क्षणभर कबूल केलें तरी साध्या माणसाच्या मृत्यूनंतर त्याला प्राप्त होणारी अवस्था व या समाधिवाल्याच्या मृत्यूनंतर त्याला प्राप्त होणारी अवस्था या भिन्न आहेत हें म्हणण्यास आधार काय ? तसा आधार कांहींच नाहीं. त्यामुळें मला यातना होत असल्या तर अफू घेऊन 'मी' ही जाणीव नष्ट करून त्या थांबविणें यानें जें सुख होतें, त्याच जातीचें सुख म्हणजे अभावरूप सुख हेंच मोक्षानें मिळतें इतकेंच फार तर म्हणतां येईल. पण हें सुख अगदींच हीन दर्जाचें आहे असें आपण आरंभींच पाहिलें आहे.

मोक्षासंबंधीं दुसरा एक गैरसमज करून देण्याची चाल आहे. मोक्ष हें सुख नुसतें दीर्घकाल टिकणारं आहे एवढेंच नव्हे तर तें अत्यंत उत्कट, अगदीं अलौकिक आपल्याला कल्पनाही करतां येणार नाहीं इतकें अलौकिक आहे, इतर सुखें त्याच्या पुढें पासंगालाही पुरणार नाहींत असें वर्णन धार्मिक ग्रंथांतून केलेलें असतें. पण मोक्षसुखाची कल्पना प्रथम ज्यांनीं सांगितली त्या उपनिषदांत या सुखाचें जें वर्णन आहे, त्यावरून या सर्व कल्पना फोल आहेत असें दिसून येईल. छांदोग्य उपनिषदाच्या मतें गाढ निद्रेचें सुख व मोक्षसुख यांत कांहींच फरक नाहीं. गाढ निद्रेंत जीव हा निजस्वरूपांत विलीन होत असतो 'सता सौम्य तदा संपन्नो भवति' असें गाढ झोपेचें वर्णन केलेलें आहे. ( छां. ६–८–१ ) म्हणजे हें मोक्षसुख प्रत्येक मनुष्य निदान कष्टाळू मनुष्य तरी रोज पांच सहा तास अनुभवीत असतो असें उपनिषदाचें मत आहे. शंकराचार्य व विद्यारण्य यांनींही हें मत मान्य केलें आहे. वरील भागावरील आचार्यांचें भाष्य असें आहे. " मनसि प्रविष्टं मन आदि संसर्ग-

कृतं जीवरूपं परित्यज्य, स्वं सद्रूपं यत् परमार्थसत्यमपीतोऽपिगतो भवति ' ।
पंचदशीमध्यें विद्यारण्यांनीं तर याहीपेक्षां स्पष्ट वर्णन केलें आहे.

**तच्छ्रमस्यापनुत्त्यर्थं जीवो धावेत् परात्मनि ।**
**तेनैक्यं प्राप्य तत्रत्यो ब्रह्मानंदः स्वयं भवेत् ॥** ११-४५

पंचदशीच्या पुढच्या दोन तीन श्लोकांत व त्याचप्रमाणें बृहदारण्यकोपनिषदांतही वाटेल ते शब्द खर्चून, अतिशयोक्ति होईल इतकें या सुखाचें वर्णन केलें आहे. आतां या आचार्यांच्या व श्रुतींतील वचनान्वयें मोक्ष व गाढ निद्रा यांच्या सुखांत जर काडीमात्रही फरक नसेल तर मोक्षाची जी भरंनसाट वर्णनें आपण वाचतों, तीं सर्व अलंकारिक आहेत, असें म्हणण्यावांचून गत्यंतरच नाहीं. उपनिषदांतही मोक्षसुखाची विलक्षण वर्णनें सांपडतात. पण झोपेच्या सुखाचींही तसलींच वर्णनें आहेत. आणि तें कांहीं असलें तरी गाढ झोपेचें सुख व मोक्ष यांत फक्त ऱ्हस्वदीर्घत्वाचाच जर फरक असेल तर त्या अलंकारिक बेफाम वर्णनांचा कांहीं एक उपयोग नाहीं. आणि मग मोक्षसुखाची ज्याला गोडी लागली त्याला इतर सुखें तुच्छ वाटूं लागतात, त्या सुखावरून इतर सुखें ओवाळून टाकावींशीं वाटतात, या म्हणण्यांत कांहींच अर्थ उरत नाहीं. कारण प्रत्येकाला हें सुख रोज अनुभवावयास मिळत असूनही त्याला इतर सुखें हवींशीं वाटतातच. इतकेंच नव्हे तर हें परम सुख टाकून देऊन कित्येक मानव नाचरंगांत तो काळ घालवितात. व कित्येक पंडितही हें सुख सोडून वाचनमननांत रात्रींच्या रात्रीं घालवतात. त्यावरून हें सुख अडाण्यांना तर नाहींच पण पंडितांनाही मोठेंसें लोभनीय वाटतें असें नाहीं. यावरून मग असा विचार डोकावतो कीं व्यभिचार, नाचरंग, दारू यासारखीं वाटेल तीं कृत्यें करूनही मनुष्य जर बेफिकीर राहील व खूप शारीरिक कष्ट करील तर त्याला रोज ब्रह्मसुख मिळण्यास मुळींच पंचाईत पडणार नाहीं. आणि त्यालाही हें सुख मिळणार असेल तर मोक्षासाठीं तपश्चर्या करण्याचें कारणच नाहीं. वार्धक्य आलें कीं कांहीं तरी युक्ति करून झोपेंतच प्राण जाण्याची व्यवस्था केली म्हणजे झालें. किंबहुना रोजच्या या महापुण्याच्या संचयामुळें आपोआपच तसें घडून यावयास हरकत नाहीं.

आध्यात्मिक सुख हें अशा तऱ्हेनें अगदीं भ्रामक, हीन दर्जाचें व अलोभनीय ठरल्यानंतर आपल्यापुढें दोन प्रकारचींच सुखें राहिलीं. शारीरिक व मानसिक. त्यांतलें मानसिक सुख हें दीर्घकाल अनुभवतां येणें शक्य असल्यामुळें शारीरिक सुखापेक्षां श्रेष्ठ आहे असें आपण पाहिलें. येथें एक गोष्ट पुनःपुन्हां नजरेस आणावीशी

वाटते कीं शारीरिकांपेक्षां मानसिक व मानसिकांपेक्षां आध्यात्मिक सुख श्रेष्ठ ही जी प्रतवारी लाविली जाते तिच्या बुडाशीं कालाच्या अल्पदीर्घत्वावांचून दुसरें कांहींहीं नाहीं. म्हणजे सुखासुखांत कमीअधीक तीव्रता नसते असा याचा अर्थ नाहीं. एक शारीरिक सुख दुसऱ्या शारीरिक सुखापेक्षां श्रेष्ठ असूं शकतें. व तेंच मानसिक सुखाच्या बावतींतही असूं शकेल. पण उत्कट शारीरिक सुखापेक्षां उत्कट मानसिक सुख तीव्रतेच्या, लज्जतीच्या दृष्टीनें श्रेष्ठ असतें असें म्हणतां येणार नाहीं. एक टाकून दुसरें घ्यावयाचें तें केवळ दीर्घकाल टिकतें एवढ्याचसाठीं. श्रीखंड खाणें, सुंदर युवतीचा नाच पाहाणें किंवा मद्य पिऊन वेहोष होणें हीं सुखें वाटेल तितका दीर्घकाल अनुभवणें जर शक्य असतें, शरीराला व्याधी जडून त्यांना जर मर्यादा पडल्या नसत्या, तर धर्मानें त्यांचा निषेध केव्हांच केला नसता. कारण दीर्घकाल सुख मिळवून देणें एवढेंच धर्माचें साध्य आहे. मोक्षसुख, गाढ निद्रेचें सुख व स्त्रीसंगाचें सुख यांची तीव्रता उपनिषत्कारांच्या मतें एकच आहे. प्रिय स्त्रीशीं संपरिष्वक्त झाल्यावर पुरुषाला बाह्यांतर भान जसें राहात नाहीं, त्याचप्रमाणें- एवमेव अयं पुरुषः प्राज्ञेन आत्मना संपरिष्वक्तो न बाह्यं किंचन वेद नान्तरम् ।— त्या स्थितींतही बाह्यांतर भान नसतें असें बृहदारण्यकोपनिषदांत म्हटलें आहे. (४।३।२१). पण तीव्रता तीच असली तरी शारीरिक सुख फार मर्यादित आहे, म्हणून धर्मशास्त्र त्याचा निषेध करतें.

व्यक्तीच्या दृष्टीनें विचार केला तर सुख हेंच मानवाचें ध्येय आहे आणि शारीरिक सुखापेक्षां मानसिक सुख श्रेष्ठ असल्यामुळें तें प्राप्त करून घेण्यासाठीं त्यानें झटणें हें युक्त आहे असें आपण पाहिलें. आतां समाजाच्या दृष्टीनें विचार करून त्या दृष्टीनेंही हेंच ध्येय ठरतें कीं काय व ठरत असल्यास तेथें सुखाची श्रेष्ठकनिष्ठता कशावरून ठरते तें आपणांस पहावयाचें आहे.

सुख हें व्यक्तीचें ध्येय म्हणून एकदां मान्य केल्यानंतर समाजाचेंही ध्येय तेंच असलें पाहिजे हें अमान्य करतां येणार नाहीं. कारण अनेक व्यक्ती एकत्र येणें याचेंच नांव समाज. व्यक्ती काढून टाकल्या तर समाज म्हणून स्वतंत्र कांहींच उरत नाहीं. सर्व व्यक्तींना दुःख होत असतांना समाजाला मात्र सुख होईल किंवा दुःख होणार नाहीं, हें शक्य नाहीं. म्हणून व्यक्तींना सुख मिळवून देणें हेंच समाजाचें ध्येय असावयास पाहिजे. मात्र एका व्यक्तीचें सुख हें समाजाचें ध्येय न राहातां सर्व व्यक्तींचें सुख, व तें शक्य नसेल तर जास्तींत जास्त व्यक्तींचें सुख हें समाजाचें ध्येय राहील. मानवप्राणी हा इतका दुर्बल आहे कीं समाजाशिवाय म्हणजे

अनेक व्यक्ती एकत्र राहिल्याशिवाय त्याचें जीवनच अशक्य आहे म्हणून समाज टिकवून धरणें हें समाजांतील व्यक्तींचें सर्वांत श्रेष्ठ कर्तव्य होय. दुसरें कोणचेंही सुख समाजाकडून व्यक्तीला मिळालें नाहीं, तरी प्राणरक्षणाचें सुख मिळालेंच पाहिजे. कारण त्यासाठींच त्याचें अस्तित्व आहे. तेव्हां जास्तींत जास्त व्यक्तींना जास्तींत जास्त सुख देणें हें ध्येय, समाज संघटित राखणें हें पुण्य व तो फुटून जाईल असें कोणचेंही कृत्य करणें हें पाप, या तीन गोष्टी मनांत बाळगल्या तर कोणच्याही श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या किंवा नीति–अनीतीच्या प्रश्नांचा सहज उलगडा होईल.

पण हा उलगडा कसा होतो हें पाहण्याच्या आधीं जास्तींत जास्त व्यक्तींचें सुख हें जें आपण समाजाचें ध्येय ठरविलें त्यावर जे अनेक आक्षेप घेतले जातात त्यांचा विचार करणें अवश्य आहे. या ध्येयावर पहिला आक्षेप असा कीं संख्येवर जर आपण नीति अनीति ठरवूं लागलों तर मोठा गोंधळ उडून जाईल. समजा दहा माणसांनीं कट करून एका निरपराधी माणसाला मारलें, तर बहुसंख्यांचें सुख या तत्त्वा–अन्वयें आपणांस त्या दहा लोकांना शिक्षा करतां येणार नाहीं. कारण शिक्षा केली तर दहांना दुःख होईल व नाहीं केली तर एकाचेंच नुकसान होईल. पण हा आक्षेप बरोबर नाहीं. कारण समाज त्या दहा व्यक्तींना जेव्हां शिक्षा करतो तेव्हां त्याची विचारसरणी पुढीलप्रमाणें असते. या दहांना जर शिक्षा केली नाहीं तर खून करण्यांत कांहीं वाईट नाहीं असा इतरांचा समज होईल. व कोणीही मनुष्य एकट्याच्या फायद्यासाठीं दुसऱ्याचा खून करील. यावरून यांना जर शिक्षा केली नाहीं, तर अनेकांचें जीवित धोक्यांत येईल हें स्पष्ट आहे. म्हणजे येथें दहांचें सुख विरुद्ध एकाचें सुखः असा प्रश्न नसून. दहांचें सुख व सर्व समाजाचें सुख असा हा प्रश्न आहे. आणि म्हणूनच त्या दहांना शिक्षा करणें युक्त आहे. न्याय, सत्य, हीं जीं समाजधारणेचीं तत्त्वें आहेत त्या कोणच्याही तत्त्वासाठीं समाज वाटेल तितक्या माणसांचे बळी घेण्यास मागेपुढें पहात नाहीं, याचें कारण हेंच आहे. तत्त्वें कांहीं उगीच अस्तित्वांत येत नाहींत. सर्व व्यक्तींच्या रक्षणासाठीं म्हणजे समाजधारणे-साठीं अमुक एक प्रकारचें आचरण युक्त आहे, असें अनुभवा–अंतीं ठरल्यानंतर त्या अनुभवावरून सिद्धान्त काढून समाज त्याला अढळ असें तत्त्वरूप देऊन टाकतो. व मग तें तत्त्व पाळणारा एक मनुष्य व मोडणारीं हजार माणसें असलीं तरी समाज एकाचीच बाजू घेईल व हजारांना शिक्षा करील व जरूर तर ठारही मारील. कारण तें अमूर्त तत्त्व याचा अर्थ लाखो जणांचें किंबहुना सर्व समाजाचें सुख असा आहे. आतां पुष्कळ वेळां त्या तत्त्वांतील तत्त्वपणा म्हणजे अनेकांना सुख देण्याचें सामर्थ्य

नाहींसें झालेलें असतें. तरी पण समाज तें आंधळेपणानें तसेंच मानीत असतो. व त्याच्या भंगासाठीं लोकांना शिक्षा करीत असतो. पण मानवी ज्ञानाला मर्यादा असल्यामुळें हें व्हावयाचेंच. मोठ्या समाजसुधारकाची जरूर असते ती याच वेळीं. तत्त्व ही समाजाची मोठी शक्ति आहे. ती आपणावरच उलटली आहे हें अगोदर पुष्कळांच्या ध्यानांत येत नाहीं. कारण समाजरचनेचा अभ्यास प्रत्येक जण करीत नसतो. कांहींच्या तें ध्यानांत येतें. पण हें कुजलेलें तत्त्व उलथून टाकण्याचें सामर्थ्य त्यांना नसतें. तें सामर्थ्य क्वचित् एखाद्या महापुरुषाच्या अंगीं असते तो त्यावेळीं समाजाचा नेता बनतो व नवीन तत्त्वें सांगून समाजाची घडी बसवून देतो. पण कोणचेंही तत्त्व पाहिलें तरी त्याच्या बुडाशीं अनेकांचें सुख ही एकच गोष्ट आपणास दिसून येते. व त्यामुळें लाखो दुर्जन व एक सज्जन यांत संख्याधिक्यावरून लाखो दुर्जनांचें हित केलें पाहिजे ही आपत्ति येत नाहीं. म्हणजे यावरून जास्तींत जास्त लोकांचें सुख या ध्येयाअन्वयेंही दहांना शिक्षा करणें युक्त असाच निकाल होतो.

हें ध्येय मान्य केलें तर त्या समाजांत कर्त्याच्या सदअसद् बुद्धीचा विचार होत नाहीं, केवळ परिणामावरूनच निर्णय द्यावा लागतो, असा आणखी एक आक्षेप घेण्यांत येतो. सार्वजनिक काम करणारे लोक पुष्कळ वेळां पैसे खातात. समजा पन्नास लाख रुपये जमवून एकाद्यानें महाराष्ट्र विद्यापीठ स्थापलें. पण तसें करतांना दोन तीन लाख रुपये खाल्ले, तर यावर आक्षेपकांचें म्हणणें असें कीं विद्यापीठामुळें पुष्कळांना पुष्कळ सुख झालें आहे, तेव्हां तसें करतांना त्या संस्थापकानें पैसे खाल्ले तर तुम्हांला त्याला शिक्षा करतां येणार नाहीं. पण मला वाटतें असें म्हणण्याचें कांहींच कारण नाहीं. तत्त्व म्हणजे बहुसंख्याकांचें सुख हें जर ध्यानांत ठेवलें, तर हा प्रश्न उद्भवणारच नाहीं. परक्याच्या धनाचा अन्यायानें अपहार करणें हें वाईट आहे कारण त्यामुळें समाजाच्या अस्तित्वावरच गदा येते असें समाजानें एकदां ठरविलें आहे. त्यामुळें विद्यापीठ स्थापलें व सर्व महाराष्ट्रीयांचें कल्याण साधलें हें जरी खरें असलें तरी तसें करतांनाही पैसे खाऊं नये या दुसऱ्या कल्याणकारक तत्त्वावर जर त्यानें घाला घातला तर तें निंद्यच होय. कारण तत्त्वावर घाला म्हणजे समाजाच्या सुखावर घाला हें समीकरण ठरून गेलें आहे. आतां फार मोठें कार्य केल्यामुळें समाज कदाचित् तो गुन्हा क्षम्य मानील, हें निराळें. पण तो गुन्हा आहे यांत शंकाच नाहीं. म्हणजे पुष्कळांचें पुष्कळ सुख या ध्येयाअन्वयेंही कर्त्याच्या बुद्धीला महत्त्व द्यावेंच लागतें. कारण तो आपलें कार्य करतांना समाजाच्या मूलतत्त्वांना म्हणजेच बहुतांच्या सुखाला मान देतो कीं नाहीं हें पाहावें

लागतें. दहा हजार शिलकेपैकीं पांचशें रुपये देणारा व शंभरापैकीं शंभर रुपये देणारा यांत बहुतांचें सुख या ध्येयाप्रमाणें दुसराच श्रेष्ठ ठरेल. कारण इतरांना मदत करण्याची प्रवृत्ति हें तर समाजाचें जीवन होय. त्यामुळें समाज जास्त सुसंघटित होतो. तेव्हां ती प्रवृत्ति ज्यानें जास्त दाखविली तो श्रेष्ठ व ज्यानें कमी दाखविली तो कनिष्ठ. आतां दहा हजार मिळवून पांचशे देणें यांत एवढे पैसे मिळविणें हें एक प्रकारचें सामर्थ्य आहेच. व त्यासाठीं त्या गृहस्थाला मान मिळेल यांत शंकाच नाहीं. पण समाजाला दुसऱ्या प्रकारची प्रवृत्ति जास्त उपयुक्त आहे. कारण प्रत्यक्ष पांचशे रुपयांनीं जें सुख होणार, त्यापेक्षां त्या प्रवृत्तीनें अंतीं जास्त होणार आहे. म्हणून समाज तिला जास्त मान देतो.

या पंथावर आणखी एक फारच मोठा आक्षेप येतो. तो असा कीं यांत ' मी दुसऱ्याच्या हितासाठीं कां झटावें ? ' या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मिळत नाहीं. व्यक्तीचें सुख हेंच ध्येय असेल तर प्रसंगीं समाजाचें नुकसान करूनही मी आपलें हित कां साधूं नये, असा जर कोणी प्रश्न विचारील तर त्याला उत्तर देण्यास पंचाईत येईल असें कोणी म्हणतात. पण ही अडचण खरी नाहीं. जगण्याची इच्छा प्रत्येकाला आहे, व समाजावाचून जगणें अशक्य आहे, म्हणून समाजधारणेसाठीं झटण्यांत आपण पर्यायानें आपल्याच हितासाठीं झटत असतों, हें जर प्रत्येकाच्या ध्यानांत आणून दिलें तर सुबुद्ध माणसाला दुसरें उत्तर नको आहे. आतां प्रत्येकाला हें कळणें शक्य नाहीं, इतरांचें सुख कशांत आहे हें नेहमीं ठरविणें कठिण असतें- आणि थोड्या लोकांना कळलें तरी बहुसंख्यांना कळणार नाहीं इत्यादि जे आक्षेप आहेत ते धार्मिक तत्त्वावर उभारलेल्या समाजाला जसेच्या तसे लागू करतां येतील. म्हणजे कोणचेंही तत्त्व घेतलें तरी या अडचणी कधींच सुटत नसतात. पण याही- पेक्षां पुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं, धार्मिक तत्त्वावर उभारलेल्या समाजावरच संख्याबाहुल्यावर निकाल करावयाची पुष्कळ वेळां पाळी येते. श्रुतिस्मृतीवरून धर्म समजत नाहीं, कोणा ऋषीचें वचन प्रमाण धरावें याचा निश्चय होत नाहीं, मला तर धर्मतत्त्व समजत नाहीं, तेव्हां आतां महाजनो ( बहुसंख्य लोक ) येन गतः स पंथाः । असा निकाल कांहीं लोकांनीं केलेला दिसतो. तेव्हां पुष्कळांचें पुष्कळ सुख या तत्त्वा-अन्वयें नीतिनिर्णय केला तर कांहीं विक्षिप्तपणा पदरीं येतो. असें मुळींच दिसत नाहीं. उलट मी दुसऱ्यासाठीं कां झटावें याचें वेदान्तानें जें उत्तर दिलें आहे तेंच फसवें आहे. जें पिंडीं तेंच ब्रह्मांडीं आहे, म्हणजे तूं व दुसरा मनुष्य दोघे मूलतः एकच आहां व म्हणून त्याचें कल्याण तेंच तुझें कल्याण हें उघड

असल्यामुळें तूं स्वतः इतकेंच दुसऱ्यासाठीं श्रम कर असें धर्म सांगतो. पण एक तर हें तत्त्व किती लोकांना पटेल याची शंका आहे. आणि दुसरे म्हणजे मी व दुसरा मनुष्य एक म्हणून मी त्याच्या सुखासाठीं झटणें हें जसें युक्त तसेंच त्याच्या श्रमावर मी जगणें व त्याच्या धनाचा मी अपहार करणें हेंही युक्त ठरूं लागेल. कारण आम्ही दोघे एकच. तेव्हां बहुसंख्यांचें सुख या तत्त्वाचा बोध न होणें, लोकांनीं त्याचा दुरुपयोग करणें हें जितकें शक्य आहे तितकेंच 'मी तसा दुसरा' या आत्मौपम्य बुद्धीचा बोध न होणें, तिचा लोकांनीं दुरुपयोग करणें हें शक्य आहे. वेदान्तातील आत्मौपम्य बुद्धीच्या बाजूनें असा एकही आक्षेप या पंथावर घेतां येणार नाहीं कीं जो तिच्यावर तितक्याच जोरांत परत फिरणार नाहीं. आणि शिवाय या पंथांत इतरही अनेक गुण आहेत. म्हणून कोणत्याही समाजांत बहुसंख्यांचें जास्तींत जास्त सुख हेंच ध्येय असावयास पाहिजे आणि नीति, अनीति व श्रेष्ठकनिष्ठता यावरूनच ठरविली पाहिजे हें मत मान्य करावयास हरकत नाहीं असें वाटतें.

पुष्कळांचें पुष्कळ सुख या तत्त्वावरच्या ज्या आक्षेपांचा उल्लेख वर केला आहे ते सर्व ठिकाणीं गीतारहस्यांत उद्भावित केलेले आक्षेप आहेत. माझ्या अल्प मतीप्रमाणें त्यांचें जें निरसन मला करतां आलें, तें त्या महाभागाच्या पायाशीं सादर करून पुढील विवेचनास आरंभ करतो.

बहुसंख्यांचें सुख हें ध्येय ठेवूनहि समाजाला मानसिक सुख हेंच श्रेष्ठ कां मानावें लागतें हें आपणांस आतां पहावयाचें आहे. प्रत्येक मनुष्य नेहमींच पराकाष्ठेचें शारीरिक सुख भोगीन असें म्हणूं लागला, तर तें त्याला शक्य नाहीं असें आपण पाहिलें. पण जितकें शक्य तितकें भोगावयाचें असा जरी त्यानें विचार केला तरी समाजाचें त्यांत नुकसान आहे असें दिसेल. शारीरिक सुखाची स्थितीच अशी आहे कीं, एक मनुष्य जों जों जास्त सुख भोगूं लागतो, तों तों दुसऱ्याच्या सुखावर तो आक्रमण करूं लागतो. अन्न व वस्त्र ही जी माणसाची अगदीं कमींत कमी गरज त्या बाबतींतहि असें दिसतें कीं, जाडीभरडी पण पोटभर भाकरी प्रत्येकाला मिळालीच पाहिजे अशी व्यवस्था समाजाला करतां येत नाहीं. आहे त्या अन्नाची वाटणी सारखी केली तर तें सर्वांना पुरेल असें गृहीत धरलें तरी तें अगदीं जेमतेम पुरेल इतकेंच फार तर म्हणतां येईल. मग एकाच माणसानें जास्त वाटा मिळविण्याचा प्रयत्न केला तर त्याला दुसऱ्याच्या तोंडचा घास काढूनच तसें करावें लागेल हें उघड आहे. अन्नवस्त्राची ही गोष्ट. मग इतर चैनीच्या वस्तूंबद्दल बोलावयासच नको.

(५१) ४८००

मानसिक सुखाची स्थिति याच्याबरोबर उलट आहे. एक मनुष्य शारीरिक सुख जों जों जास्त घेईल तों तों दुसऱ्यांना दुःख होतें, पण मानसिक सुख तो जसजसा जास्त घेऊं लागेल तसतसा दुसऱ्यांच्या सुखाला तो कारणभूत होतो. एकाच्या मानसिक सुखानें दुसऱ्याला त्रास कधींच होत नाहीं असें म्हणण्याचा मुळींच हेतु नाहीं. सत्ता चालविणें, दुसऱ्याची टवाळी करणें अशी कांहीं अधम मानसिक सुखेंहि आहेत. पण अशींहि कांहीं मानसिक सुखें आहेत कीं, ज्यांत स्वतःच्या सुखाबरोबरच अनेक जनांचें सुख साधतां येतें, व शारीरिक सुखें तशीं मुळींच नाहींत इतकेंच सांगावयाचें आहे.

उत्तम चित्र काढणें, उत्तम नाटक किंवा कादंबरी लिहिणें, हीं मानसिक सुखें आहेत. आणि या सुखांचें स्वरूप न्याहाळलें तर असें दिसतें कीं हीं कामें करणारा स्वतः तर सुख अनुभवतोच; पण शिवाय इतरांनाहीं सुख मिळण्याची कायमची व्यवस्था करून ठेवतो. आणि यामुळेंच समाज आपल्या जवळची जी अत्यंत श्रेष्ठ देणगी म्हणजे कीर्ति ती त्या माणसांना देऊन कलाकौशल्याची वाढ करण्यास त्यांना उत्तेजन देतो. कीर्ति हें अत्यंत लोभनीय मानसिक सुख आहे. कीर्तिवरची माणसाची भक्ति ओळखून समाजानें तिचा फार सुंदर उपयोग केला आहे. शारीरिक सुख कमी करून माणसानें चंदनासारखें दुसऱ्यासाठीं झिजावें व त्याचा मोबदला म्हणून समाजानें त्याची स्तुति करावी अशी ही रचना आहे. यांत दोघांचेंहि हित आहे. माणसें दुसऱ्यासाठीं झटूं लागलीं कीं समाज स्थिर होतो. आणि माणसालाहि श्रेष्ठ सुख मिळतें. त्यामुळें कीर्तीचा अभिलाष समाजांत जितका जास्त निर्माण होईल तितका तो जास्त सुदृढ म्हणजेच प्रगतिमान् समजला पाहिजे.

शारीरिक व मानसिक सुखांत दोन ध्रुवाइतकें असणारें हें अंतर समाजाच्या फार फायद्याचें झालें आहे. अगदीं कनिष्ठ शारीरिक सुखाचा नियमच हा कीं तें एकानें भोगलें कीं दुसऱ्याच्या आड येतें. पण मानसिक सुखाची अगदीं अल्प जरी भेसळ केली तरी त्यांतलि हा दोष कमी होऊं लागतो. गायन, सिनेमा इत्यादि जी अर्धवट शारीरिक व अर्धवट मानसिक सुखें आहेत, त्यांच्यांत मानसिक सुखाच्या भेसळीमुळें केवढें सामर्थ्य आलें आहे पहा. उपभोगण्याची व मिळण्याची शक्यता या दोन्ही वाढल्या. श्रीखंड कोणीं किती वेळां खावें याला मर्यादा आहे. पण गंधर्वाचें गाणें प्रत्यक्ष व ध्वनिलेखांवरून कोणी कितीवेळां ऐकावें याला मर्यादाच नाहीं असें म्हटलें तरी चालल. सृष्टिसौंदर्यनिरीक्षण, रामायणासारख्या सुंदर काव्याचें वाचन हा शुद्ध मानसिक आनंद आहे. हा मिळविण्यास अत्यंत सुलभ व तो अनु-

भवण्याची माणसाच्या ठायीची शक्ति अमर्याद आहे. म्हणूनच लोकांना काव्य-रसाची गोडी लावणें, किंवा सृष्टिसौंदर्याची असक्ति त्यांच्याठायीं वाढविणें याला समाज फार महत्त्व देतो. ज्या मानानें समाजांत रसिकता वाढेल, त्या मानानें तो थोडा जास्त सुखी होतो. कारण मानसिक सुखाची शक्यता त्यामुळें थोडी वाढते. तेव्हां कलाकौशल्याची वाढ हें समाजांच्या सुखांत भर घालण्याचें एक साधन आहे, व त्याची प्रगति मोजण्याचें तें एक माप आहे असें, समजण्यास हरकत नाहीं. पण आपले समाजशास्त्रज्ञ रा. गो० म० जोशी यांना हें मत पसंत नाहीं. वाङ्मय, कला-कौशल्य, यांची वाढ होणें हें समाजाच्या अव्यवस्थेचें लक्षण आहे असें त्यांचें मत आहे. कामविकाराची पूर्ती त्या समाजांत होत नसल्याचें तें द्योतक आहे, असें ते म्हणतात. ( हिंदूचें समाजरचनाशास्त्र पान ३४७ ) आतां आर्यसंस्कृतींत कामपूर्ती कधींच होत नसली पाहिजे असें यावरून अनुमान निघेल. कारण भारतीयांनीं कला-कौशल्य परिपूर्णतेला नेलें होतें असा इतिहास आहे. पण असें कब्याळ आपल्यावर येऊं नये म्हणून जोशांनीं वरच्या उलटहि लिहून ठेवण्याची व्यवस्था केली आहे. वाङ्मय, कलाकौशल्य, तत्त्वज्ञान यांची वाढ करणारा जो समाजांतील बुद्धिमान् वर्ग त्याचें समाजानें विनतक्रार पोषण केलें पाहिजे असेंहि तें म्हणतात. ( पान ५५ ) यावरून जोशी कसें मनोरंजक लिहितात हें कळून येईल. संस्कृति व प्रगति या विषयावर त्यांनीं ग्रंथांत जें ठायींठायीं विवेचन केलें आहे, तें सर्व एकत्र करून रंगभूमीवर म्हटलें तर भ्रमाच्या भोपळ्यापेक्षांहि जास्त करमणूक होईल यांत शंका नाहीं. प्रगति वगैरे सर्व आभास असून वंशपरंपरा संस्कृतिरक्षण हेंच संस्कृतीचें ( ? ) आद्य ध्येय आहे असें त्यांस वाटतें. ( पान ४३७ ) पण यावरून निग्रो, कातकरी यांच्यापेक्षां चांगल्या प्रतीच्या जीवनाची हिंदूंना अपेक्षा आहे, असें कोणास वाटेल; पण तसें नाहीं. नुसतें जीवन हें तत्त्व मागें पडून चांगल्या तऱ्हेचें जीवन हें तत्त्व पुढें येणें त्यांना पसंत नाहीं. ( १७५ ) अशा तऱ्हेनें जगणें तशा तऱ्हेनें जगणें हा वैयक्तिक अभिरुचीचा प्रश्न आहे. तो येथें घुसडूं नये असें म्हणतात. ( पान ४१४ ) पण हिंसाप्रिय सृष्टींत त्याच नामरूपानें शिल्लक रहाणें हें मात्र त्यांना हवें आहे. बरें हिंदूचें तेंच नामरूप म्हणजे वेदकाळचें, कां कृष्णाच्या काळचें, कां औरंगजेबाच्या काळचें, कां सध्याचें हें त्यांनीं कोठेंच सांगितलें नाहीं. कदाचित् गणितागत पद्धतीनें पुढील ग्रंथांत सांगणार असतील. कलाकौशल्य हे त्यांच्या संस्कृतींत येतें व येत नाहीं असें आपण पाहिलेंच. युद्धाचीं आयुधें चांगलीं असणें हेंहि त्यांच्यामतें श्रेष्ठत्वाचें द्योतक नाहीं. ( ४५ ) दूरदर्शीपणा व अभिमान हे गुण वंशवृद्धीला हानिकारक आहेत. ( ३३७ )

तेव्हां तेहि संस्कृतींत येत नसतीलच. मग संस्कृति म्हणजे काय तर धर्म, ( ४१५ ) आणि धर्म म्हणजे काय तर मानवाची बुद्धि खुंटली, डोळे मिटले, व कान बंद झाले म्हणजे होणारें ज्ञान ! ( ७६ ) पिंडप्रगति व सांस्कारिक प्रगति यावरचें त्यांचें सुंदर काव्य वाचतांना कवीच्या बुद्धीचा स्फूर्तीमध्यें लय होत असल्याबद्दल आपल्याला शंकाच रहात नाहीं. त्या बाबतींत कवीला माझी एवढीच विनंति आहे कीं, या दोन प्रकारच्या प्रगतींत तोल राखणें हें जें कर्तव्य म्हणून त्यानें सांगितलें आहे, त्याचा नीट बोध होण्यासाठीं किती पिंडप्रगतीला किती सांस्कारिक प्रगति असावी याचें एक कोष्टक तयार करून त्यानें प्रसिद्ध करावें. असो.

मानसिक सुखाची आवड समाजांत वाढत जाण्यामध्यें समाजाचा आणखी एक फार मोठा फायदा आहे. या आवडीमुळेंच समाजांत अत्यंत उपयुक्त ज्ञानें व विज्ञानें निर्माण होतात. समाज वाढत चालला कीं त्याच्यापुढें अनेक तऱ्हेचे प्रश्न येऊन पडतात. ज्या अनेक व्यक्ति सुखासाठीं व संरक्षणासाठीं एकत्र आलेल्या असतात त्यांचे स्वभाव, आवडीनावडी अत्यंत भिन्न प्रकारच्या असतात. असल्या तऱ्हेच्या व्यक्तींना एकत्र वागविणें हें समाजांत अत्यंत कठिण कर्म होऊन बसतें. दोन माणसें एकत्र आलीं कीं नीतिअनीतीचे प्रश्न निर्माण होतात. अनेकांनीं एकत्र खपून संपत्ति निर्माण केली कीं तिच्या वाटणीचे प्रश्न निर्माण होतात. या सर्व प्रश्नांचा विचार करण्यासाठीं दीर्घकाल ज्यांनीं याच विषयाचा व्यासंग केला आहे, अशा पंडितांची समाजाला जरूर असते. आणि शरीरसुखांत मग्न झालेल्या लोकांकडून हे व्यासंग होणें अशक्य असल्यामुळें त्यापेक्षां श्रेष्ठ सुखाची ज्यांना आवड असते, अशीं माणसें समाजाला हवीं असतात. कीर्ति हें सुख मोबदल्याच्या रूपानें समाज त्यांना देतो. तेंहि आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करून समाजाला उपयुक्त अशीं ज्ञानें निर्माण करतात. किंवा चंदनाससारखें झिजून समाजकल्याण साधतात.

जास्तींत जास्त लोकांचें सुख हें ध्येय ठेवलें तरी पराकाष्ठेच्या स्वार्थत्यागाची प्रवृत्ति व तीक्ष्ण बुद्धि यांची समाजांत वाढ होणें कसें शक्य आहे व इष्ट आहे तें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल असें वाटतें. याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं स्वार्थत्यागी, पराक्रमी किंवा बुद्धिमान् पुरुष आपापलीं कार्यें करतात त्या वेळीं वरील मीमांसा त्यांच्या ध्यानीं असते. आपल्या अमुक एका प्रवृत्तीचा मूळ उगम कशांत आहे व तिचें अंतिम फलित काय याचा विचार सामान्य मनुष्य तर नाहींच करीत; पण थोर पुरुषहि बहुशः करीत नसतो. कोणच्याहि ध्येयानें प्रवृत्त झालेल्या समाजांत हीच स्थिति असते. समाजांत शतकांतून एकादा निर्माण होणारा तत्त्ववेत्ता मात्र या

प्रवृत्तींचा अभ्यास करतो, व समाजसुखाच्या दृष्टीनें त्यांना इष्ट वळण लावून देतो. एकादा गोड आंबा खात असतांना त्याच्या झाडाला खतें कसलीं घातलीं होतीं याचा विचार जसा आपण करीत नाहीं व करणें जरूर नसतें तशीच समाजाच्या मूलतत्त्वांची विवेचना बहुसंख्य लोक करीत नाहींत व त्यांनीं करण्याची जरूरहि नसते. आंब्याचा माळी मात्र आंब्याची निगा राखून कोणचे आंबे समाजांत किती पसरूं द्यावे या विचारांत रात्रंदिवस चूर असतो. कार्यकर्त्याला आपल्या कृतीचें आद्यंत माहीत नसतात इतकेंच नव्हे तर तत्त्ववेत्त्यालाहि प्रत्येक कृतीचा समाजसुखाच्या दृष्टीनें नेमका उपयोग काय हें सांगतां येईलच असें नाहीं. मनुष्य सत्यनिष्ठ राहिला तर आपण त्याचें अभिनंदन करतों. पण दर वेळच्या त्याच्या सत्य भाषणानें समाजाला नेमका फायदा काय हें अध्यात्मिक पद्धतींतहि सांगणें शक्य नाहीं. तेंच या पद्धतींत होतें. बहुसंख्यांचें सुख या ध्येयानुसार रचलेल्या समाजांत दोष दाखवून या पद्धतीचा उपहास करणाऱ्यांनीं अतींद्रिय तत्त्वावर जी समाजरचना असेल तिच्यांत हे दोष जसेच्या तसे सांपडतील हें ध्यानांत ठेवलें तर पुष्कळच वाद मिटेल असें वाटतें.

मानसिक सुखाची वाढ होणें याची समाजाला अत्यंत जरूर आहे हें जरी खरें, तरी मानसिक सुख हें शारीरिक सुखाची सर्व जागा घेऊं शकेल हें अशक्य आहे. मानसिक सुख कितीहि वाढलें तरी शरीरसुखाची भूक कधींहि थांबणार नाहीं. शारीरिक सुखाच्या आसक्तीला मुरड घालणें एवढेंच समाजाला शक्य आहे. म्हणून अन्न-वस्त्र व एकंदर संपत्ति समाजाला पुरेशी निर्माण करणें व तिची योग्य वाटणी करणें हें समाजाचें आद्य कर्तव्य आहे. माणसांची कामेच्छा भुकेइतकीच प्रबल असते. म्हणून तिचाहि विचार समाजांत झाला पाहिजे. ही व्यवस्था कोणीं कशी केली व ती उत्तम आहे कीं नाहीं हें कशावरून ठरवावयाचें याचा विचार आतां करावयास हवा. तसेंच श्रेष्ठकनिष्ठतेच्या आणखी एक दोन फार महत्त्वाच्या कसोट्या राहिल्या आहेत. त्यांचाही विचार केला पाहिजे. तो करून त्या-अन्वयें विद्यमान राष्ट्रामध्यें श्रेष्ठकनिष्ठता कशी ठरवितां येईल हें पाहाणें व संस्कृति व प्रगति यांच्या खऱ्या स्वरूपाचें विवेचन करणें एवढा भाग या विषयाचा अजून राहिला आहे.

सुख हेंच मानवजातीचें ध्येय आहे असें वरील विवेचनांत पाहिलें. उदात्त कल्पनांच्या प्रसारासाठींच ज्याचें अस्तित्व, तो धर्मसुद्धां यापेक्षां निराळें ध्येय मानवाला सांगूं शकत नाहीं. परमेश्वराचा ही सृष्टि निर्माण करण्यांत काय हेतु आहे, हें पाहून मग त्याअन्वयें मानवानें आपलें ध्येय ठरवावें असें म्हणणाऱ्यांचा एक पक्ष आहे. त्याचा आपण विचारही केला नाहीं. पण त्याचें

कारण उघड आहे. परमेश्वराचा हेतु काय आहे हें अजून तरी कोणालाच कळलेलें नाहीं. व त्या बावतींत गंभीर वाणीनें वोलणारे लोकही त्याचे हेतु व कृति अतर्क्य आहेत असेंच म्हणतात. त्यामुळें आपल्या कार्य किंवा कोणाच्याही काय, विचार-कक्षेच्या आंत परमेश्वराचा हेतु बसतच नाहीं. सुख हें ध्येय ठरविलें तरी त्या दृष्टीनें सुद्धां वाङ्मय, कलाकौशल्य, स्वार्थत्यागाची प्रवृत्ति इत्यादि श्रेष्ठ गुणांची वाढ होणें कसें इष्ट आहे हेंही आपण पाहिलें व त्यावरून समाजाच्या श्रेष्ठकनिष्ठतेचें कांहीं गमक, कांहीं मानदंड ठरविण्याचा प्रयत्न केला. पण या मानदंडाची उपयुक्तता पूर्ण होण्यास आणखी कांहीं महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करणें अवश्य आहे. तेव्हां त्यांकडे आतां वळलें पाहिजे.

## राष्ट्र आणि व्यक्ति.

भोंवतालच्या क्रूर सृष्टींत मनुष्याला जगावयाचें असेल तर समाज करून राहाण्यावाचून त्याला गत्यंतर नाहीं. शरीरानें तो अत्यंत दुबळा आहे व ज्या बुद्धीच्या जोरावर निसर्गाशीं व इतर प्राणिमात्राशीं झगडावयाचें तिच्या विकासाला समाजाची अत्यंत अवश्यकता आहे. म्हणूनच समाज करून राहाणें मनुष्याला अत्यंत अवश्यक आहे. आत्मसंरक्षणासाठीं मनुष्यानें निर्माण केलेल्या मानव-संघाच्या कांहीं विशिष्ट स्वरूपाला आपण अलीकडे राष्ट्र असें नांव देतों. या राष्ट्र-कल्पनेचा आपणास थोडासा विचार करावयाचा आहे.

एकत्र आलेल्या माणसांची संख्या किंवा त्यांनीं व्यापिलेलें क्षेत्रफळ यावर राष्ट्रकल्पना अवलंबून नाहीं. स्विटझरलंडची लोकसंख्या तीस लक्ष असून क्षेत्रफळ १५ हजार चौरस मैल आहे. साम्राज्य सोडून दिलें तरी नुसत्या चीनची वस्ती ३७ कोटी असून क्षेत्रफळ १५ लक्ष चौरस मैल आहे. तरी या दोहोंना राष्ट्र हीच संज्ञा आपण देतों. इंग्लंड, इटली, जपान, जर्मनी या पराक्रमी राष्ट्रांचा विचार केला तरी चार कोटींपासून सात कोटींपर्यंत त्यांच्या लोकसंख्या कमीअधीक आहेत. यावरून लोकसंख्या किंवा क्षेत्रफळ यावर राष्ट्रकल्पना अवलंबून नाहीं हें स्पष्ट दिसतें. हें जरी खरें तरी कोणच्याही मानवसंघाला राष्ट्र म्हणतां येईल असें नाहीं. युरोप व युनायटेड स्टेटस् यांचें क्षेत्रफळ जवळजवळ सारखेंच आहे. पण त्यांतील एक राष्ट्र आहे व दुसरें नाहीं. वाटेल त्या शब्दसमूहाला आपण वाक्य म्हणत नाहीं. ज्यांतील शब्द एकमेकांशीं कांहीं नात्यांनीं जोडलेले आहेत व जो कांहीं पूर्ण अर्थ सांगतो त्याच समूहाला आपण वाक्य म्हणतों. राष्ट्राचें कांहींसें तसेंच आहे. ज्यांची सुख-दुःखें एक आहेत, जे अनेक कारणांनीं व अनेक प्रसंगीं एकमेकांशीं समरस होऊं

शकतात त्या लोकांच्या संघालाच फक्त राष्ट्र म्हणतां येईल. आणि या सर्वांचें कारण इतकेंच कीं त्या सर्वांना मिळून आत्मसंरक्षणाचें एकच कार्य करावयाचें असतें. ते नसतें तर कोणच्याही मानवसमूहाला राष्ट्र म्हणण्यास हरकत नव्हती. किंवा उलट असेंही म्हणतां येईल कीं राष्ट्र या कल्पनेचा तेव्हां उदयच झाला नसता. संरक्षणासाठीं गटानें राहाण्याची फार पुरातन काळीं मानवानें जी पद्धत सुरूं केली तिचेंच राष्ट्र हें परिणत स्वरूप आहे. आणि आपणाहून अत्यंत विभिन्न लोकांशीं तोंड देण्याचे प्रसंग जों जों जास्त येतात तों तों या राष्ट्र या कल्पनेची जरूर जास्त पडूं लागते. म्हणून मागल्या काळीं जरी या कल्पनेवाचून आपण जगूं शकलों असलों तरी यापुढें तें शक्य आहे असें म्हणण्यांत अर्थ नाहीं.

आत्मरक्षण, बुद्धि व भावना यांचा विकास आणि त्यायोगें जास्तींत जास्त सुखप्राप्ती या हेतूनेंच मनुष्य समाज करतो व त्या समाजाचें परिणत स्वरूप म्हणजेच राष्ट्र हें जर ध्यानांत घेतलें तर त्या संघांत येणाऱ्या व्यक्तींमध्यें जितकें जास्त साम्य असेल तितकें अधिक हितप्रद होईल, याबद्दल कोणी वाद करील असें वाटत नाहीं. एकाचें जें सुखदुःख किंवा मानापमान तेच दुसऱ्याचे अशी स्थिति जितकी जास्त असेल तितकें तें राष्ट्र जास्त संघटित व समर्थ असेल यांत शंकाच नाहीं. हें विचार अगदींच साधे आहेत. पण आज एका बाजूनें सनातनी व दुसऱ्या बाजूनें कम्युनिस्ट लोक या कल्पनेचा उपहास करीत आहेत, म्हणून त्याचा विचार करणें अवश्य आहे.

राष्ट्र म्हणून एकत्र आलेल्या माणसांची स्थिति ही काठ्यांच्या जुडग्यासारखी आहे. काठ्यांना जितक्या जास्त दोरांनीं बांधावें तितकें त्यांचे जुडगें जास्त भक्कम होतें. त्याचप्रमाणें या माणसांना एकत्र बांधणारे धागे जितके जास्त व जितके जास्त चिवट, त्या मानानें तें राष्ट्र जास्त संघटित व जास्त सबल होईल. एकत्र आलेले लोक (१) एक रक्ताचें असणें (२) एक धर्माचें असणें (३) त्यांच्या पूर्वपीठिका व इतिहास एक असणें ( ४ ) त्यांची भाषा एक असणें ( ५ ) व त्या सर्वांना उन्नतीची सारखी संधि मिळणें हे पांच धागे राष्ट्रांतील लोकांना एकत्र बांधण्यास फार उपयोगीं पडतात असें आतांपर्यंतच्या इतिहासावरून आढळून आलेलें आहे. यांपैकीं एकादा धागा तुटतांच राष्ट्र विस्कटतें असें नाहीं; पण जितके जास्त धागे जिवंत तितकें राष्ट्राचें सामर्थ्य जास्त हें निर्विवाद आहे. कारण सुखप्राप्ती व दुःखनिरास यासाठीं माणसें एकत्र येतात, व माणसांचीं सुखदुःखें सारखीं असणें हें वरील पांच गोष्टींवर फारच अवलंबून आहे.

'Workers of the world unite' हें अगदीं भोळें तत्त्वज्ञान आहे. खाणींत काम करणाऱ्या इंग्रज मजुराला चैनींत लोळणारा इंग्रज मालक हा हाडवैरी वाटतो हें खरें; पण आफ्रिकेच्या जंगलांत काम करणारा काळाकुट्ट घाणेरडा निग्रो त्या इंग्रज मजुराला जवळचा वाटेल, आपला बांधव आहे असें वाटेल, हें खोटें आहे. निग्रो व इंग्रज मजूर यांच्यांतील वैषम्याची दरी दुर्लंघ्य आहे. उलट इंग्रज मजूर व इंग्रज मालक यांच्यांतील दरी कांहीं सामाजिक व्यवस्थेमुळें निर्माण झालेली असून एका पिढींतच ती इतकी पालटूं शकते कीं तोच मालक त्याच मजुराला आपली मुलगी आनंदानें देऊं शकतो. एकरक्ततेचा प्रभाव हा असा आहे. व तो मान्य न करतां उभारलेलें कोणचेंही तत्त्वज्ञान व्यासपीठापलीकडे जाऊं शकणार नाहीं. धर्म, भाषा, पूर्वपीठिका, इतिहास या प्रत्येक बाबतींत असेंच आहे. जों जों हे जास्त भिन्न तों तों माणसें एकमेकांपासून दुरावतात आणि समाजविसंघटित होतो. जों जों यांतील साम्य वाढेल तों तों राष्ट्र जास्त सामर्थ्यसंपन्न होईल.

आपल्या हिंदु राष्ट्राला या पांच धाग्यांपैकीं कोणच्या धाग्यांनीं बांधलेलें आहे हें पाहिलें तर, यापैकीं कोणचाही एक धागा येथें नाहीं, इतकेंच नव्हे तर तसा धागा नसलाच पाहिजे, असें धार्मिक लोक सांगत आहेत असा विचित्र देखावा दिसून येतो. हिंदु राष्ट्र, हा शब्द मी उगीच वापरला आहे. असें एकादें राष्ट्र मागें कधीं होतें किंवा पुढें कधीं होऊं शकेल असें मला वाटत नाहीं. पण हल्लीं लोक तसें म्हणतात हें एक आणि दुसरें असें कीं अखिल हिंदुस्थानची जी स्थिति तीच त्यांतल्या कोणच्याही बारक्या तुकड्याची, म्हणजे महाराष्ट्र, बंगाल इत्यादि देशांची आहे. म्हणून सर्व हिंदुसमाजाबद्दल विवेचन केलें म्हणजे तेंच थोड्याफार फरकानें महाराष्ट्राला लागू पडणार असल्यामुळें तसें करण्यास हरकत नाहीं असें वाटतें.

एकरक्तता या राष्ट्रांत मुळींच नाहीं. आणि बुद्धि व रंग या बाबतींत येथें इतके भिन्न लोक एकत्र जमले आहेत कीं ती घडवून आणण्याचे प्रयत्न हितप्रद होणार नाहींत. पण याचा अर्थ असा नव्हे कीं जेवढा फुटीरपणा आज आहे, तितका अवश्य आहे. अशा कित्येक जाति येथें आहेत कीं ज्यांचीं रक्तें मिसळण्यास मुळींच हरकत नाहीं. जितके जास्त लोक एकरक्ततेनें बांधले जातील तितकीं त्यांचीं सुखदुःखें सारखीं होतात. व तेंच आपणांस साधावयाचें आहे. असें असतांना पाश्चात्य शास्त्रज्ञांचे खोटे आधार घेऊन मिश्रविवाह होऊं नयेत असे कांहीं वेडगळ लोक सांगत आहेत व मोठमोठे धर्ममार्तंड त्यांना आशीर्वाद देत आहेत.

जी स्थिति रक्ताची तीच धर्माची. संघटनेच्या दृष्टीनें पाहिलें तर हिंदुराष्ट्र या शब्दाला जितका अर्थ आहे तितकाच हिंदुधर्म या शब्दाला आहे. म्हणजे मुळींच नाहीं. तत्त्वज्ञानांत असा एकही विचार नाहीं व नीति व कर्मकांड यांत असा एकही आचार नाहीं कीं जो सर्व हिंदू सारखाच पाळतात. इतकेंच नव्हे तर तसा विचार किंवा आचार नसलाच पाहिजे असा सनातन धर्म आहे. ब्राह्मणाचे आचार निराळे, क्षत्रियाचे निराळे, वैश्याचे निराळे, शूद्राचे निराळे. कांहीं लोक म्हणतात कीं प्रत्येकाचीं कामें जर निराळीं आहेत तर त्यांना त्यांना भिन्न आचार असणें युक्तच आहे. पण या म्हणण्यांत अनेक हेत्वाभास आहेत. एक तर वर्णाप्रमाणें कामाची विभागणी करणें हेंच चूक आहे असें वृत्तिसंकराचा विचार करतांना आपण पाहिलें आहे. आणि दुसरें असें कीं अशी कामाची विभागणी केली असें गृहीत धरलें, तरी कित्येक आचार असे आहेत कीं त्यांचा धंद्याशीं कांहींच संबंध नाहीं. गायत्री मंत्राचा जप जर सुबुद्धि देतो, तर कोळ्याला किंवा परटाला तो कां सांगूं नये ? आपले सर्व धार्मिक आचार वेदमंत्रपूर्वक करण्यास शूद्रातिशूद्रांना सुद्धां कां अधिकार नसावा ? पण शूद्र तर लांबच राहिले. शिवछत्रपतीच्या कुळांत जन्मलेल्या कोल्हापूरच्या भोसल्यांना सुद्धां तो अधिकार नाहीं. लखलखीत ज्ञानमय परब्रह्माच्या उपासकापासून तों थेट मरीआईच्या उपासकांपर्यंत सर्व लोक हिंदुधर्मांत आहेत. सात जन्म एकच पति मिळावा, यासाठीं व्रतें करणाऱ्या स्त्रियांपासून एकाच जन्मीं मुदतीच्या करारानें सात नवरे करणाऱ्या स्त्रीपर्यंत सर्व प्रकारच्या स्त्रिया येथें आहेत. ब्राह्मणांची विवाहपद्धति निराळी, क्षत्रियाची निराळी, त्यांचें अध्ययनाचें वय व अधिकार वेगळे, त्यांच्या स्वच्छतेच्या कल्पना वेगळ्या. इतकेंच नव्हे तर त्यांचीं वस्त्रें नेसण्याची पद्धतही वेगळी असावी असें शास्त्र आहे. आणि आचारस्वातंत्र्य या गोंडस नांवाखालीं सनातनी लोक त्याचें समर्थन करतात. पण हिंदुधर्मांत आचारस्वातंत्र्य आहे ही थाप आहे. निरनिराळे आचार येथें आहेत इतकेंच खरें आहे. त्या त्या समूहाच्या ठरलेल्या आचाराबाहेर मनुष्य गेला तर समाज तें मुळींच सहन करीत नाहीं आणि हे नियम लग्नविधीपासून पाणी पिण्यापर्यंत सारखेच कडक समजले जात असत. सर्व हिंदूंना इतरांपासून स्पष्टपणें निवडून दाखवील असा, सर्वांना एका कक्षेंत आणील असा आचार, विचार, धर्मग्रंथ किंवा देव, एकही नाहीं; आणि नसलाच पाहिजे असा धर्म आहे. हिंदूचे, हिंदुधर्माचे जे आचार म्हणून आपण म्हणतो, व उत्तम आचार म्हणून ज्याची स्तुति करतो ते सर्व कांहीं ठरीव वर्गाचे आहेत. स्नानसंध्या सोंवळेंओवळें, उपनयन, वेदपठन या

थोर आचारांची स्तुति करणारे लोक सर्व हिंदूंचे हे आचार आहेत अशा स्वरांत बोलतात. हा स्वर, हा त्यांचा भ्रम खरा ठरावा, शूद्रापर्यंत सुद्धां वेदमंत्र पोंचावे यांतच वास्तविक हित आहे. पण तसें ते कधींहीं सुखानें होऊं देणार नाहींत. हे आचार सर्वांचे आहेत, असें उगीचच भासविण्यांत मात्र कांहीं अर्थ नाहीं. हिंदूंच्या श्रेष्ठ आचारांची स्तुति करतांना रा. गो. म. जोशी म्हणतात कीं खरा हिंदु रोज स्नान केल्यावांचून राहूं शकत नाहीं. हें अज्ञान त्यांनीं कोठून चोरलें, याबद्दलची थाप त्यांनीं लवकरच प्रसिद्ध केलेली बरी. हिंदूधर्माची व्याख्या करण्याचा अनेक पंडितांनीं प्रयत्न केला आहे. पण समर्पक अशी व्याख्या अजून एकहीः झालेली नाहीं, व होणें शक्य नाहीं. कारण सर्व हिंदूंना सारखें असें कांहींच नाहीं.

पूर्वपीठिका आणि आणि पूर्वजांचा इतिहास या बाबतींत तीच निराशाजनक स्थिति आहे. येथें एक गोष्ट लक्षांत ठेवावयास हवी. ती अशी कीं हिंदूंचा धर्म, त्यांची संस्कृति, त्यांचा पूर्वेतिहास व पूर्वपीठिका या अत्यंत उज्ज्वल अशा आहेत याबद्दल वाद नाहीं. दोष आहे तो एवढाच कीं, त्या सर्व जुन्या मिळकतीची मालकी फक्त कांहीं विशिष्ट वर्गाकडे आहे, त्यामुळें सर्व समाजाला तिचा कडकडून अभिमान वाटत नाहीं आणि म्हणून संघटना करणें हें जें अत्यंत महत्त्वाचें तिचें काम तें ती करूं शकत नाहीं. येथें ज्या अनेक जाति आहेत त्यांची रक्तें तर भिन्न आहेतच, पण त्यांच्या अभिमानाचीं केन्द्रेंहि भिन्न आहेत. पूर्वपीठिका जितक्या एक व पूर्वजांच्या पराक्रमाचा अभिमान जितका जास्त पसरलेला तितका तो समाज जास्त संघटित होतो. पण आम्ही एकमेकापासून इतके फुटलेले आहों कीं, एकाला दुसऱ्याच्या पूर्वपीठिका व पूर्वज यांच्याबद्दल अभिमान नाहीं इतकेंच नव्हे तर तिटकारा आहे. विक्रमादित्य हा माझा आहे असें वाटून त्याच्याबद्दल मला जो अभिमान वाटतो त्याला दोन कारणें असूं शकतात. तो माझ्या रक्ताचा असेल तर त्याचा पराक्रम म्हणजे माझाच पराक्रम आहे, माझें रक्त तितकेंच पराक्रमी आहे, हा आत्मविश्वास माझ्या ठायीं निर्माण होतो व जगही माझ्याकडे त्या दृष्टीनें पाहूं लागतें. या दुहेरी ऋणामुळें मला त्याचा अभिमान वाटतो. एकरक्तता नसली तरी त्याचीं माझीं सुखदुःखें जर एक असतील म्हणजे तो राजा झाल्यामुळें माझ्या सुखांत जर जास्त भर पडणार असेल, तर मला त्याच्याबद्दल अभिमान वाटतो. या बाबतींत अखिल हिंदुसमाजाची स्थिति वाईट असली तरी महाराष्ट्राची स्थिति बरीच समाधानकारक आहे. गेल्या दोनतीन शतकांत भिन्न भिन्न क्षेत्रांत मराठ्यांनीं जो पराक्रम केला, त्याचें श्रेय अनेक जातींना असल्यामुळें हें वैभव आमचें आहे असें बहुसंख्य

समाजाला वाटावें अशी स्पृहणीय स्थिति येथें झाली आहे. धार्मिक क्षेत्रांत ज्ञानेश्वर, एकनाथ या ब्राह्मणांच्या जोडीला तुकाराम, नामदेव हे ब्राह्मणेतर अगदीं बरोबरीच्या मानानें बसूं शकले व राजकीय क्षेत्रांत संताजी, धनाजी यांच्या बरोबरीनेंच प्रतिनिधी व पटवर्धनांनीं उडी घेतली, यामुळें अमुक मिळकत अमक्या जातीची असा दुजाभाव राहिला नाहीं व मराठी साम्राज्य वैभवाला चढूं शकलें. हें जें आपोआप घडून आलें तेंच शास्त्रशुद्ध पायावर, नवीन तत्त्वज्ञान उभारून मुद्दाम घडवून आणावयास हवें आहे. म्हणजे भेदाचें व दुहीचें भूत पुन्हां या देशाला झपाटूं शकणार नाहीं. तुकारामाच्या व नामदेवाच्या वाणीलाच वेद म्हटल्यानंतर भोसले कुळांतल्या माणसाला वेदमंत्र नाकारणें यांत कोणचा शहाणपणा आहे ? पुष्कळ लोक म्हणतात तशी ही बाब लहान नाहीं. या बारीक गोष्टींच्या मागें अभिमानाचे तीव्र पीळ आहेत. व त्यामुळेंच भेदाच्या धारेला विषारी कटुता येते. राष्ट्रीय पीठिका एक असूनसुद्धां ब्राह्मणांना अत्यंत वंद्य वाटणाऱ्या रामदास, विष्णुशास्त्री, टिळक अशा ज्या विभूती त्यांना, ब्राह्मणेतर अत्यंत घाणेरड्या शिव्या देऊं शकतात. व ते विशिष्ट लोक बेजबाबदार म्हणून सोडून दिले तरी उरलेल्या समाजामध्यें बारीक भेदाचे पडदे कसे पडत गेले आहेत याची जाणीव त्यामुळें झाल्यावाचून राहात नाहीं. आज सांवतामाळी, बांकामहार, इत्यादि कमी अधिक उंचीचे पण आपापल्या जातीचे पुरुष घेऊन ती ती जात त्यांची पूजा करते ही गोष्ट दुर्लक्षणीय खास नाहीं. इतर थोर पुरुषांची पूजा केली तरी आपल्या जातींतल्या पुरुषांची पूजा करणें युक्तच आहे, हें खरें. पण वरील पूजेचा इतका साधा अर्थ नाहीं. व्यासवाल्मिकि, रामदास, ज्ञानेश्वर हे महापुरुष या जातींना जवळचे वाटत नाहींत; ते फारच दूरचे असल्यामुळें त्यांच्या पराक्रमामुळें यांना स्फूर्ती व तेज चढत नाहीं; ते पराक्रमी म्हणूनच आम्ही पराक्रमी असें त्यांना म्हणतां येत नाहीं, व सांवता माळी किंवा इतर सत्पुरुष यांच्या बद्दल तसें म्हणतां येतें हें कारण या पूजेच्या बुडाशीं आहे. ब्राह्मणा ब्राह्मणांत सुद्धां हे आडपडदे आहेत. पेशवेपटवर्धनांचा कोंकणस्थांना जितका अभिमान वाटतो, तितका देशस्थांना वाटत नाहीं. व प्रभू लोकांपैकीं पुष्कळांना तर हे आपले शत्रूच वाटतात. यावरून असें दिसेल कीं एकरक्तता नसली तरी ज्यांना एक राष्ट्र म्हणून रहावयाचें आहे, त्यांनीं आचार, पूर्वपिठिका यांच्या साह्यानें सर्व समाज शक्य तितका एका पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जें जुने ठेवणें असेल तें माझें आहे असें प्रत्येकाला अभिमानानें सांगतां आलें, तर समाजाला एकरूपता व त्यामुळेंच सामर्थ्य जास्त येतें, याबद्दल कोणी वाद करील असें वाटत नाहीं.

राष्ट्रामध्यें जे लोक एकत्र जमले असतील त्यांना एकमेकांबद्दल आपलेपणा वाटावयास रक्त, धर्म, व पूर्वपीठिका यांचें धागे नसले तरी यांच्या अभावामुळें निर्माण होणारे दोष कांहीं एका व्यवस्थेनें काढून टाकणें बरेंचसें शक्य असतें. उन्नतीच्या सर्व क्षेत्रांत वाटेल तितके उंच चढण्यास प्रत्येक व्यक्तीला सारखी संधी देणें, ही ती व्यवस्था होय. माझ्या अंगीं कर्तृत्व, विद्वत्ता व योग्यता असूनही केवळ जातीनें मी कोळी किंवा गंवडी आहे एवढ्याच कारणासाठीं जर मला राजपद, किंवा शंकराचार्यांचें पद मिळणार नसेल, तर हा हिंदु समाज जवळचा व चिनी किंवा इराणी समाज लांबचा, असें मला कां वाटावें ? जें जें मानाचें व वैभवाचें पद या राष्ट्रांत असेल, तेथपर्यंत जाण्याची मोकळीक प्रत्येक कर्तृत्ववान् व्यक्तीला असली तरच हें राष्ट्र माझें आहे व त्याच्या उन्नतिअवनतीची जबाबदारी माझ्यावर आहे ही जाणीव तिला होईल. व अशी व्यवस्था असली म्हणजे राष्ट्राच्या अग्रभागीं चमकणाऱ्या पुरुषांत प्रत्येक जातीचा प्रतिनिधी दिसत असल्यामुळें प्रत्येक क्षेत्र सगळ्यांचें व सगळीं क्षेत्रें प्रत्येकाचीं अशी स्थिति निर्माण होते. आणि त्यामुळेंच आपलेपणा वाढतो. भिन्नधर्ममतें, श्रीमंती, दारिद्र्य, यामुळें कोणच्याही राष्ट्रांत भिन्नभिन्न गट पडलेले असतातच. पण त्या भिन्न गटांतील कोणाही व्यक्तीला समाजांतल्या कोणच्याही उच्च पदाला जावयास मोकळीक असते. परिस्थितीनें अडचण येईल तर निराळी. पण तशी अडचण आली तर तें दुर्दैव आहे, अन्याय आहे, समाजाची तशी व्यवस्था नसली पाहिजे हें तत्त्व तेथें सर्वमान्य असते. तसें असणें हीच समाजाची व्यवस्था, हेंच आमच्या मोठेपणाचें लक्षण असें मानणें निराळें आणि नाइलाजानें तसें होणें निराळें. पौर्वात्य व पाश्चिमात्य समाजाची विभागणी कशी भिन्न आहे, हें रिस्लेनें फार सुंदर रीतीनें स्पष्ट केलें आहे. पौर्वात्य समाजाला विभागणारे तक्ते आडवे आहेत. म्हणजे येथें अगदीं खालच्या थरांतल्या माणसाला वरच्या थरांत केव्हांच येतां येत नाहीं. पश्चिमेंतील समाजविभागणीच्या भिंती उभ्या आहेत. म्हणजे तेथें गट कितीही भिन्न असले तरी तळचा मनुष्य अंगीं कर्तृत्व असेल तर वरपर्यंत जाऊं शकतो. या व्यवस्थेमुळेंच समाजांतल्या सर्व गटांतील व्यक्तींच्या कर्तृत्वाला वाव मिळतो. महाराष्ट्राला थोडेसें जें राष्ट्रस्वरूप प्राप्त झालें आहे, तें या तत्त्वाचा अवलंब केल्यामुळेंच झालें आहे. शिवाजी व बाजी या थोर पुरुषांनीं वाटेल त्याला आऊत सोडून राऊत व्हावयास संधि दिली, इतकेंच नव्हे तर मेंढ्या सोडून राजपदावर चढण्यालाही उत्तेजन दिलें, याबद्दल हें राष्ट्र त्यांचें सदैव ऋणी राहील. वर्णाश्रमधर्माचें घातकी तत्त्व जर

महाराष्ट्रानें पाळलें असतें तर वर्णाश्रमधर्म हे शब्दही आज कदाचित् ऐकूं आले नसते. या विषयासंबंधीं जीवनशास्त्रदृष्ट्या जे प्रश्न उपस्थित होतात त्यांचा विचार आनुवंश व रक्तसंकर या आरंभींच्या दोन लेखांत केलेलाच आहे. व त्या शास्त्राप्रमाणेंही सर्वांना सारखी संधि हेंच तत्त्व कसें हितप्रद ठरतें, हें दाखविलें आहे. येथें फक्त राष्ट्रसंघटनेच्या दृष्टीनेंच त्याचा विचार करावयाचा आहे. राष्ट्रानें मिळविलेलें वैभव, कीर्ति ही माझी कीर्ति आहे, ही राष्ट्रीय संघटनेला अत्यंत अवश्य म्हणून वर सांगितलेली भावना सर्वांना सारखी संधि या तत्त्वामुळें निर्माण होणें बरेंचसें शक्य होतें. कारण मत्सराचें मूळच या व्यवस्थेनें खणून निघाल्यासारखें होतें.

सर्वांना सारखी संधि या तत्त्वावर आक्षेप घेऊन एक समाजशास्त्रज्ञ म्हणतात कीं आज वेद वाचण्यास सर्वांना मोकळीक आहे तरी किती अस्पृश्यांनीं मॅक्समुल्लरची वेदाची प्रत वाचली आहे ? वेदज्ञान सर्वांना मोकळें ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें यावरून त्यास सुचवावयाचें आहे. पण त्यांना उलट असें विचारतां येईल कीं ही वेदाची प्रत किती ब्राह्मणांनीं वाचली आहे ? ज्यांना द्रव्यार्जन म्हणूनच वेद उच्चारावे लावतात ते सोडले, तर शास्त्री म्हणविणाऱ्यांत सुद्धां ऋग्वेद सबंध ज्यांनीं वाचला आहे असे किती निघतील ? आणि असे जर निघणार नसले तर ब्राह्मणांना तरी वेदाध्ययनाचा अधिकार ठेवण्यांत तात्पर्य काय ? तेव्हां अशा प्रश्नांत कांहीं अर्थ नाहीं. पूर्वपरंपरा किंवा पूर्वींचे सदाचार प्रत्येक जण अनुसरीलच असें नाहीं. ते अनुसरण्यास सर्वांना मोकळीक असणें याला महत्त्व आहे. अशी व्यवस्था असली म्हणजे मागून जी विषमता शिल्लक राहते, ती विषारी असूं शकत-नाहीं. इंग्लंडादि देशांत जी विषमता आहे ती या तऱ्हेची आहे. तेथेंही पैसेवाल्याचा गट वंशपरंपरेनें निराळा पडतो असें दिसूं लागतांच भेदाचे वारे वाहूं लागतात व भांडवलवाले व मजूर असे शत्रुपक्ष निर्माण होतात. या सर्वांचा अर्थच हा कीं ज्यांचीं सुखदुःखें वंशपरंपरेनें भिन्न राहाणार ते गट कधींच एकजीव होऊं शकत नाहींत. कारण ज्या परिस्थितीला आपण मुळींच जबाबदार नाहीं, तिच्यामुळें, अंगांत कर्तृत्व असूनही आपणास खितपत पडावें लागतें ही जाणीव व्यक्तीच्या आणि त्या त्या जातीच्या मनांत समाज व्यवस्थेबद्दल असंतोष निर्माण करते. भांडवलवाले व मजूर यांच्यांतल्या भेदाच्या भिंती जातींतल्या भेदाच्या भिंती इतक्या दुर्लंघ्य नाहींत. पण त्यांनासुद्धां वंशपरंपरेचा वास येतांच त्या राष्ट्राला जाचक होतात. मग जातिभेदाच्या शाश्वत व दुर्लंघ्य भिंती किती जाचक होतील हें सांगणेंच नको. जातिभेद ठेवणेंच असेल तर सर्वांना समसंधि हें तत्व मान्य

करून मग ठेवावा. म्हणजे त्याचा विषारी दांत नाहींसा होईल आणि संघटनेच्या तो :फारसा आड येणार नाहीं.

ज्यांचीं सुखदुःखें एक आहेत व उत्कर्षापकर्ष सारखे आहेत तेच लोक राष्ट्र म्हणून एकत्र येऊं शकतात असें आपण पाहिलें. सर्व हिंदुस्थान इंग्रजांनीं जिंकला व सर्वांचेंच स्वातंत्र्य गेलें. या एकाच गोष्टींतल्या सारखेपणामुळें, म्हणजे सर्वांचें दुःख एक झाल्यामुळें अत्यंत भिन्न अशा अनेक गटांतले व देशांतले लोक सहकार्य करून चळवळ करूं लागले. व या बाह्य उपाधींमुळें आपण एक असें त्यांना वाटूं लागलें. मग इतरही दुःखें अशींच एक झालीं, व त्याबरोबर सुखेंही सारखीं झालीं तर एकीची भावना किती वाढेल व संघटितपणा किती येईल याची कल्पना कुणालाही सहज करतां येण्याजोगी आहे. आणि सुखदुःखें एक असणें संघटनेला जरूर आहे हें मान्य झाल्यानंतर तीं सुखदुःखें, रक्त, धर्म, इतिहास. पूर्वपीठिका व आचारविचार यांवर अवलंबून असल्यामुळें तेही शक्य तों एकरूप असावे हेंही मान्य होईल असें वाटतें.

जगावयाचें असेल तर समाज केला पाहिजे, समाज टिकवून धरावयाचा असेल तर राष्ट्रकल्पनेचा अवलंब केला पाहिजे आणि तिचा अवलंब करावयाचा तर सर्वांचीं सुखदुःखें शक्यतों एकरूप असलीं पाहिजेत अशी ही प्रणाली आहे. ती जाणून ज्यांनीं राष्ट्रकल्पना पूर्णत्वाला नेली ते लोक श्रेष्ठ होत. व त्यांचीच प्रगति झाली आहे, हें म्हणणें अमान्य करतां येणार नाहीं.

राष्ट्रकल्पनेचा विचार केल्यावर त्याबरोबरच तितक्याच महत्त्वाच्या दुसऱ्या एका प्रश्नाचा विचार करणें क्रमप्राप्त होतें. व्यक्ति व राष्ट्र यांचे परस्परसंबंध काय असावे हा तो प्रश्न होय.

समाज हा व्यक्तींच्या सुखासाठीं अस्तित्वांत आलेला आहे तेव्हां त्यांतील प्रत्येक संस्था–धर्मसंस्था, शासनसंस्था, विवाहसंस्था–जास्तींत जास्त व्यक्तींना जास्तींत जास्त सुख कसें मिळेल, इकडे लक्ष ठेऊनच उभारली पाहिजे, या तत्त्वाकडे पुष्कळ लोक दुर्लक्ष करतात. आणि मग व्यक्ति ही समाजासाठीं कां समाज व्यक्तीसाठीं असले प्रश्न निर्माण होतात. समाजासाठीं व्यक्ति या म्हणण्याला कांहींचाहि अर्थ नाहीं. समाजासाठीं म्हणजे सर्व लोकांच्या सुखासाठीं असा जरी अर्थ केला (हा अर्थ त्या लोकांच्या मनांत असतो असें दिसत नाहीं. समाज म्हणजे व्यक्तिसुखनिरपेक्ष अशी कांहीं संस्था आहे असा त्यांच्या विचाराचा कल असतो) तरी त्या सुखासाठीं व्यक्ति आहे असेंहि म्हणतां येणार नाहीं. दुसऱ्यासाठीं आपलें सर्वस्व होमून टाकणारे महात्मे समाजांत असतात. व समाज त्यांना मान देतो हें खरें; पण त्या व्यक्तींना

त्यांत अलौकिक समाधान वाटत असतें हें एक व समाज त्याबद्दल त्यांना मोबदला देत असतो हें दुसरेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे. समाजांत एकाच्या सुखासाठीं दुसऱ्यानें झटावें हा जो सामान्य नियम त्याच्या बुडाशीं, असें केल्यानें प्रत्येकाला सुख मिळेल, हें तत्त्व असतें. आणि याचा अर्थ असा कीं, समाज एकत्र मिळून जीं सुखें निर्माण करील त्याचा वाटा सर्वांना मिळालाच पाहिजे. त्याचें प्रमाण ज्याच्या त्याच्या गुणांवर अवलंबून राहील हें खरें; पण हा जर वाटा मिळणार नसेल, किंवा मिळावयाचाच नाहीं असें ठरलें तर ती व्यक्ति किंवा तो समूह त्या समाजाचें कांहीं एक लागत नाहीं. आपल्या समाजांतील अस्पृश्य समाजाचें उदाहरण असें आहे. ते लोक हिंदू समाजाचें कांहीं ऋण लागतात असें मला वाटत नाहीं. उच्च प्रकारचीं सुखें जीं समाजांत निर्माण होतात, तीं त्यांना नाहींच मिळावयाचीं असें ठरलेलें आहे. त्यांची योग्यता नाहीं या म्हणण्यांत काडीचाहि अर्थ नाहीं. कारण योग्यता दाखविण्यास त्यांना संधींच मिळालेली नाहीं. आणि ही संधीहि नसेल तर त्या व्यक्ति समाजासाठीं आहेत हें जबरदस्तीनें पाहिजे तर म्हणावें. समाजरचनेच्या कोण-त्याहि तत्त्वा-अन्वयें हें म्हणतां येणार नाहीं.

यापुढचा प्रश्न याहिपेक्षां महत्त्वाचा आहे. खाणें-पिणें, वाचणें या सुखापेक्षांहि व्यक्तीला आणखी एका प्रकारच्या सुखाची तीव्र इच्छा असते. मी जगावें, मला खावयास मिळावें ही जशी व्यक्तीच्या ठायीं इच्छा असते, त्याचप्रमाणें प्रत्येक बाबतींत मला कांहीं तरी मत असावें, माझें म्हणणें लोकांनीं ऐकावें, निदान ऐकून तरी घ्यावें हीं व्यक्तीला जबर आकांक्षा असतें. माणसाच्या ऐपतीप्रमाणें घर, वर्ग, राष्ट्र, जग या पायऱ्या तो चढतो. व त्या त्या क्षेत्रांत आपलें म्हणणें लोकांनीं ऐकावें असा अहंकार त्याला निर्माण होतो. यालाच अलीकडच्या भाषेंत व्यक्तित्व असें म्हणतात. आणि माणसाच्या या व्यक्तित्वाची योग्य जोपासना करून फिरून जास्तींत जास्त व्यक्तींच्या व्यक्तित्वाचा समन्वय घडवून आणणें हें समाजांतील अत्यंत दुर्घट काम आहे. शब्दप्रामाण्य हें व्यक्तित्वाच्या आड येणारें तत्त्व आहे. बुद्धिप्रामाण्य हें त्याला पोषक आहे. व्यक्तित्वाची जोपासना झालीच पाहिजे असें पश्चिमेकडील अर्वा-चीन संस्कृतीचें प्राणतत्त्व आहे. आपल्याकडे गेल्या एक दोन हजार वर्षांत तें नव्हतें आतां येऊं पहात आहे. पण त्याला पुष्कळांचा विरोध आहे. समाज नीट चाला-वयाचा असेल तर हें असेंच कां व तें तसेंच कां असें बोलावयाचा कोणासहि अधिकार असतां कामा नये, असें हे लोक म्हणतात. पण व्यक्तींचें व्यक्तित्व दडपून रचना केली तर तो दगडांचा किंवा फार तर पशूंचा समाज होईल. माणसाच्या व्यक्तित्वाला

अवसर दिला तर समाजरचना अत्यंत अवघड होऊन बसतें हें खरें. पण ते दडपणें म्हणजे मानवताच नष्ट करण्यासारखें आहे. अहंकार, व्यक्तित्व हेंच मानवतेचें मुख्य लक्षण आहे. दोन दगड एकत्र ठेवले तर भांडत नाहींत हें खरें; पण त्यांच्यांत प्रेम निर्माण होऊं शकत नाहीं, हेंहि तितकेंच खरें आहे. माणसांच्या बाबतींत हीं दोन्हीं शक्य आहेत. तेव्हां दगडत्व टाकून द्यावयाचें असेल तर हीं दोन्हीं पत्करलीं पाहिजेत व त्यांतील पहिलें नाहींसें करून दुसऱ्याची वाढ होईल अशी व्यवस्था समाजरचनेंत केली पाहिजे. व्यक्तींच्या देहाचा नाश होऊं न देणें हें जितकें महत्त्वाचें आहे तितकेंच त्यांच्या मनाचा नाश न होऊं देणें हेंहि महत्त्वाचें आहे. तें जर होत नसेल तर ती समाजरचना सदोष आहे. व्यक्तित्व दडपून समाजरचना उत्तम करणें हें दगडांना एकत्र रचणें किंवा पशूंची दावण बांधणें इतक्याच कौशल्याचें आहे. अहं-काराला अवसर देऊन अनेकांच्या अहंकारांचा समन्वय करणें हेंच तर बिकट कर्म कवी, तत्त्ववेत्ते, मुत्सद्दी यांना करावयाचें असतें. त्यांतच त्यांची थोरवी आहे. पशूंची दावण बांधणें असें वर म्हटलें आहे. पण तेंहि तितकेसें खरें नाहीं. कारण पशूंनाहि व्यक्तित्व असतें. त्यांत जो आपलें व्यक्तित्व ठासून सांगतो, बंधनें अप्रिय मानतो-तो वनराज सिंह आपल्याला आवडतो. व्यक्तित्वाचा नाश सहन करणाऱ्या गाढवाचा आपण तिरस्कार करतो. गाढवापेक्षां सिंह श्रेष्ठ कां याचें उत्तर आपणास हवें होतें. तें उत्तर हें आहे. ओझें वाहणें ही उपयुक्तता खरी. पण आपला अहंकार प्रगट करणें हें जें सर्वांत श्रेष्ठ सुख त्याचा धडाच सिंह घालून देतो. म्हणून उपयुक्ततेच्या दृष्टीनेंहि सिंहच श्रेष्ठ वाटतो. हें जसें पशूमध्यें तसेंच माणसांमध्यें आहे. व्यक्तित्व नाहींसें करून समाजरचना करणें हें सोपें आहे. मुद्रणस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य हें नाहींसें करून झार किंवा सुलतान यांचा अंमल निर्वेध चालेल हें खरें. आणि मुसो-लिनी किंवा हिटलर यांनीं स्वीकारलेलें धोरण बिकट प्रसंगीं अनुसरावें यालाहि कोणी हरकत करणार नाहीं. मनुष्य आजारी असतांना आपण तेंच करीत असतो. पण बिकट प्रसंगीं व्यक्तित्व दडपणें निराळें व नेहमींच ती व्यवस्था असणें निराळें. व्यक्तित्व संभाळावयास लोक नालायक असले तर तेथें हुकमत असूं नये, असाहि आग्रह नाहीं. पण लोकांना तें संभाळावयास लायक करणें हेंच त्या हुकमतीचें धोरण असलें पाहिजे. हुकमत चालवितां यावी म्हणून व्यक्तित्व दडपणें हें हीनतेचें, पशुतेचें, दगडपणाचें लक्षण आहे. व्यक्तित्वाला अवसर दिला तर समाजरचना अवघड होऊन आणखी निराळींच दुःखें उद्भवतात हेंहि मान्य आहे. पण हा पेंचच असा आहे.

सृष्टिरचनेंतला केव्हांहि नाहींसा न होणारा हा दोष आहे. इबसेननें म्हटलेंच आहे—Suppress individuality and you have no life; assert it and you have war and chaos. व्यक्तित्व नष्ट करावें तर मनुष्यत्वच नष्ट होतें. त्याला अवसर द्यावा तर कलह माजतो. सर्वत्र हेंच दुःखद दृश्य आपणांस दिसतें. स्त्रीला स्वातंत्र्य द्यावें तर पतिपत्नींचें पटत नाहीं. न द्यावें तर स्त्री ही माणुसकींतून खालीं उतरते ! राजकारणांतहि तेंच ! लोकशाही निर्मून प्रत्येक व्यक्तीच्या मताला अवसर देणें ही एक उत्तम व्यवस्था आहे असें आरंभीं वाटत होतें. पण त्यांतले अनंत दोष व भयंकर वर्गकलह प्रत्ययास येऊं लागल्यामुळें पुन्हां हुकूमशाही सुरू करावी कीं काय असें पुष्कळांना वाटूं लागलें आहे. पण कांहीं असलें तरी ज्या कुटुंबांत किंवा राष्ट्रांत जास्तींत जास्त लोकांच्या व्यक्तित्वाला अवसर आहे, तेंच राष्ट्र पशुकोटींतून वर निघालेलें व जास्त सुखी होय असें म्हटलें पाहिजे. ज्ञान हें दुःखप्रद आहे हें तत्त्व सनातन आहे. तरी पण ज्ञानाचा मोह अनिवार आहे. कारण त्यांत वरच्या दर्जाचें सुख मिळतें. तेंच व्यक्तित्वाचें आहे. आणि असें आहे म्हणून अनेक व्यक्तींच्या अहंकाराचा समन्वय कसा करावा हें सांगणारा तत्त्ववेत्त्वा अन्न निर्माण करणाऱ्या शेतकऱ्यापेक्षां श्रेष्ठ ठरतो.

ज्या समाजांत राष्ट्रीय भावना वाढीस लागल्या आहेत, म्हणजे आपल्या सुखापेक्षां राष्ट्राचें सुख अधिक महत्त्वाचें असें जेथील व्यक्तींना वाटत आहे, व शिवाय जो समाज व्यक्तीचें व्यक्तित्व जास्तींत जास्त टिकवून धरण्याचा प्रयत्न करावयाचा या तत्त्वानें चालत आहे, तो समाज जास्त सुखी होय, असें आपण पाहिलें. आणि त्यामुळें श्रेष्ठकनिष्ठत्वाची आणखी एक कसोटी आपल्या हातीं आली. आतां सुखदुःखांच्या मापनासंबंधीं रा. गो. म. जोशी यांनीं उपस्थित केलेल्या एकदोन मुद्यांचा विचार करून मग संस्कृतीसंबंधींच्या इतर प्रश्नांची चर्चा करूं.

रा. जोशी यांनीं श्रेष्ठकनिष्ठतेचा विचार फारसा कोठें केला नाहीं; पण सुख-दुःख मोजण्याच्या साधनांचा थोडासा विचार केला आहे. ज्या समाजांत (१) आत्महत्येचें प्रमाण वाढत आहे, (२) वेड लागण्याचें प्रमाण वाढत आहे, (३) व उपदंशादि रोगांचा फैलाव होत आहे, तो समाज अधःपाताकडे चालला आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. हे मुद्दे महत्त्वाचे व खरे आहेत यांत शंका नाहीं. पण त्यांचें जोशीकृत विवेचन कसें मासलेवाईक आहे, तें पाहाण्यासारखें आहे. दोनचार पानांच्या अंतरानें केलेलीं जोशी यांचीं पुढील तीन विधानें वाचून कोणालाही

मौज वाटेल. ( १ ) ज्या राष्ट्रांत वेड लागण्याचें प्रमाण जास्त तेथें आत्महत्येचें प्रमाण कमी असतें ( पान २७५ ). ( २ ) जे समाज अस्थिर आहेत, [illegible] ज्यांची प्रगति चालली आहे, त्यांत आत्महत्येची प्रवृत्ति वाढत आहे. ( २८२ ) ( ३ ) सर्व सुधारलेल्या ( प्रगतिमान् ) समाजांत वेडाचें प्रमाण वाढत आहे. ( २८६ ). वेड आणि आत्महत्या हीं एकत्र नसतात असें एकदां म्हणून लगेच पुन्हां सर्व प्रगतिमान समाजांत हीं दोन्हीं वाढत आहेत, असें जोशांना म्हणावयाचें आहे. साहेबाचें ग्रंथ वाचतांना चांगले मुद्दे आढळले तरी, ते उतरून घेऊन आपल्या लिखाणांत मांडतांना विचार करावा लागतो हें जोशीबुवांना पसंत नाहीं असें दिसतें. पण त्यांनीं जरी आपल्याच म्हणण्याचा विचका केला असला तरी त्यांतील मुद्दा खरा असल्यामुळें तेवढाच समजावून घेऊन त्याचा आपणास विचार केला पाहिजे.

समाजांत आत्महत्येचें प्रमाण वाढणें, हें समाजाच्या दुःस्थितीचें लक्षण आहे, यांत शंकाच नाहीं; आणि स्त्री, पुत्र, राष्ट्र इत्यादि बाह्य निष्ठास्थानें म्हणजे माणसाचें मन येथें खेचून धरणाऱ्या गोष्टी जितक्या जास्त तितका तो आत्महत्येस कमी प्रवृत्त होतो, हेंही खरें आहे. पण बाह्य निष्ठास्थानें कमी असणें एवढेंच कारण आत्महत्येस पुरेसें नाहीं. आपण घटस्फोटाचें उदाहरण घेऊं. सुधारलेला समाज घेतला तर ज्यांचे घटस्फोट झाले त्यांच्यामध्यें, ज्यांनीं केले नाहींत त्यांच्यापेक्षां आत्महत्येचें प्रमाण दुप्पट सापडतें हें खरें. पण जेथें जेथें घटस्फोट तेथें तेथें तो नसलेल्यांच्यापेक्षां प्रमाण दुप्पट हें जोशाचें म्हणणें खरें नाहीं. महाराष्ट्र सांवत्सरिकांतील जाति-परिचय जरी त्यांनीं वाचला असता तरी त्यांच्या ध्यानांत आलें असतें कीं थोड्या-थोडक्या नाहीं तर येथल्या दीडशें जातींत घटस्फोट आहे. तरी पण तेथें आत्महत्या नाहीं. तेव्हां आत्महत्येला बाह्य निष्ठास्थान ढळणें याशिवाय आणखी कांहीं तरी लागतें आणि तें आणखी कांहीं तरी म्हणजे सुसंस्कृत मन हें होय. अमेरिकन किंवा युरोपियन समाजांत तें जास्त आहे. बायकोशीं पटलें नाहीं, ती दुसऱ्यावर मन ठेवूं लागली, संसार उध्वस्त झाला, तर सुसंस्कृत मनाला जितका धक्का बसतो तितका असंस्कृत मनाला बसत नाहीं. म्हणून त्याची आत्मनाशाकडे प्रवृत्ति होत नाहीं. आत्महत्येचीं जीं जीं कारणें अमेरिकेंत आहेत, तीं तीं सर्व हिंदुस्थानांतल्या कनिष्ठ जातींत आहेत तरी येथल्या लोकांत आत्महत्या फार कमी आहे. तीं कारणें येथल्या वरच्या वर्गांत पसरल्याबरोबर येथें आत्महत्या सुरूं झाल्या. यावरून निघणारा निर्णय फार भयानक आहे. पण त्याला कांहीं इलाज नाहीं. वर व्यक्ति-त्वाचें विवेचन करतांना जो विचित्र पेंच म्हणून सांगितला त्याचेंच हें उदाहरण आहे.

संस्कृति वाढवावी तर मानापमानाच्या कल्पना फार तीव्र होतात. आणि मनांतल्या आकांक्षेप्रमाणें जीवितक्रम चालवतां येत नसेल, तर मृत्यू बरा, असें वाटूं लागतें. म्हणजे मृत्यूंत दुःख कमी असें होऊन जातें. संस्कृति न वाढवावी तर पशुस्थिति येते. अस्थिर विवाहस्थिति व पैशाची कमतरता या दोन गोष्टी आत्महत्येस विशेष कारणीभूत होतात. मागल्या काळीं सर्व जगांतच स्त्रीचें व्यक्तित्व दडपलेलें होतें म्हणून विवाह स्थिर होते. आणि रोगराई, दुष्काळ वगैरे कारणानें माणसें फार मरत असल्यामुळें जीवनार्थ कलह तेव्हां इतका तीव्र नव्हता. म्हणून आत्महत्येचें दुसरेंही कारण फारसें जारी नव्हतें. त्यामुळें सर्व जगांतच तेव्हां आत्महत्या कमी होत्या. हिंदूंच्या समाजव्यवस्थेशीं त्याचा कांहीं एक संबंध नाहीं. गेल्या शंभर वर्षांत युरोपांत ही स्थिति पालटली आहे. पशूसारख्या जिण्याविरुद्ध स्त्री बंड करून उठली आणि संपत्ति वाढत असली तरी जीवनार्थ कलह फार तीव्र झाला. आतां हीं दोन्हीं कारणें असूनही आत्महत्या वाढल्या नसत्या. पण यांच्या जोडीला समाजांतील स्त्रीपुरुषांत शिक्षणाचा प्रसार झाला व प्रत्येकाच्या व्यक्तित्वाची किंमत वाढली. आणि त्यामुळें हीन प्रकारच्या जीवनापेक्षां मरण पुरविलें असें व्यक्तीला वाटूं लागलें. बायको दुसऱ्याबरोबर गेली तर मारपीट करून तिला परत आणणें व पुन्हां कामाला लागणें एवढाच फरक कातकऱ्याच्या जीवितांत होतो. पण बायको दुसऱ्याबरोबर गेली तर सुसंस्कृत माणसाच्या जीवितांत अफू खावीशी वाटण्याइतका फरक होतो. हा दोष त्याच्या सुसंस्कृत मनाचा आहे. स्त्री व पुरुष या दोघांचें व्यक्तित्व कायम ठेवावयाचें, संस्कृति कायम ठेवावयाची व तरीसुद्धां हा दोष निर्माण होऊं द्यावयचा नाहीं, हें अजून कोणालाच साधलें नाहीं. हिंदूंनीं त्या बाबतींत व्यर्थ ऐट मारण्यांत अर्थ नाहीं. ज्ञानाबरोबर दुःखें येतात. त्यांतलेंच हें एक आहे. पण त्याला इलाज काय! स्त्रीचें व्यक्तीत्व नाहीसें करून तिला पशुकोटींत ढकलणें, किंवा कातकरी जीवनास तयार होणें, हा त्यावर खास उपाय नाहीं. स्त्रीच्या व्यक्तित्वाचें हें फाजिल स्तोम आहे असें कांहीं लोक म्हणतील; पारतंत्र्यामुळें स्त्री पशुवत् होते, हें त्यांना खोटें वाटेल. त्यांना विनंति एवढीच कीं, त्यांनीं हा प्रयोग स्वतःवर करून पाहावा.

आत्महत्येसारखाच दुसरा दोष म्हणजे वेड लागणें. हें युरोपीय समाजांत वाढत आहे हें खरें आहे पण तें समाजाच्या अव्यवस्थेचें द्योतक नसून फाजील व्यवस्थेचें द्योतक आहे, असें हॅवलॉक एलिसनें म्हटलें आहे तें खरें आहे. इस्पितळें, अनाथालयें हीं अलीकडे इतकीं वाढलीं आहेत, कीं चांगल्या माणसांच्या

बरोबरच वेडीं व अर्धवट माणसें, जीं पूर्वी निसर्गाच्या तडाख्यांत मरून गेलीं असतीं तीं पण जगूं लागलीं. व त्यांना सुस्थिति मिळाल्यामुळें त्यांची प्रजाही फार वाढूं लागली. तेव्हां समाजानें जी जास्त व्यवस्था केली तिचें हें फल आहे. पण विचारी लोकांचें आतां तिकडे लक्ष गेलें आहे व अशा लोकांना निरपत्य करून टाकण्याची त्यांनीं मोहीमच सुरू केली आहे. त्यामुळें त्या दोषाकडे बोट दाखविण्यांत अर्थ नाहीं. सुधारणेचा व वेडाच्या वाढीचा यापेक्षां निराळा संबंध कांहीं नाहीं.

उपदंशादि रोगांचें प्रमाण युरोपीय लोकांत वाढत आहे हें खरें आहे. आणि तें अवनतीचें लक्षण आहे यांतही शंका नाहीं. पण तेवढ्या एकाच प्रमाणावरून श्रेष्ठकनिष्ठता ठरविणें कितपत युक्त होईल, याचा वाचकांनीं विचार करावा. आणि दुसरें असें कीं हिंदी लोकांचें सरासरी आयुर्मान फार कमी म्हणजे तेवीस आहे हें आपल्या हिताचेंच आहे, असें रा. जोशी यांनीं सुंडबर्ग नांवाच्या साहेबाच्या आधारानें दाखविलेंच आहे ( पान ३३३ ) आणि उपदंशादि रोगांनीं तें आणखी कमी होईल हें स्पष्ट दिसत असतांना त्यांच्या प्रसाराविरुद्ध तक्रार करणें निदान जोशांना तरी शोभत नाहीं.

श्रेष्ठकनिष्ठतेच्या जेवढ्या म्हणून कसोट्या उपलब्ध आहेत तेवढ्यांचा येथवर दोन प्रकरणांत आपण विचार केला ( १ ) सुख हें ध्येय म्हणून कला-कौशल्यादि साधनांनीं मानसिक सुखाची आत्यंतिक वाढ झालेली असणें ( २ ) आत्मरक्षणासाठीं समाज अवश्य म्हणून त्याचें राष्ट्र हें जें परिणत स्वरूप त्यावर लोकांची निष्ठा असणें ( ३ ) आणि मानसिक सुखाचें आद्य साधन जें व्यक्तित्व त्याचा त्या राष्ट्रासाठीं किंवा धर्मासाठीं बळी दिलेला नसणें ही कोणच्याही राष्ट्राच्या श्रेष्ठत्व मापनाचीं साधनें आहेत, असें थोडक्यांत सांगतां येईल.

संस्कृति व प्रगति या संबंधांत निर्माण होणाऱ्या कोणच्याही प्रश्नाचीं उत्तरें आपणास आतां देतां येतील असें वाटतें. माझ्या मतानें संस्कृति व प्रगति या भिन्न मानण्याचें मुळींच कारण नाहीं. शब्दाबद्दल माझा वाद नाहीं. दोहोंचा अर्थ अभिन्न आहे इतकेंच सांगावयाचें आहे. आणि त्या दृष्टीनें पाहिलें तर हिंदुस्थानांत मागें संस्कृतीची कितीही वाढ झालेली असली तरी गेलीं हजार वर्षें हा समाज अगदीं हीनदीन स्थितीप्रत जाऊन पोंचलेला आहे असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. रामायण, महाभारत, शाकुंतल, ज्योतिषशास्त्र, गणितशास्त्र, योगशास्त्र, वेरूळ, अजंठा, बरोली हीं जर आमच्या गतवैभवाचीं व संस्कृतीचीं स्मारकें होत, तर तसली

एकही गोष्ट गेल्या हजार वर्षांत झाली नाहीं हें त्या काळाच्या अधःपाताचें लक्षण नव्हे असें कसें म्हणतां येईल. आणि सध्यांच्या काळीं टिळक, गोखले (अमेरिका) रामन्, बोस असे मोठमोठे संशोधक होत असतां त्या क्षेत्रांत थोडी प्रगति आहे असें म्हटलें तर तें तरी नाकबूल कसें करतां येईल.

प्रगति हा एक भ्रम आहे असें कांहीं पंडितांचें मत आरंभीं सांगितलें आहे. पण तें खरें नाहीं असें आतां दिसून येईल. गेल्या चाळीस हजार वर्षांत मानवाची मुळींच प्रगति झाली नाहीं हें म्हणणें बरोबर नाहीं. मानवाला कोणतेंच ध्येय नाहीं, असें ज्यांचें मत असेल, त्यांना कदाचित् असें म्हणतां येईल. पण प्रगति हा शब्दच त्यांना वापरतां येणार नाहीं. पण एरवीं गटभावना किंवा राष्ट्रीय वृत्ति वाढणें, व्यक्तित्वाची जाणीव निर्माण होणें, बुद्धीचा विकास होऊन ज्ञानांत भर पडणें ही निःसंशय प्रगति आहे. नीतिदृष्ट्या विचार केला व गेल्या सातआठ हजार वर्षांचाच विचार केला तर मात्र अल्फ्रेड वॅलेस् किंवा डॉन् इंग यांचें म्हणणें खरें आहे असें वाटतें. म्हणजे त्या काळीं जे समाज सुसंस्कृत होते, त्यांच्यांत एका माणसाला दुसऱ्या माणसाबद्दल त्या काळीं जें प्रेम वाटत असे, त्यांत व आतांच्या स्थितींत कांहीं फरक आहे असें वाटत नाहीं. थोडक्यांत असें कीं, सत्यनिष्ठा, बंधुभाव वगैरे सद्गुणांची जी उंची वेदकाळीं होती तीच आज आहे, त्यांत सुधारणा झाली नाहीं, हें खरें आहे. इतकेंच नव्हे तर पुढें कधीं होईल, असा आशेचा किरण क्षितिजावर सुद्धां दिसत नाहीं. पण आठदहा हजार वर्षांपूर्वी जी स्थिति होती, तीच पन्नास हजार वर्षांपूर्वी होती, असें म्हणतां येणार नाहीं. हिंदी, मिसरी, चिनी वगैरे संस्कृतीचे लोक केव्हां तरी आफ्रिकेंतल्या रहिवाशांच्या स्थितींत होतेच. आणि त्या स्थितींतून ते वर आले असें दिसत असतांना नीतिदृष्ट्या प्रगति झाली नाहीं ह्या म्हणण्यांत तरी काय अर्थ आहे ?

आणि तसा अर्थ नसेल तर प्रगति हा अमान्य करतां येणार नाहीं. कोणचाहि एक कालखंड घेतला तर त्यांत आजच्यापेक्षां उद्यां बरी स्थिति प्राप्त करून घेण्याकडे माणसानें दृष्टि ठेवणें हेंच खरें जिवंतपणाचें लक्षण आहे. बरी स्थिति कोणची तें वर सांगितलेंच आहे. ती स्थिति ज्याला आली असेल तो समाज सुसंस्कृत होय. केवळ टिकून राहिलों येवढ्यांतच फुशारकी मारण्यांत कांहीं अर्थ नाहीं. अगोदर तेंही खरें नाहीं. पण तें आहे असें धरलें तरी त्यांत पराक्रम किंवा मोठेपणा कांहींच नाहीं. आफ्रिकेंतले नीग्रोही टिकून राहिलेलेच आहेत. आणि ढेकूण व पिसवा याही टिकून राहिल्या आहेत. मानवाला तें जिणें आवडत

नाहीं म्हणून तर सर्व खटाटोप आहे. तो मूल हेतुच ज्यांना अमान्य करावयाचा असेल, त्यांनीं हिंदू समाज सुस्थितींत आहे असें म्हणावें. इतरांना तसें म्हणणें लज्जास्पद वाटेल. यावच्चंद्रदिवाकर टिकून राहावें ही ईर्षा तर आहेच पण तें मानानें टिकून राहावें अशी दुसरीही ईर्षा आहे. आणि या दोहोंचा खटका आला तर मानी पुरुष दुसरीचीच किंमत जास्त करील. आणि तसेंच करण्याकडे या जुनाट भारत देशाची प्रवृत्ति व्हावी, त्यानें आपली सनातन शांतता सोडून देऊन थोडी अस्वस्थता व अस्थिरता धारण करावी, अशी शुभेच्छा प्रगट करून संस्कृतीचें हें लांबलेलें विवेचन पुरें करतों.

---

# विवाहसंस्थेचें भवितव्य.

विसावें शतक हें क्रान्तीचें शतक आहे. जुनीं राज्यें व साम्राज्येंच यांत उलथून पडत आहेत असें नसून त्या साम्राज्यापेक्षांही जास्त दृढमूल झालेलीं तत्त्वें व त्याहीपेक्षां जास्त जुन्या व विश्वमान्य अशा संस्था याही आतां ढासळून पडत आहेत. शास्त्रांच्या वाढीमुळें परमेश्वराच्या अस्तित्वावरच गदा आली. व त्यामुळें धर्माचें अधिष्ठानच कोसळून कांहीं ठिकाणीं पूर्णपणें व इतर ठिकाणीं पुष्कळसा धर्माचा उच्छेद झाला आहे. व धर्माइतकीच जुनी व कदाचित् त्यापेक्षांही जास्त प्रिय अशी जी विवाहसंस्था तीही त्याच मार्गानें जाणार कीं काय अशी पुष्कळांना भीति वाटूं लागली आहे. कॅल्व्हर्टनचें बँक्रप्टसी ऑफ मॅरेज, बेन लिंडसे यांचें रिव्होल्ट ऑफ मॉडर्न यूथ यांसारखीं पुस्तकें वाचलीं म्हणजे युरोप व अमेरिका या खंडांत विवाहसंस्था किती हीन दशेला पोचली आहे हें ध्यानांत येईल. बर्लिन, बोस्टन, लंडन यांसारख्या शहरांत दर हजारीं तीनशें पासून पांचशें पर्यंत मुलें बेकायदेशीर असतात. न्यूयार्कमध्यें दरसाल ८०००० गर्भपात होतात; अविवाहित मातांसाठीं काढलेलीं इस्पितळें कोठेंच पुरेनाशीं झालीं आहेत, व दरदहा लग्नामागें दोन किंवा तीन व कांहीं ठिकाणीं तर पांचपर्यंत घटस्फोट होतात. ही माहिती तिकडील विवाहसंस्थेचें स्वरूप समजवून देण्यास पुरेशी आहे. रशियामध्यें तर विवाह हा अनवश्यकच झालेला असून कोठलीच संतति विधिबाह्य नाहीं असें सरकारनें ठरवून टाकलें आहे. व तेंच धोरण

अमेरिका व इंग्लंड यांनीं स्वीकारावें असें लिंडसे, हॅवलॉक एलिस वगैरे मोठमोठे लेखक सांगत आहेत.

आज हजारों वर्षे चिरस्थायी झालेली ही संस्था एका पांचपन्नास वर्षांच्या अवधींत अगदीं रसातळाला जाऊन पोचण्याजोगी अशी काय परिस्थिति उत्पन्न झाली आहे, असा आपणापुढें प्रश्न येऊन पडतो. त्याचा उहापोह एलिस, रसेल वगैरे अनेक पंडितांनीं केला आहे. नॅशा-पालमाल मासिकाच्या जानेवारी १९३३ च्या अंकांत रसेलनें विवाहसंस्था ढासळण्याचीं सर्व कारणें फार थोडक्यांत पण स्पष्टपणें दिलीं आहेत. ( १ ) स्त्री ही वस्तुरूप टाकून व्यक्तिरूप पावली. ( २ ) तिला आर्थिक स्वातंत्र्य मिळालें. ( ३ ) समागम करूनही गर्भसंभव टाळणें विज्ञानानें शक्य करून दिलें. ( ४ ) घटस्फोट पूर्वीपेक्षां पुष्कळ सोपा झाला. ( ५ ) पुरुषाच्या द्रव्यार्जनाची सुरवात विसाव्या वर्षावरून निघून तिसाव्या वर्षावर गेली व त्यामुळें समागमाची इच्छा व तृप्ति यांत अंतर पडलें; हीं पांच कारणें प्रमुखपणें सांगण्यांत येतात. मोटार वगैरे थोडक्या वेळांत लांब नेणारीं वाहनें, धर्मविचाराचें शैथिल्य, हींही कारणें त्यांच्या जोडीला कोणी सांगतात. शिशुसंगोपन व मुलांचें शिक्षण याची पुष्कळशी जबाबदारी मातापित्यावरून काढून सरकारनें आपल्याकडे घेतली हेंही कारण अनेकांनीं सांगितलें आहे. विवाहसंस्थेला लागलेले हे अनेक सुरुंग असून त्यांच्यामुळें ही शाश्वत वाटणारी इमारत पुढील पांचपन्नास वर्षांत जमीनदोस्त होऊन जाईल असें पुष्कळांचें म्हणणें आहे. स्टिंडबर्ग किंवा रशियांतील मॅडम कोलॉन टाई यांसारख्या कांहीं लोकांना यांत वाईट असें कांहीं वाटत नसून ही संस्था व विशेषतः गृहसंस्था नष्ट झालेली उत्तमच, असें त्यांचें मत आहे. तेव्हां त्याप्रमाणें ही संस्था खरोखरच नष्ट होईल कीं काय, होणें अवश्य आहे कीं काय, कां वर सांगितलेले सुरुंग हे सुरुंग नसून हॅवलॉक एलिस म्हणतो ( व्हिदर मनकाइंड पृ. २१४ ) त्याप्रमाणें हे त्या संस्थेचे धिरे आहेत, व त्यामुळें ती संस्था कोसळण्याऐवजीं जास्तच भक्कम होणार आहे, याचा आपणांस प्रस्तुत लेखांत विचार करावयाचा आहे.

कोणतीही संस्था टिकेल कां मोडेल याचा विचार करण्याची सरळ व एकच पद्धत म्हणजे तिच्या आदिहेतूंची चिकित्सा करणें ही होय. ज्या कारणासाठीं ती संस्था अस्तित्वांत आली असेल, तीं कारणें जर अविनाशी असतील व जीं कार्यें ती करीत असेल तीं अजूनही समाजाला इष्ट असतील, तर ती संस्था टिकेल, किंवा निदान समाज ती टिकवून धरावयाचा प्रयत्न करील हें अगदीं उघड आहे.

विवाहाच्या बाबतींत अशीं कारणें तीन आहेत. समागमाचें सुख मिळविणें, व सुप्रजा निर्माण करणें हे दोन हेतु कोणाच्याही सहज डोळ्यापुढें येतील असे आहेत. तिसराही एक हेतु आहे. पण त्याचा पुढें विचार करणें जास्त सोयीचें आहे.

समागमाचें सुख मिळविणें हा विवाहसंस्थेचा हेतु म्हणून सांगितला, हें पाहून जुन्या धार्मिक पंडितांना क्रोध येईल. कोणत्याही तऱ्हेचें शारिरिक सुख मिळविण्याचा प्रयत्न करणें ही मोठी लज्जास्पद व निंद्य गोष्ट आहे अशी आतां पर्यंतच्या सर्व धर्ममतांची शिकवण आहे. त्यांतल्या त्यांत स्त्रीसमागमाचें सुख हें तर अत्यंत निंद्य व पापमय असून त्याची नुसती इच्छा धरणें हें अगदीं हीनतेचें द्योतक आहे, तें दौर्बल्य आहे, असें सांगण्याची चाल होती. जुन्या अनेक धर्मग्रंथांत विवाहाला परवानगी आहे. पण ती प्रजोत्पादनासाठीं आहे. विषयसुख हें नाइलाज म्हणून भोगावयाचें. तें टाळतां आलें तर बरें; पण तसें सर्वांना शक्य नाहीं म्हणून विकारांना एक वाट करून द्यावयाच्या हेतूनें जुने लोक विवाहाला परवानगी देतात. त्यामुळें विषयसुखाची इच्छा धरणें ही एक लाजिरवाणी गोष्ट आहे, असें सर्व जण बोलण्यापुरतें तरी मानीत असत. अशा प्रकारच्या धोरणामुळें समागमाचें सुख अनुभवणें हा विवाहाच्या प्रधान हेतूंपैकीं एक म्हणून मान्य करणें जुन्या काळीं कधींच शक्य नव्हतें. त्यांच्या मतें प्रजा निर्माण करून पितरांच्या ऋणांतून मुक्त होणें, हें एक धार्मिक कर्तव्य असल्यामुळें त्याचें साधन म्हणून पुरुषानें विवाह करावयाचा असतो. त्यामुळें विवाहाचें प्रजोत्पत्ति हें एकमेव ध्येय असलें पाहिजे, सुखासाठीं समागम करणें हें चूक आहे, असें सनातनी लोक सांगतात व जुन्या काळीं तें तसेंच होतें असें सांगून ' प्रजायै गृहमेधिनाम् ' हें कालिदासाचें वचन बाणासारखें प्रतिपक्षावर फेकतात.

आपल्याकडे जुन्याचा कैवार घेऊन अर्थहीन व ढोंगी बडबड करण्याची जी पद्धत अलीकडे रूढ होत चालली आहे, तिचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे. पश्चिमेकडच्या अनेक पंडितांनीं व तरुणांनीं प्रजा ( Procreation ) हें विवाहाचें एकमेव ध्येय आम्हांला मुळींच मान्य नसून विषयानंद ( recreation ) हाही एक त्यांत हेतु आहे, इतकेंच नव्हे तर केवळ विषयानंदाच्या हेतूनेंच लग्न करणें हेही पूर्णपणें न्याय्य आहे असें सांगण्यास निर्भयपणें सुरवात केली आहे. त्याची टर करण्यासाठीं कांहीं सनातनी शास्त्री व कांहीं सुशिक्षित हरदास नेहमीं टीका करतात कीं ' प्रजायै गृहमेधिनाम् ' हें उदात्त धोरण टाकून ' मजायै गृहमेधिनाम् ' हें धोरण अलीकडच्या लोकांनीं पत्करलें आहे. वास्तवीक मौज अशी आहे कीं, कालि-

दासाच्या ज्या ' प्रजायै गृहमेधिनाम् ' या वाक्यावर या लोकांच्या एवढ्या उड्या आहेत त्याच्याच पुढचें वाक्य जर हे लोक वाचतील तर त्यांची उडी खड्यांतच जाईल. पुढच्याच श्लोकांत ' यौवने विषयैषिणाम् ' असेंही कवीनें रघुराजांचें वर्णन केलें आहे. यावरून केवळ प्रजेच्याच हेतूनें रघुराजे लग्न करीत नसून विषयानंद हाही पण त्यांना प्रिय होता असें दिसतें. पण एवढ्या एकाच श्लोकानें काय झालें आहे ? विदग्ध वाङ्मय म्हणून संस्कृतांत जो भाग आहे त्यांत विवाहाचें सर्व थोर हेतु बाजूस राहून अधम, पाशवी विषयानंदच कसा थैमान घालीत आहे, हें कोणाही वाचकाच्या ध्यानांत येण्याजोगें आहे. अनेक संस्कृत नाटकांत कवींनीं ज्यांचीं चरित्रें गायिलीं आहेत ते बहुतेक सर्व राजे–चंद्रसूर्य वंशांतले धीरोदात्त व सत्त्वशील राजे–' प्रजायै ' याच धोरणानें चालत असत, असें दिसेल. तेथून ऐतिहासिक कालाकडे दृष्टी टाकली तरी तीच स्थिति दिसते. सर्व मराठी राजे, पेशवे, सरदार, मानकरी प्रजायै हाच हेतु तोंडानें नसला तरी मनानें खास प्रमुख मानीत होते. सामान्य जनांतही हेंच धोरण होतें. समागमाचा हेतु प्रजा हाच असला पाहिजे हें धोरण स्त्रियांच्या बाबतींतच फक्त पुरुषांनीं ठेवलें होतें. पुरुषांनीं अनेक स्त्रिया करून किंवा अन्य मार्गांनेंही मजा करण्यास कोणाचीच हरकत नव्हती.

जुन्या व नव्यामध्यें फरक इतकाच आहे कीं विषयानंद हा एक सुखाचा उत्तम प्रकार असून तो अनुभवण्यांत लज्जास्पद कांहीं एक नाहीं व तो मानवाच्या कोणच्याही प्रकारच्या उन्नतीच्या आड येत नाहीं, असें नवे पंडित निर्भयपणें सांगतात व जुने सांगत नाहींत. जुन्याची कृति मात्र तीच असते. पण त्यांत उजळ माथा नसल्यानें विषयसुखाची चर्चा करून ते जास्त कल्याणकारक, हितप्रद व सुसंस्कृत कसें करावें याची जी नव्यांना चर्चा करतां येते, ती मात्र त्यांना शक्य नाहीं. व त्यामुळें हीन प्रकारचें सुखच फक्त आतांपर्यंत ते अनुभवीत आले आहेत.

विषयसुखाच्या बाबतींतली ही भेकड व अप्रामाणिक वृत्ति नव्यांनीं टाकून दिली आहे. व त्यामुळें मानवाच्या सुखांत जास्त भर पडण्याचा संभव आहे, यांत शंकाच नाहीं. स्त्रीपुरुषांनीं, विशेषतः स्त्रियांनीं अतिशय मोहक व वेधक वेषभूषा करावी यांत जुन्यांना फार भयंकर पाप वाटे. मुलगी पाहावयास गेल्यावर ते सुंदर मुलगीच निवडतील; पण तिनें जास्त सुंदर दिसण्याचा प्रयत्न केला तर मात्र ते रागावतील. या तऱ्हेचे वेडगळ प्रकार यापुढें नव्या धोरणानें बंद होऊन स्त्रीपुरुष परस्परांना जास्त आकर्षक होण्याचा प्रयत्न करतील तर त्यामुळें विवाहबंध-

नाची दृढता निःसंशय अधिक होईल. विषयानंदाची लज्जास्पदता जाऊन त्याला मान्यतेची मुद्रा मिळाली तर याहीपेक्षां एक मोठा फायदा होईल. स्त्रीपुरुषांमध्यें प्रेम असेल, भावना व विचार यांची समानता असेल तर सामाजिक दृष्ट्या तर अनेक फायदे होतीलच; पण विषयानंदालाही त्यामुळें जास्त उत्कटता व सुसंस्कृतता येईल, ही गोष्ट विषयसुखाला प्राधान्य दिल्याबरोबर लोकांच्या सहज ध्यानांत येईल. तीस वर्षांच्या मुलानें आठ वर्षांच्या मुलीशीं लग्न करावें, व पतिपत्नींनीं दिवसां एकमेकाशीं बोलूं नये, केवळ रात्रींच त्यांची भेट व्हावी असल्या चाली रूढ असलेल्या समाजांत पतिपत्नींच्या समागमाकडे पाहाण्याची दृष्टि किती हीन असली पाहिजे हें कांहीं सांगावयास नको. विषयसुखांत केवळ हीन व पाशवी भागच त्यांना माहीत होता. प्रेमानें, भावनांच्या समरसतेनें, बरोबरीच्या नात्यामुळें निर्माण होणाऱ्या स्नेहानें, स्त्रीला भोग्य वस्तु न मानतां व्यक्ति मानल्यामुळें होणाऱ्या फरकानें, विषयानंदाला किती उत्कटता व श्रेष्ठता येते याची कल्पना जुन्या मताच्या लोकांना कधींच येणें शक्य नाहीं. आणि हा सर्व विषयसुखाला निंद्य किंवा कमी प्रतीचें मानण्याचा परिणाम आहे.

विषयानंदाच्या तर्फे आणखीही एक गोष्ट सांगण्याजोगी आहे. हें सुख ऐहिक उन्नतीच्या आड तर येत नाहींच; पण पारमार्थिक उन्नतीच्याही तें आड येत नाहीं. एकनाथ व तुकाराम हीं दोन उदाहरणें आपल्यापुढें अगदीं स्पष्ट आहेत. ' आत्मा वै पुत्र नामासि । पुत्र झालिया स्त्रियेसी । संग करूं नये तियेसी ' असें एकनाथांनीं सांगितलें आहे. तुकारामानें तर बायकापोरांचें एका घायें मडकें फोडून टाकण्याचा उपदेश किती वेळां केला असेल विठोबा जाणे. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं दुसऱ्याला केलेला उपदेश स्वतः या लोकांनीं मुळींच पाळला नाहीं. हरिपंडित या पुत्रानंतर नाथांना एक कन्या झाली आणि तुकाराम वारले त्या वेळीं त्यांची स्त्री गरोदर होती. एरवीं याची विचिकित्सा कोणींच केली नसती. पण दुसऱ्यांना मडकें फोडा म्हणून कडकडून सांगणारे स्वतः काय करतात, असा प्रश्न साहजिकच येतो. असो. स्वतःच्या बाबतींत तुकाराम व एकनाथ यांनीं स्वतःचा उपदेश पाळला नाहीं तरी त्यांना मोक्ष मिळाला हें खरेंच आहे. यावरून विषयसुखाची इच्छा मोक्षाच्या आड येत नाहीं, हें स्पष्ट आहे. हे साधुसंत अगदीं निर्ममत्वानें भोग घेत होते असेंही म्हणतां यावयाचें नाहीं. कारण ते जर मोहातीत असते तर स्वतः कडकडून सांगितलेल्या वचनाविरुद्ध ते वागते ना. यावरून एकच गोष्ट दिसते कीं विषयसुख-हें मोक्षाच्या आड येतें असें जरी या साधुसंतांना वाटत होतें, तरी वस्तुस्थिति तशी नव्हती.

यावरून असें दिसून येईल कीं प्रेम, भावना, विचार यांची समरसता यामुळें सुसंस्कृत होणारा विषयानंद हा विवाहाचा एक प्रधान हेतु आवश्य मानला पाहिजे, पतिपत्नींची एकमेकाबद्दल एकनिष्ठा आणि त्यांच्या नात्याचा शाश्वतपणा या विवाहाच्या मुख्य अटी आहेत. आणि केवळ विकारशमन एवढाच हेतु असेल, तर त्याला या तऱ्हेच्या विवाहाची मुळींच जरूर नाहीं. विवाह नसलेल्या समाजांना तें पूर्णपणें शक्य आहे, हें कोणत्याही समंजस माणसाच्या तेव्हांच ध्यानांत येईल.

सुप्रजेचें उत्पादन हा विवाहाचा दुसरा हेतु सांगितला जातो. पुत्रोत्पत्ति करून पितरांना पाणी मिळण्याची व्यवस्था करून ठेवावयाची व त्यांच्या ऋणांतून मुक्त व्हावयाचें, अशी यांत धार्मिक दृष्टि आहे; पण शास्त्रामध्यें या भोळसर कल्पनेचा विचार करणें शक्य नाहीं. दुसरी दृष्टि समाजाची. उत्कृष्ट प्रजा निर्माण व्हावी व समाज उन्नतीला जावा अशी लोकांची नेहमींच इच्छा असते आणि व्यक्ति ही हरएक प्रकारें समाजाची ऋणी असल्यामुळें प्रजा निर्माण करून समाज टिकविणें व तो सुदृढ व्हावी म्हणून दक्षता बाळगणें हें प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे.

पण जरा खोल विचार केला तर असें दिसून येईल कीं विवाहसंस्था ज्या स्वरूपांत आज आपल्या डोळ्यापुढें आहे, त्याची सुप्रजेच्या निर्मितीला तितकीशी मुळींच जरूर नाहीं. इतकेंच नव्हे तर सुप्रजेच्या दृष्टीनें सध्यांच्या विवाहसंस्थेंत अनेक दोष आहेत. येथें वाचकांनीं गैरसमज करून घेऊं नये. सुप्रजा हा विवाहाचा हेतु असावा याबद्दल वादच नाहीं. पण तो एकमेव हेतु समाजानें पुढें ठेवला तर सध्यां असलेली एकनिष्ठा व शाश्वतता हीं विवाहबंधनें कितपत अवश्य आहेत याचा विचार येथें करावयाचा आहे. जीवनशास्त्रदृष्ट्या विचार केला तर सुप्रजेला यांतल्या कशाचीच जरूर नाहीं. स्त्री ज्या पुरुषांशीं संगत होते त्यासारखी ती होते वगैरे जुन्या कल्पना आतां चुकीच्या ठरल्या आहेत. कालांतरानें स्त्रीनें अन्य पुरुषापासून संतति निर्माण करून घेतली तरी त्या संततीवर पहिल्या पुरुषाच्या संभोगाचा कांहीं एक परिणाम होत नाहीं. त्याचप्रमाणें स्त्रीच्या मानसिक एकनिष्ठेवरही प्रजेचें चांगलें वाईटपण मुळीं अवलंबून नाहीं. म्हणजे पुरुष व्यभिचारी असला तरी त्याच्या पुत्राच्या पिंडगत गुणांत जसा फरक पडत नाहीं, तसाच स्त्री व्यभिचारी असली तरी पडत नाहीं. दुसरें असें कीं, सुप्रजा हाच अंतिम हेतु धरला तर आज जशी सर्व लोकांना विवाहाला परवानगी आहे तशी त्या समाजांत मिळणार नाहीं. वय, आरोग्य, कर्तृत्व इत्यादि गुणांनीं प्रजा निर्माण कर-

ण्याला योग्य असें शेंकडा दहापंधराच स्त्रीपुरुष सांपडतील. आणि मग तेवढ्या-नाच प्रजोत्पादनाची परवानगी देणें व बाकीच्यांना निरपत्य करून टाकणें हें श्रेयस्कर ठरेल. शिवाय पती कसाही असला तरी स्त्रीनें त्याशीं एकनिष्ठ राहणें हा धर्माचा उपदेश जीवशास्त्राला कधींच मान्य होणार नाहीं. कारण सुप्रजेच्या दृष्टीनें तो अगदीं चुकीचा आहे. मातृप्रधान गृहसंस्था ठेवून, प्रत्येक वेळीं निरनिराळ्या थोर पुरुषांकडून स्त्रीनें पुत्रोत्पत्ति करून घ्यावी अशी कांहीं इंग्रज पंडितांनीं सुचविलेली व्यवस्था सुप्रजेच्या दृष्टीनें मान्य करावी लागेल. यावरून असें दिसेल कीं केवळ सुप्रजा हीच अंतिम दृष्टि ठेवली तर उत्तम बीज व उत्तम क्षेत्र, एवढी एकच दृष्टि ठेवून बाकी सर्व बंधनें झुगारून द्यावीं लागतील आणि त्या उत्तम शब्दाची व्यवस्था जीवनशास्त्र सांगेल ती. धर्म, किंवा नीति सांगेल ती नव्हे.

केवळ विकारशमन, किंवा सुप्रजेची निर्मिति हे एकेक निरनिराळे किंवा दोन्ही मिळूनही विवाहसंस्थेचे अंतिम हेतु होऊं शकत नाहींत असें आतांपर्यंतच्या विवेचनावरून दिसून येईल. स्त्रीपुरुषांची एकनिष्ठा आणि संबंधाचा शाश्वतपणा हीं ज्या नात्यांत प्रधान मानलीं जातात तो विवाह, ही विवाहाची व्याख्या सर्वमान्य होईल असें वाटतें. आणि त्या व्याख्येअन्वयें विवाह हा विकार शांत करण्यास किंवा पिंडदृष्ट्या सुप्रजेची निर्मिती करण्यास जरूरच आहे असें नाहीं; किंबहुना कांहीं बाबतींत विवाह हा सुप्रजेच्या व विकारशमनाच्या आडच येईल असें दिसून येईल. धर्मरक्षण किंवा मोक्षप्राप्ति असे कांहीं आणखी हेतु जुने लोक सांगतील; पण त्याची माहिती कोणालाच नीटशी नसल्यामुळे त्यांचा विचार करणें शक्य नाहीं. मग नव्या शास्त्रीय दृष्टीला विवाहसंस्थेची जरूर आहे कीं नाहीं असा प्रश्न येतो आणि त्याचाच आतां आपणाला विचार करावयाचा आहे.

विकारशमनासाठीं, किंवा समाज जिला सुप्रजा म्हणेल त्यासाठीं जरी विवाहसंस्थेची जरूर नसली तरी यापेक्षांही श्रेष्ठ अशा एका सुखाची मानवी मनाला अपेक्षा असते आणि तिच्यासाठीं विवाहाची जरूर आहे.

मानवी मनाचा असा एक धर्म आहे कीं आपल्या व केवळ आपल्याच सुखदुःखाची काळजी घेणारी, केवळ आपल्या एकट्याच्याच उत्कर्षानें हर्ष पावणारी व अपकर्षानें खेद पावणारी आणि आपल्या एकट्याच्याच भावनाशीं समरस होणारी अशी कोणी तरी व्यक्ति असावी, यांत त्याला पराकाष्ठेचें सुख आहे. मी मेलों तर हजारांत एक व्यक्ति कमी झाली, या हिशेबानें समाजाला थोडें तरी दुःख

होतें हें खरें आहे. पण ती समाजाची पातळ सहानुभूति मला मुळींच सुखदायक होऊं शकत नाहीं. पण मी मेलों तर आपणही मरावें इतकें वाईट वाटण्याजोगें दुःख जिला होईल, अशी जर कोणी व्यक्ति असेल, तरच मला जगण्यामध्यें खरा आनंद होतो; आणि अशी जर व्यक्ति कोणीच नसेल तर मला जीवित नकोसें होतें. आपल्यावर कोणाची तरी अनन्यसामान्य भक्ति आहे, ही जाणीव केवळ सुखप्रद आहे इतकेंच नव्हे तर मानवाच्या सर्व कर्तृत्वाचें तें उगमस्थान आहे. सर्व समाज माझा आहे, ह्यासाठीं मला कष्ट केले पाहिजेत ही भावना हजारांतील एखाद्याच मनाला चैतन्यप्रद होत असेल. पण माझ्यासाठीं, आणि केवळ माझ्याचसाठीं तळमळणारी अशी जी व्यक्ति आहे तिचें कल्याण हा हेतु वाटेल त्याला उद्योगरत करण्याला, इतकेंच नव्हे तर प्रसंगीं प्राणही देण्यास पुरेसा प्रेरक होऊं शकतो. आपल्यावर अनन्यसामान्य भक्ति करणारी ही व्यक्ति कोणीही असून चालत नाहीं. पुरुषाला ती व्यक्ति स्त्री असावीशी वाटते व स्त्रीला पुरुष असावीशी वाटते. कारण हॅवलॉक एलिसनें एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें मनाचें पूर्ण मीलन होऊन दोन जीव अगदीं अभिन्न होऊन जाण्यास, देहाच्या समागमाची सुद्धां अत्यंत जरूर असते. मनाच्या समागमावांचून शारीरिक संबंध हा उच्च आनंद देऊं शकत नाहीं, हें जितकें खरें आहे तितकेंच मनाच्या पूर्ण मीलनाला शारीरसंबंधाची आवश्यकता आहे हेंही खरें आहे. म्हणजे स्त्रीच्या किंवा पुरुषाच्या पार्थिव जडदेहाला पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या पार्थिव देहाच्या समागमाची जशी भूक असते, तशीच त्यांच्या मनालाही दुसऱ्याच्या मनाच्या समागमाची भूक असते. आणि मनाची ही भूक अनन्यसामान्य प्रेमाखेरीज शांत होऊं शकत नाहीं. मानवाच्या या विशिष्ट मनोधर्मांतच विवाहसंस्थेचें बीज आहे.

इस्पितळांतील दाई आपली काळजी घेते, यामुळें आपल्याला अल्पसें सुख होतें. पण आपल्या इतक्याच आस्थेनें ती दुसऱ्या पन्नास माणसांची काळजी घेत असल्यामुळें त्या आस्थेला पातळपणा येऊन पन्नास माणसांत पडलेले असूनही आपणास निर्जन प्रदेशांत पडल्यासारखेंच वाटतें. घरामध्यें याच्या उलट स्थिति असते आणि यामुळेंच घराला घरपणा आलेला असतो. यावरून असें दिसून येईल कीं प्रेमांतील अनन्यसामान्यता हेंच सर्व सुखाचें उगमस्थान आहे आणि विवाहसंस्था ही त्यासाठींच आवश्यक आहे.

अनन्यसामान्य प्रेमाचें हें तत्त्व कांहीं अर्वाचीन युरोपीय पंडितांना मान्य नाहीं असें दिसतें. या प्रेमाची अपेक्षा असली म्हणजे पतिपत्नींचीं मनें अन्य स्त्रीपुरुषांवर गेलीं

तर त्यांना मत्सर किंवा असूया वाटूं लागतें. व अशी असूया वाटणें हें रानटी-पणाचें द्योतक आहे असें कांहीं लेखकांचें म्हणणें आहे. कारण या असूयेच्या बुडाशीं मालमत्ता व स्वामित्व ही कल्पना असते असें ते म्हणतात. म्हणजे स्त्रीचें परपुरुषाकडे मन गेलें तर पतीला जो मत्सर वाटतो, तो स्त्री ही आपल्या माल-कीची वस्तु आहे अशी कल्पना असल्यामुळें वाटतो असें त्याचें मत आहे.

मेन अँड देअर मोटिव्हज् या पुस्तकांत ( पृ. ११७ ) फ्लूगेल या पंडितानें म्हटलें आहे कीं स्वातंत्र्य, समता या कल्पनाशीं मत्सर हा विसंगत आहे. आपलें मन कोणावरही जडविण्याचा व्यक्तीला हक्क असला पाहिजे. सेक्स इन् सिव्हिलि-झेशन या ग्रंथांत ( पृ. २३३ ) वुइल्यम लॉइड म्हणतो कीं असूया हें स्वार्थीपणाचें लक्षण आहे. स्त्री ही वस्तु आहे, पशुवत् आहे या कल्पनेचें असूया समर्थन करते-हॅवलॉक एलिसनें आपल्या सायकॉलजी ऑफ सेक्स या ग्रंथांत हेंच मत दोनतीन ठिकाणीं प्रकट केलें आहे. पण या पंडितांचें हें मत चूक आहे असें वाटतें. मोनो-गॅमी म्हणजे एकपतिपत्नी ही विवाहाची पद्धत सर्वांत उत्तम व नैसर्गिक आहे असें एलिसनें स्वतःच मान्य केलें आहे ( सायकॉलजी ऑफ सेक्स आवृत्ति १९३५, भाग ४ पृ. ४१६, ४९४ ) असें असतांना अनन्यसामान्य निष्ठा त्यानें मान्य करूं नये, हें विचित्र आहे. विवाहबाह्यसंबंध अपरिहार्य वेळीं आणि दोष कबूल करून रसेलनें मान्य केले आहेत. पण एलिसचें तसेंही नाहीं. ( पृ. ५१३ ) पण तो स्वैरसंभोगाला अनुकूल आहे असेंही नाहीं. विवाहांतील पावित्र्य त्याला हवेंच आहे; पण या पंडितांचें मत कांहीं असलें तरी एकनिष्ठा, व शाश्वतता या विवाहां-तील मूल तत्त्वाशीं असूयेचा निषेध विसंगत आहे एवढें खरें.. या बाबतींत मॅक्-डुगलनें फार सुंदर दिवेचन केलें आहे. तो म्हणतो असूया वाटत नसेल तर प्रेमच असणें शक्य नाहीं. असूया ही अपरिहार्य आहे एवढेंच नव्हे तर ती योग्यच आहे. ( कॅरेक्टर अँड कॉंडक्ट पृ. २३१, ३२ ) अनन्यसामान्य निष्ठा नसेल तर माणसाचें जीवन इस्पितळांतल्या जीवनासारखें रसहीन, वैराण व शून्य होईल. आणि जगाच्या अनंत व्यापारांना अवश्य असणारा जो माणसाच्या मनाचा उत्साह तोच नाहींसा होईल. मॅरेज अँड मॉरल्स् या पुस्तकांत रसेलनें हेंच मत सांगितलें आहे. ( पृ. १८८ ). एडवर्ड कार्पेंटर यानें असूयेचे दोन प्रकार सांगून नैसर्गिक असूया चांगली, कृत्रिम वाईट असें म्हटलें आहे. वेस्टर मार्क म्हणतो कीं, सहचराचें मन दुसरीकडे गेलें कीं व्यक्तीला वाईट वाटणें स्वाभाविक आहे. आणि आपल्या सहचराला (Partner) वाईट वाटूं नये अशी प्रत्येकानें खबरदारी घेतली

पाहिजे ( फ्यूचर ऑफ मॅरेज, पृ. ७८ ) लोवेन फील्ड असेंच म्हणतो. हें वाचलें म्हणजे या शास्त्रज्ञांना असूया शब्द फक्त नको आहे, ती कल्पना मान्य आहे असें दिसतें. वरील विरोधी पंडितांचाहि मनांतील अर्थ कदाचित् असाच असेल.

आतांपर्यंतच्या विवेचनावरून पुढील गोष्टी स्पष्ट होतील असें वाटतें. अनन्यसामान्य प्रेमाची मानवी मनाला भूक आहे. दोन जीव पूर्ण समरस झाल्यावांचून ती भागणें शक्य नाहीं. या समरसतेंत मानसिक भागच जास्त असतो. म्हणून दोघांचीं सुखदुःखें, रागद्वेष, वैचारिक उंची, सारखी असल्यावांचून ही समरसता उत्पन्न होऊं शकत नाहीं. या मानसिक समरसतेला शारीरिक समागमाचीही फार आवश्यकता असते आणि म्हणून हें सर्व घडवून आणण्यासाठीं एकनिष्ठ प्रेम व नात्याचा शाश्वतपणा जींत आहे अशी विवाहसंस्था अत्यंत आवश्यक आहे.

विवाहसंस्थेच्या बुडाशीं जें तत्त्व आहे तेंच गृहसंस्थेच्या बुडाशीं आहे. प्रजेचा विचार करतांना ती सुप्रजा असावी एवढीच समाजाची अपेक्षा असते. पण व्यक्तीची दृष्टि याहून फार भिन्न आहे. पुत्र चांगले असावे हें कोणालाही वाटणारच. पण समाजांत पुष्कळसे चांगले पुत्र आहेत या विचारानें व्यक्तीला मुळींच समाधान होत नाहीं. मला पुत्र असावा, ही अत्यंत प्रबळ वासना गृहसंस्था निर्माण करते. सुप्रजेचा विचार येथें गौण आहे; येथेंही पुन्हां गैरसमज होण्याचा संभव आहे. आपली कन्या किंवा पुत्र चांगले व्हावे म्हणून मनुष्य आटोकाट प्रयत्न करील हें खरें. पण त्या प्रयत्नांच्या बुडाशीं समाजांत चांगल्या नागरिकाची भर पडावी या हेतूला प्राधान्य नसून माझा पुत्र चांगला असावा याला प्राधान्य आहे आणि म्हणूनच तो गुणरूपांनीं जरी कमी असला तरी त्याच्याच पालनपोषणाची मी काळजी घेतों. शेजाऱ्याचा मुलगा आपल्या मुलांपेक्षा जास्त बुद्धिमान आहे, आपल्या पुत्राच्या विद्येवर खर्च करण्यापेक्षां त्याच्यासाठीं खर्च केल्यास समाजहित जास्त होईल असा विचारही मी कधीं करीत नाहीं- येथेंच समाजाच्या व माझ्या इच्छेचा विरोध येतो. समाजाची इच्छा अशी कीं पैसा खर्च व्हावयाचा तो चांगल्या विद्यार्थ्यावर व्हावा म्हणजे त्याचें चीज होईल. मला वाटतें कीं मी मिळविलेला पैसा माझ्या मुलावर खर्च होऊन त्याची एक रेसभर जरी उंची वाढली तरी त्याचें चीज झालें. व्यक्तीच्या व समाजाच्या या परस्परविरोधी इच्छेचा समन्वय घडवून आणणें हें फार अवश्य आहे, पण तसें करतांना ' माझा पुत्र ' या विचाराला व्यक्तीला जें प्राधान्य द्यावेसें वाटतें, त्याला समाजानें मुळींच धक्का

लावून उपयोगी नाहीं. युरोपांतील कांहीं अर्वाचीन पंडितांना [illegible] हें मान्य नाहीं. समाजहिताकडे दुर्लक्ष करून व्यक्ति आपल्या [illegible] विरुद्ध आचरण करण्यास गृहसंस्थेमुळें प्रवृत्त होते, तिच्या सर्व भावना कुटुंबीय जनावर केंद्रीभूत होऊन त्यांतील विशालता नष्ट होते व त्यामुळें समाजाचें नुकसान होतें असें त्यांचें मत असून त्यामुळें गृहसंस्था नष्ट करून टाकली पाहिजे असें तें म्हणतात. रशियांतील कोलानटाई ही लेखिका या विचारासाठीं प्रसिद्ध आहे. फ्लूगेलनें आपल्या मेन अँड देअर मोटिव्हज् या पुस्तकांत ( पृ. ९६ ) म्हटलें आहे कीं अनेक महत्त्वाच्या बाबतींत गृहसंस्था ही समाजहितबुद्धीच्या आड येते., पण मनाच्या. विकासाला पायरी म्हणून फ्लूगेल गृहसंस्थेला मान देतो. हॅवलॅक् एलिसनेंही गृह-संस्थेमध्यें हा दोष आहे असें मान्य केलें आहे. कॅलव्हर्टनही आपल्या बॅंकरप्टसी ऑफ मॅरेज या ग्रंथांत म्हणतो कीं गृहसंस्था नसेल तर माणसांचें प्रेम जास्त व्यापक होऊन त्यांच्या सुखदुःखांचीं क्षेत्रें हीं संकुचित न राहातां विशाल होतील.

पण असूयेप्रमाणेंच याही बाबतींत या पंडिताचें मत बरोबर नाहीं असें म्हणावें लागतें. वर दाखविल्याप्रमाणें व्यक्तीच्या व समाजाच्या कांहीं इच्छा पर-स्परविरोधी असल्या तरी मानवाचें मन विशाल होण्याच्या मार्गांत गृहसंस्था आड येईल हें मत अगदीं निखालस चुकीचें आहे असें वाटतें. आणि उलट प्रेम, दया, स्वार्थत्याग, यांचे संस्कार त्याच्या मनावर करण्यास गृह हें एकमेव साधन आहे, हेंच खरें वाटतें. पुत्र, कन्या, वहीण, माऊ, पतिपत्नी, हीं नात्याचीं माणसें नसतील तर मानवाच्या मनाची वाढ होण्याचें बाजूलाच राहून तें अगदीं निरुत्साह, निराश व कर्तृत्वशून्य होईल. स्त्रीपुत्र या प्रेरक शक्ति नसतांना केवळ समाजासाठीं मनुष्य अहोरात्र उद्योग करील ही कल्पना अगदीं भ्रामक आहे. अनन्य-सामान्य प्रेमाचे प्रकार अनेक असतात. पतिपत्नींचें प्रेम हा त्याचा निःसंशय एकमेव श्रेष्ठ प्रकार होय. पण मातापिता, पुत्रकन्या, बंधुभगिनी यांच्या प्रेमांत या श्रेष्ठ प्रेमाचा भाग असतोच असतो. आणि म्हणूनच ही मंडळी एकत्र राहूं शकतात. हा सुवर्णांश जसजसा कमी होत जातो ( आणि पुत्रकन्या, बंधुभगिनी यांच्या बाब-तींत तसें होणें अगदीं वाजवी आहे ) तसतशा त्या व्यक्ति दुरावतात. पण गृहसंस्था ही जी उभारली जाते ती अनन्यसामान्य प्रेम या तत्त्वावरच उभारली जाते. अपत्यांचें संगोपन हें तिचें मुख्य कार्य होय हें खरें. पण तें याच तत्त्वावर झालें पाहिजे आणि होत असतें. गृहसंस्थेच्या अभावीं अपत्यांचें संगोपन होणार नाहीं असें नाहीं. वैद्यकीय दृष्ट्या कदाचित् जास्त चांगलें होईल. पण रसेलनें म्हटल्या-

प्रमाणें ( मॅरेज अँड मॉरलस् पृ. १०० ) तें अगदीं निष्प्रेम होईल आणि त्यांत अगदीं उद्वेगजनक एकरूपता येईल. मुलाच्यां मनाच्या वाढीला व तें आनंदी, निर्भय आणि विशाल व्हावें यासाठीं प्रेमळ वातावरणाची आवश्यकता असते आणि तें आईबापावांचून अन्यत्र मिळणें अशक्य आहे असेंही त्यानेंच म्हटलें आहे. ( पृ. १९४ ) तो माझा, मी त्याचा व इतर कुणाचा नव्हे एवढ्या भावना पिता-पुत्रांच्या प्रेमाला अवश्य आहेत. ( याच बाबतींत जास्त चर्चा अपत्यसंगोपन प्रकरणीं पहावी. )

मी, माझी पत्नी, माझीं अपत्यें, ही भिन्नतेची भावना मानवाच्या मनाला फार पोषक आहे. शाळेच्या लहानशा जगांतही हिचा परिणाम आपणास दिसून येतो. ए व बी या तुकड्यांच्या मुलांत तादृश फरक फारसा नसतो, पण आपण ' ए ' पासून निराळें आहों, त्यांच्यावर चढ करण्यास आपण झटलें पाहिजे, ही भिन्नतेची भावना विघातक तर नाहींच पण उलट पोषक आहे. तुकडीच्या लहानशा गटांतली हीच भिन्नतेची भावना शाळा, शहर, व राष्ट्र या पायऱ्यांनीं वर गेलेली असते. इतरांहून भिन्नता जितकी तीव्र तितकी गटाशीं निष्ठा उत्कट आणि त्या मानानें कर्तृत्व जास्त प्रभावशाली असें येथें अगदीं स्पष्ट दिसून येते. अर्थात् या भिन्नतेंत द्वेषाचा मागमूसही न येऊं देण्याची दक्षता घेणें फार अवश्य आहे. पण कांहीं असलें तरी भिन्नतेखेरीज जीवन रुक्ष व कर्तृत्वशून्य होय यांत शंकाच नाहीं. भिन्नतेची ही भावना गृहसंस्थेंत अगदीं उत्कटतेला नेलेली असते. पण त्यामुळेंच तेथें कर्तृत्वालाही अलौकिक अशी प्रेरणा मिळत असते.

विषयानंद, सुप्रजेची निर्मिति आणि अनन्यसामान्य प्रेमाची प्राप्ति या विवाहाच्या तीनही हेतूंचें येथवर आपण परीक्षण केलें; आणि त्यांतील तिसरा हेतु श्रेष्ठ ठरविला. विषयानंद व सुप्रजा यांना कमी महत्त्व आहे असें मुळींच नाहीं. अनन्यसामान्य प्रेमाला ते पोषकच आहेत. पण तिसरा हेतु श्रेष्ठ ठरविण्याचें कारण असें कीं त्यावांचून विवाहच असणें शक्य नाहीं. एकाद्या पतिपत्नींना अपत्य झालें नाहीं तरी त्यांचे वैवाहिक नातें संपत नाहीं. तुरुंगांत गेल्यामुळें किंवा अन्य कांहीं कारणामुळें दहापंधरा वर्षें जरी त्यांना विषयसुख मिळालें नाहीं, तरी आपण त्यांना नांवें ठेवीत नाहीं. त्यांनीं विवाहबंधनें मोडलीं असें आपण म्हणत नाहीं. पण ते जर परस्परांशीं एकनिष्ठ नसतील तर त्यांच्या विवाहाला आपण विवाहच म्हणत नाहीं. तेव्हां विवाहांत अनन्यसामान्य प्रेमाला श्रेष्ठता आहे हें निर्विवाद होय. यावरून असें दिसेल कीं व्यक्तीचें सुख हेंच विवाहाचें अंतिम आहे. प्रजेच्या बाब-

तींत सुद्धां असेंच आहे. व्यक्ती स्वतःच्या सुखासाठीं प्रजा निर्माण करते व तिचें संगोपन करते. समाजाचें हित हें पर्यायानें व्यक्तीचेंच हित असल्यानें या सुखाला मुरडी व बंधनें घालून सामाजिक दृष्टिही विवाहांत ठेवली पाहिजे हें खरें; पण हें सांगतांना समाजानें मूळ हेतूकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं, हेंही तितकेंच खरें आहे.

स्त्रीपुरुषांची उच्चतम मैत्री, अनन्यसामान्य प्रेम, ही भावना मुळांत जरी नैसर्गिक असली तरी तिची वाढ करून तिला योग्य वळण लावणें हें अवश्य आहेच. कारण परस्परविरोधी अनेक प्रकारच्या प्रवृत्ति मनुष्याच्या अंगीं असतात. कीर्तीची आस कोणाला नाहीं ? पण प्रत्येकाला ती असूनहि आळस, हीन सुखाचा लोभ हे अनेक दुर्गुण तिच्या आड येतातच. तसेंच अनन्यसामान्य प्रेमाचें आहे. कीर्तीची आस जरी नैसर्गिक असली तरी तिची शिकवण समाजाला देऊन तिचें सारखें संगोपन करणें हें जसें अवश्य आहे, तसेंच स्त्रीपुरुषांच्या या उच्च मैत्रीचें आहे. सर्वांना यांतील गोडी कळेलच असें नाहीं. कळली तरी त्याची किंमत देण्यास ते तयार होतीलच असें नाहीं. मनुष्य हा जसा अनेक चांगल्या प्रवृत्तींनें युक्त आहे तसाच असत् प्रवृत्तींनेंहि तो युक्त आहे. त्यामुळें अनन्यसामान्य प्रेम हें जरी ध्येय असलें तरी तें पूर्णांशानें कोठेंहि व कधींहि साध्य होत नसतें. बंधारा घालून नदीचें सर्वच्या सर्व पाणी आडवलें तर हवेंच आहे. पण तसें करूं गेल्यास सर्वच पाणी वाहून जाऊन तलाव कोरडा पडण्याचा संभव असतो. हा सृष्टिरचनेचा दोष आहे. मानवाच्या हातांत नाहींत अशा शक्तीच इतक्या आहेत कीं त्याचें ध्येय पूर्णांशानें त्याला कोठेंच साध्य करून घेतां येत नाहीं. इतकेंच नव्हे तर आपला कमकुवतपणा, व सृष्टीच्या विरोधी शक्ति या ओळखून त्यानें ध्येयाला योग्य त्या मुरडी घातल्या नाहींत, तर सर्वच बंधारा फुटून त्याची जमीन वैराण होण्याचा प्रसंग येतो. याच दृष्टीनें एकनिष्ठा व शाश्वतपणा या विवाहाच्या अलौकिक तत्त्वांनाही अगदीं नाइलाजानें व मोठ्या दुःखानेंच कां होईना पण मुरडी घालणें प्राप्त होतें. त्या तशा घातल्या नाहींत म्हणूनच पश्चिमेकडील विवाहसंस्थेचें दिवाळें वाजलें अशी लिंडसे, एलिस वगैरे थोर विचारवंतांची तक्रार आहे. त्या मुरडी कोणच्या व कशा घालावयाच्या, त्या कितपत इष्टानिष्ट व शक्याशक्य आहेत याचा विचार पुढील प्रकरणीं करावयाचा आहे. पण तत्पूर्वी विवाहसंस्था व गृहसंस्था यांच्याबद्दल नवविचारी पाश्चात्य पंडितांचीं काय मतें आहेत तें पहावयाचें आहे.

सामान्यतः पश्चिमेकडील सर्वत्र देशांत विवाहसंस्था नष्ट होत आहे असें आपण ऐकत असलों तरी त्यांतल्य त्यांत रशियाबद्दल ओरड फार आहे. तेथें विवाहाची नोंद कायद्यानें आवश्यक नाहीं. घटस्फोट वाटेल तेव्हां मिळतो, गर्भपात बेकायदेशीर नाहीं असें आपण ऐकतों आणि त्यामुळें तेथें सर्वत्र स्वैराचार, भ्रष्टाकार, बेबंदशाही आहे असें कल्पून त्यावर लेख लिहितो. सह्याद्रीच्या एप्रिलच्या अंकांत असाच एक लेख आला आहे. पण मिस मेयोचें उदाहरण ध्यानांत ठेवून वाचकांनीं या बाबतींत फार सावध राहिलें पाहिजे. त्या प्रश्नाची चांगली बाजूही पाहून सहानुभूतीनें विचार करणें हेंच युक्त होईल. ' फॅक्टरी, फॅमिली अँड वूमन इन् सोव्हिएट रशिया '—किंग्जबरी व फेअरचाइल्ड; ' मॅरेज अँड मॉरल्स् इन् सोव्हिएट यूनियन '—ॲना लुइस स्ट्रॉंग; ' प्रोटेक्शन ऑफ वुमेन अँड चिल्ड्रेन् इन् सो. रशिया '–अलाइस विथ्रोफील्ड वगैरे पुस्तकें पाहिलीं तर वस्तुस्थिति पुढीलप्रमाणें आहे असें दिसून येईल. स्वैराचाराला रशियांत मुळींच उत्तेजन नसून आत्मनिग्रह, एकनिष्ठा हींच त्यांना प्रिय आहेत. मतें मागविलीं तेव्हां शेंकडा ७० तरुणांनीं एकपत्नीपद्धत मान्य असल्याचें सांगितलें. स्वैराचार करणाऱ्याला कम्युनिस्ट पार्टीतून हाकलून देतात. केवळ एकदा समागम केला इतकें जरी सिद्ध झालें तरी पुरुषाला अपत्याच्या संगोपनाचा खर्च देणें कायद्यानें भाग पडत असल्यामुळें स्वैराचार करणें येथें फार कठीण झालें आहे. गर्भपाताला कायद्यानें परवानगी असली तरी त्याविरुद्ध सरकारनें फार जोराची चळवळ चालविली आहे. बर्लिनपेक्षां मास्कोमध्यें जास्त गर्भपात तर होत नाहींतच पण सरकारी डॉक्टरांच्या नजरेखालीं शस्त्रक्रिया होत असल्यामुळें रशियांतील स्त्रीच्या जीविताला धोका जवळजवळ नाहींसा झाला आहे. शिवाय पहिला गर्भ किंवा अडीच महिन्यांवर वाढलेला कोणचाही गर्भ नाहींसा करणें बेकायदेशीर आहे. यावरून असें दिसेल कीं विज्ञाना अन्वयें जें शुद्ध व निग्रही आचरण ठरेल तें रशियन लोकांना हवेंच आहे. स्वैरता, अनिर्बंधता तेथें मुळींच नाहीं. फरक एकच आहे कीं या बाबतींत कायद्याचा कांहीं-एक उपयोग नाहीं असें त्यांना वाटल्यामुळें ही गोष्ट उपदेशानें घडवून आणावी असा त्यांचा प्रयत्न आहे.

मूठभर आर्यस्त्रियांच्या थोरवीकडे नजर ठेवून आर्यस्त्रियांच्या शीलाबद्दल भोळसटपणें कांहीं तरी लिहिणाऱ्या लेखकांची खरोखर कींवच येते. कांहीं थोड्या जाती सोडून दिल्या तर येथेंही दोनतीन बाप, स्वैरसंभोग, मुदतीचीं लग्नें, बहुपतित्व हीं वाटेल तितकीं दृश्यें दिसतील. आणि पुन्हां या सर्वांवर धर्माचा शिक्का

लागलेलाही दिसेल. रशियांत गर्भपाताला स्वातंत्र्य आहे असें सांगणें हें हिंदुस्थानांत चौदा वर्षांच्या आंतील मुलींवर अत्याचार करण्यास परवानगी आहे असें सांगण्याप्रमाणेंच आहे. हिंदुस्थानांत पंधरा वर्षांखालच्या ६४ लक्ष, पांच वर्षांखालच्या दीड लक्ष आणि एक वर्षांच्या आंतल्या १०८१ विधवा ( ! ) आहेत. हें येथल्या विवाहपद्धतीच्या यशाचें चिन्ह खास म्हणतां येणार नाहीं. शिवाय दहा व अकरा वर्षांच्या कित्येक माता ( ! ) येथें मृत्युमुखीं पडतात. हेंही दृश्य मोठेसें शुभ नाहीं. श्रद्धानंद महिलाश्रम, पंढरपूरचे आश्रम वगैरे संस्था येथल्या विवाहसंस्थेबद्दल कोणची साक्ष देतात तीही ऐकली पाहिजे. त्यावरून असें दिसेल कीं पश्चिमेकडे विवाहसंस्था धुळीस मिळत असली तर येथेंही तेंच आहे. इतकेंच नव्हे तर येथल्या कांहीं जाति सोडल्या तर हजारों वर्षें येथें रशियाच आहे. आणि त्या शुद्ध जातींचें जें प्रमाण आपल्याकडे निघेल तितक्या स्त्रिया रशियांतच काय पण कोणच्याही देशांत सांपडतील. मात्र अजून एक ठळक फरक आहे. हिंदुस्थानांतल्या स्त्रीला स्वातंत्र्याची प्राप्ति झाली नाहीं. ती झाली, तिला आपल्या व्यक्तित्वाची जाणीव झाली म्हणजे मग ती कशी राहील यावर सर्व अवलंबून आहे. येथें स्त्रियांना गोषांत ठेवाव्या लागतात, किंवा गांवाला जातांना त्यांना बुंकलें घालावें लागतें अशी कित्येक ठिकाणीं स्थिति आहे. तेव्हां येथल्या विवाहसंस्थेची स्थिति कांहीं फार अलौकिक आहे हें भोळसट समाधान मानून स्वस्थ बसणें अगदीं घातकी ठरेल हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

रशिया सोडून इतर देशांकडे पाहिलें तरी असें दिसेल कीं विवाहसंस्था किंवा गृहसंस्था अजिबाद नाहींशी करावी असें म्हणणारे लेखक क्वचितच आढळतात. तिच्यामधले दोष दाखविणारा एलिससारखा पंडितही स्पष्टपणें असें सांगतो कीं गृहसंस्था बुडवायचा प्रयत्न करूनही बुडणार नाहीं. इतकी ती मानवाच्या स्वभावाशीं निगडित झाली आहे. ( मोअर एसेज ऑफ लव्ह अँड व्हर्च्यू पान २४ व्हिदर मनकाइंड पान २१४ ). जज् बेन लिंडसे याच्यावर या बाबतींत फार गहजब झाला आहे. पण रिव्होल्ट ऑफ मॉडर्न यूथ या पुस्तकांत ( पृ. १३७ ) त्यानें स्पष्ट म्हटलें आहे कीं विवाहसंस्थेवर माझा ठाम विश्वास आहे. आणि स्त्रीपुरुषांचें एकमेकावर अनन्यसामान्य प्रेम (The love of one man for one woman) यालाच मी विवाह म्हणतों. रसेलचें मत वर सांगितलेंच आहे. विवाहसंस्था मोडणें मुळींच हितप्रद नसून ती मोडली तर अपत्यसंगोपन नीट होणार नाहीं आणि पुरुष कर्तृत्वशून्य होईल असें तो म्हणतो. दि वे ऑफ ऑल वूमेन ( पृ. १७२ )

या पुस्तकांत ईस्थरहार्डिंग या लेखिकेनें म्हटलें आहे कीं शाश्वतता हें तर विवाहाचें मुख्य लक्षण होय. आणि तसें न मानतां जी स्त्री विवाह करील तिचा विवाह कधींच सुखादायी होणार नाहीं. व्हॅन डी व्हेल्डे या स्विट्झरलंडमधील मोठया लेखकाचें मत असेंच आहे. तो म्हणतो कीं एकनिष्ठा व शाश्वतता या लक्षणांनीं विवाहसंस्थेचा विकासच दिसून येतो आणि विवाहांतून कांहीं त्रास व दुखें जरी निर्माण होत असलीं तरी त्या संस्थेच्या अभावीं याच्यापेक्षां कितीं तरी अधिक दुःखें मानवाला भोगावीं लागतील. ( आयडियल मॅरेज पृ. २ ) मॅक्‌डुगल या विख्यात मानसशास्त्रज्ञाला विवाह तर मान्य आहेच, पण शिवाय विवाहित स्त्रीपुरुषांनीं परक्या स्त्रीपुरुषांसह नाचणें हेंही गर्ह्य आहे असें तो मानतो. ( कॅरेक्टर अँड कॉंडक्ट ).

यावरून असें दिसेल कीं युरोपांतल्या पंडितांनाही विवाह आणि गृह या दोन्ही संस्था अत्यंत आवश्यक वाटतात. फरक एवढाच आहे कीं तिच्या मर्यादा व नीतिनियम विज्ञानाला विचारून बसवावे असें ते म्हणतात. मानसशास्त्र, सुप्रजाशास्त्र, आरोग्यशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादि अनेक शास्त्रांना विचारून नियम ठरवावे व त्यांना संमत नाहींत अशीं बंधनें कितीही पवित्र, व श्रुतिस्मृतिपुराणबायबलोक्त असलीं तरी तीं काढून टाकावीं असें त्यांचें म्हणणें आहे. तपशिलांत मतभेद होणें केव्हांही शक्य आहे. कांहीं मतभेदानें सिद्धान्तच उलटतो हेंही खरें आहे. पण असें कोठेंही असणारच. आपल्याकडच्या दोन स्मृति घेतल्या तरी त्यांतही असें दिसून येईल. तेवढयावरून कांहीं विपरीत बोलण्यांत मुळींच अर्थ नाहीं आतां विज्ञानाचें सांगणें आणि धर्माचें सांगणें यांतच जमीनअस्मान अंतर आहे यांत शंका नाहीं. पण ते एवढयाच बाबतींत नसून सर्वच क्षेत्रांत आहे. आणि अशा वेळीं विज्ञानाचें ऐकलें पाहिजे हें आपण मागेंच ठरविलें आहे.

पण गृहसंस्थेच्या पुरस्कर्त्यांनीं पश्चिमेकडील या हल्लयानें गांगरून जाण्याचें मुळींच कारण नाहीं. येथील वेदान्त्यांनीं याहीपेक्षां जास्त मोठा हल्ला मागें या संस्थेवर केला होता आणि अजून तीच बडबड करण्याची चाल तत्पंथीयांनीं सोडलेली नाहीं. कसली जायको नि कसला पुत्र असें म्हणून आचार्यांनीं पुरुषाचीं दोन प्रबळ निष्ठास्थानेंच हालविलीं. संसाराची काळजी वाहणें हें या मार्गांतील लोकांना मोठें गर्ह्य वाटतें. एखादेनि अकाळ काळें । मजचि जें मरण आलें । तें काय करितील स्त्रिया बाळें । आसवीं डोळे लोटतीं ॥ अशी खंती पुरुष करतो म्हणून एकनाथमहाराजांनीं त्याला मूढमती म्हटलें आहे. ( एकनाथी भागवत १७।५२४.)

पण हीं उदाहरणें कशाला ? संसाराची निंदा करण्याचें सुख जिन्हेनें भोगलें नाहीं असा सत्पुरुषच आपणास सांपडणार नाहीं. पण विवाहसंस्थेचें अद्भुत यश यांतच आहे कीं हें ऐकून लोकांनीं तर संसार सोडले नाहींतच पण या साधुसंतांनींहि ते सोडले नाहींत. अलिप्तपणें कां होईना, भोगायचें नाहीं अशा इच्छेनें कां होईना ते संसारसुख भोगीतच राहिले. आतां लोकांनीं संसार सोडले नाहींत तरी ज्ञान-विन्मुखता, तर्कशून्यता, कर्तृत्वाबद्दल निराशा इत्यादि अनेक दुर्गण या उपदेशामुळें उत्पन्न झालेच. पण विवाहसंस्था आजिबात ढासळली नाहीं हें काय थोडें झालें ? तेव्हां वेदान्ताच्या प्राणघातक हल्ल्यांतूनहि जी संस्था सहीसलामत बाहेर पडली तिला, सर्वस्वीं अनुकूल असलेल्या पाश्चात्यांच्या कांहीं तपशिलांतल्या सुधारणांनीं भय उत्पन्न होईल, अशी भीति बाळगणें अगदींच असमंजसपणाचें होईल.

---

# गृहसंस्थेचें नवें स्वरूप.

विवाह आणि गृह या संस्थेवर कितीही जहरी टीका होत असल्या, त्यांवर कितीही जोराचे हल्ले होत असले तरी त्या ढासळून पडणार नाहींत व पडूं नयेत अशीच सर्व विचारी पुरुषांची इच्छा आहे हें मागील प्रकरणीं आपण पाहिलें पण त्याबरोबरच आपल्या असेंही ध्यानांत आलें कीं या दोन्ही संस्था जर चिरंजीव करावयाच्या असतील तर त्यांच्या स्वरूपांत व रचनेंत आपणास आमूलाग्र फरक केला पाहिजे. गेल्या दोन हजार वर्षांत व विशेषतः गेल्या दीडशें वर्षांत समाजाच्या स्थितींत, माणसांच्या मनोभावनांत, नैतिक मूल्यांत इतके जमीन-अस्मान फरक पडले आहेत कीं जुन्या तत्त्वावर चालविलेली कोणचीही संस्था या कालांत टिकून राहणें अगदीं अशक्य आहे.

गृहसंस्थेची पुनर्घटना करण्यास भाग पाडणारी मुख्य गोष्ट म्हणजे स्त्रियांच्या मनांत स्वातंत्र्यप्रीतीचा झालेला उदय ही होय. आजपर्यंत जगांत स्त्रीला व्यक्ति म्हणून कोणीच ओळखीत नव्हतें. मनुष्य जात ही फक्त पुरुषांची आणि ती कायम टिकावी, तिला सुख व्हावें, तिला मोक्ष मिळण्याची सोय व्हावी या हेतूनें वापरण्यांत येणारें स्त्री हें एक साधन होतें. मोक्ष हें अंतिम ध्येय. पण तें पुरुषांचें. स्त्री ही त्याच्या आड येणारी वस्तु म्हणून ती टाकून द्यावी. ‘ स्रक्, चंदन, वनितादि

भोग ' या शब्दरचनेंत ही मनोवृत्ति स्पष्ट दिसून येते. स्त्रीला बंधनांत ठेवतां यावी यासाठीं ' ज्ञानानेंच मोक्ष मिळतो ' हा वज्रलेप सिद्धान्तही बदलून तिला पतिसेवेनें मोक्ष मिळेल अशी खात्री देण्यासही शास्त्रज्ञांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. पहिली बायको मेली तर अग्निहोत्र अडेल म्हणून दुसरी करण्यास हरकत नाहीं. म्हणजे पुरुषाच्या पुण्यप्राप्तीच्या सोयीसाठीं स्त्री आहे. दुसरा नवरा करून स्त्रीला अग्निहोत्र घेण्यास मुळींच परवानगी नव्हती. उत्तरवयांतही पुरुषाला विवाह करण्यास परवानगी देऊन त्या स्त्रीला पुनर्विवाहाची बंदी करणें या नियमांत तर माणुसकीलाही फाटा दिलेला दिसतो. पुरुषाची शेवटचीं दहा पांच वर्षें सुखाचीं जावीं यासाठीं स्त्रीच्या सर्व जीविताचा नाश करून टाकणारे शास्त्रकार स्त्रीकडे कोणत्या दृष्टीनें पहात होते तें सांगण्याची जरूर नाहीं. दुसऱ्याच्या जीवितांचें साधन म्हणून जगणें या अत्यंत हीन कल्पनेची स्त्रीला आतां चीड आली आहे. व आपलें जीवन हेंही स्वतंत्रपणें ध्येय असूं शकतें आपल्यालाही स्वतंत्र व्यक्तित्व आहे हें जगाला निर्भयपणें सांगून त्यासाठीं वाटेल तीं दुःखें व हाल–अपेष्टा सोसण्यास ती तयार झाली आहे.

स्त्री–स्वातंत्र्य, स्त्री–पुरुषांची समता हे वाद उपस्थित झाले तेव्हां प्रथम त्यावर अनेक बाष्कळ, गंभीर, प्रामाणिक, कुत्सित अशा टीका होऊं लागल्या. देह, मन, बुद्धि या सर्व बाबतींत स्त्रीपुरुषांचीं सामर्थ्यें सारखीं आहेत असेंच नव्या पक्षाचें म्हणणें आहे, असें कल्पिलें जाऊन त्यावर लोक टीका करूं लागले. पण इतकें एकांतिक विधान कोणतीही विचारी स्त्री किंवा पुरुष करणार नाहीं, हें उघड आहे. साम्यवादाचे महाभोक्ते जे रशियन तेही असें म्हणत नाहींत. स्त्रीला वाटेल त्या क्षेत्रांत काम करण्यास तेथें मोकळीक आहे हें खरें. पण वाटेल तें याचा अर्थ विज्ञान सांगेल तें असा आहे. केवळ रूढीला तें अमान्य म्हणून स्त्रीला तेथें बंदी, असें नाहीं. शास्त्रीय युगाचा खरा अर्थ त्यांना समजल्यामुळें डोळे मिटून ज्ञान सांगणारा ऋषी किंवा लांब झगा घालणारा पाद्री या दोघांनाही त्यांनीं गुरुपदावरून हाकलून देऊन तेथें विज्ञानाची स्थापना केली आहे. प्रथम नृत्यगायनापासून लष्करापर्यंत सर्व क्षेत्रें त्यांनीं स्त्रियांना खुलीं करून दिलीं. आणि प्रत्येक ठिकाणीं वैद्यकीय तपासणी करून, दहा दहा वर्षांचे अनुभव जमेस धरून त्यावरून नियम बसविले. गर्भावर, अपत्यावर, किंवा स्वतः स्त्रियांच्या आरोग्यावर ज्यानें वाईट परिणाम होतो असें दिसेल तें काम स्त्रीला कायद्यानें बंद करण्यांत येते. कांहीं किलोमिटरच्यावर वजन उचलणें स्त्रीला सांगावयाचें नाहीं, स्फोटकद्रव्याच्या कार-

खान्यांत ड्रिलिंग, लोडिंग वगैरे कामें हीं त्यांनीं करावयाचीं नाहींत, इत्यादि नियम आहेत. पण गवंडीकाम, मोटार चालविणें, इंजनें चालविणें येथपासून वकील, न्यायाधीश किंवा मंत्री होणें हीं कामें त्यांना खुलीं आहेत. यावरून असे दिसेल कीं स्त्रीपुरुषांची समता ही आंधळ्या किंवा हेकट दुराग्रही दृष्टीनें मुळींच चालविलेली नाहीं. स्त्रियांना पगारही त्यांच्या कामाप्रमाणेंच मिळतो. बरोबरी आहे म्हणून काम कमी असलें तरी पगार तितकाच द्यावा असें नाहीं. तेव्हां असें स्पष्ट दिसतें कीं शरीर, मन, बुद्धि यांच्या सामर्थ्याच्या दृष्टीनें विज्ञानानें सांगितलेला प्रत्येक फरक नव्या लोकांना मान्य आहे व त्याअन्वयें त्यांनीं समाजरचनेंत भिन्न व्यवस्थाही केली आहे. पण असा फरक असला तरी, म्हणजे स्त्रीपुरुषांच्या कामाच्या क्षेत्रांत फरक असला तरी स्त्री–पुरुषांच्या योग्यतेंत फरक करावा हें त्यांना मान्य नाहीं आणि त्यामुळेंच स्त्रीचें पारतंत्र्यही त्यांना मान्य नाहीं.

स्त्रीच्या स्वातंत्र्याच्या बाबतींत एक अगदीं घोटाळ्याचा प्रश्न नेहमीं उपस्थित केला जातो. स्त्री शिकली आणि बुद्धीनें पुरुषाच्या बरोबरीची झाली तरी ती पुरुषापेक्षां केव्हांहि दुर्बलच रहाणार; आणि हें जोपर्यंत आहे तोपर्यंत आहे तिला स्वातंत्र्य देतां येणें शक्य नाहीं असें कांहीं लोक म्हणतात. येथें पारतंत्र्य आणि रक्षण या दोन शब्दांचा घोटाळा होत आहे. कांहीं झालें तरी स्त्री दुबळी रहाणार हें खरें असल्यामुळें तिला रक्षण हवें हें खरें आहे. पण रक्षण हवें याचा अर्थ पारतंत्र्य अवश्यक आहे असा मुळींच नाहीं. समाजांत फक्त स्त्रियाच दुबळ्या आहेत असें नाहीं. गेलीं शेंदोनशें वर्षें सर्व जगभर भांडवलवाले लोक मजुरांना पिळून काढीत आहेत. इंग्लंडमधील कारखान्यांत मजुरांचा अमानुष छळ होत असे. तेव्हां तो थांबविण्यासाठीं सरकारनें कायदे करून मजुरांचें रक्षण केलें. पण मजुरांना रक्षणाची जरूरी आहे म्हणून त्यांना पारतंत्र्यहि अवश्य आहे असें केव्हांहि कोणीहि म्हणालें नाहीं. तेंच स्त्रीच्या बाबतींत युक्त आहे. स्त्रियांना लोक पळवून नेतात म्हणून त्यासाठीं कडक कायदे करणें, किंवा एकटेदुकटे न हिंडण्याचा त्यांना उपदेश करणें हें योग्य ठरेल, आणि तसे कायदे किंवा तसा उपदेश हा इंग्लंड व अमेरिका या देशांतहि चालू आहे. पण तिला रक्षण जरूर आहे म्हणून ती मताधिकाराला लायक नाहीं, किंवा तिनें द्रव्यार्जन करणें युक्त नाहीं असें मुळींच ठरत नाहीं. स्वातंत्र्य हवें याचा अर्थ, जेथें मला धोका आहे तेथेंहि मला जाण्यास परवानगी असावी, असा स्त्रीहि कधीं करीत नाहीं. पण एवढें मात्र खरें कीं, समाजाच्या उन्नतीची सर्व काळजी आपल्यालाच आहे, स्त्री अगदीं थिल्लर व उथळ आहे, तेव्हां तिला धोका कशापासून आहे हेंहि आम्ही ठरविणार हा जो पुरुषांचा आग्रह तो स्त्रीला मान्य करणें शक्य नाहीं. तो मान्य करणें

म्हणजेच पारतंत्र्य. मनुस्मृतींत स्त्रियांना पारतंत्र्य सांगितलें आहे तेथें त्या शरीरानें दुर्बल आहेत, म्हणून सांगितलेलें नसून त्या अधम आहेत, रूप, वय न पहातां वाटेल त्या पुरुषाशीं संगत होतात, कितीहि काळजी घेतली तरी व्यभिचार करतात म्हणून त्यांना पारतंत्र्य असावें असें सांगितलें आहे. ( मनु. ९.१४,१५ ) केवळ शरीराचें दौर्बल्यच अभिप्रेत असतें तर त्यांना वेदमंत्रांचा अधिकार नाहीं, ब्रह्मचर्याचा अधिकार नाहीं असलें निर्बंध शास्त्रकारांनीं घातलें नसते. असो. तर मुख्य प्रश्न स्त्रीला आपण व्यक्ति समजतों कां वस्तु समजतो यावर अवलंबून आहे. जुने शास्त्रकार तिच्याकडे वस्तु म्हणून पहात असत. पण मनु वगैरे शास्त्रकारांचें स्त्रियांच्या शीलाबद्दलचें वर सांगितलेलें मत सर्वस्वीं चूक आहे. त्याहि एकनिष्ठा, गांभीर्य, कडक मनोनिग्रह, अविरत उद्योग इत्यादि पुरुषी मक्त्याचे गुण वाटेल त्या तीव्रतेनें दाखवूं शकतात, असा इतिहास निर्वाळा देत असल्यामुळें स्त्रीला रक्षणाची जरूर असली तरी त्यामुळें तिचें स्वातंत्र्य हिरावलें पाहिजे हें म्हणणें अगदीं अयुक्त आहे. नीच लोक स्त्रिया पळवतात, ते स्त्रियांना वेदमंत्रांचा अधिकार दिला, किंवा शिक्षण दिले, किंवा मताधिकार दिला तर जास्त प्रमाणावर पळवूं लागतील असें मुळींच नाहीं. उलट स्त्री शिकलेली असली तर पुरुषाप्रमाणेंच तिचा जगाचा अनुभव आणि विचारशीलता ही वाढणार असल्यामुळें वाईट लोकांच्या भूलथापा तिला चांगल्या उमगून तिचें रक्षणच जास्त होण्याचा संभव आहे. तेव्हां रक्षण आणि पारतंत्र्य यांचा एकच अर्थ कल्पून स्त्रीचें स्वातंत्र्य हिरावण्यांत कांहींच अर्थ नाहीं. स्त्रीपुरुषांच्या भिन्न कार्यक्षेत्राबद्दलहि हेंच म्हणतां येईल. ड्रिलिंग किंवा लोडिंग आलें नाहीं, दोन मण वजन उचलतां आलें नाहीं म्हणून, त्यावरून, आपण विवाह करावा कीं नाहीं, पति कोणचा निवडावा, अपत्यसुख भोगावें कीं नाहीं, याही बाबतींत आपल्याला स्वातंत्र्य असूं नये असला विचित्र न्याय मान्य करण्यास स्त्री तयार नाहीं. कमालीचें शारीरकष्ट करणारा शूर शिपाई, आणि सुखासनावर बसून संशोधन करणारा शास्त्रज्ञ यांचीं कार्यक्षेत्रें भिन्न असली तरी त्यांच्या योग्यतेंत जसा फरक नाहीं तसाच स्त्रीपुरुषांच्या बाबतींत, त्यांची कार्यक्षेत्रें भिन्न असलीं तरी फरक नसावा अशी नव्या स्त्रीची मागणी आहे. आणि ती सर्वथा न्याय्य असल्यामुळें ती जमेला धरूनच यापुढची गृहव्यवस्था केली पाहिजे. आणि त्याच दृष्टीनें बालविवाह, पुनर्विवाह, प्रेमविवाह, घटस्फोट इत्यादि प्रश्नांचाही विचार केला पाहिजे.

स्त्रीच्या विवाहाचें वय हा प्रश्न अनेक दृष्टीनें महत्त्वाचा आहे. स्त्रीपुरुषांची उच्च सुसंस्कृत मैत्री हें जरी विवाहाचें अंतिम ध्येय असलें तरी अपत्यांची निर्मिती

आणि संगोपन हा कांहीं कमी महत्त्वाचा प्रश्न नाहीं. समाजाच्या दृष्टीनें तर त्यालाच जास्त महत्त्व आहे. तेव्हां स्त्रीच्या मनाचा विकास, पतिपत्नीमधील सलोखा व अपत्यांची सुदृढता या तिहेरी दृष्टीनें स्त्रीच्या विवाहसमर्यीच्या वयाचा विचार केला पाहिजे.

या सर्वदृष्टीनें पाहातां विवाहसमयीं स्त्रीचें वय २० ते २२ व पुरुषाचें वय २५ ते २७ असावें असें अर्वाचीन शास्त्रज्ञाचें मत आहे. 'दी सेक्शुअल लाइफ ऑफ वूमन' या ग्रंथांत हेनरीक् कीश या पंडितानें या प्रश्नाचा फार बारकाईनें विचार केला आहे. तो म्हणतो कीं ऋतुप्राप्ति हें अपत्यक्षमतेचें मुळींच चिन्ह नाहीं. सुप्रजा निर्माण होईल अशी स्त्रीच्या शरीराची वाढ वीस वर्षांच्या आंत होत नाहीं ( पृ. २७, १६६ ). १५ ते ४५ हा स्त्रीच्या अपत्य निर्मितीचा काळ आहे. आणि समागम जितका लवकर होईल तितका हा काळ लवकर संपुष्टांत येत असल्यामुळें विवाह लवकर होणें हितप्रद नाहीं. लवकर विवाहित होणाऱ्या स्त्रीची प्रजनन शक्ति कमी होते. ( पृ. १६८ ) आणि २० वयाच्या आंत निर्माण होणाऱ्या अपत्यांत मृत्यूचें प्रमाणही जास्त असतें ( पृ. २३५ ) असें तो म्हणतो. हिंदुस्थानच्या १९३१ च्या सेन्सस रिपोर्टांतही असेंच सांगितलें आहे. त्यांच्या मतें लग्न लवकर झालें तर मुलें जास्त होतात पण त्यांतलीं मरतात जास्त. उशीरां लग्न केलें तर मुलें जगण्याचें प्रमाण. जास्त पडतें. ( पृ. २०६ ) 'कॉन्ज्युगल हॅपिनेस' या पुस्तकांत डॉ. लोवेनफील्ड यांनींही हेंच मत दिलें आहे. तो म्हणतो कीं वीसच्या आधीं विवाहित झाल्यानें जास्त स्त्रिया मृत्युमुखीं पडतात. १४ ते १८ या वर्षांत सर्वसाधारणच स्त्रियांच्या मृत्यूचें प्रमाण जास्त असतें. पण विवाहित स्त्रिया दरहजारीं १४ व अविवाहित ८ च मरतात. २० ते २५ या वयांत विवाहित व अविवाहित यांच्या मृत्युसंख्या जवळ जवळ सारख्या आहेत म्हणून वीस वर्षांच्या आंत विवाह करूं नये ( पृ. २९ ). Sellheim या जर्मन शास्त्रज्ञाचेंही मत आपल्यासारखेंच असल्याचें लोवेनफील्डनें सांगितलें आहे ( पृ. ३२ ). व्हॅन डी व्हेल्डे या स्विडिश शास्त्रज्ञानें फर्टिलिटी अँड स्टारिलिटी इन् मॅरेज या पुस्तकांत हेंच मत प्रकट केलें आहे ( पृ. १७५ ). स्त्रीचें आरोग्य व अपत्यांची सुदृढता याखेरीज आणखीही एक मुद्दा या शास्त्रज्ञांनीं सांगितला आहे. वीस वर्षांच्या आधीं अपत्यासाठीं स्त्रीच्या शरीराची जशी वाढ झालेली नसते तशीच मनाचीही झालेली नसते. मातृपदासाठीं अवश्य असणारा मनाचा जो विकास व्हावा लागतो तो या वयांत मुळींच झालेला नसतो. पंधराव्या सोळाव्या वर्षी मुलीच्या अंगचा हूडपणाही पुरता

गेलेला नसतो. आणि तो जाणें इष्टहि नसतें ( पृ. १६६ ) हा मुद्दा फारच महत्वाचा आहे. १५ ते २० हीं चार पांच वर्षें व्यक्तीच्या आयुष्यांत फार रम्य अशीं असतात. तारुण्याच्या बेफाट वृत्ति येथें जागृत होत असतात. नाना प्रकारचीं ध्येयें मनापुढें तरंगत असतात. आणि पूर्ण उच्छृंखलपणें व अनिर्बंधपणें जीविताकडे पाहाणें याच वयांत शक्य असतें. या वयांत तारुण्याचा खरा मानसिक आनंद व्यक्तीला मिळावयाचा असतो आणि कोणच्याही प्रकारची: शाश्वत स्वरूपाची जबाबदारी यावेळीं खांद्यावर आली तर व्यक्ति या अलौकिक सुखाला मुकते. हा केवळ सुखाचाच प्रश्न नाहीं. अनिर्बंध उच्छृंखलपणा, बेफामपणा हा मनाच्या वाढीला तर आवश्य आहेच, पण शरीरावरही याचें सुपरिणाम होतात. म्हणून या वयांत व्यक्तीवर शाश्वत स्वरूपाची कसलीच जबाबदारी नसणें हें फार अवश्य आहे. तारुण्याचीं हीं सुखें, अनिर्बंधतेचा हा आनंद आर्यस्त्रीला आज हजारों वर्षांत कधींच मिळालेला नाहीं. तो यापुढें तिला मिळणें न्याय्य व इष्ट आहे. म्हणून या वयांत तिच्यावर मातृपद लादणें हें अयुक्त आहे. कीश् लोवेन फील्ड, व्हेल्डे वगैरे शास्त्रज्ञांचीं मतें वर सांगितलीं. सुप्रसिद्ध पंडित हॅवेलॉक एलिस यांचेंही असेंच मत आहे. सॉयकॉलजी ऑफ सेक्स ( खंड ४ था आवृत्ति १९३५ ) या ग्रंथांत जर्मन न्युरॉलजिस्ट बेयर याचें प्रथम मत देऊन ( पृ. ३७८ ) नंतर आपलेंही मत स्त्रीचें वय वीसच्यावर असावें असेंच आहे ( पृ. ६३४ ), असें यानें म्हटलें आहे. पण एलिसच्या ग्रंथांत एक भानगड आहे. वैद्यकशास्त्रज्ञांचा पुरावा म्हणून त्यानें जो दिला आहे तो वीसच्या आंतील विवाहाला अनुकूल आहे. सोळाव्या वर्षीच्या आंतील स्त्रियांची प्रसूति सुखाची होते, त्यांचीं अपत्यें चांगलीं होतात, असाच शास्त्रीय पुरावा त्यानें दिला आहे. पण असें असूनही आपलें मत म्हणून देतांना त्यानें वीसनंतरच स्त्रीला अपत्य व्हावें असें दिलें आहे. हें पाहून आपले स्वयंमन्य समाजशास्त्रज्ञ जोशीबुवा त्यांच्यावर फारच संतापले आहेत. एलिसची विद्वत्ता बाहेर काढून ते म्हणतात ( हिंदूंचें समाजरचनाशास्त्र पृ. ३५७ ) शास्त्रीय ज्ञानाशीं विरोधी वर्तन करण्याचा कोणाही स्त्रीला किंवा पुरुषाला हक्क नाहीं. सोळाव्या वर्षाच्या आंत प्रजा झाली पाहिजे असें शास्त्रानें सांगितलें कीं ती झालीच पाहिजे. बुवांची ही शास्त्रावरची श्रद्धा पाहून कोणीही स्त्री किंवा पुरुष त्यांचें कौतुकच करील. कारण साऱ्या पुस्तकांत इतकी शास्त्रनिष्ठा त्यांनीं कोठेंच दाखविलेली नाहीं. पण वैद्यकीय पुरावा थोडा विरुद्ध असूनही एलिसनें विसाव्या वर्षाआधीं स्त्रीनें लग्न करूं नये असें म्हटलें आहे त्याचें कारण उघड आहे. मानवी समाजाबद्दल बोलतांना कोणत्याही

एकाच शास्त्राचा विचार करून कधीं भागत नाहीं. सेक्स इन सिव्हिलिझेशन या ग्रंथांत एका लेखकानें या प्रश्नाचें फार सुरेख विवेचन केलें आहे. तो म्हणतो, मानवी शास्त्रांचा फार मोठा दोष म्हणजे असा कीं एकाद्या प्रश्नाचा विचार करतांना एकाच अंगावर जोर देऊन इतर बाजूंचा तीं विचार करीत नाहींत. मानसशास्त्र हें व्यक्तित्वावर सर्व भर देऊन परिस्थितीचा विचारही करीत नाहीं. अर्थशास्त्र व समाजशास्त्र परिस्थितीवर सर्व भर देऊन मानवाच्या अंतःशक्तींना गौण मानतात. तर्कशास्त्र हें जीवनशक्तीचा विचार करीत नाहीं आणि जीवनशास्त्र व सुप्रजाशास्त्र हीं अगदीं हास्यास्पद एकांतिकपणा करतात. ही एकांतिक विचारसरणी हा मानवी शास्त्रामध्यें असलेला फार मोठा दोष आहे ( पृ. २४८ ). जोशी बुवांना हें ज्ञान नाहीं असें नाहीं. पण ज्ञानी असून अज्ञानी हीच तर बुवांची मुख्य खुबी आहे. व्यक्तीला जीवित ही मौल्यवान वस्तु वाटली पाहिजे, तिचा वीट येऊन उपयोग नाहीं. नाहींतर समाजस्वास्थ्य बिघडेल असें शास्त्र त्यांनींच सांगितलें आहे ( पृ. २८२ ). तरी पण अध्यात्मिक दृष्ट्या वीट आलाच पाहिजे असेंही तें म्हणतात. यावरून शास्त्रांनीं कांहीं सांगितलें तरी दुसऱ्या कांहीं सोयीसाठीं तें अमान्य करणें बुवांना पसंत आहे हें उघडच आहे. असो. मातेचें व मुलांचें आरोग्य, स्त्रीची मानसिक वाढ, इत्यादि सर्व दृष्टींनीं २०।२१ हेंच वय स्त्रीच्या विवाहाला कसें योग्य आहे हें आपण पाहिलें. सुप्रसिद्ध पंडित सर फ्रॅन्सिस गाल्टन याचेंही मत असेंच आहे. लवकर विवाह व्हावा असें त्याचें मत असें. तें कोणी बालविवाहाकडे खेचूं नये म्हणून त्याचा शिष्य कार्ल पियर्सन यानें खुलासा केला कीं सुदृढ व सुसंस्कृत स्त्रियांनीं २८, २९ या वयापर्यंत विवाह न लांबवितां २१, २२ या वयांतच विवाह करावा असें गाल्टनचें मत होतें ( लाईफ अँड लेटर्स ऑफ फ्रॅन्सिस गाल्टन खंड ३ पृ. २३३ ).

आणखी एका महत्त्वाच्या मुद्याचा विचार करावयास हवा. सेक्स इन सिव्हिलिझेशन या ग्रंथांत डॉ. हॅमिल्टन यांनीं कित्येक विवाहित स्त्रियांना समागमापासून उत्कट रतिसुख मिळत नाहीं, असें कां व्हावें या प्रश्नाचा विचार केला आहे. एकंदर नऊ कारणांचा विचार करून त्यांनीं शेवटीं असा निकाल दिला कीं ज्या स्त्रियांच्या मनावर लहानपणीं विषयसुख हें निंद्य, नीच प्रकारचें आहे, सभ्य माणसांनीं स्त्री–पुरुषांच्या भिन्न देहाचा विचार करणें पाप आहे इत्यादि संस्कार झालेले असतील त्या स्त्रिया वैवाहिक आयुष्यांत रतिसुखाला मुकतात. नकळत झालेले हे मनोगंड त्यांच्या सुखाच्या आड येतात. ह्या विचार करून निबंध संपवितांना त्यांनीं

स्त्रीच्या वयाचा विचार केला आहे. तेथें ते म्हणतात कीं प्रथम समागमाच्या वेळीं स्त्रीचें वय कमी असण्याचा रतिसुखावर वाईट परिणाम होत नाहीं, उलट चांगलाच होतो. पण हें सांगतांना लोकांनीं विपर्यास करूं नये म्हणून म्हणून त्यांनीं परिच्छेदाच्या आरंभींच सांगितलें आहे कीं पुढें दिलेल्या गोष्टींचें फक्त साहचर्य मानावें. त्यांत कार्यकारण संबध आहेच असें नाहीं. [Let us now consider matters related to the lack of climax, but not necessarily causes of it पृ ५७७ ] याचा स्पष्ट अर्थ असा कीं रतिसुख न मिळण्याचें खरें कारण म्हणजे लहानपणीं मनावर त्याविरुद्ध झालेले संस्कार हेच होत. ते जर नसतील तर वयाचा संबंध रतिसुखाशीं फारसा येणार नाहीं. इतकें स्पष्टीकरण स्वतः लेखकानें केलें असूनही आमच्या जोशीबुवांनीं त्याचा विपर्यास करून त्यांत कार्यकारण भाव जोडून दिला आहे ( पृ. ३४८ ).

मॅथ्यू डंकन याचे बाबतींत जोशांनीं असाच घोटाळा केला असावा असें वाटतें. पंधरा ते वीस हाच आयुष्याचा टप्पा स्त्रीच्या बाबतींत जास्त फलप्रद असतो असें डंकनचें मत म्हणून त्यांनीं दिलें आहे. ( पृ. ३४० ) पण डार्विनिझम व रेस प्रोग्रेस या पुस्तकांत हेक्रॅफ्ट म्हणतो—Mathew Duncan concludes that women who marry from twenty to twenty four are the most prolific and that, the only period which at all rivals this, is the five years from fifteen to nineteen inclusive (पृ.१४४). याचा अर्थ १५ ते २० हाच काळ जास्त फलप्रद असतो असा नसून ' मुख्यतः २० ते २४ हा काळ फलप्रद असतो, व १५ ते १९ हा काळ त्याची बरोबरी करूं शकेल' असा आहे.

Diseases of Women या आपल्या ग्रंथांत ग्लॅडसटन व जाइलस् या दोघां डॉक्टरांनीं मॅथ्यू डंकनच्या आकड्यांचा उताराच दिला आहे. त्यांत '१५ ते १९ च्या दरम्यान ज्या स्त्रिया लग्न करतात त्यांच्यांत वंध्यत्वाचें प्रमाण शेंकडा ७·३ असतें आणि २० ते २५ च्या दरम्यान लग्न करणाऱ्या स्त्रियांत हेंच प्रमाण शेंकडा शून्य असतें ' असें डंकनचें मत म्हणून त्यांनीं दिलें आहे ( पृ. ४०७ ). डंकनचें पुस्तक आज हातांत नाहीं, म्हणून मी नक्की सांगूं शकत नाहीं. पण जोशीबुवांची विनोदी वृत्ति ध्यानांत घेतली व वरील दोन उतारे पाहिले म्हणजे बुवांनीं घोटाळा केला असावा असेंच वाटूं लागतें.

रतिसुखाच्या बाबतींत आणखीहि एक महत्त्वाचा विचार डॉ. हॅमिल्टन यांनीं सांगितला आहे (पृ.५७६). ते म्हणतात—ऋतुप्राप्तीच्या आधीं चारपांच वर्षें काम-

सुखाच्या कल्पनाहि मुलीच्या मनांत न येणें हें तिच्या वैवाहिक आयुष्यांतील उत्कट रतिसुखाच्या दृष्टीनें फार हितावह आहे. या वयांत या विषयाची जाणीवहि ज्यांना नसतें, किंवा यापासून ज्यांना अलिप्त ठेवण्यांत येतें त्यांना विवाहानंतर रतिसुख जास्त मिळतें. ज्या या विषयांचा विचार करतात त्यांना तें मिळत नाहीं. यावरून या काळांत मुलीचा विवाह न करणें तिच्या पुढील रतिसुखाच्या दृष्टीनें किती हितावह आहे तें सहज ध्यानांत येईल. म्हणजे विवाह पंधरा वर्षांनंतर व्हावा एवढें तरी यावरून निर्विवाद सिद्ध होईल.

लोकसंख्येचा प्रश्न उपस्थित करून प्रौढविवाह व स्त्रीशिक्षण यावर एक मोठाच आक्षेप घेण्यांत येत असतो. जी स्त्री शिकत नाहीं ती पंधराव्या वर्षी प्रजोत्पादनास सुरवात करते व जी शिकते ती २३ व्या वर्षी करते. म्हणजे स्त्रीशिक्षण नाहीं तेथें १५ वर्षांनीं पिढी बदलणार व आहे तेथें २३ वर्षांनीं बदलणार. याचा अर्थ असा कीं एका शंभर वर्षांच्या अवधींत सुधारलेल्या व न सुधारलेल्या समाजांत प्रजेचें प्रमाण २० : ८० असें होणार. आणि म्हणून स्त्रीशिक्षण व त्यामुळें येणारा प्रौढविवाह हा घातुक आहे असा हा पक्ष आहे.

पण हें विवेचन अगदीं चुकीचें आहे. एक तर लवकर झालेली संतति जास्त मृत्युमुखीं पडते व मातांचें आरोग्यहि त्यानें बिघडतें असें बऱ्याच डॉक्टरांचें मत असल्याचें वर सांगितलेंच आहे. दुसरें असें कीं, हे जे दोन गट आहेत ते एकाच समाजांत असले, म्हणजे यांच्यांत मारामारी नसली तर समाजांतल्या अमुक एका गटांत प्रजा कमी होते याला भिण्याचें कांहींच कारण नाहीं. सांस्कृतिक दृष्ट्या जों जों वर जावें तों तों प्रजोत्पादनशक्ति कमी होते असें एक मत आहेच. पण तेवढ्यासाठीं संस्कृतिहीन रहाणें हें जसें आपण पत्करीत नाहीं, तसेंच येथें केलें पाहिजे. बरें, या दोन गटांत मारामारी आहे असें धरलें तर काय होईल याचा विचार आपण लोकसंख्येची वाढ व नियमन या प्रकरणांत केलाच आहे. युद्धांतलें यश हें संख्येवर मुळींच अवलंबून नसून कर्तृत्वावर असतें. ब्राह्मण, क्षत्रिय वगैरे मूठभर लोकांनीं चार हजार वर्षे हिंदुस्थानवर राज्य केलें तें संख्येच्या बळावर नसून अकलेच्या बळावर केलेलें आहे. तेव्हां अकलेच्या प्राप्तीसाठीं संख्या घटली तरी फारशी हरकत नाहीं. शिवाय हॅवलॉक एलिसचा, मागें एकदां सांगितलेला महत्त्वाचा उपदेशहि विसरणें युक्त नाहीं. समाजांतील शांतता व स्थिरता टिकून रहाण्याच्या दृष्टीनें पिढी लवकर पालटणें हें अगदीं अनिष्ट आहे असें तो म्हणतो. (टास्क ऑफ सोशल हायजीन पृ. १५१ ) या दृष्टीनेंहि बालविवाह अनिष्ट आहे.

माझ्यामतें बालविवाह हा स्त्रीच्या व्यक्तित्वाच्या विकासाच्या आड येतो, एवढाच मुद्दा त्याच्या निषेधास पुरेसा आहे. अपत्याचें संगोपन, गृहव्यवस्था, या

दृष्टीनें स्त्रीशिक्षण अवश्य आहेच. स्त्रीपुरुषसंबंधविषयक शिक्षण तिच्या रतिसुखाच्या व इतरहि अनेक दृष्टीनें तिला मिळणें हेंहि अवश्य आहे. आणि तिच्या मनाच्या वाढीच्या दृष्टीनें वाङ्मयीन शिक्षणाचीहि अवश्यकता आहे. असें असतांना भावी पिढीच्या दृष्टीनें तिला या सुखाला मुकविणें म्हणजे तिच्या स्वतःच्या जीविताचा विचार न करण्यासारखें आहे. भावीपिढीची जबाबदारी प्रत्येक स्त्रीपुरुषावर आहे यांत शंकाच नाहीं. पण तेवढयासाठीं उच्च संस्कृतीचा आनंद सर्वस्वीं नष्ट होत असेल तर ती काळजी करणें म्हणजे मूर्खपणाचें आहे. कारण समाज संस्कृतच्या वरच्या पायरीला जाणें, हें तर समाजाचें ध्येय आहे. आणि समाजांत स्त्रिया येतातच. तेव्हां प्रथम त्यांच्या मनोविकासाची काळजी घेणें हें अवश्यच आहे. पण सुदैवानें भावीपिढी आणि स्त्रीशिक्षण यांत विरोध येतच नाहीं. उलट भावीपिढीच्या दृष्टीनेंहि स्त्रीशिक्षण व प्रौढविवाह अवश्य आहे. तेव्हां प्रजेचा हा मुद्दा अगदींच फोल आहे.

स्त्रीच्या विवाहाच्या वयाचा येथवर विचार केला. पुरुषाच्या विवाहाचें २५ असावें असें शास्त्रज्ञांचें मत वर सांगितलेंच आहे. यांत महत्त्वाचा मुद्दा असा आहे कीं, स्त्री व पुरुष यांच्या वयांत ५ वर्षांचें तरी अंतर असलें पाहिजे. विसाव्या वयाला स्त्रीच्या देहाची व मनाची जी वाढ होते तीच पुरुषामध्यें होण्याला २५ वें वर्ष येतें. म्हणून हा फरक असणें जरूर आहे. कांहींच्यामतें जास्तींत जास्त अंतर दहा वर्षें असण्यास हरकत नाहीं. पण त्यापेक्षां जास्त अंतर असणें पतिपत्नींचें वैवाहिक सुख आणि पुढील प्रजा या दोन्ही दृष्टीनें अनिष्ट आहे. ( डॉ. हेनरीक् कीश् पृ. १६२ ). डॉ. लोवन फील्ड पृ. २८ ). यावरून १२ वर्षांची मुलगी व ३० वर्षांचा मुलगा किंवा ८ वर्षांची मुलगी व २४ वर्षांचा मुलगा असावा हें मनूचें मत ( मनुस्मृति ९·९४ ) विज्ञानाला मान्य नाहीं, एवढें तरी लोकांनीं ध्यानांत घ्यावयास हवें. धर्म, परलोक, मोक्ष या दृष्टीनें मुलगी किती वर्षांची असावी हें सांगणें शक्य नाहीं. कारण या बाबतींत कोणालाच कांहीं माहीत नसतें. आणखीहि एक गोष्ट अशी ध्यानांत येईल कीं पुरुषाला तीसपस्तीस वयानंतर विवाहाला परवानगी ठेवून स्त्रीला पुनर्विवाहाची बंदी ठेवणें हें सुप्रजेच्या दृष्टीनें फार घातुक आहे. ( कारण त्या पद्धतीनें पतिपत्नींच्या वयांत फार फरक पडतो. )

पुनर्विवाहाच्या बाबतींत आणखीही एक दोन मुद्यांचा विचार करणें अवश्य आहे. ज्या पुरुषाशीं स्त्री समागम करते त्याच्या वीर्याचा परिणाम तिच्यावर कायम राहून पुढें तिनें दुसरा पति वरिल्यास त्याः प्रजेवर पहिल्याचे परिणाम होतात असा

पूर्वी समज होता. यादृग्गुणेन भर्त्रा स्त्री संयुज्येत यथाविधि। तादृग्गुणा सा भवति समुद्रेणेव निम्नगा–( मनु ९-२२ ). या श्लोकांत हेंच तात्पर्य असावें असें वाटतें. आणि यामुळेंच प्राचीन शास्त्रकारांनीं स्त्रीला पुनर्विवाहाची बंदी केली असावी. पण एक तर ही कल्पना आतां असिद्ध ठरली आहे. इंग्रजींत हिला टेलिगनी असें नांव आहे व टेलिगनी असिद्ध आहे असें आतां शास्त्रज्ञांनीं मान्य केलें आहे. ( सायन्स ऑफ लाइफ–हक्सले व वेल्स, पृ. ३१० ) मागल्या लोकांचा टेलिगनीवर विश्वास होता म्हणून त्यांनीं विधवा पुनर्विवाहास बंदी करणें युक्त होतें असें कोणी म्हणेल व त्यांत थोडासा सत्यांशही आहे. पण केवळ सुप्रजेच्या दृष्टीनें पाहिल्यास अक्षतयोनि स्त्रियांना ही बंदी त्यांनीं करावयास नको होती. पण तीही त्यांनीं केली आहे. यावरून स्त्रीच्या सुखाचा ते सर्वांगीण विचार करीत नसत हेंच दिसतें. आणि हे नियम केवळ सुप्रजेच्या दृष्टीनेंच केले नव्हते हेही यावरून दिसतें. आणि मग मोक्षाच्या दृष्टीनें केलें असल्यास स्त्रीनें पुन्हां लग्न केल्यास तिला मोक्ष मिळणार नाहीं, व पुरुषानें केले तरी त्याला मिळेल हें त्यांनीं कसें ताडलें असावें हें नेमकें ध्यानांत येणें फार कठिण आहे. तें कांहीं असलें तरी, स्त्रीपुरुषांच्या वयांत फार अंतर असणें घातुक आहे, टेलिगनी असिद्ध आहे, आणि स्त्रीला जीवितांत सुख लागलें तरी चालेल असा नवा दृष्टिकोन आहे, म्हणून पुनर्विवाहाला बंदी करणें युक्त होणार नाहीं.

प्रेमविवाह हा विवाहाचा नवीनच प्रकार अलीकडे रूढ होत आहे. तो अत्यंत इष्ट आहे यांत शंकाच नाहीं. पण त्या बाबतींत बऱ्याच भ्रामक समजुती रूढ झाल्या आहेत त्यांचा विचार केला पाहिजे. जिचें मी तोंडही पाहिलें नाहीं त्या मुलीशीं माझा संसार सुखानें कसा व्हावा, अशा तऱ्हेचा प्रश्न प्रेमविवाहाच्या बाजूनें लोक विचारतात. पण यांत गृहीत धरलेली कल्पना चूक आहे. कारण पूर्ण परिचयानंतर, मनें एकमेकांवर पूर्णपणें अनुरक्त झाल्यानंतर जरी विवाह केला तरी तो सुखाचा होतोच असें नाहीं. युरोपांतील बहुतेक सर्व विवाह प्रेमविवाहच होतात. तरी कित्येक वेळां विवाहाच्या दुसऱ्याच दिवशीं घटस्फोटासाठीं अर्ज झालेले दिसतात. ' ट्रू स्टोरी ' या अमेरिकेंतील मासिकांत बहुतेक सर्व कथा प्रेमाच्याच आहेत. त्या वाचल्या म्हणजे प्रेम ही एक फारच विचित्र कल्पना आहे, तिला नियम असा एकही सांगतां येणार नाहीं असें स्पष्ट दिसून येतें. विवाहाच्या आधीं असलेलें प्रेम दोन दिवसांत किंवा कित्येक वेळां दहा वर्षांनीं सुद्धां नाहीसें होतें. तर उलट आरंभीं मुळींच प्रेम नसतांना विवाहानंतर हळूहळू प्रेम जडतें. पुष्कळ वेळां प्रेम

जडलें असें वाटून विवाह करावा तर कांहीं वर्षांनीं असें ध्यानांत येतें कीं अरे तें खरें प्रेम नव्हतें. ती केवळ विषयवासना होती. प्रेमाचे प्रकार हे असे आहेत. पण उलट लहानपणीं आईबापांनीं लग्नें लावून दिलीं तर तीं सुखाचीं होतात हेंही खरें नाहीं. म्हणून शेवटीं विवाहांतील सौख्य हें केवळ नशिबावर अवलंबून आहे हें जेन ऑस्टिनचें म्हणणेंच खरें वाटूं लागतें. पण हें कांहीं असलें तरी विवाहाला पतिपत्नीमधील प्रेम अवश्य आहे हें निर्विवाद आहे. आणि तें प्रेम दोन व्यक्ति जितक्या सम संस्कृतीच्या असतील तितकें जास्त शक्य आहे हेंही खरें आहे. या बाबतींत जुने लोक नेहमीं असें विचारतात कीं आमच्यां बायका शिकलेल्या नव्हत्या तरी आमचें काय बिघडलें ? आमचे संसार सुखाचे झालेच ना ? यावर या लोकांना असा प्रश्न विचारतां येईल कीं समजा जातिभेदाचे निर्बंध आपल्याकडे नाहींत, तर अशा स्थितींत कैकाड्याच्या मुलीशीं तुम्ही लग्न कराल कां ? आणि करणार नसाल तर कां करणार नाहीं ? हें लोक या प्रश्नाला नेमकें उत्तर देऊं शकणार नाहींत. पण आपल्याला देतां येईल. तें उत्तर असें कीं कैकाडीण अशिक्षित असते आणि यांनीं निवडलेली मुलगी सुशिक्षित असते. यांच्या ज्या स्वच्छतेच्या कल्पना असतात, त्याच तिच्या असतात आणि कैकाडणीच्या नसतात. रोज अंग धुवावें, वस्त्रें स्वच्छ असावीं, केसांत उवा नसाव्या या गोष्टी मराठे, ब्राह्मण, प्रभू, इत्यादि उच्च वर्गां-तल्या मुलींना शिकविलेल्या असतात. त्याचप्रमाणें राम, सीता हीं नांवें उच्चारलीं तर ब्राह्मण मुलीला कांहीं बोध होतो तो कैकाडणीला होत नाहीं. आणि या मुलीला हा बोध होतो म्हणूनच या वरील मंडळींचा संसार तिच्याशीं सुखानें होऊं शकतो. स्वच्छता नसेल, राम, सीता, रामायण, महाभारत या कल्पनाच माहीत नसतील, शुद्धवाणीचा अभाव असेल, विनयाचें शिक्षण नसेल तर जुन्या लोकां-नाही संसारांत राम वाटणार नाहीं. आणि ते त्या वेळीं जे उद्गार काढतील त्याची भाषा जरी निराळी असली तरी त्याचा अर्थ हाच असेल कीं स्त्री सुशिक्षित नाहीं. त्या वेळीं जर कैकाडी जवळ असला तर तो असेच म्हणेल कीं माझा संसार कोठें वाईट झाला ! राम सीता माहीत नसले म्हणून काय बिघडलें ? केस रोज विंच-रले नाहींत म्हणून काय झालें ? त्याचा हा प्रश्न जसा वेडगळ तसाच मुलीला कालि-दास, शेक्सपियर नाहीं आला म्हणून काय झालें, केशरचना सुरेख आली नाहीं म्हणून काय बिघडलें हाही प्रश्न वेडगळ आहे. याचा अर्थच असा कीं आचार-विचा-रांच्या ज्या पायरीवर मी उभा आहे त्याच पायरीवर माझी पत्नी उभी असावी असें पुरुषाला वाटत असतें.

वेस्टर मार्कनें आपल्या फ्यूचर ऑफ मॅरेज या ग्रंथांत आपले म्हणून नमूद केलेले अनुभव या दृष्टीनें मननीय आहेत. तो म्हणतो– पतीच्या बौद्धिक जीवनांत स्त्री जेथें सहकार्य करते तो विवाह जितका सुखप्रद होतो तितका इतर कधींच होत नाहीं. आणि सांस्कृतिक समता हेंच या सुखाचें कारण म्हणून त्यानें दिलें आहे. त्यानें असेंही सांगितलें आहे कीं कॉलेजमध्यें एकत्र शिकत असलेल्या तरुण-तरुणींमध्यें जे विवाह होतात त्यांत सुखी दंपतींचें प्रमाण इतर विवाहापेक्षां पुष्कळच जास्त असतें. अमेरिकेंतील एकंदर विवाहांत दर ७ विवाहांत १ घटस्फोट होतो. तर कॉलेजमधून झालेल्या विवाहांत ७५ विवाहांत १ घटस्फोट असें प्रमाण पडतें ( पृ. ४१ ). या गोष्टींचाही अर्थ असाच कीं पतिपत्नी समभूमिकेवर असतील तर विवाह जास्त सुखप्रद होतो. सायन्स ऑफ लिव्हिंग या पुस्तकांत अलफ्रेड ॲडलर यानें हेंच मत दिलें आहे. तो म्हणतो कीं पतिपत्नींचें नातें जेव्हां पूर्ण समतेचें असेल तेव्हांच प्रेमाला योग्य मार्ग लागून विवाह सुखाचा होईल.

प्रेमविवाहाला, आणि स्त्रीपुरुषांच्या सांस्कृतिक समतेला शास्त्रज्ञ पाठिंबा देत असले तरी दर्शनी प्रेम, हुरळतें प्रेम, शब्दांतीत असलेलें असें कांहीं प्रेम याचा ते निषेधच करतात. प्रेम हा विकार असला तरी विचाराच्या सुकाणूवांचून जर तो भरकटूं लागला तर विवाहनौका खडकावर आपटण्याचा संभव जास्त आहे असें त्यांचें मत आहे. प्रेमविवाह ( Love–marriage ) आणि विचारपूर्वक केलेला विवाह ( Marriages of reason ) असा फरक करून दुसऱ्या पद्धतीनें केलेले विवाह जास्त सुखप्रद होतात असें ब्लॉक् यानें आपलें मत दिलें आहे. ( Sexual-life of our Times पृ. २०४ ) वेस्टर मार्कचेंही तेंच मत आहे.

या सर्वांचा निष्कर्ष असा कीं विवाहांत आणि विवाहापूर्वी प्रेम हें अत्यंत आवश्यक असलें तरी तें आंधळें असून उपयोगी नाही. व्यक्तीचें कुल, शिक्षण, तिचे आचारविचार हे जितके सम असतील तितकी प्रेमाला स्थिरता जास्त येणार असल्यामुळें केवळ दर्शनी प्रेमाकडे लक्ष न देतां वरील सर्व गोष्टींकडे लक्ष पुरविलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर आरोग्य, सांपत्तिक स्थिति या गोष्टींचाही त्यांत विचार झाला पाहिजे. हा सर्व विचार वधूनें किंवा वरानें एकटयानेंच करावा असें कोणींच म्हणणार नाहीं. पण आपलें एकमेकांवर प्रेम बसेल कां नाहीं याचा जो कांहीं थोडा अदमास करावयाचा तो त्यांना बराच शक्य असल्यामुळें त्यांना त्यांत प्राधान्य दिलें पाहिजे यांत वादच नाहीं. त्या वयांत ते विकारी असल्यामुळें वाटेल ती निवड करतील हें म्हणणें युक्त वाटत नाहीं. कारण एक तर तें खरें नसतें.

आणि दुसरें म्हणजे आईबाप हें कामविकारांनीं वाहवलेले नसले तरी इतर अनेक विकारांनीं वाहवलेले असतात. हुंड्याच्या आकड्यावर मुलामुलींचा सवदा पटविणारे पुष्कळ आईबाप आजही आहेत. म्हणून पतिपत्नींनाच स्वतःची निवड करूं देणें हें फार इष्ट आहे. प्रेमाची शक्यता त्यांत जास्त आहे हें तर खरेंच, पण दोघांच्याही व्यक्तित्वाला त्यांत अवसर मिळाल्यामुळें त्यांत मनाचा विकासही साधत असतो. माझ्यामतें तर हाच फायदा सर्वांत मोठा असतो. प्रेमविवाहाच्या बाबतींत हॅवलॉक एलिसचें मत पुढीलप्रमाणें आहे. प्रेमानें ज्या निवडी होतात त्या वाटेल तशा व समाजाला हानिकारक होतात असें नाहीं, तर उलट हितप्रदच होतात. प्रेम हें आंधळें असतें हें तितकेंसें खरें नाहीं. त्यांतही कांहीं नियम सांपडताच. इतकेंच नव्हे तर सुप्रजाशास्त्रानें केलेली निवड आणि प्रेमानें केलेली निवड यांत फारसा फरक पडणार नाहीं. ( टास्क ऑफ् सोशल हायजिन पृ. २०५, २०९ ). असें खरोखरच असेल तर फारच चांगलें आहे.

या सर्व विवेचनाचा सारांश असा कीं स्त्रीपुरुषांतली उत्कट मैत्री हें विवाह संस्थेचें जें ध्येय आहे तिला प्रेम हें अत्यंत अवश्य आहे. पतिपत्नीमध्यें सांस्कृतिक समता जितकी जास्त तितकी प्रेमाची शक्यताही जास्त असते आणि मातृपितृपदाची जबाबदारी ज्यांच्यावर टाकण्यास आपण तयार होतों त्यांच्यावर परस्परांची निवड करण्याची जबाबदारी टाकणें हें मुळींच वाईट नाहीं. स्त्रीपुरुषांची उत्कट, अनन्य मैत्री हें एक अत्यंत श्रेष्ठ प्रकारचें मानसिक सुख आहे आणि पूर्ण आत्मनिग्रह करूनच तें मिळविणें शक्य असतें. अनन्यतेची भूक सर्वांनाच असते. पण मनाची विशेष वाढ झालेली असल्याखेरीज तें अनुभवण्याची पात्रता व्यक्तीला कधींच येत नाहीं. ' ए वूमनस् बेस्ट इयरस् ' या पुस्तकांत वुल्फ म्हणतो ' एक पत्नी हा विवाहाचा अत्युच्च प्रकार होय. पण या श्रेष्ठ सुखाचा आस्वाद घेण्याइतकी फारच थोड्या व्यक्तींची मानसिक वाढ झालेली असते. ' लेखकाचें हें म्हणणें अगदीं खरें आहे. आणि म्हणून इतर मानसिक सुखाची आवड समाजांत वाढविणें हें जसें समाजनेत्यांचें काम आहे तसेंच या सुखाची आवड वाढविणें हेंही आहे. आपण अनन्य न होतां दुसऱ्यानेंच फक्त असावें अशा असत् अभिरुचीचेच सामान्यतः लोक असतात. म्हणजे अनन्य निष्ठेची किंमत अनन्य निष्ठेनें देण्यास लोक तयार नसतात. ती देण्यास लोक ज्या समाजांत जास्त तयार होतील तो समाज जास्त सुखी होईल.

आतांपर्यंत जें विवेचन केलें तें केवळ शास्त्राकडे दृष्टि ठेवून, उत्तम व्यवस्था कशी असूं शकेल, या धोरणानें केलें. पण मानवाचें मन, सृष्टीची रचना, आणि

५४०७

सृष्टिकर्ता कोठें असला तर त्याची शक्ति, ही सर्व दोषपूर्ण असल्यामुळें उत्तम म्हणून ठरविलेल्या नियमांना पावलोंपावलीं अपवाद आणि मुरडी घालाव्या लागतात हें कोणाहि जाणत्याच्या ध्यानांत येईल. स्वाभिमान हा सद्‌गुण फार श्रेष्ठ असें आपण मानतों. आणि त्यावांचून जिणें व्यर्थ असेंहि समजतों. पण व्यवहारांत उतरलेल्या कोणाहि माणसाचा अनुभव विचारला तर तो असेंच सांगतो कीं स्वाभिमान ठेवून कोठेंच चालत नाहीं. जेथें नमणें अत्यंत दुःसह वाटतें तेथेंहि पावलोंपावलीं नमावें लागतें. सत्य भाषण करावें, क्षमावृत्ति असावी इत्यादि नियमांची हीच स्थिति आहे. असत्य हें अपवादात्मक नसून जगाचा तोच नियम होऊन बसलेला दिसतो. आणि स्वाभिमान, सत्यनिष्ठा यांना चिकटून कोणी स्वतःचें नुकसान करून घेऊं लागला तर व्यवहारी लोक त्याला मूर्ख समजतात. स्वाभिमान पराकाष्ठेचा ठेवला तर केवळ व्यवहारी दृष्टीनेंच तोटा होतो असें नसून ज्या स्वाभिमानासाठीं आपण हाल सोसण्यास तयार होतो तोच उतरत्या स्थितीला लागतो. सृष्टिरचनेची ही अपूर्णता, हा दोष ध्यानांत घेऊनच समाजांतली कोणचीहि संस्था उभारली पाहिजे. आणि विवाहाकडे याच दृष्टीनें पाहिलें तर घटस्फोटाला कोणचाहि समंजस मनुष्य विरोध करणार नाहीं असें वाटतें.

आयुष्याच्या पहिल्या पहिल्या प्रहरांत एकमेकांवर अनुरक्त झालेल्या सुदृढ तरुण–तरुणींनीं संसार थाटावा, आणि शेवटच्या प्रहरांत दोघांनींहि एकदमच येथून जावें यापेक्षां जास्त सुंदर, रम्य, मनोहर असें काय आहे ? पण या रम्यतेकडून जगाच्या उग्र, कठोर परिस्थितीकडे दृष्टि टाकली तर लगेच यापेक्षां जास्त अशक्य असें काय आहे, असा अत्यंत खेदजनक प्रश्न मनापुढें उभा रहातो. या रम्य व्यवस्थेला आपल्या मृत्यूच्या दुर्लंघ्य नियमांनीं सृष्टि पहिला तडाखा देते. पण तो तडाखा जेथें नाहीं तेथेंहि मानवाचें अपूर्ण मन पावलोंपावलीं अनंत अडचणी निर्माण करून या सुंदर ध्येयाचें वाटोळें करून टाकीत असतें. स्त्रीपुरुषांचे स्वाभिमान, एकमेकांवर कितीहि निष्ठा असली तरी मधूनच निर्माण होणाऱ्या विवाहबाह्य कामवासनेच्या ऊर्मी, आपल्या घेऱ्यांत धरून सर्वस्वाचा विध्वंस करून टाकणारीं व्यसनें, आणि मानवी स्वभावांतले इतर अनंत दुर्गुण, यांनीं आरंभीं एकमेकांसाठीं प्राणत्याग करण्यास तयार असलेल्या पतिपत्नींना पुढें पुढें एकमेकांचा सहवासहि दुःसह होऊन जावा अशी भयाण परिस्थिति निर्माण होते, त्यामुळें ध्येयदृष्टीला दिसणाऱ्या त्या रम्य दृश्यावरून डोळे ओढून घेऊन या विकट परिस्थितींतून वाट काढण्यासाठीं जरा कमी रम्य अशा दृश्यावर नजर ठेवावी लागते. पत्रिका पहाण्यासारख्या वेडगळ

पद्धतीपासून, एकमेकांचें स्वभाव अजमावणें, संस्कृतीची समता राखणें, आरोग्य-दृष्ट्या तपासणें, आर्थिक स्थिति लक्षांत घेणें, इत्यादि शास्त्रमान्य अशा पद्धतीपर्यंत कोणच्याहि दृष्टीनें कितीही काळजी विवाहाच्या आधीं घेतली तरी शेवटपर्यंत विवाहसंबंध सुखप्रद राहतील अशी हमी देतांच येत नाहीं. मानवीस्वभाव आणि सृष्टींतल्या घडामोडी आपल्याला इतक्या अगम्य आहेत. असें असतांना सर्वज्ञत्वाचा आव आणून एकदां जडविलेला प्रत्येक विवाहसंबंध आमरण कायम टिकलाच पाहिजे अशी सक्ति करणें हें सर्वथा अयुक्त होय. तसा उपदेश असावा यांत वादच नाहीं. पण जेथें सहवास दुःसह होऊन सुखप्राप्ति होत नसेल तेथें त्यांतून सुटण्यास समाजानें मार्ग करून दिला पाहिजे एवढेंच दुसऱ्या पक्षाचें म्हणणें आहे.

विवाह हा फक्त स्त्रीपुरुषांच्याच सुखाचा प्रश्न नसून अपत्यांच्याहि सुख-दुःखाचा त्यांत विचार होणें अवश्य आहे म्हणून घटस्फोट मान्य करणें चूक आहे असा एक पक्ष आहे. पण कित्येक वेळां पतिपत्नीचे संबंध इतके विकोपाला गेलेले असतात, किंवा व्यसनामुळें किंवा अन्य कारणामुळें पुरुष इतका राक्षसी झालेला असतो कीं अपत्यांच्या हितासाठींच घटस्फोट अवश्य होऊन बसतो. आणि हें सर्व लक्षांत घेऊनच घटस्फोट सुकर व्हावा असें आजचे सर्व विचारी पुरुष सांगत आहेत. घटस्फोटाचे प्रसंग कमी यावे असें त्यांनाहि वाटतें. पण कायदा हा त्यावर उपाय नसून शिक्षणानें मनाची संस्कृति वाढविणें हा उपाय आहे असें त्यांचें मत आहे.

हिंदुस्थानांत अनेक जातींत घटस्फोट रूढ आहे. आणि कांहीं वरच्या जातींत तो रूढ नसल्यामुळें त्या आपल्याला या बाबतींत श्रेष्ठ मानतात. एकनिष्ठा, शाश्वतता, आणि तज्जन्य सुख या बाबतींत त्या श्रेष्ठ आहेत हें खरेंच आहे. पण घट-स्फोटाची परिस्थितीच आपणापुढें नाहीं असा जो भोळसट मोठेंपणा त्यांनीं जिवाशीं धरला आहे तो चूक आहे. पुरुषांनीं या बाबतींत आपली सोय करून घेतलीच आहे. आणि मनूनें त्याना तशी परवानगीही दिली आहे. पती कितीही नीच, व्यसनी असला तरी त्याला देवासमान मानावें असें स्त्रियांना सांगणाऱ्या मनूनेंच ( ५.१५४ ) स्त्री मर्जीप्रमाणें वागत नसेल, रोगी असेल, किंवा फार काय नुसती जास्त खार्चिक असेल तर पुरुषानें दुसरें लग्न करावें असा उपदेश केला आहे. ( ९.८० ) आणि यामुळें जर ती पहिली स्त्री रागावून निघून गेली तर तिला टाकून द्यावी असा सल्ला दिला आहे. याच्या युक्तायुक्ततेचा विचार जरी केला नाहीं तरी यावरून एवढें खास दिसतें कीं एकदां जडविलेला विवाहसंबंध आमरण टिक-विलाच पाहिजे, तो मोडतां येत नाहीं, असें आर्यांचेंही मत नव्हतें. मानवाचें अज्ञान

व सृष्टिरचनेंतली दोषपूर्णता लक्षांत घेऊन ध्येयवादाला मुरड घालण्यास आर्यांचीही हरकत नव्हती. फरक एवढाच कीं दुसरें लग्न करून आपण सुखी झाल्यानंतरही आपल्या पहिल्या स्त्रीनें तिच्या माहेरीं किंवा अन्यत्र आपल्या नांवानें रडत बसावें यांत आर्य पुरुषाला जी लज्जत आहे ती घटस्फोटवादी पंडितांना नाहीं. आपल्याशीं तिचें जमलें नाहीं तर अन्य पुरुषांशीं विवाह करून तिनें सुखी होण्यास हरकत नाहीं असें त्यांना वाटतें.

घटस्फोटाचा पश्चिमेकडील इतिहास पाहिला तर तो कायद्यानें बंद केला तर कमी होतो, किंवा कायद्यानें परवानगी दिली तर जास्त वाढतो असें मुळींच दिसत नाहीं. आणि घटस्फोट सोपा केल्यानें गृहसंस्थेचा नाश तर होणार नाहींच, तर उलट तेथली वजबज नाहींशी होऊन तिला जास्तच गांभीर्य प्राप्त होईल असें हॅवलॉक् एलिस व वेस्टरमार्क या दोघा मोठ्या शास्त्रज्ञांचें मत आहे. ( व्हिदर मनकाईंड पृ. २१४ ) आणि एकांगी घटस्फोटाच्या बाबतींत म्हणजे पुरुषानें स्त्रीला टाकण्याच्या बाबतींत मनूचेंही तेंच मत असल्यामुळें त्यांत थोडी सुधारणा केली तर सनातन्यांनींही ती मान्य करण्यास हरकत करूं नये असें वाटतें. पहिल्या स्त्रीला रडवीत ठेवण्यामध्यें जें सुख आहे तें नाहींसें होईल एवढाच तोटा त्यांत आहे.

प्रेमविवाह, पुनर्विवाह, घटस्फोट, संतति-नियमन, इत्यादि सुधारणा मान्य करण्यास पुरुष तयार होत नाहींत याचें कारण एकच आहे. स्त्री हा एक नाठाळ प्राणी असून बंधनें शिथिल होतांच वाटेल तो स्वैराचार करून समाजाच्या घाताला तो प्रवृत्त होईल, असलीं मनुप्रणीत मतेंच त्यांनीं अजून धरून ठेवलेलीं आहेत. समाजाच्या सुखाची काळजी, आणि जबाबदारी फक्त आपल्यालाच आहे असें त्यांना वाटतें. पण आज शेकडों वर्षांच्या अनुभवानें ही कल्पना खोटी ठरली आहे. बौद्धिक क्षेत्रांत पुरुषाची अल्पही बरोबरी स्त्रीनें अजून केली नसली, तरी आत्मनिग्रह, निष्ठा, जबाबदारीची जाणीव आणि उच्च ध्येयासाठीं प्राणाहुतीही देण्याइतकी उज्ज्वल तपश्चर्या, इत्यादि अनेक गुण स्त्रियांनीं व्यक्त केले आहेत. वास्तविक स्मृतिकालाच्या पूर्वीच रामायण—महाभारतांतील इतिहास घडला असल्यामुळें स्मृतिकारांच्या ही गोष्ट लक्षांत यावयास हरकत नव्हती. पण अनुभव जमेस न धरतां, परिस्थितीकडे न पाहातां या विषयांत तरी रूढ कल्पनाच पुन्हां पुन्हां बडबडण्याच्या सनातन चालीमुळें शास्त्रकारांनीं ही गोष्ट जमेला धरलीच नाहीं. पण युरोप अमेरिकेंतल्या आजच्या स्वैराचारी समजल्या जाणाऱ्या समाजाकडे

जरी दृष्टि टाकली तरी बंधनें अत्यंत शिथिल असतांनाही वाटेल त्या परिस्थितींत एकनिष्ठ राहणाऱ्या, अलौकिक स्वार्थत्याग करणाऱ्या, निग्रही अशा अनेक स्त्रिया, संख्येनेंही आर्य स्त्रियांशीं तुलना होईल इतक्या स्त्रिया, त्या समाजांत निर्माण होतात असें दिसत असल्यामुळें स्त्रीच्या स्वभावाबद्दलचें स्मृतिकारांचें हीन मत आज कोणीही विचारी मनुष्य मान्य करणार नाहीं आणि त्यामुळें मानवी सुखांत भर घालणाऱ्या वरील सुधारणांना तो विरोधही करणार नाहीं.

स्त्रीस्वातंत्र्य, विवाहाचें वय, विधवाविवाह, प्रेमविवाह, घटस्फोट इत्यादि अनेक प्रश्नांची चर्चा करून शास्त्रज्ञांच्या मतानें नव्या गृहसंस्थेचें स्वरूप कसें असावयास हवें आहे तें आपण पाहिलें. आणि त्यामुळेंच मानवाच्या सुखांत भर पडून समाज जास्त बलिष्ठ होईल हेंही आपल्या ध्यानांत आलें. अपत्यसंगोपन, स्त्रीचें आर्थिक स्वातंत्र्य, सगोत्रविवाह इत्यादि यांशीं संलग्न असलेल्या प्रश्नांची अजून चर्चा करावयाची आहे. ती पुढील प्रकरणीं करून हा लांबलेला विषय आटपता घेऊं.

---

# अपत्यसंगोपन व इतर कांहीं प्रश्न.

पहिल्या लेखांत विवाहाच्या मूल हेतूंची चर्चा करून अनन्यनिष्ठेची मानवी मनाला असलेली पिपासा तृप्त करणें हें तिचें अंतिम ध्येय असें आपण ठरविलें. नंतर तें धोरण डोळ्यापुढें ठेवून गृहसंस्थेचें नवें स्वरूप कसें असावयास पाहिजे याबद्दल चर्चा केली. आतां गृहाच्या अंतर्गत व्यवस्थेशीं संबद्ध असलेल्या कांहीं प्रश्नांची चर्चा करावयाची आहे. या प्रश्नांतील पहिला आणि सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे अपत्यसंगोपन हा होय.

फार पुरातन काळापासून समाजांतील, बुद्धिजीवी वर्ग आणि बुद्धिजीवी नाहीं, पण सुखवस्तु आहे असा जो वर्ग, त्या वर्गांतील लोकांच्या स्त्रिया चूल व मूल या उद्योगांतच गढून गेलेल्या असत. शेतकरी, कोष्टी व इतर मेहनतीचीं कामें

करणारे जे लोक त्यांच्या स्त्रियांना चूल व मूल संभाळून शिवाय नवऱ्याच्या उद्योगांतही साहाय्य करणें भाग पडत असे. पण असें असलें तरी शेती, वीणकाम हीं कामें घराच्या आसपास असल्यामुळें व विशेषतः स्त्री त्यांत बांधली जात नसल्यामुळें तीं कामें अपत्यसंगोपनाच्या आड येत नसत. आणि त्यामुळें स्त्रीचा इतर उद्योग व अपत्य संगोपन यांत तेढ कधींच येत नसे. पण अलीकडे सुशिक्षित स्त्रियांत स्वातंत्र्य, समता या भावनांचा उदय झाला आणि काबाडकष्ट करणाऱ्या स्त्रियांच्या कामाचें स्वरूप बदलून गेलें, आणि त्यामुळें अपत्यसंगोपनाच्या बाबतींत नवीनच प्रश्न उपस्थित झाले आहेत.

नव्या युगांत सुशिक्षित स्त्रीला आपल्या व्यक्तित्वाची जाणीव झाल्यामुळें तिला आर्थिक स्वातंत्र्य हवेसें वाटूं लागलें. पण अपत्यसंगोपनाची जबाबदारी दिवसांतून चोवीस तास सारखी अंगावर असल्यामुळें स्त्रीचें आर्थिक स्वातंत्र्य आणि तिच्यावर निसर्गानें लादलेलें अपत्यसंगोपन यांमध्यें विरोध निर्माण झाला. तेव्हां दळणकांडण, शिवणटिपण, आणि पाश्चिमेकडे तर स्वयंपाकही, हीं कामें पुष्कळशी बाजारांत होऊं लागल्यामुळें त्या कामांतून स्त्री जशी मोकळी झाली, तशीच ती अपत्यसंगोपनाच्या जबबदारींतूनही मोकळी होऊं शकेल कीं काय, विज्ञानाला तिला यांतून सोडवून पुरुषाशीं सर्व दृष्टीनें समभूमीवर आणून सोडणें शक्य होईल किंवा असें या प्रश्नाचा विचार नवे लोक करूं लागले.

अंगमेहनत करणाऱ्या स्त्रियांच्या संसारावरही नव्या परिस्थितीचा परिणाम झालेला आहे. एवढें खरें कीं त्यांची पूर्वीची स्थितिही मोठीशी समाधानकारक नसल्यामुळें त्यांच्या पूर्वीच्या आणि आतांच्या जीवनांतील फरक वरच्या वर्गांतील स्त्रीच्या जीवनांत पडूं पाहणाऱ्या फरकाइतका जाणवत नाहीं. दारिद्र्य आणि अज्ञान यांमुळें या वर्गाची संस्कृति अगदीं हीन असल्यामुळें निसर्गनियमानें प्रजा होणें व ती वाढणें या पलीकडे अपत्यांना कांहीं धोरणानें हेतुपुरस्सर वाढविणें हीं संगोपनाची कल्पना त्यांच्यात मुळांतच नव्हती. आईला पोटासाठीं कष्ट करणें प्राप्त असल्यामुळें अपत्याकडे सारा वेळ लक्ष देणें तिला पूर्वीही शक्य नव्हतें पण असें असलें तरी, म्हणजे त्यांची स्थिति पूर्वीही अगदीं असमाधानकारक होती हें खरें असलें तरी हल्लीं ती त्यापेक्षांही वाईट झाली आहे हेंही खरेंच आहे. कारण बाळंतपणाची वेळ अगदीं जवळ आली म्हणजे जुन्या काळीं, काम घरचेंच असल्यामुळें, स्त्रीला थोडी तरी विश्रांति घेणें शक्य होतें. तसेंच मूल आजारी असलें म्हणजे तिला घरीं बसणें शक्य होतें. आणि कोष्टी, विणकरी यांचीं पुष्कळशीं

कामें घराच्या आसपास असल्यामुळें मुलाकडे वरचेवर लक्ष देणें हेंही तिला शक्य होतें. पण अलीकडे गिरण्या व इतर कारखाने यांमध्यें स्त्री ही कामाला बांधली जात असल्यामुळें वर सांगितलेल्या अल्प सोयीही नष्ट झाल्या आहेत. आणि त्यामुळें अपत्यांच्या आरोग्यावर फार वाईट परिणाम होत आहे.

अशा तऱ्हेच्या अनेक अडचणींमुळें अपत्य-उत्पादनाचें नाहीं तरी निदान अपत्यसंगोपनाचें काम स्त्रीकडून काढून घरांतील इतर कामांप्रमाणेंच सामुदायिक पद्धतीनें केलें तर बरें असें कांहीं विचारी लोकांना वाटूं लागलें.

यांतच आणखी कांहीं तात्त्विक विचार करणाऱ्या लोकांच्या अनुकूलतेची भर पडली. सामान्यतः स्त्री ही अशिक्षित असते त्यामुळें व ती कितीही शिकली तरी त्याच विषयाला वाहून घेतलेल्या परिचारिकेइतकी ती निपुण होणें शक्य नसल्यामुळें अपत्य-संगोपनाला आई ही लायकच नाहीं असें कांहीं पंडित सांगूं लागले. याशिवाय सामुदायिक पद्धतीचे इतर जे फायदे तेही प्रत्येक घरीं मुलें निरनिराळीं वाढविल्यानें मिळत नाहीत असें दिसूं लागलें. मुलें एकत्र ठेवलीं म्हणजे अनेकांना मिळून एक डॉक्टर मिळूं शकतो, खेळण्याची नाना तऱ्हेची साधनें घेणें परवडतें व इतरही आरोग्यकारक परिस्थितीचे फायदे मिळूं शकतात. प्रत्येकाचीं मुलें निरनिराळीं ठेवलीं तर हें कधींच शक्य नाहीं. याही दृष्टीनें घरामध्यें मुलें वाढविण्यापेक्षां त्यांच्यासाठीं स्वतंत्र संस्था काढूनच त्यांना वाढविणें बरें असें लोकांना वाटूं लागलें.

अशा तऱ्हेचे विचारप्रवाह सुरूं झाल्यावर त्याअन्वयें तशी व्यवस्थाही कांहीं ठिकाणीं सुरूं झाली. मातेला व अपत्याला मुद्दाम कायमचें वियुक्त करून अपत्याचें संगोपन करणाऱ्या संस्था फारशा निघाल्या नाहींत हें खरें पण मातेचा मृत्यु किंवा इतर कांहीं पापमय कारणें यांनीं आपोआप मातेपासून तुटलेलीं जीं बालकें त्यांच्यासाठीं संस्था स्थापन करण्यांत आल्या व तेथें आपल्या अपत्यसंगोपनाच्या नव्या कल्पना कितपत यशस्वी ठरतात याचा अनुभव त्या विचाराचे समाजसुधारक पाहूं लागले.

या संस्थांतील बालकांची स्थिति पाहून शास्त्रज्ञांनीं जे अनुभव नमूद करून ठेवले आहेत, त्यावरून पाहातां अपत्याला आईपासून वियुक्त करून त्याचें स्वतंत्रपणें संगोपन करण्याची कल्पना ही अत्यंत हानिकारक असून अपत्याचें आरोग्य व मानसिक वाढ या दोन्ही दृष्टींनीं ती अतिशय घातुक आहे असें आढळून आलें आहे.

अगदीं एकदोन वर्षांच्या आंतील लहान्या बालकांच्या आरोग्यापासूनच या प्रश्नाचा विचार करण्यास आपण सुरवात करूं.

मुलाचें संगोपन आईकडूनच होण्यांत मुख्य मुद्दा आईच्या अंगावरच्या दुधाचा असतो. आणि अनुभवाअंतीं असें आढळलें आहे कीं आईच्या अंगावर न पिणाऱ्या मुलामध्यें अंगावर पिणाऱ्या मुलांपेक्षां मृत्यूचें प्रमाण तिप्पट असते. बर्थ कंट्रोल अँड् युजेनिक्स या निबंधांत हॅवलॉक एलिस यानें हें मत सांगितलें आहे. वरचें दूध पिणाऱ्या मुलांत मृत्यूचें प्रमाण जास्त असतेंच; पण आईखेरीज इतर स्त्रीच्या अंगावरचें दूध पिणाऱ्या मुलांतही मृत्यू जास्त होतो असें तो म्हणतो. मात्र हें प्रमाण त्या बाबतींत तिपटीवरून दुपटीवर येतें, एवढीच बरी गोष्ट आहे. लिऑनस् येथील संस्थेवरील अधिकारी व्हिट्रे याचाही अनुभव असाच आहे. अंगावरचें दूध पिणारीं मुलें शें. १२ मेलीं तर वरचें दूध पिणारीं शें. ३३ मरतात असें त्यानें म्हटलें आहे. ( अपत्यसंगोपनासंबंधाची ही व पुढील माहिती आणि कांहीं अवतरणें डॉ. वेस्टरमार्क यांच्या फ्यूचर ऑफ मॅरेज इन् वेस्टर्न सिव्हिलिझेशन या पुस्तकांतून घेतलीं आहेत. पृ. १५९ ते १६४ ). हें झालें आरोग्यासंबंधीं. मुलांच्या मनाच्या विकासाच्या बाबतींतही शास्त्रज्ञांचें मत संस्थांतील संगोपनाला प्रतिकूलच आहे. अमेरिकेंत १९३१ सालीं व्हाइट हाऊस कॉन्फरन्स ऑन चाइल्ड हेल्थ अँड प्रोटेक्शन या नांवाची एक परिषद् भरली होती. तिच्यांतील शास्त्रज्ञांनीं असा अभिप्राय दिला आहे, कीं अपत्यांच्या मनोविकासाला गृहांतील जीवन अत्यंत अवश्य आहे. संस्थेंतील जीवनांत मनोविकास होणें शक्य नाहीं. फ्लॉइड डेल यानें तर थोडें पुढें जाऊन असें सांगितलें आहे कीं, संस्थेंतील मुलें अगदीं हीन, दुर्बल व तेजोहीन अशीं होतात. असा अनुभव आल्यामुळें अमेरिकेंतील डॉक्टरांनीं एक नवीन पद्धत सुरू केली. अनेक कारणानें अपत्यहीन असलेल्या स्त्रियांची संख्या अमेरिकेंत बरीच मोठी आहे. अशा स्त्रियांना अपत्यांची हौस अनिवार असते. तेव्हा हें लक्षांत घेऊन या डॉक्टरांनीं अशा स्त्रियांना संस्थेंतील मुलें कायमची दत्तक देण्याची पद्धत सुरू केली. आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं संस्थेंतील वैद्यकीय मदत, निष्णात दायांची शुश्रूषा, शास्त्रीय पद्धतीची उपकरणीं व खेळ यापैकीं कांहीही या दूधघरामध्यें ( Foster Homes ) नसूनही तेथें या बालकांची वाढ पुष्कळच चांगल्या प्रकारें होऊं लागली.

या मुद्याला वरवर दिसतें त्यापेक्षां फारच विलक्षण महत्त्व आहे. संस्थेपेक्षां आईजवळ मूल चांगलें वाढावें हें सयुक्तिक दिसतें. कारण तेथें अंगावरचें दूध आणि

खरी ममता यांचा प्रश्न असतो. पण खरी आई सोडली तर इतर कोणाही व्यक्तीपेक्षां सर्व साधनांनीं सिद्ध अशी संस्था श्रेष्ठ ठरेल असेंच कोणालाही वाटेल. पण तसें न होतां संस्थेपेक्षां दूधघर व दूधआई ( Foster Mother ) हींच श्रेष्ठ ठरतात. असें कां व्हावें ?

पति आणि पत्नी यांच्या बाबतींत अनन्यनिष्ठेचें जें तत्त्व सांगितलें तेंच येथेंही लागू पडतें, असें थोड्या विचारा-अंतीं ध्यानांत येईल. युरोपांतील इस्पितळांतील दाया अलीकडे पुष्कळच चांगल्या असतात. भाडोत्रीपणा त्यांच्यांत मुळींच नसतो. तरी पण अनेक मुलें एकीच्या ताब्यांत असल्यामुळें आणि तीही वरचेवर बदलत असल्यामुळें सर्वस्वीं एकटीच्या स्वाधीन केलेल्या बालकावर स्त्री जसें वात्सल्य ओतूं शकेल तसें दाईला कालत्रयींही शक्य नाहीं. हें मूल कायमचें आपलें आहे, व दुसऱ्या कोणाचें नाहीं व पुढेंही होणार नाहीं ह्या कल्पनेंत कांहीं निराळाच रस आहे. आणि त्याच्या बळावरच अहोरात्र कष्ट करून या रोपट्याला वाढविण्याची शक्ति स्त्रीच्या आंगीं येत असते. आणि सर्व साधनांनीं युक्त अशा संस्थेपेक्षां सामान्य घरांत, मानलेल्या आईजवळही मुलें चांगलीं वाढतात या अनुभवावरून मोठ्या वयांत जाणतेपणीं जी अनन्यनिष्ठेची भूक व्यक्तीला असते, तीच लहान वयांत नेणतेपणीं कां होईना, पण बालकालाही असते असें म्हणावें लागतें. आज, उद्यां आणि पुढें अनंत काळपर्यंत हें बालक आपलें आहे ही जाणीव, हें समाधान स्त्रीला असल्यामुळें ती त्याची अनन्य भावनेनें जोपासना करते. आणि आरोग्याच्या साधनापेक्षां त्या बालकाला या अनन्य प्रेमाचीच अपेक्षा जास्त असल्यामुळें त्याच्या मनाची व त्याचमुळें शरीराचीही वाढ तेथेंच चांगली होते.

गृहसंस्थेंत आमूलाग्र क्रांति करून टाकणाऱ्या रशियांतहि अपत्यसंगोपनाच्या बाबतींत हाच अनुभव आला आहे. बालकें व माता यांच्या संरक्षणासाठीं रशियांत जें स्वतंत्र सरकारी खातें आहे त्यावरील मुख्य अधिकारी डॉ. लिविदेवा यांनीं अगदीं निःसंदिग्ध भाषेंत आपलें मत दिलें आहे. त्या म्हणतात, सध्यां तरी आमच्या सरकारी संस्थांपेक्षां गृहामध्येंच अपत्यें चांगलीं वाढतात. मानसिक व शारीरिक अशा दोन्ही दृष्टीनें आमच्या संस्थांतील बालकें गृहांतील बालकांपेक्षां दुबळीं असतात, असें प्रत्येक ठिकाणीं आढळून आलें आहे.

याचा अर्थ हाच कीं भिन्नतेची व तज्जन्य उत्कट प्रेमाची मानवी मनाला फार आवश्यकता आहे. त्याच्या अभावीं मानवाचें शरीरबळ, मानसिक बळ व कर्तृत्व सर्वस्वीं नष्ट होईल; आणि हें ध्यानांत घेतलें तर अपत्यसंगोपनाच्या जबाबदारींतून स्त्री कधींहि मोकळी होणें शक्य नाहीं असें दिसेल.

पण या बाबतींत असें बजावून लिहिण्याची जरूरच नाहीं. कारण अपत्य-संगोपन ही जशी जबाबदारी आहे, त्याचप्रमाणें तें एक फार श्रेष्ठ प्रकारचें सुखहि आहे. आणि तें स्त्रीला आहे एवढेंच नसून पुरुषालाहि आहे. तेव्हां या जबाबदारींतून स्त्री मोकळी होणार नाहीं असें म्हणण्यापेक्षां, राष्ट्रीय भावनांचे संस्कार, आरोग्य, मानसिक वाढ इत्यादि हेतूसाठींहि अपत्यें आईपासून दूर करून शास्त्रज्ञ तिचें सुख हिरावून घेऊं शकणार नाहींत, असेंच म्हणणें अनेक स्त्रियांना पसंत पडेल.

पण मग स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न कसा सोडवावयाचा असा पेच येऊन पडतो. स्त्रीच्या किंवा कोणाच्याहि व्यक्तित्वाच्या विकासाला आर्थिक स्वातंत्र्याची अत्यंत आवश्यकता आहे. चाळीसपन्नास रुपयेच का असेनात, पण ते माझे स्वतःचे आहेत व त्यांच्या जोरावर जगांत मी स्वतंत्रपणें राहूं शकेन, या जाणिवेची पुरुषी मनाच्या विकासाला जशी आवश्यकता असते तशीच स्त्रीच्या मनालाहि असते. माझा मी स्वतंत्र आहे ही भावना कर्तृत्वाच्या उदयाला अत्यंत अवश्य आहे. मला तर असें वाटतें कीं आजपर्यंत स्त्रीला मानवी संस्कृतीच्या कोणच्याहि अंगांत विशेष कर्तृत्व जे कधींच दाखवितां आलें नाहीं, त्याचें कारण हेंच असावें. विज्ञान, वाङ्मय, कला, राजकारण, इत्यादि बाबतींत शरीरसामर्थ्याची अपेक्षा नसूनहि स्त्रिया उच्च पदाला कधींच फारशा गेल्या नाहींत. चूल आणि मूल या उद्योगानें त्यांना इकडे लक्ष देण्यास वेळ होत नाहीं हें एक कारण आहे. पण तें तितकेसें विचारांत घेण्याजोगें नाहीं. कारण दिवसांतून पंधरापंधरा तास सुद्धां पोटासाठीं काम करणाऱ्या वर्गांतून अनेक थोर पुरुष उदयाला आले आहेत. शिवाय ज्यांच्या स्त्रियांना चूल व मूल हे उद्योग पुष्कळ अंशीं नोकरांवर सोपवितां येतील, असा वर्ग प्रत्येक समाजांत असतोच. त्यांच्या स्त्रियांनींहि म्हणण्यासारखे पुरुषी तोलाचें कर्तृत्व फारसें दाखविलेलें नाहीं. तेव्हां वेळाचा अभाव हें तितकेसें निर्णायक कारण होऊं शकणार नाहीं. क्षणाक्षणाला प्रत्येक बाबतींत प्रत्यक्ष भासमान होणाऱ्या पराधीनपणामुळें स्त्रीच्या मनाची वाढच होणें शक्य झालें नाहीं हें तें कारण असावें असें वाटतें. नवनिर्मितीची प्रतिभा (originality) स्त्रीच्या मनाला मुळींच नाहीं, असें अन्फेअर सेक्स या पुस्तकांत व्हाइट हेडनें म्हटलें आहे. आणि आतांपर्यंतच्या इतिहासावरून तें खरें आहे असें दिसतें. पण आतांपर्यंत तिच्यावर लादली गेलेली मानसिक गुलामगिरी हें त्यास कारण असावें असें वाटतें. इंग्रजी अमदानीपूर्वीचा हिंदुस्थानचा एक हजार वर्षांचा इतिहास पाहिला तर स्वतंत्रपणें अभिजात नवी कृति करणारे पुरुष किती सांपडतील ? ज्ञानेश्वर, भास्कराचार्य, एकनाथ, शिवाजी, रामदास ! संपली यादी

कला, विद्या, वाङ्मय, राजकारण; वैदिक संशोधन, शास्त्रीय संशोधन, नवीन सामाजिक विचार, या क्षेत्रांत अत्यंत अल्प कां होईना पण कांहीं तरी नवीन कल्पना किंवा विचार काढणारे, रीत दाखविणारे लोक तेव्हां हाताच्या बोटावर मोजण्याइतकेहि झाले नाहींत. याचें कारण हेंच कीं वेदान्त, श्रुति, स्मृति यांच्या एका विशिष्ट पन्हळींतूनच त्यांचें मन वहात होतें. आणि वाटेल त्या पन्हळींतून वहावयास मोकळीक असल्यावाचून नवीन कल्पना सुचणें अशक्य आहे. तीच गोष्ट स्त्रीच्या बाबतींत झाली असावी. पूर्ण स्वातंत्र्यावांचून मनाचा विकास नाहीं आणि तो नसेल तर नाविन्य, प्रतिभा हीं अशक्य आहेत. युरोपच्या इतिहासांत असेंच दिसतें. ख्रिस्ती धर्माची भयंकर शब्दनिष्ठा जसजशी कमी होऊं लागली, तसतसे शास्त्रज्ञ निर्माण होऊं लागले. हा नियम गणितांतील नियमाइतका जरी खरा नसला, आणि गुलामी परिस्थितींतहि स्वतंत्र विचाराचे लोक निर्माण झाल्याचीं कांहीं उदाहरणें असलीं तरी नवनिर्मितीला बुद्धि योग्य होण्यास मनाच्या स्वातंत्र्याची जरूर आहे, हें फारसें विवाद्य आहे असें वाटत नाहीं.

पण स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या आड चूल आणि मूल या दोन गोष्टी येतात त्यामुळें तो प्रश्न मोठा विकट होऊन बसला आहे. पैकीं चुलीचा प्रश्न सहज सोडवितां येण्याजोगा आहे आणि युरोपांतील राष्ट्रांनीं तो बहुतेक व रशियानें तो पूर्णपणें सोडविलाहि आहे. शिजलेलें उत्तम अन्न बाजारांत ठेवणें हें कांहीं शक्यतेच्या पलीकडे नाहीं. विज्ञानाच्या मदतीनें वाटेल तितकें अन्न अशा रीतीनें बाजारांत आणतां येईल. आणि तें अन्न घरीं आणून नेहमींप्रमाणेंच जेवणें केलीं तर कुटुंबसुखांत कोणचाही बिघाड होण्याचें मुळींच कारण नाहीं. सर्वांनीं मिळून एकत्र जेवणें याला किंमत आहे. यानें सुख खास वाढतें. पण अन्न स्वच्छ असल्यानंतर त्याचें शिजवणहि घरांत झालें असलें पाहिजे या विचाराला तितकीशी किंमत नाहीं.

पण अपत्याचा प्रश्न जास्त महत्त्वाचा आहे. आर्थिक स्वातंत्र्य हवें असेल तर अन्न खानावळींत शिजवावें या व्यवस्थेला स्त्री कबूल होईल. पण अपत्याचें तसें नाहीं. आपल्याला अपत्य असावें, ही जबर वासना स्त्रीला असतें आणि त्याचें संगोपन करावें यांत तिला परमकाष्ठेचें सुख असतें. आणि अपत्याच्या दृष्टीनेंहि तेंच इष्ट आहे. पण अपत्य आणि आर्थिक स्वातंत्र्य यांचा सध्यांच्या समाजव्यवस्थेंत तर फारच विरोध आहे. बाळंतपणाच्या आधीं व मागून कांहीं महिने स्त्रीला पूर्ण विश्रांतीची जरूर असते. आणि नोकरी किंवा दुसरें कोणचेंहि स्वतःच्या अंगावर घेतलेलें काम करूनही विश्रांति घेणें तिला शक्य नाहीं. त्याचप्रमाणें अर्थार्जनासाठीं दिवसांतून

७।८ तास तरी तिला पूर्ण मोकळीक असली पाहिजे. अपत्यसंगोपन अंगावर घेतल्यावर स्त्रीला ती मिळणें शक्य नाहीं. आणि त्यामुळें सध्यांच्या परिस्थितींत विवाह झाल्यानंतर स्त्रीला अर्थार्जन केवळ अशक्य होऊन बसलें आहे. युरोप–अमेरिकेंतहि विवाहानंतर द्रव्यार्जन करणाऱ्या स्त्रिया फारच थोड्या असतात.

स्त्रीचें आर्थिक स्वातंत्र्य व अपत्यसंगोपन यांतील ही तेढ सोडविण्यास अनेकांनीं अनेक उपाय सुचविले आहेत. कोणी म्हणतात कीं अपत्याचें उत्पादन व संगोपन हें एक सामाजिक कार्यच समजावें व इतर कामासाठीं जसें व्यक्तीला आपण वेतन देतों, तसें या कामासाठीं द्यावें. पतीच्या प्राप्तीपैकीं कांहीं भागावर स्त्रीचा कायद्यानें हक्क ठेवावा असें कांहीं म्हणतात. पण रशियानें या बाबतींत फार सुरेख व्यवस्था केली आहे. स्त्री कोणत्याहि ठिकाणीं कामावर असली तरी तिला बाळंतपणाच्या आधीं व मागून दोनदोन महिने भरपगारी रजा मिळावी; असा तेथें कायदा आहे. या कायद्यानें त्या दिवसांतहि काम केल्यामुळें गर्भावर होणारे वाईट परिणाम टळले. क्रेश या संस्था स्थापून सरकारनें दुसरीहि अडचण नाहीशी केली आहे. क्रेश या बालकांच्या संस्था असून तेथें दिवसांतून ७।८ तास मुलें संभाळण्याची व्यवस्था केलेली असते. प्रत्येक कारखान्याशेजारीं अशा संस्था असून त्या मुलांना पाजण्यासाठीं दर तीन तासांनीं आयांना अर्धा तास सुट्टी मिळण्याची सोय असते. या व्यवस्थेमुळें स्त्रीच्या मार्गांतल्या सर्व अडचणी नाहींशा झाल्या असून तिला आर्थिक स्वातंत्र्य व अपत्यवात्सल्य हीं दोन्ही सुखें मिळविणें सुलभ झालें आहे. शिवाय मातेपासून बालक कायमचें वियुक्त करण्यांत जे तोटे असतात तेहि येथें नाहींत. उलट पांचसहा तास मूल निराळें झालें तर तें बरेंच असतें. आणि मुलालाहि आरोग्याची तपासणी, समवयस्क मुलांची संगत, खेळण्याचे अनेकविध प्रकार हे मिळून पुन्हां घरहि मिळतें. म्हणजे त्या दृष्टीनेंहि ही व्यवस्था उत्तम आहे.

रशियांतील ही व्यवस्था उत्तम आहे हे खरें; पण त्याबरोबरच असें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं जोंपर्यंत ही व्यवस्था समाजानें केली नाहीं, तोंपर्यंत विवाहित स्त्रीनें द्रव्यार्जनाच्या फंदात पडणें सर्वस्वीं घातुक ठरेल. दुर्दैवानें ज्या हजारों स्त्रियांना ही दुहेरी जबाबदारी संभाळणें भाग आहे, त्यांची स्थिति अत्यंत शोचनीय झालेली आपण पाहातोंच. तेव्हां ज्यांना द्रव्यार्जन न करूनही भागण्याजोगें आहे त्यांनीं तें करूं नये, हेंच त्यांच्या व अपत्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनें युक्त आहे.

प्रत्येक दंपतीला किती अपत्यें असावीं ह्या प्रश्नालाही कौटुंबिक सुखाच्या दृष्टीनें फार महत्त्व आहे. पंधरा ते पंचेचाळीस या वयांत जितकीं अपत्यें होणें

शक्य आहेत तितकीं होऊं द्यावीं, हा ' नैसर्गिक निवड ' या पक्षाचा आग्रह कसा घातुक आहे हें मागें लोकसंख्येचा वाढीचा व नियमनाचा विचार केला तेव्हां दाखविलेंच आहे. आहे हीच लोकसंख्या टिकवून धरण्यासाठीं ( कित्येक देशांत तीही जरूर नाहीं. ) प्रत्येक दंपतीला दोन तरी अपत्यें असणें अवश्य आहे. हीं दोन्हीं तारुण्यांत येऊन स्वतः दोन अपत्यें निर्माण करीपर्यंत जगतीलच अशी खात्री नसल्यामुळें आणखी अपत्यें होणें इष्ट आहे. या सर्वांचा हिशेब करून प्रत्येक दंपतीला चार तरी अपत्यें असावींत असें शास्त्रज्ञांनीं सांगितलें आहे. ग्रोटजेन या जर्मन अभ्यासकानें चालू लोकसंख्या टिकवून धरण्यास सरासरी ३.८ अपत्यें कुटुंबामागें असावींत असें म्हटलें आहे. पण ही संख्या फार मोठी आहे, वास्तविक २.५ च्या वर सरासरी आकडा असण्याची जरूर नाहीं, असें हॅवलॉक् एलिसनें आपलें मत दिलें आहे. ( व्हिदर मनकाइंड पृ. २२३ ).

प्रत्येक दंपतीला सरासरी चार अपत्यें असावीं असें लिओनार्ड डार्विनचें मत आहे. मानसशास्त्राच्या दृष्टीनें विचार करून चार ते पांच मुलें असावींत असें मॅक्डुगलनें मत दिलें आहे. त्याच्या मतानें अशी थोड्या थोड्या वयाच्या अंतराचीं मुलें एकाच घरांत असल्यानें बालकांच्या मनाची वाढ होण्यास फार सुकर होतें. हे आणि मागें सांगितलेले विचार ध्यानांत घेतले तर चारपांच मुलांपलीकडे जास्त मुलें होणें इष्ट नाहीं, हें ध्यानांत येईल. मुलांचें आरोग्य व आईचें सुख या दोन्ही दृष्टीनें हीच मर्यादा चांगली आहे. आणि हें मान्य केल्यास संततिनियमनाचें व अपत्यसंगोपनाचें शिक्षण प्रत्येक स्त्रीला देणें अत्यंत अवश्य आहे हें मान्य करणें ओघानेंच प्राप्त होतें.

विवाहसंस्थेच्या मूलतत्त्वांचा व वैवाहिक जीवनाचा इतक्या अनेक अंगांनीं विचार केल्यानंतर सध्यां आपल्या समाजांत विवाहाच्या बाबतींत प्रचलित असलेल्या एका महत्त्वाच्या रूढीचा विचार करणें अस्थानीं होणार नाहीं. सगोत्रविवाहनिषेध ही ती रूढी होय.

आज दोन हजार वर्षें हिंदु समाजानें सगोत्रविवाह हा अत्यंत निषिद्ध मानलेला आहे. असा विवाह केला तर ती स्त्री चांडाळी व तिचा पुत्र हा चांडाळ होतो असा कांहीं स्मृतिकारांचा अभिप्राय आहे. सगोत्र स्त्रीशीं विवाह करणें हें गुरुतल्पगमनाइतकें नीचपणाचें कृत्य आहे असें धर्मपंडितांचें सांगणें आहे. तेव्हां तें खरें आहे किंवा काय याचा आपणास विचार केला पाहिजे.

सगोत्रविवाह करूं नये असें म्हणणाराचें मत पुढीलप्रमाणें आहे. क आणि ख ह्या दोन व्यक्तींचें गोत्र एकच ( उदा. शांडिल्य ) आहे असें समजूं. आतां

शास्त्रकारांच्या मतें याचा अर्थ असा आहे कीं या दोन व्यक्तींचीं कुलें सध्यां एक-मेकांस कितीही अपरिचित व कितीही दूरचीं अशीं असलीं तरी त्या दोन व्यक्तींचे लांबचे पूर्वज एकाच कुळांत जन्मलेले असले पाहिजेत. गोत्र शांडिल्य आहे, याचा अर्थच हा कीं शांडिल्य हा त्या दोघांचा एकच पूर्वज होता. आणि ज्या दोन व्यक्तींचे पूर्वज एक आहेत, त्यांनीं आपापसांत रक्तसंबंध करणें, हें प्रजेच्या दृष्टीनें अगदीं घातुक आहे.

सगोत्राप्रमाणेंच आणखीही कांहीं गोत्रांचे आपापसांतले विवाह निषिद्ध मानलेले आहेत. जामदग्न्य व वत्स, बाभ्रव आणि कौशिक, वासिष्ठ आणि कौंडिण्य इत्यादि जोड्या प्रसिद्धच आहेत. कौशिकगोत्री यांनीं कौशिक गोत्रीयांशीं लग्न नाहींच करावयाचें. पण बाभ्रव गोत्रीयाशींही करावयाचें नाहीं. या दोन गोत्रांचें आपापसांत जमत नाहीं असें व्यवहारांत म्हणतात. सगोत्र विवाहाच्या निषेधाला जें कारण आहे तेंच कारण येथें आहे. ज्या दोन गोत्रांचें जमत नाहीं, असें सांगितलेलें असते त्या दोन्ही गोत्रांचें प्रवर एक असतात. तीन प्रवरांपैकीं निदान एक तरी प्रवर सारखा असतो. आणि प्रवर याचा रूढ अर्थ ह्या कुळांतील पूर्वज असा असल्यामुळें जी सगोत्राची अडचण तीच सप्रवरांना येते.

सगोत्राप्रमाणेंच सपिंडविवाहाचाही शास्त्रकार निषेध करतात. बापाकडून सात पिढया व आईकडून पाच पिढया जे सपिंड असतील, त्यांचे आपापसांत विवाह होऊं नयेत असें शास्त्र आहे. मेहेंदळे व मराठे हीं दोन उदाहरणें घेऊं. मेहेंदळे यांचें गोत्र विष्णुवर्धन व मराठे यांचें कपि. यांनीं आपापसांत लग्न करण्यास मुळींच हरकत नाहीं. मराठे कुळांत आलेल्या मेहेंदळ्यांच्या मुलीला जो मुलगा होईल तो अर्थातच कपिगोत्री होणार. त्या मुलीच्या भावाला झालेल्या मुलीचें गोत्र विष्णु-वर्धनच राहाणार. पण असें जरी असलें म्हणजे या दुसऱ्या पिढींतील मुलाचें व मुलीचें गोत्र जरी निराळें असलें तरी ती मुलगी या मुलाला सपिंड होते, म्हणून तिच्याशीं लग्न करणें शास्त्रकारांच्या मतें युक्त नाहीं.

सगोत्र, सप्रवर व सपिंडविवाहनिषेधाच्या अशा मर्यादा आहेत. यांतील पहिले दोन निषेध कडकपणें पाळले जातात. तिसरा ब्राह्मणांच्याही सर्व पोटजातींत पाळला जात नाहीं. मामे बहिणीशीं लग्न करणाऱ्या ब्राह्मणांतही पुष्कळ पोट-जाती आहेत.

सगोत्र, सप्रवर व सपिंड विवाहाचा हा जो निषेध सांगितला आहे, याच्या बुडाशीं पुढील तीन कल्पना गृहीत धरलेल्या आहेत.

( १ ) गोत्राचें नांव हें रक्तसंबंधामुळेंच मिळालेलें नांव आहे.

( २ ) प्रत्येक कुलाचे जे प्रवर सांगितलेले आहेत, ते त्या कुळांतील पूर्वजच होत; आणि

( ३ ) कितीही पूर्वीच्या काळीं दोन व्यक्तींचे पूर्वज एक होते, असें ठरलें तर ह्यांचा विवाह होणें प्रजेच्या दृष्टीनें घातुक आहे.

ऐतिहासिक आणि शास्त्रीय पद्धतीनें या गृहीत गोष्टींचा विचार केला तर असें दिसून येईल कीं या तीनही असिद्ध आहेत. आणि त्यामुळें वरील निषेध मानण्याचें यापुढें मुळींच कारण नाहीं.

हिंदू एक्झोगॅमी या आपल्या ग्रंथांत रा. करंदीकर यांनीं फार बारकाईनें या प्रश्नांचा विचार केला आहे. व त्यांनीं केलेलें विवेचन इतकें पूर्ण व निःसंदेह आहे कीं कोणाही विचारी माणसाला तें पटण्यासारखें आहे. म्हणून त्याचाच येथें थोडक्यांत अनुवाद करतों.

वेदकाळीं सगोत्र विवाहाचा निषेध मुळींच नव्हता. गोत्रें व प्रवर हीच त्या काळीं निश्चित झालीं नव्हतीं. तीं प्रथम ब्राह्मणकाळीं झालीं. समाज लहान असतो तेव्हां व्यक्तीचें एकच नांव उल्लेखास पुरेसें असतें. पण समाज मोठा होऊन व्यवहार वाढला म्हणजे निश्चितीसाठीं कुलनामें देण्याची चाल पडते. तेंच ब्राह्मणकाळीं होऊन गोत्रनामें निर्माण झालीं. गोत्रें हीं आडनांवाप्रमाणेंच असून आडनांवाप्रमाणेंच तींही निवासस्थान, धंदा, अध्ययन पद्धत, शाखा, धार्मिक मतें, कांहीं विशेष कर्तबगारी यावरून प्राप्त झालेलीं आहेत. बौधायनाच्या मताप्रमाणें पहिल्यानें लक्षावधि गोत्रें होतीं. त्यांचे निरनिराळे गट पुढें करण्यांत आले, त्यांनाच गण म्हणतात. गांधार, खांडव, गोदायन, सैंधव, पांचाल इत्यादि नांवें हीं देशावरून पडलेलीं आहेत हें स्पष्ट दिसतेंच आहे. फडणीस, जोशी, कुळकर्णी, पुणेकर, मिरजकर हीं नांवें धंदा किंवा रहाण्याची जागा यावरून पडलेलीं आहेत. आणि म्हणून फडणीस असेंच गांव दोन्ही कुळांचें असलें तरी त्यांचा रक्तसंबंध असेल असें आपण मानीत नाहीं. पुष्कळ ठिकाणीं तर त्या व्यक्ति भिन्न जातीच्याही असतात. गोत्रांची स्थिति तीच आहे.

प्रवर म्हणजे त्या कुलांतील पूर्वज ही कल्पना चूक आहे. जे प्रवर आपल्या पठणांत असतात ते पिता, पुत्र, व नातू यांचीं नामें दर्शवितात असा समज आहे. असें समजल्यानें अनेक घोटाळे होतात. कुंडिण गोत्राचे प्रवर वसिष्ठ, मित्रावरुण, व कुंडिण असे आहेत. यांतील मित्रावरुण हा जुन्या वाङ्मयाच्या आधारानेंच वसि-

ष्टाच्यां पूर्वकालचा आहे. तेव्हां तो त्याचा मुलगा होऊ शकणार नाहीं. भारद्वाज गोत्राचे प्रवर भारद्वाज, बृहस्पति व आंगिरस. यांतील बृहस्पति व आंगिरस हे पितापुत्र नसून भाऊ होते, असें ऐतरेय ब्राह्मणांत म्हटलें आहे. एका गौतम गणांत उच्यथ, वामदेव, राहुगण व बृहदुक्थ अशा चार शाखा आहेत. या चारही गोत्रांचा पहिला प्रवर आंगिरस आहे. दुसऱ्या प्रवराच्या ठायीं तें गोत्रनामच आहे. म्हणजे एकाचा उच्यथ, दुसऱ्याचा वामदेव वगैरे. आणि मौजेची गोष्ट अशी कीं या सर्वांचा तिसरा प्रवर पुन्हां एकच म्हणजे गौतम आहे. चौघांचा पूर्वज किंवा पिता एकच असणें यांत कांहीं विचित्र नाहीं. पण चौघांचा मुलगाही एकच होता असें कोणी सांगूं लागल्यास ते नव्या विचाराच्या माणसाला तरी निदान मान्य होणार नाहीं.

यावरून असें दिसेल कीं प्रवर आणि गोत्र यांनीं रक्तसंबंध दर्शविला जातो हें खोटें आहे. प्रवर हे कुलांतील पूर्वज नसून भिन्नभिन्न वैदिक शाखांचे अध्वर्यु होते असें मानण्यास पुष्कळच पुरावा आहे. यज्ञाच्या वेळीं यजमान जे प्रवर म्हणत असे ते त्याच्या विद्येच्या शाखांतील गुरूंचे दर्शक समजले पाहिजेत. त्याचे पूर्वज समजण्यामध्यें अनेक अडचणी येतात. शिवाय पूर्वी गोत्रें बदलता येत असत असाही पुरावा मिळतो. शुनःशेप हा आंगिरस गणांतून विश्वामित्र गणांत गेला असा उल्लेख आहे. भारद्वाजाचा वंशज शौनहोत्र हा भृगुकुळांत गेला व त्यानें गृत्समदानें रचलेल्या ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडलांत आणखी एक सूक्ताची भर घातली व आपलें नांवही बदलून शौनक हें नांव धारण केलें अशी कथा आहे.

मुलगा दत्तक गेला म्हणजे त्याच्या गोत्राबद्दल जे नियम पाळावयाचे असतात ते पाहिले तर प्रवर हे रक्तसंबंधाचे नसून विद्येसंबंधाचे होते असेंच दिसतें. चौल व्हायच्या आधीं दत्तक दिल्यास मूळ कुळांतलें गोत्र आजिबाद जातें. चौल झाल्यावर दिला तर दत्तकाच्या स्वतःच्या बाबतींत संबंध करताना जुने व नवे गोत्र पहावें लागतें. आणि मुंज झाल्यावर दिला तर मात्र पुढील पिढयांनाही दोन्ही गोत्रांचा विचार करावा लागतो. यावरूनही प्रवरांच्या बुडाशीं रक्ताचा विचार नसून वेदांतील पंथ, विद्येची शाखा यांचा विचार होता असें दिसतें. कारण तीनही स्थितींत मुलाचें रक्त तेंच आहे. मुंज झाल्यामुळें गुरु मात्र बदलतो.

क्षत्रिय, वैश्य वगैरे जातींतील गोत्रें कुलगुरूंचीं गोत्रें आहेत हें कित्येक ठिकाणीं अगदींच स्पष्टपणें दिसून येतें. तेव्हां तेथें गोत्र रक्तसंबंध दाखवितें हें म्हणणेंच शक्य नाहीं.

सगोत्र विवाहासंबंधींची आरंभींच्या शास्त्रकारांची वृत्ति पाहिली तर त्यांना यांत कांहीं भयंकर वाटत होतें असें दिसत नाहीं. सूत्रकाळीं चांद्रायण किंवा कृच्छ्र प्रायश्चित्त केलें कीं सगोत्र विवाहाचा दोष जात असे. मनूनें सगोत्र विवाह नसावा असें सांगितलें असलें तरी तो करणारास नुसतें प्रायश्चित्तही त्यानें सांगितलेलें नाहीं. याज्ञवल्क्य, नारद, पराशर, बृहस्पति या स्मृतिकारांच्या मतें सगोत्र-विवाह फार वाईट आहे. पण तज्जन्य पुत्र ते त्याज्य मानीत नाहींत. यम, बृहद्-यम, व्यास, हे उत्तरकालीन स्मृतिकार मात्र त्या स्त्रीला चांडाळी व पुत्राला चांडाळ समजतात. टीकाग्रंथ व निबंधग्रंथ हे तर या विवाहाला वाटेल त्या शिव्या देतात. पण मौजेची गोष्ट अशी कीं पूर्वींच्यांनीं इतकें कडक धोरण ठेवलेलें नसतांना आपण कां ठेवतो, हें त्यांनीं मुळींच सांगितलेलें नाहीं. पण या वाढत चाललेल्या कडकपणावरून एवढें अनुमान करण्यास हरकत नाहीं, कीं गोत्रप्रवरांची वस्तुस्थिति पुसट कां होईना, पण ज्यांच्या डोळ्यापुढें होती त्यांना सगोत्रविवाह इतका भयंकर वाटत नसे.

पूर्वींच्या संस्कृत शास्त्रग्रंथांचा परामर्ष घेऊन हा विचार केला. त्यावरून एवढें स्पष्ट दिसतें सगोत्र किंवा सप्रवर कुलांत पूर्वी कधीं तरी समानपूर्वज असला पाहिजे ही कल्पनाच मुळांत भ्रामक आहे. आणि मग ज्या कारणासाठीं सगोत्र विवाह त्याज्य मानले होते, तें कारणच खरें नाहीं असें ठरल्यानें ती त्याज्यताही नाहींशी झाली पाहिजे हें अगदीं उघडच आहे.

पण करंदीकरांचें हें संशोधन मान्य न करणारेही कांहीं पंडित असूं शकतील. त्यांनीं थोड्या नव्या दृष्टीनें विचार केला तर, त्यांनाही सगोत्र विवाह हा निषिद्ध मानण्यास मुळींच कारण नाहीं हें ध्यानांत येईल.

गेल्या शंभर वर्षांत जीवनशास्त्रांत या विषयाचा बराच अभ्यास झाला आहे. त्या शास्त्राचें या बाबतींत आजचें मत पुढीलप्रमाणें आहे.

व्यक्तीमध्यें कांहीं गुण असतात कांहीं दोष असतात. अगदीं जवळच्या रक्तांत जर विवाह झाला, तर अंगीं जे गुण असतील ते जास्त उत्कटत्वानें प्रकट होतात. हा फायदाच आहे. पण गुणांप्रमाणेंच दोषही प्रबळ होतात हा तोटा आहे. आणि साधारणतः अगदीं निर्दोष असें रक्त केव्हांच नसल्यामुळें अगदीं लगतच्या रक्तांत म्हणजे भावाबहिणींत विवाह होऊं देणें इष्ट नाहीं. सख्खे भाऊबहीण सोडून आते मामे नात्यांतले भाऊबहीण विचारांत घेतले तर तेथेंही या प्रकारच्या विवाहांचा परिणाम चांगला होत नाहीं असें शास्त्रज्ञाचें मत

आहे. आते–मामे नात्यांतील विवाहामुळें ( Cousin Marriages ) शुक्रबिंदू-तील दोषच संततींत जास्त प्रगट होतात. तेच दोष या मर्यादेच्या बाहेर विवाह केल्यास नाहींसे होतात असें डेव्हनपोर्टचें मत आहे ( हेरिडिटी इन रिलेशन टु युजेनिक्स पृ. १८५ ) वेल्स व हक्स्ले यांच्या सायन्स ऑफ लाइफ या ग्रंथात साधारण असेंच मत आहे. ( पृ. ३०० ) साधारण म्हणण्याचें कारण असें कीं त्यांनीं पुरावा दिला आहे तो सर्व जवळच्या रक्तसंबंधास अनुकूल असा आहे. पण अर्थात् त्यांचें मत त्यांनीं दिलें तें मान्य केलेंच पाहिजे.

शास्त्रज्ञांचा हा पुरावा पाहिला तर तें जवळच्या रक्तांतील विवाहाला प्रति-कूल आहेत असें दिसतें; पण हे जवळचे संबंध म्हणजे सख्खे भाऊबहीण किंवा आतेमामे नात्यांतले भाऊबहीण एवढेंच त्याच्या मनांत आहेत. या पलीकडच्या सगोत्र व सपिंड विवाहाला त्यांची मुळींच हरकत नाहीं. पण In breeding, Cousing Marriages, Marriages of near kin, यांचें विवेचन करतां करतां हातचलाखीनें करून तेथेंच आपल्याकडचे सपिंड व सगोत्र हे शब्द दडपून सगोत्र विवाहाला पाश्चात्य शास्त्रज्ञांचाही विरोध आहे असें दाखविण्याचा उद्योग कांहीं विदूषकी समाजशास्त्रज्ञ करतात. त्यामुळें लोकांनीं भ्रमून जाऊं नये इतकेंच सांगावयाचें आहे.

धर्मशास्त्र व जीवनशास्त्र या दोन्ही दृष्टीनें सगोत्र विवाहाचा विचार केला. त्यावरून धर्मशास्त्राच्या निषेधाच्या बुडाशीं असलेली कल्पनाच चुकीची आहे आणि जीवनशास्त्राचा याला मुळींच विरोध नाहीं व त्यामुळें सगोत्रविवाह निषिद्ध मान-ण्यास मुळींच आधार नाहीं, हें आपल्या ध्यानांत आलें. इतकें पाठबळ मिळाल्यावर व्यवहाराकडे थोडी दृष्टि टाकण्यास हरकत नाहीं असें वाटतें.

सध्यां ब्राह्मण, मराठे वगैरे जे वर्ग हीं गोत्राचीं बंधनें पाळतात त्यांची या बाबतींत अत्यंत कुचंबणा होत आहे, हें सर्वांच्या ध्यानांत आलेलेंच आहे. कांहीं पोटजातींत आणखी दहा दहा पोटजाती आहेत. त्यांत ही सगोत्र सपिंडाची भर. त्यामुळें विवाहांत वधूवरांची निवड चांगली करण्यास पुरेसें क्षेत्रच मिळत नाहीं. कांहीं कांहीं ठिकाणीं साठसत्तरपेक्षां जास्त घरेंच नसतात. त्यामुळें जी मुलगी मिळेल ती पत्करावी लागते. त्यांत शिवाय पत्रिकेच्या वेडगळ अडचणींची भर आहेच. यामुळें अनुरूप वधूवरांचा विवाह होण्यास अवकाशच नाहीं. वय, संस्कृति, शिक्षण यांतील सादृश्य, आरोग्य, या विवाहांतील मुख्य विचारांना या उपटसुंभ विचारापुढें स्थानच मिळत नाहीं. आणि त्यामुळें असल्या विवाहानें पतिपत्नींना

सुख तर होत नाहींच, पण संततीवरहि वाईट परिणाम होतो. तेव्हां सगोत्र, सपिंड, समसंस्कृति असतांनाहीं पाळले जाणारे जातिभेद, या प्रकारचे सर्व बंध नाहींसे करून वधूवरांच्या निवडीला शक्य तितकें जास्त विस्तृत क्षेत्र करून देणें हें आजच्या समाजांत अत्यंत अगत्याचें आहे.

विवाहाचा आदिहेतु, एकनिष्ठा, शाश्वतता, संतति, अपत्यसंगोपन, स्त्रीस्वातंत्र्य, विवाहाचें वय, पुनर्विवाह, प्रेमविवाह, घटस्फोट, स्त्रीचें द्रव्यार्जन, सगोत्र विवाह, इत्यादि या बाबतींतल्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार आपण केला. या बाबतींत आणखीहि कांहीं कल्पना प्रचलित आहेत. गांधर्वपद्धतीनें विवाह केल्यास एक प्रकारची संतति होते, ब्राह्मपद्धतीनें केल्यास दुसऱ्या प्रकारची, क्षत्रियांना, विवाहाचा एक प्रकार हितकर तर ब्राह्मणांना दुसरा व वैश्यांना अगदींच निराळा हितकर, विवाहानंतर प्रथम होणारी संतति चांगली सुदृढ व बुद्धिमान् असते, व पुढील दुबळी असते किंवा आरंभींची दुबळी असून पुढची सुदृढ असते इत्यादि अनेक समज आपल्याकडे रूढ आहेत. पण शास्त्र या पदवीच्या आसपासहि येण्याची त्यांची योग्यता नसल्यामुळें त्यांचा विचार येथें केला नाहीं.

गेल्या दोनतीन लेखांत अर्वाचीन शास्त्राअन्वयें विवाहसंस्थेचें जें स्वरूप असावयास हवें आहे त्याचें दिग्दर्शन केलें. त्याअन्वयें आपल्या समाजांत सुधारणा झाल्या तर येथले बरेच सामाजिक प्रश्न सुटतील, आणि त्यामुळें येथील अनेक दुःखें कमी होऊन समाजाच्या सुखांत व सामर्थ्यांत बरीच भर पडेल असें वाटतें. समाज नव्या शास्त्रीय विचाराला व तदनुसारी कृतीला कितपत तयार आहे, यावर सर्व अवलंबून आहे.

---

# पूर्वेचें पश्चिमीकरण.

तुर्कस्थान व जपान यांचा अर्वाचीन इतिहास फार उद्बोधक आहे. जगामध्यें जेथें कोठें म्हणून वस्तिक्षम प्रांत असेल तेथें तो युरोपियांच्या अमलाखालीं असलाच पाहिजे असा जणुं कांहीं नियमच ठरून गेला असावा असें वाटण्याजोगी परिस्थिती एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत निर्माण झाली होती. आस्ट्रेलिया, अमेरिका, आफ्रिका हे विरळ व रानटी वस्तीचे देशच फक्त युरोपीयांनीं जिंकले असें नसून हिंदी, चिनी, आरबी हे जे एकाकाळीं अत्यंत सुधारलेले लोक यांच्याही भूमी त्यांनीं जिंकून घेतल्या आणि युरोपीय संस्कृतीला तोंड देण्यास जगावर एकही प्रांत समर्थ नाहीं हें निरपवाद सिद्ध करून टाकलें.

युरोपच्या वर्चस्वाखालीं नसलेले इराण, अफगाणिस्थान वगैरे आणखीही कांहीं देश आहेत. पण त्यांना अजून मानाचें स्थान प्राप्त झालेलें नाहीं; हें एक, आणि युरोपीय लोकांशीं त्यांचा प्राणांतिक झगडा होण्याचा अजून कधीं प्रसंगच आलेला नाहीं, हें दुसरेंही कारण आहे. तुर्कस्थान व जपान यांचीं गोष्ट तशी नाहीं. या दोनही राष्ट्रांनीं युरोपीयाशीं झगडून आपल्या तोफांचा धूर त्यांना पाजून आपलें स्वातंत्र्य टिकविलें आहे आणि जपाननें तर आतां युरोपीयांनाच उलट शह देण्यास सुरवात केली आहे; आणि वरच्या पदावर गेल्याबरोबर आम्ही श्रेष्ठ, आमचा वंश श्रेष्ठ, इत्यादि जी भाषा राष्ट्रें बोलूं लागतात तशी भाषा या दोनही राष्ट्रांनीं सुरू केली आहे; आर्यवंश सर्वजगांत श्रेष्ठ असें मध्यंतरी कांहीं दिवस ठरलें होतें. गेलीं कांहीं वर्षें नॉर्डिक वंशाला ऊर्जितावस्था आलेली आहे. आर्यवंश म्हणजे त्याचीच एक शाखा असें पंडित म्हणत आहेत. पण यूसफ झिया या तुर्की पंडितानें व्युत्पत्ति, जुने गाडून गेलेले अवशेष वगैरे अर्वाचीन साधनांच्या साह्यानेंच आपल्या आर्यर व तुर्कर नांवाच्या पुस्तकांत आर्य व नॉर्डिक हे दोघेही तुर्कांचेच वंशज असून खरें कर्तृत्व तुर्की रक्तांतच असतें असें सांगितलें आहे.

इतरांना जें साधलें नाहीं तें तुर्कस्थान व जपान या दोनच राष्ट्रांना कां साधलें याचा अगदीं थोडा जरी विचार केला तरी असें दिसेल कीं, या राष्ट्रांचें आमूलाग्र पश्चिमीकरण झालें आहे. राजकारण, व्यापार, शिक्षणसंस्था, युद्धशास्त्र, विज्ञानाचा अभ्यास इत्यादि राष्ट्रीय जीवनाच्या बहुतेक सर्व शाखांत या लोकांनीं युरोपी धोरण अंगिकारलें आहे. केमालपाशानें तर सामान्य आचारविचारांत सुद्धां कायद्याच्या सक्तीनें युरोपीयता आणून सोडली आहे. याचा अर्थ असा कीं युरोपी मनुष्याशीं यांनीं टक्कर दिली हें जरी खरें असलें तरी युरोपी संस्कृतीशीं मात्र त्यांना झगडतां आलें नाहीं. वेळींच सावध होऊन तिचा अगदीं बिनतक्रार अंगीकार त्यांनीं केला. आणि तसें त्यांनीं केलें म्हणूनच त्याना मान वर ठेवून जगतां आलें.

पश्चिमेनें पूर्वेवर हा जो अलौकिक विजय मिळविला आहे त्याच्या बुडाशीं पश्चिमेजवळ असलेल्या तोफा, विषारी धूर किंवा विमानें हींच आहेत असें वरवर पाहातां वाटतें. पण खोल विचार केला तर असें ध्यानांत येईल कीं तोफा व विमानें हीं केवळ बाह्य चिन्हें आहेत. तेवढींच निराळीं काढून पूर्वेच्या हातांत दिलीं तर पूर्वेला जय मिळेल हें खरें नाहीं. या तोफा व हीं विमानें यांचीं पाळेंमुळें फार फार खोलवर गेलेलीं आहेत. कांहीं विशिष्ट प्रकारची समाजरचना,

विशिष्ट प्रकारची विचारपद्धति, जगाबद्दलची अगदीं निराळी दृष्टी, इतकेंच नव्हे तर धर्म, नीति, सौंदर्य, संपत्ति, याहीबद्दलचा निराळा दृष्टिकोन, येथपर्यंत त्या तोफांचा व विमानांचा संबंध जाऊन पोचतो. म्हणजे पूर्व आणि पश्चिम यांच्यांत तोफांचा अभाव व अस्तित्व एवढाच फरक नसून या दोघींच्या जीवनाच्या धाग्याधाग्यांत आढळून येईल असा तो फरक आहे. हा फरक काय आहे, कोणच्या मूलतत्त्वावर हा फरक झालेला आहे, आपल्याकडची सनातन म्हणून ठरलेलीं तत्त्वें टाकून देऊन त्यांचा अंगिकार करणें कितपत इष्ट आहे, तुर्कस्थान व जपान यांच्या यशाचें बीज त्यांतच आहे असें म्हणतात त्यांत कितपत तथ्य आहे, आणि त्यांत खरोखरीच कांहीं तथ्य असल्यास आपण त्यामुळें कोणचें धोरण आखलें पाहिजे इत्यादि प्रश्नांचा या लेखांत विचार करावयाचा आहे.

'प्रयोगनिष्ठा' हें अर्वाचीन युरोपी जीवनाचें मुख्य लक्षण आहे. रसायन, पदार्थविज्ञान, इत्यादि विज्ञानाच्या शास्त्रांतच तेथें प्रयोग चालू आहेत असें नाहीं; तर समाजव्यवस्था, धर्म, नीति, राजकारण, वाङ्मय, कला इत्यादि मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगोपांगांतही ते चालू आहेत. आणि त्यांचे बरेवाईट परिणाम पाहून त्याप्रमाणें निर्णय करण्याची पद्धत तेथें रूढ होऊन गेली आहे.

या एका प्रयोगनिष्ठेच्या मागें समाजधारणेस अवश्य अशा किती तरी गुणांची मालिका लागलेली दिसते. जुन्या ग्रंथांत जें ज्ञान सांगितलेलें आहे, जे निति किंवा धर्म यांचे नियम सांगितलेले आहेत, ते सर्व काळीं, सर्व स्थळीं, सारखेच लागू पडतील, ही वेडगळ श्रद्धा नाहीशी होणें हें प्रयोगनिष्ठेचें पहिलें प्राणतत्त्व होय. त्यावाचून नवीन प्रयोग करून पाहणें याला अर्थच उरत नाहीं. पृथ्वीचा गोलपणा, तिचें भ्रमण, जीवांची उत्पत्ति, इत्यादिबद्दल बायबलांत सांगितलेलें ज्ञान चूक आहे असें वाटल्यामुळेंच गॅलिलिओ, कोपर्निकस, डार्विन इत्यादि शास्त्रज्ञांना नवीन ज्ञान मिळविण्याची बुद्धि झाली. रोगांच्या कारणांची जुनी मीमांसा चूक आहे असे वाटल्यानेंच डॉ. पाश्चर यानें रोगजंतूंचा तलास लावण्याचा प्रयत्न केला व जंतू हें रोग होण्यास मुख्य कारण होतात हें नवीन ज्ञान जगाला सांगितलें. विज्ञानाप्रमाणेच इतर प्रत्येक बाबतींत घडामोडी चालू आहेत. राजशाही, लोकशाही, पक्षशाही, हुकूमशाही इत्यादि नवे प्रकार राज्यव्यवस्थेसाठीं लोक चोखाळून पहात आहेत. फ्रेंच राज्यक्रान्तींतून निघालेल्या व वेदवत् मानल्या गेलेल्या तत्त्वांची हीच स्थिति आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वें कांहीं दिवस प्रभावी ठरलीं होतीं. मध्यंतरी वंशशास्त्राचा अभ्यास सुरू होऊन या

तत्त्वांना बराच पायबंद बसला. कांहीं ठिकाणीं आनुवंशावर सर्व समाज हालत आहे असें वाटल्यामुळें त्यांवर भर दिला गेला. तेथूनही कांहीं पंडित आतां लोकांना ढासळवीत आहेत. अर्थामध्यें सर्व सुखदुःखाचें मूळ आहे असें वाटून त्याअन्वयें कांहीं देशांत समाजरचना चालू आहे. शिक्षणशास्त्रांतही अशाच घडामोडी नित्य चालू आहेत. डाल्टनप्लॅन, विनेटकाप्लॅन, प्रॉजेक्टमेथड, हॉवर्डप्लॅन, रोज नित्य नवी पद्धत–जास्त सुलभ, जास्त कार्यक्षम पद्धत—विचारी लोक हुडकून काढीत आहेत आणि जुनी त्याज्य म्हणून टाकून देत आहेत. हे मोठे विषय सोडून देऊन अगदीं सामान्य विषयाकडे जरी लक्ष दिलें, तरी तेंच दिसेल. घर बांधण्याच्या पद्धति, पोषाखाच्या पद्धति यांहींमध्यें आमूलाग्र फरक पडत चालला आहे. अलीकडे तर प्रयोगानें नित्य पालटणें हेंच जीवनाचें मुख्य लक्षण तेथें होऊं पहात आहे. कालची मोटार आज चालत नाहीं, कालची बंदूक आज रद्द ठरते व कालचें सिनेमाचें यंत्रही आज मागें पडलेलें दिसतें; आणि कालची बंदूक, मोटार, किंवा शिक्षणपद्धति आज नकोशी वाटते त्याचें कारण, केवळ नवीनतेची हौस हें नसून ती बंदूक, मोटार किंवा शिक्षणपद्धति कमी कार्यक्षम आहे व नवीन पद्धत ही जास्त कार्यक्षम होईल असा भरंवसा वाटतो, हें आहे.

जुने ग्रंथ किंवा पंडित हे सर्वज्ञ होते ही समजूत जाणें हें प्रयोगनिष्ठेला जितकें आवश्यक आहे तितकेंच नवीन ज्ञान सांगण्याची व स्वीकारण्याची तयारी असणें हेंहि आवश्यक आहे. या बाबतींत असें दिसतें कीं बहुजन समाजाची प्रवृत्ति सगळीकडे सारखीच असते. नव्या गोष्टीला पूर्वेकडे जितका तीव्र विरोध होतो तितकाच पश्चिमेकडे होतो. पंधरासोळाव्या शतकापर्यंत पूर्वपश्चिमेची स्थिति या बाबतींत जवळजवळ सारखीच होती. किंबहुना पश्चिमेकडे ती जास्त भयंकर होती. कारण बायबलविरुद्ध ग्र काढल्याबरोबर तिकडे जाळून टाकीत असत. पण पूर्वेकडे मुख्य उणीव पडली ती नवीन संशोधन करून आलेले निर्णय लोकापुढें निर्भयपणें ठासून मांडणाऱ्या शूर पुरुषांची. कोपर्निकस, गॅलिलिओपासून न्यूटन–डार्विनपर्यंत शेंकडों वीरांनीं आपल्या रक्ताचें व प्राणाचेंहि मोल देऊन नवीन ज्ञानाचा नंदादीप पाजळत ठेवला. ती परंपरा पूर्वेकडे निर्माणच झाली नाहीं. इतकेच नव्हे तर संतवाङ्मयांत भौतिक ज्ञानाची, तर्कशास्त्राची, पांडित्याची, टवाळीच करण्याची प्रथा पडली होती. आतां यावरून समाज जुन्या श्रुतिस्मृतींना सर्वस्वीं चिकटून राहिला होता असें वाटण्याचा संभव आहे. पण तेंहि खरें नाहीं. आपापल्या सुखसोयींस व क्वचित् समाजाच्या सुखसोयींसहि अनुकूल असे बदल येथल्या कांहीं समाजधुरीणांनीं केलेले

दिसतात; पण तसें करतांना जुन्या ग्रंथांची गुलामगिरी तोडून टाकण्याचा प्रयत्न तर त्यांनीं केला नाहींच पण आपल्या म्हणण्यास ते अनुकूलच आहेत असें दाखविण्याचा अश्लाघ्य व विघातक प्रयत्न मात्र त्यांनीं केला. बुद्धीला पिरगळून टाकून शब्दनिष्ठ होण्याचा प्रयत्न केला कीं हा अनिष्ट परिणाम टाळतांच येणार नाहीं. रेनननें म्हटलेंच आहे कीं माणसाचा स्वभाव बदलणें शक्य नाहीं. त्याला ग्रंथाला जखडून टाकलेत तर त्या ग्रंथावर आपल्याला अनुकूल असें भाष्य लिहून तो त्यातून सुटून जाणार हे ठरलेंच आहे. तीच स्थिति पूर्वेकडच्या पंडितांची झाली. आणि त्यांतूनच ‘ समन्वया’चा जन्म झाला. या समन्वयपद्धतीनें हिंदुस्थानची किती बौद्धिक हानी झाली असेल याची कल्पनाच करणें शक्य नाहीं. कोणचेंहि मत सांगावें आणि गीतेंतला आधार द्यावा, कोणचाही आचार करावा आणि मनूचा आधार दाखवावा, असला मिथ्याचार या पद्धतीमुळेंच सुरू होतो. गेलीं हजार वर्षें हिंदुस्थानांत हेंच चाललें आहे. पण यामुळें मानसिक गुलामगिरीच्या शृंखला तुटणें लांबच राहून त्या दृढतर मात्र झाल्या. व व्यक्तीच्या मनाला स्वातंत्र्य मिळून त्याचा जो विकास व्हावयाचा तो मुळींच झाला नाहीं. जुनें शास्त्र मला मान्य नाहीं, माझ्या काळचें शास्त्र मी ठरवीन असें निर्भयपणें सांगणारा महाराष्ट्रांतला पहिला महापुरुष म्हणजे आगरकरच होय. तोपर्यंत आचरावे एक, बडबडावें दुसरें, मुळांत असावें तिसरेंच, अशी स्थिति होती. आणि ही तिन्ही परस्परविरुद्ध मुळींच नाहींत, असा समज उराशीं धरून बहुजनसमाज शांतपणें चालला होता.

प्रयोगनिष्ठेला तिसरी आवश्यक गोष्ट म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य. मला नवीन संशोधन करण्याचा व माझीं मतें समाजांत पसरविण्याचा जितका अधिकार आहे तितकाच तो दुसऱ्याला आहे हें प्रत्येकाला मान्य असलें पाहिजे. रसायन, वैद्यक, आनुवंश इत्यादि शास्त्रांतीलच फक्त प्रयोग येथें अभिप्रेत नसून धर्म, राजकारण, समाजकारण, याहि क्षेत्रांतले प्रयोग विचारांत घेतले आहेत, हें लक्षांत घेतलें म्हणजे तेथें व्यक्तिस्वातंत्र्य किती जरूर आहे हें ध्यानांत येईल.

व्यक्तिस्वातंत्र्य हा युरोपच्या अर्वाचीन वैभवाचा केवळ आत्माच होय. व्यक्तीच्या सुखाच्या दृष्टीनें याचें किती महत्त्व आहे हें मागें संस्कृति व प्रगति या प्रकरणांत सांगितलेंच आहे. समाजाच्या दृष्टीनेंहि व्यक्तिस्वातंत्र्य अत्यंत अवश्य आहे. धर्मकारण, राजकारण, समाजकारण यांत एकाच्याच नेतृत्वानें चालावें अशी जुनी पद्धत होती. पण तो एक कोण हें ठरविण्याच्या ज्या पद्धति होत्या त्या अगदीं अयशस्वी व विघातक आहेत असें अनुभवास आलें आहे. बापासारखाच

तंतोतंत पुत्र निर्माण व्हावा अशी निसर्ग योजना असती तर कोणाचें नेतृत्व पत्करावे हें ठरविणें फारसें अवघड गेलें नसतें. एकदां एक मनुष्य निवडला कीं काम झालें. याच कल्पनेनें वंशपरंपरा राजपद किंवा गुरुपद मागें दिलें जात असें. पण बापासारखा मुलगा होत नाहीं. म्हणून प्रत्येक व्यक्तीला आपले सामर्थ्य, गुण, कर्तृत्व हीं प्रगट करण्यास अवसर देऊन त्यांतून जो सर्व समाजाला योग्य दिसेल तो निवडावा ही पद्धत प्रचारांत आली. ही सर्वथा निर्दोष आहे असें मुळींच नाहीं. पण युरोपचा अर्वाचीन इतिहास पाहिला तर ही पद्धत जुन्या पद्धतीपेक्षां किती तरी पटीनें जास्त कार्यक्षम आहे असें दिसून येईल. केवळ राजकारणी व मुत्सद्दीच यानें वर येतात असें नसून प्रत्येक क्षेत्रामध्यें या व्यक्तिस्वातंत्र्याच्या पद्धतीनें मोठमोठे पुरुष निर्माण होतात. इसवीसनापूर्वीचा हिंदुस्थानचा इतिहास पाहिला तर तेथेंहि हाच प्रकार आढळून येतो. समाजांतल्या कोणच्याहि थरांतल्या कोणच्याहि पुरुषाला वाटेल त्या क्षेत्रांतला वाटेल तितका उच्च विचार सुचूं शकतो किंवा कोणचीहि व्यक्ति कोणचाहि पराक्रम करूं शकते. आणि असा स्फुरलेला विचार त्या पुरुषाला सांगू दिला नाहीं, किंवा व्यक्तीच्या पराक्रमाला अवसर मिळाला नाहीं तर, जग अनेक महापुरुषांना मुकते. म्हणून व्यक्तिस्वातंत्र्य हें समाजव्यवस्थेचें मूलतत्त्व असावयास पाहिजे

प्रयोगनिष्ठेला अवश्य म्हणून जे गुण येथपर्यंत सांगितले त्यांच्या व विशेषतः व्यक्ति-स्वातंत्र्याच्या वाढीला लोकशाही ही फार पोषक असते. लोकशाहींत सर्व समाज खालपासून वरपर्यंत ढहुळला जातो. समाजाच्या उत्कर्षापकर्षाची जाणीव तरी निदान लोकशाहींत प्रत्येक व्यक्तीला जितकी चांगली असते तितकी राजशाहींत नसतें. म्हणून व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाही यांचे संबंध अविभाज्य आहेत असें म्हणावें लागतें. म्हणूनच पूर्वेच्या पश्चिमीकरणांत राजशाही जाऊन लोकशाही येणें याला फार महत्त्व आहे. पण गेल्या दहापांच वर्षांत युरोपांत मुसोलिनी, हिटलर, स्टॅलिन वगैरे पुरुषांनीं हुकूमशाही चालवून व्यक्तिस्वातंत्र्य, आणि त्या स्वातंत्र्याची जननी जी लोकशाही तिचा अगदीं नायनाट करून टाकला आहे, आणि त्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्याचा व लोकशाहीचा प्रयोग युरोपांत फसला आहे असें वाटून पूर्वेकडची पूर्ण निर्बंधाची व राजशाहीची तत्त्वेंच समाजधारणेस हितकर आहेत असें लोकांचें मत होऊं लागलें आहे. तेव्हां त्याचा थोडासा विचार केला पाहिजे.

'मॉडर्न सिव्हिलिझेशन ऑन् ट्रायल' या ग्रंथांत बर्नस्नें या प्रश्नाची चांगली चर्चा केली आहे. तो म्हणतो कीं ज्या देशांत सध्यां हुकूमशाही स्थापन झाली

आहे, त्या देशांत पूर्ण लोकशाही अशी कधीं स्थापनच झालेली नव्हती. जर्मनी, रशिया, इटली या देशांत राजेच राज्य करीत होते. म्हणून लोकशाही पूर्णतेला गेली आणि तो प्रयोग फसला असें या देशांचीं उदाहरणें दाखवून म्हणतांच येणार नाहीं. या बाबतींत मला आणखी असें सुचवावेसें वाटतें कीं या वरील देशांतहि लोक-शाहीच्या अनेक तत्त्वांपैकीं व्यक्तिस्वातंत्र्य हें प्राणतत्त्व जरी मुरगळलें जात असलें तरी सरकार हें लोकांच्यासाठीं असलें पाहिजे, राज्य ही राजाची दौलत नाहीं, हें जें लोकशाहीचें दुसरें मुख्य तत्त्व तें अजूनपर्यंत तरी पाळलें जात आहे.

दुसरें असें कीं हुकूमशाही जेथें चालली आहे अशा देशांपैकीं प्रमुख जो रशिया त्यानें आतां नुकतीच लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा केली आहे. जुन्या रानटी अवस्थेतून लोकांना नवीन वातावरणांत आणण्यापुरतीच तेथली लोकशाही होती हें यावरून स्पष्ट आहे. तुर्कस्थानांत केमालपाशाचें हेंच धोरण आहे. तेथली लोकशाही अगदीं थेट रशियासारखी होणार नाहीं हें खरें; पण इंग्लंड-फ्रान्ससारखी खास होईल. इटाली व जर्मनीमध्यें पडत्या भांडवलशाहीला सावरण्याच्या प्रयत्नांतून दोन हुकुमशहा निर्माण झाले आहेत. पण तेथेंहि बाह्यतः तरी देशांतील बहुसंख्य लोकांच्या मतानेंच हे हुकुमशहा निवडून आलेले आहेत. तेव्हां लोकशाहीचा प्रयोग फसला असें तर नाहींच म्हणतां येत, पण उलट अगदीं पूर्ण राजशाही असलेले देशहि हुकूमशाही या पायरीवरून संपूर्ण लोकशाहीकडेच येत आहेत असें म्हणावें लागतें.

इंग्लंड व अमेरिका या देशांत लोकशाही वगैरे कांहीं नसून कांहीं भांडवल-वाल्यांचे हातीं सर्व सत्ता आहे असें विधान अलीकडे पुष्कळ ऐकू येतें. हें विधान जरी कांहीं अंशीं खरें असलें तरी त्यावरून जें अनुमान काढण्यांत येतें तें मात्र सर्वस्वी चूक आहे. समता, व्यक्तिस्वातंत्र्य यांचे हे परिणाम आहेत अशी सध्यां हाकाटी चालू आहे; पण थोडा विचार केला तर समता व व्यक्तिस्वातंत्र्य यांचे हे परिणाम नसून समता व व्यक्तिस्वातंत्र्य हें कांहीं कारणानें कमी झाल्यामुळेंच ही आपत्ति ओढवली आहे असें दिसून येईल. 'प्रोग्रेस अँड् पॉव्हर्टी' या आपल्या पुस्तकांत हेन्री जॉर्ज यानें या प्रश्नाचें विवेचन केलें आहे. हिंदी, मिसरी, चिनी, बाबिलोनी या संस्कृति उदयास आल्या व नाहींशा झाल्या; तशीच सध्यांची युरोपची संस्कृति एक दिवस नाहींशी होईल कीं काय, या प्रश्नाचा युरोपमधील बरेच पंडित सध्यां विचार करीत आहेत. हेन्री जॉर्ज हा त्यांपैकींच एक आहे. त्याच्या मतें संघटना, समता व स्वातंत्र्य ही प्रगतींचीं मूलतत्त्वें होत हें सांगून त्यानें पुढीलप्रमाणें विवेचन केलें आहे. जेव्हां संस्कृति उदयास येते तेव्हां या तत्त्वानुसार समाजरचना झालेली असते.

पण पुढें समाजाचा उत्कर्ष होऊं लागला कीं विशिष्ट कार्य विशिष्ट लोकांकडे जाऊन त्यांचा एक वर्ग तयार होतो. आणि मग समाजाचें लवचीक स्वरूप जाऊन तेथल्या व्यवस्थेला कडकपणा येतो. आपल्या हातांतलें ठावकें जाऊं नये म्हणून कोणच्याहि सुधारणेला समाजांतलें हे स्थिर झालेले वर्ग विरोध करूं लागतात. व हा विरोध यशस्वी व्हावा म्हणून त्यांना दुसऱ्यांचें स्वातंत्र्य हिरावून घ्यावें लागतें. येथूनच संस्कृतीच्या अधःपातास प्रारंभ होतो. म्हणजे समता व स्वातंत्र्य यांनीं समाजाचा नाश होत नसून त्यांची गळचेपी झाल्याबरोबर नाश सुरूं होतो.

हिंदुस्थानांत कडक वर्गवारी प्रथम मनूनें सुरूं केली आणि तेथूनच हिंदुस्थानच्या अधःपातास सुरवात झाली असें मला वाटतें. पण मनूनें घातलेलें निर्बंध हें अगदीं कडक नव्हते. इसवी सनाच्या सातव्या-आठव्या शतकांत मनूनें सुरूं केलेलें कार्य पूर्ण झालें आणि तेथून मग प्रगति आणि स्वातंत्र्य यांना हा देश बव्हंशीं मुकलेलाच आहे. इ० स० १००० पासून गझनीच्या महंमदाच्या स्वाऱ्या सुरूं झाल्या. त्यांचा प्रतिकार कोणीच करूं शकला नाहीं ! महंमदाचा एकदांहि पराभव झाला नाहीं ! पुढें साम्राज्याच्या रूपानेंच मुसलमानी आक्रमण सुरूं झालें. त्याला प्रतिकार करून तें जवळजवळ नाहींसें करण्यांत यश आलें तें फक्त मराठ्यांनाच. आणि तें कां तर मनूचे वर्गबंध त्यांनीं सर्वस्वीं झुगारून दिले म्हणून. म्हणजे समतेच्या व व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वानेंच येथें उत्कर्ष झाला असें दिसतें. एरवीं मुसलमानी लाटेखालीं सर्व देश बुडून गेला असता.

प्रयोगनिष्ठा, समता, व्यक्तिस्वातंत्र्य व लोकसत्ता या अर्वाचीन पश्चिमेच्या चार ठळक लक्षणांचा येथवर विचार झाला. पश्चिमेच्या जीवनांत खोल रुजलेलीं म्हणून जीं तत्त्वें मागें उल्लेखिलीं होतीं तीं हींच. या तत्त्वामुळें सर्व समाज अंतर्बाह्य बदलून जाऊन त्याचे जे दृश्य परिणाम आज सर्व जगाला दिसत आहेत त्यांचा विचार आतां करावयाचा आहे.

पश्चिमेकडे अगदीं सहज नजर फेकली तरी यंत्र हा तिचा सर्वांत तेजस्वी अलंकार आहे हें कोणासही दिसून येईल. वाहतुकीची, डोंगरफोडण्याची, समुद्र किंवा आकाश तरण्याचीं मोठमोठीं कामेंच यंत्रें करतात असें नसूनं झाडणें, सारवणें, धुणें, पुसणें हींही कामें आतां पश्चिमेकडे यंत्रें करूं लागलीं आहेत. हातानें किंवा काठीनें जमीन उकरणाऱ्या मानवाला नांगराचा जेव्हां शोध लागला तेव्हां त्याच्या स्थितींत जो फरक पडला तोच वास्तवीक त्या पुढच्या प्रत्येक शोधानें पडत गेलेला आहे. तो पहिला शोध जितका निषिद्ध किंवा ग्राह्य तितकाच शेवटचा असावयास

पाहिजे. पहिल्यानें मानवाला पशुकोटींतून उचलून मनुष्यतेप्रत आणण्यास जर मदत केली असेल तर शेवटचाही खास करील आणि तो करीत नसला तर त्याच्या वापरांत कांहीं तरी चूक होत असली पाहिजे हें उघड आहे. पण हें ध्यानांत न घेतां कांहीं लोक यंत्राला सैतानी, राक्षसी इत्यादि शिव्या देतांना आढळतात. व तें पाहून आपणांला मोठा विस्मय वाटतो.

अलीकडील यंत्रानें हजारो मानवांच्या तोंडचा घास काढून घेतला असा यंत्रावर पहिला आरोप आहे. पूर्वी जें काम दहा लोक करीत असत तेंच आतां यंत्राच्या साह्यानें एकटा मनुष्य करतो आणि त्यामुळें नऊ माणसें उपाशी मरतात असा हा मुद्दा आहे. या मुद्यांत अनेक प्रकारच्या चुका आहेत. दहा माणसांपैकीं एकानें काम करून नवाना उपाशी ठेवावें असें कांहीं यंत्रानें सांगितलेलें नाहीं. काम सोपें व कमी झाल्यास प्रत्येकानें एक दशांश काम करून जास्त सुखी होणें हेंही शक्य आहे. आणि या दृष्टीनें पाहिल्यास यंत्रानें घास तर काढून नाहींच घेतला पण एकदशांश श्रमांत तितकाच घास मिळवून देण्याची व्यवस्था केली आहे असें दिसून येईल. आणि असें असूनही मानवाला हें सुख मिळत नसेल तर तो दोष यंत्राचा नसून यंत्र वापरणाऱ्या समाजाचा आहे असें म्हणणें प्राप्त आहे.

अलीकडच्या यंत्रांची संहारशक्ति फार प्रचंड आहे व त्यामुळें शेवटीं मानवी संस्कृतीचा व मानवाचाही पृथ्वीच्या पाठीवरून नायनाट होऊन जाईल असें कांहीं पंडितांचें मत आहे. ही भीति अगदींच निरर्थक आहे असें म्हणतां येणार नाहीं. पण याचाही बारकाईनें विचार केला तर हा दोष यंत्राकडे नसून मानवाच्या मनाच्या दुसऱ्या कांहीं स्वाभाविक दुर्गुणाकडे आहे असें दिसून येईल.

पूर्वीच्या व अलीकडच्या मानव समाजाकडे पाहिले तर असें दिसून येतें कीं हल्लीं मानवाचें मोठमोठाले गट राष्ट्र या नावानें रहात आहेत. एकाच इंग्लंड-मध्यें पांचशे निरनिराळ्या टोळ्या असण्याऐवजीं आतां इंग्लंड व स्कॉटलंड मिळून एकच टोळी म्हणजे राष्ट्र आहे आणि मानवाची दुष्ट प्रवृत्ति किंवा मारामारीची हौस हल्लीं कमी झाली आहे असें जरी म्हणतां येत नसलें तरी एवढें खास म्हणतां येईल कीं इंग्लंडमधल्या पांचशे टोळ्यामध्यें रोज ज्या मारामाऱ्या व रक्तपात पुरातन काळीं होत असत त्या आतां खास टळल्या असून मानव तितका सुखी झाला आहे. स्टोरी ऑफ सिव्हिलिझेशनमध्यें विल डुरँट यानें म्हटलें आहे कीं समाजांत माणसाला आपल्याला रोज अन्नवस्त्र नक्की मिळेल अशी खात्री असेल व कोणच्याही क्षणाला मरण येऊं शकेल, किंवा कोणी तरी जबरदस्त येऊन खंडणी

उपटूं शकेल हा धसका नाहींसा झाला असेल तरच संस्कृति जन्मास येऊन वाढूं शकते. म्हणजे अन्न व स्वास्थ हे संस्कृतीचे मुख्य घटक होत आणि आज या दोहोंबद्दल सुधारलेल्या समाजांत जी मागल्यापेक्षां जास्त खात्री निर्माण झाली आहे तिचें सर्व श्रेय राष्ट्र या कल्पनेला आहे. यापुढें थोडा विचार केला तर असें दिसून येईल कीं सध्याची राष्ट्र ही कल्पना केवळ यंत्रामुळेंच शक्य झालेली आहे. टेम्स नदीच्या कांठीं राहणारे सरकार स्कॉटलंडमध्यें वचक बसवूं शकतें ते केवळ यंत्रें आहेत म्हणून. त्याला तेथें पोचावयासच दहा दिवस लागणार, आणि तेथला किल्ला घ्यायला आणखी दोन महिने लागणार अशी स्थिति असती तर सर्व राष्ट्र एका मध्यवर्ती सत्तेखालीं ठेवणें महामुष्कील झालें असतें. पण मध्याचें सरकार दोन तासांत स्कॉटलंडमध्यें जाऊन एकाच तासांत किल्ल्यांत प्रवेश मिळवूं शकतें म्हणून किल्लेदार हा बंड करूंच शकत नाहीं. बंदुकीच्या दारूमुळें सरदारवर्ग नाहींसा होऊन सर्व इंग्लंडची सत्ता केन्द्रित झाली ही गोष्ट प्रसिद्धच आहे. यंत्रसामर्थ्य असूनही दुसऱ्या कांहीं दोषामुळें सत्तेचें केन्द्रीकरण करतां येत नाहीं अशी स्थिति असणें शक्य आहे. पण यंत्र नसतांना सतत लढाई न करतां दीर्घकाल सत्तेचें केन्द्रीकरण करणें म्हणजे तो चमत्कारच होय. ती अशक्य कल्पना आहे. हें जर खरें असलें तर इंग्लंडमधल्या पांचशे टोळ्या व फ्रान्समधल्या पांचशे टोळ्या यांच्यांतला नित्याचा रक्तपात टाळून सबंध इंग्लंड व सबंध फ्रान्स यांच्यामध्येंच तो होईल व तोही पांचपंचवीस वर्षांनीं एकाद वेळीं होईल अशी जी स्थिति आज प्राप्त झाली आहे तिला यंत्रच कारण आहे असें म्हटलें तर तें अमान्य होणार नाहीं असें वाटतें. यंत्रानें माणसांची आयुर्मर्यादा वाढविली आहे; पूर्वीच्यापेक्षां दसपट धान्य निर्माण करून जगाची लोकसंख्या तिप्पट किंवा चौपटही वाढली तरी पोसणें शक्य करून ठेवलें आहे; चार वर्षांच्या महायुद्धांत जेवढे लोक मेले त्याच्या दसपट लोक एक वर्षांत प्लेग नेत असे. त्याला युरोपांतून कायमचा हांकून लावणें यंत्रानेंच शक्य केलें आहे. या व अशाच प्रकारच्या आणखी गोष्टी ध्यानांत घेतल्या व राष्ट्रकल्पना यंत्रानेंच शक्य आहे, ही वर सांगितलेली गोष्ट त्यांत भरीला घातली तर मानवाचा यंत्रानें जो संहार केला आहे तो त्यानें केलेल्या उपकारापुढें कांहींच नव्हे हें ध्यानांत येईल. सिव्हिलिझेशन ऑफ् दि ईस्ट अँड वेस्ट या आपल्या निबंधांत हू-शी या चिनी लेखकानें यंत्रनिंदकांना चांगलें उत्तर दिलें आहे. त्याचें म्हणणें थोडक्यांत असें आहे. रिक्षा ओढणाऱ्या माणसांना पशूपेक्षां जास्त कांहीं संस्कृति नसते. त्या रिक्षापासून त्या मानवांना सोडविण्याचें काम यंत्रानें केलें आहे.

कोणच्याही धर्मोपदेशाला किंवा उच्च तात्त्विक सिद्धान्ताला हें शक्य झालें नव्हतें. याचा अर्थ असा कीं, यंत्र हा कोणच्याही मानवी संस्कृतीचा आधारस्तंभ आहे. पूर्वेनें संस्कृति उभारली ती यंत्रसामर्थ्यानें. मध्यंतरींच्या काळांत तिनें यंत्र सोडून देऊन अध्यात्मचिंतन केलें त्यामुळें तिचा ऱ्हास झाला. त्याच वेळीं पश्चिम ही यंत्रोपासना करीत होती. आणि त्या सामर्थ्यानें तिनें पूर्वेला गुलाम करून ठेवून तिच्या अध्यात्मिक व ऐहिक अशा दोही संस्कृतींचा नाश करून टाकला आहे.

यंत्राचें सामर्थ्य व महत्त्व हें असें स्पष्ट असतांनाही कांहीं लोक त्याकडे मुद्दाम डोळे झाक करून त्याचा निषेध करतात. आणि चरख्यासारख्या साधनांचा जीर्णोद्धार करूं पहातात. कांहीं एका काळापुरता उपाय म्हणून जर चरखा आला असेल, तर त्याला थोडासा अर्थ आहे असें म्हणतां येईल. तलवार, बंदूक हातांत नाहीं म्हणून काठीचा उपयोग करणें जसें बरोबर ठरेल तसेंच गिरण्या उभारतां येत नाहींत म्हणून, किंवा शेतकऱ्यांना दुसरा कांहींच उद्योग नाहीं म्हणून, चरखा सांगणें कांहीं लोकांच्या मतें बरोबर ठरेल. पण तसें कांहीं नसून यंत्राशीं विरोध म्हणून जर चरखा येणार असेल तर, आणि प्रत्येक माणसानें आपलें अन्नवस्त्र आपण करावें अशी कल्पना असेल तर, ती कल्पना बरोबर नाहीं. कारण श्रमविभाग करून माणसांना अन्नवस्त्राच्या रोजच्या जिकिरींतून सोडविणें हें तर सुधारणेचें पहिलें लक्षण आहे.

पण सध्यां यंत्रालाच लोक शिव्या देतात असें नसून त्या यंत्रानें निर्माण केलेल्या समृद्धीलाहि शिव्या देतात असें दिसतें. समृद्धीला शिव्या देणाऱ्या या लोकांचा मुद्दा अगदीं निराळा आहे. यंत्रानें अन्नाचा घास काढून घेतला, किंवा संहार केला हा त्यांचा मुद्दाच नाहीं. त्यांचा मुद्दा आध्यात्मिक आहे. भोग हें मानवाचें ध्येय नसून त्याग हें आहे; गरजा वाढविणें हें ध्येय नसून त्या कमी करीत आणणें हें आहे असें त्यांना वाटतें. व भोग ही जड, तामसी संस्कृति असून त्याग ही उच्च सात्त्विक संस्कृति आहे असें त्यांचें म्हणणें आहे. त्यांची मुख्य कल्पना अशी आहे कीं भोगानें भोगेच्छा वाढत जाते आणि तृप्ति अशी कधींच होत नाहीं. अग्नींत तूप घातल्यानें तो जसा वाढतो तशा वासना या विषयांच्या उपभोगानें कमी न होतां वाढतच जातात हें गीतावचन प्रसिद्धच आहे. पण या गीतेला असें विचारावेसें वाटतें कीं भोगानें भोगेच्छा वाढत जाते, हें जरी क्षणभर खरें असलें तरी त्यागानें ती कमी होते हें खरें आहे काय ? आज हजारों वर्षें शेतकरी व मजूर हे साहेब भोगांत असलेल्या सुखाचा त्यागच करीत आले आहेत. पण त्यांची भोगेच्छा कमी

झालेली नसून नुसत्या तुकड्यासाठीं ते बाण्याबामणाच्या दाराशीं लोळ असतात. यावर गीता म्हणेल कीं शेतकऱ्याचा त्याग सक्तीचा आहे. त्याग मनानें करावयास हवा. पण मनानें केलेला त्याग हा जर श्रेष्ठ तर तेथें श्रीमंती–गरिबीचा प्रश्न येतोच कोठें ? मनःसंयम ज्याला करतां येतो, तो श्रीमंतींत किंवा गरिबींत सारखाच वागेल. भोंवतालच्या श्रीमंतीगारिबीवर मनःसंयम अवलंबून आहे हें खरें. पण तेथेंहि असें दिसेल कीं संतुष्ट झालेला म्हणजे श्रीमंत आत्माच जास्त संयम करूं शकेल. गरजा मारून त्याग करतां आलाच तर तो एखाद्यालाच येईल. बहुजनसमाजाला गरजा मारण्याचें तत्त्व शिकविणें म्हणजे भिकाऱ्याला जिलबी खाऊं नकोस असा उपदेश करण्यासारखेंच आहे. अनेक पक्वान्नांच्या राशी भरून ठेवाव्या, मनमुराद खाऊं द्यावें आणि मग त्या खाणाऱ्याला बजावावें कीं बाबा तुला संयम अवश्य आहे. नाश होईल इतका भोग घेऊं नकोस. यांत खरा शहाणपणा आहे. आणि पाश्चात्यभोगवादी समाज नेमकें हेंच करीत आहे. भांडवलवाले हे स्वार्थी आहेत. त्याचा पक्ष कोणीच घेत नाहीं. पण पश्चिमेकडचे जे समाजवादी लोक आहेत, जे कामकऱ्याचे कैवारी आहेत त्यांचें हेंच प्रतिपादन आहे. रशियांतल्या प्रत्येक व्यक्तीच्या गरजा जास्तींत जास्त वाढल्या पाहिजेत व त्या पुरविण्यासाठीं तेथें जास्तींत जास्त माल निर्माण झाला पाहिजे, असेंच सध्यांच्या तेथल्या धुरीणांचें मत आहे. 'भोगवादी' या नावानें हिंदूंच्या मनांत संस्थानिक, इनामदार असा जो अजागळ वर्ग येतो तसला पंथ युरोपांत मुळींच नाहीं. अगदीं भांडवलवाले लोक घेतले तरी तेहि असे नाहींत. कांहीं कांहीं कारखानदार तर मजूर करणार नाहीं इतकें काम करीत असतात. मालाचा खप, बाजार यावर त्यांना सदैव लक्ष ठेवावें लागतें. मजुरांत व त्यांच्यांत फरक इतकाच कीं काम संपलें कीं ते तितक्याच वेगानें सुखोपभोगांत निमग्न होतात. आणि मजुराला तें मिळत नाहीं. यांतील अन्यायाचा व अनीतीचा भाग काढून टाकून जो भोग शिल्लक राहील त्याची तपासणी केली तर असें दिसेल, कीं प्रत्येक समाजानें हेंच ध्येय आपल्यापुढें ठेवलें पाहिजे. गरजा वाढवून त्या पुरविणें यांतच खरें मनुष्यत्व आहे. संयम हवा याबद्दल वादच नाहीं. पण संयमहीन भोग हा पश्चिमेकडे कोणीच कधीं मान्य केलेला नाहीं. तसा तेथें चालू असलाच तर तो पूर्वेपेक्षां जास्त खास नाहीं. गरजा वाढवाव्या, भोगेच्छा वाढवाव्या व त्या पुऱ्या कराव्या हे गरजा मारण्यापेक्षां जास्त चांगलें हें मात्र पश्चिमेनें नवीन धोरण आखलें आहे यांत शंकाच नाहीं. पण ही उन्नति असून परागति मुळींच नाहीं. त्याग हें निराश वेदान्ताचें तत्त्व आहे. वर्धिष्णु, जयिष्णु राष्ट्राला किंवा व्यक्तीला तें सर्वथैव हानि-

कारक होय. आणि प्रत्येक राष्ट्रानें वर्धिष्णु व्हावें असें आपलें तत्त्वज्ञान असल्यामुळें त्याग ही कल्पना केव्हांच ग्राह्य नाहीं.

असंतोषः श्रियो मूलम् । हें व्यासमहामुनींचें वचनच प्रत्येकानें ध्यानांत धरणें अवश्य आहे. [ येथें वापरलेल्या त्याग शब्दाचा स्वार्थत्यागाशीं कांहीं संबंध नाहीं. स्वार्थत्याग हा दुसऱ्यासाठीं असतो. तो महासद्गुण आहे. त्याग म्हणजे स्वतःच्या गरजा उगीचच मारणें. तो महा दुर्गुण आहे ]. पाश्चात्यांच्या भोगवादाची टर करण्याची अलीकडे चाल पडूं लागली आहे. त्यांत, ते स्वार्थी असतात, विषयांध असतात, नीच असतात इत्यादि कल्पना उगीचच घुसडल्या जातात. त्या खोट्या आहेत. वेश्यामंदिरा लांबच राहिल्या, पण सिगारेटहि न ओढणारा हेन्री फोर्ड हा भोगवादी आहे. सर्व जगांतील कामकऱ्यांच्या हितासाठीं झटणारे लेनिन, स्टॅलिन हे पुरुष भोगवादी आहेत. हें ध्यानांत घेतलें तर भोगवाद म्हणजे काय हे ध्यानांत येऊन पश्चिमेप्रमाणें पूर्वेलाहि भोगवादाकडेच वळलें पाहिजे हें ध्यानांत येईल. पूर्वेला यांत फारसें कष्टप्रद वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण उपनिषदापूर्वींच्या वेदकाळीं ती तशीच होती असें कांहीं पंडितांचें म्हणणें आहे.

यंत्रामुळें समृद्धि वाढली व समृद्धीमुळें भोगवाद निर्माण झाला हें तर खरेंच आहे. पण तो बळावण्यास आणखीहि एक कारण झालेलें आहे. ज्या प्रयोगनिष्ठेंतून यंत्र निर्माण झालें तींतूनच जडवाद निर्माण झाला. या जीवितापलीकडे कांहीं नाहीं आणि असले तरी त्यामुळें येथील आचारविचारावर परिणाम व्हावा इतकें त्याचें ज्ञान मानवास मुळींच नाहीं, हा सुविचार विज्ञानाच्या अभ्यासामुळें व प्रसारामुळें देशांत रुजत गेला आणि त्यामुळेंच त्यागवाद जाऊन तेथें भोगवाद आलेला आहे. गरजा मारणें, वासना खंडणें यांनीं परमार्थ साधावयाचा असतो. तो परमार्थच नाहींसा झाल्यामुळें त्यागवाद अर्थातच लंगडा पडला. या संबंधाचें आणखी विवेचन ' राइट टु बी हॅपी ' या सौ. डोरा रसेल यांच्या पुस्तकांत सापडेल. एकोणिसाव्या शतकांत प्रबळ असलेला जडवाद आतां लोपत चालला आहे असें अनेक शास्त्रज्ञ सांगत आहेत. ३१ जुलैच्या ' केसरींत ' ईश्वराबद्दल सात शास्त्रज्ञांची मतें दिलीं आहेत. ते सर्वजण जडवादाच्या विरुद्ध आहेत. आणि जगाला हेतू असून त्याच्यामागें ईश्वर आहे असें ते सांगतात. पण त्यांचें मूळ लिखाण पाहिलें तर असें दिसेल कीं पदार्थविज्ञान व रसायन यांनीं सृष्टीचें संपूर्ण पृथक्करण करतां येत नाहीं एवढेंच त्यांनीं सिद्ध केलें आहे. कांहीं एका मर्यादेपर्यंत मानव जाऊं शकतो. त्यापलीकडच्या सृष्टींत व्यक्त होणाऱ्या शक्ति

त्याला अद्याप जाणतां आलेल्या नाहींत व कदाचित् कधींच जाणतां येणार नाहींत. शास्त्रज्ञांनीं सिद्ध केलें आहे तें एवढेंच. पण त्यावरून त्यागवाद किंवा भोगवाद यावर किंवा मानवाच्या कोणच्याहि आचारविचारावर परिणाम होण्याइतकें अजून कांहीं सिद्ध झालें आहे असें मुळींच नाहीं. जडसृष्टीपलीकडे चेतनसृष्टि आहे असें ते म्हणतात. असेलही ! पण त्यावरून जगाला हेतु आहे किंवा त्याच्यामागें ईश्वर आहे असें म्हणतां येणार नाहीं. मोठमोठे शास्त्रज्ञ तसें म्हणत असल्यास तशी त्यांची श्रद्धा आहे इतकेंच फार तर सिद्ध होईल. प्रयोग करून त्यांनीं तसें मुळींच दाखविलेलें नाहीं.

जडसृष्टीपलीकडे कांहीं तरी असलें पाहिजे या शास्त्रज्ञांच्या तर्कांच्या पुराव्यापेक्षांहि एक जास्त प्रबळ व प्रत्यक्ष असा पुरावा अध्यात्मवादाला अलीकडे मिळूं पहात आहे. त्याचाहि थोडा विचार आपणास केला पाहिजे. पण अध्यात्मिक व आधिभौतिक या मोठ्या सदरांतच त्याला घेऊन त्याचा विचार करणें जास्त युक्त आहे. तेव्हां पश्चिमेची व पूर्वेची भिन्न म्हणून जी संस्कृति सांगितली जाते तिचाच आतां विचार करूं.

पूर्व व पश्चिम या दोन जगद्‌विभागांचा विचार करणाऱ्या लेखकांच्या बोलण्यांत अध्यात्मिक व आधिभौतिक संस्कृति किंवा त्याहीपेक्षां जास्त स्पष्ट म्हणजे दैवी आणि आसुरी संपत्ति हे शब्द नेहमीं येत असतात. पूर्वेची संस्कृति अध्यात्मिक असून पश्चिमेची आधिभौतिक आहे व दैवी आणि आसुरी अशीं विशेषणें देण्याइतक्या त्या भिन्न आहेत असा या बोलण्याचा भावार्थ आहे. आणि पूर्व व पश्चिम यामधील हाच महत्त्वाचा फरक आहे असें सांगण्यांत येतें. तेव्हां या दैवासुर संपत्तीचा प्रथम विचार केला पाहिजे.

अध्यात्मिक संस्कृतीची मुख्य खूण म्हणजे मृत्यूनंतरचें अस्तित्व मानणें ही होय. अध्यात्मिक हें नांव आहे तेव्हा आत्मा मानणें या संस्कृतींत अवश्य आहे हें खरें. पण बौद्ध संस्कृतींत तो मुळींच मानीत नाहींत तरी अध्यात्मिक या शब्दाला जो व्यापक अर्थ आहे त्यांत ती येऊं शकते. मृत्यूनंतर, देहपातानंतर व्यक्तीचें जीवन तसेंच पुढें सुसंगत रहातें कीं नाहीं हा प्रश्न केवळ बौद्धिक क्षेत्रांतच असता तर त्यावर इतकीं रणें कदाचित् माजलीं नसतीं. पण मृत्यूनंतरचें अस्तित्व गृहीत धरून तेंच मुख्य जीवन मानून त्याअन्वयें येथले आचारविचार ठरविले पाहिजेत, असें नेहमीं सांगितलें जातें म्हणूनच या प्रश्नाला महत्त्व आलें आहे.

या बाबतींतल्या कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार ' आधिभौतिक शास्त्रांचे

अधिकार' आणि 'संस्कृति व प्रगति' या दोन प्रकरणांत आपण केला आहे. अध्यात्मिक जगताचें अस्तित्व जिच्या साह्यानें आपण ठरवितों ती अंतर्दृष्टि किती पंगू आहे आणि मनुष्याची बुद्धि ही, तिला कितीहि मर्यादा पडत असल्या तरी आहे या साधनांत कशी श्रेष्ठ आहे, तें तेथें दाखविलेंच आहे. त्याचप्रमाणें कर्मवाद आणि मोक्ष या भ्रामक कल्पनांचीहि चर्चा तेथें केली आहे. आतां येथें त्याच बाबतींतल्या आणखी कांहीं प्रमाणांचा व अध्यात्मिक संस्कृतीशीं संबद्ध असलेल्या इतर कांहीं गोष्टींचा विचार करावयाचा आहे.

अलीकडे युरोपमध्यें मृत्यूनंतरच्या जीवनाचा बराच अभ्यास सुरू झाला आहे. त्यासाठीं अनेक संस्था स्थापन झाल्या आहेत. आणि सर ऑलिव्हर लॉज्, कॉनन् डॉइल्, मायरस्; डॉ. व्हेरॉल यांसारख्या थोर लोकांचा त्यावर पूर्णपणें विश्वास बसला असून इतरहि अनेक पंडित त्या बाबतींत संशोधन करीत आहेत. मृतात्म्यांचें संदेश कांहीं ठराविक व्यक्तींच्या मार्फत या जगांत येऊं शकतात, कोणच्याहि बाह्य साधनावाचून व्यक्तींच्या मनांतले विचार ओळखले जातात, इतकेंच नव्हे तर मृत आत्म्यांचे आचारविचार समजणें शक्य झाले असून त्यांचे फोटोहि काढतां येतात असें सध्यां सांगितलें जातें. या बाबतींत उलटसुलट अनेक ग्रंथ आहेत. आणि असें कां व्हावें याच्या अनेक शास्त्रीय किंवा काल्पनिक उपपत्ति सांगितल्या जातात. जोसेफ मॅककेब् यानें या सर्व कल्पनांची अगदींच टर केली आहे व या सर्वांच्या बुडाशीं लुच्चेगिरीवाचून दुसरें कांहीं नाहीं असें सांगितलें आहे. पण इतका एकांतिक पक्ष टाकून देऊन सी. ई. एम्. जोड यानें त्यांचा जरा सहानुभूतीनें विचार केला आहे. व त्यानें शेवटीं असें म्हटलें आहे कीं हे सर्व फसवेगिरीचे प्रकार आहेत असें जरी म्हणतां येणार नाहीं तरी या क्षेत्रांत येणाऱ्या सर्व अनुभवांचें स्पष्टीकरण करील अशी समाधानकारक एकहि उपपत्ति अजून बसवितां येत नाहीं. ( गाइड टु मॉडर्न थॉट पृ. १७९ ). जोडचें हें म्हणणें सर्वांना मान्य झालें नाहीं व मृत्यूनंतरचें जीवन, कोणच्याहि स्वरूपांत कां होईना, आहे असें जरी त्यांनीं मानलें तरी एक गोष्ट अगदीं निश्चित आहे कीं त्या जीवनाचें खरें स्वरूप, येथील पापपुण्याचा त्या जीवनावर होणारा परिणाम, किंवा त्या अव्यक्त जीवनानंतर पुन्हां प्राप्त होणारें व्यक्त जीवन याबद्दल अजून कांहींहि निश्चित झालेलें नाहीं. आणि धर्मशास्त्र किंवा नीतिशास्त्र तर या कल्पना निश्चित धरूनच उभारलेलें असतें. तेव्हां आत्मा, परलोक, पुनर्जन्म इत्यादि अध्यात्मिक संस्कृतीचे जे मुख्य खांब त्यांना अजून शास्त्राचा यत्किंचित्‌हि आधार मिळाला आहे असें समजण्याचें मुळींच कारण नाहीं.

पण हें तात्त्विक क्षेत्र सोडून दिलें तरी या दोन संस्कृतींमध्यें आणखी कांहीं महत्त्वाचे फरक आहेत असें मानण्यात येतें. पाश्चात्य हे जडवादी व म्हणूनच अगदीं राक्षसी व क्रूर आहेत, जेथें जातील तेथें मूळच्या लोकांचा संहार करतील व तें नच साधलें तर अत्यंत अन्यायानें दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा, राज्याचा व वित्ताचा अपहार करून आपला तळिराम गार करतील असें आपल्याकडे त्यांचें वर्णन करण्यांत येतें. अबिसिनिया इटालीनें घेतला तरी इंग्लंड वगैरे युरोपी राष्ट्रें अबिसिनियाच्या मदतीस धांवलीं नाहींत, याची कारणमीमांसा सांगतांना पुण्याच्या एका म्हाताऱ्या वर्तमानपत्रानें म्हटलें आहे कीं उदारता, दया ही बुद्धिच या जडवादी राष्ट्रांत नाहीं. दुसऱ्याचा संहार झालेला पाहाण्यांतच यांना आनंद होतो. आफ्रिकेची लूटमार करून मूळच्या मालकांना युरोपी लोकांनीं नागविलें व अडाणी निग्रोंना सुसंस्कृत केलें नाहीं हें सांगून दुसऱ्या एकानें त्याच वर्तमानपत्रांत युरोपी संस्कृती कशी राक्षसी आहे तें दाखविलें आहे. डार्विनचें वगैरे उतारे देऊन कांहीं समाजशास्त्रज्ञही तसा प्रयत्न करीत आहेत.

या न्यायदयावादी मंडळींनीं युरोपवर हे आरोप करतांना आर्यांचा जुना इतिहास विसरण्याची सोयीची पद्धत पाडली आहे. नाहीं तर स्वतःचा वेडगळपणा ध्यानांत येण्यास त्यांना मुळींच उशीर लागला नसता. आफ्रिकेंत शिरण्याचा इटलीला जर हक्क नाहीं तर हिंदुस्थानांत येण्याचा आर्यांना काय हक्क होता? येथें एक ठराविक पोपटी उत्तर देण्यांत येतें, कीं आर्यांनीं हिंदुस्थान जिंकला हें खरें; पण मूळच्या लोकांना स्वधर्मांत शूद्र म्हणून कां होईना, त्यांनीं जागा दिलीच आहे! हें उत्तर मोठें मासलेवाईक आहे. दुसऱ्याच्या घरांत शिरून त्यालाच चोर ठरवून वर घर झाडण्याचे हक्क त्याला दिल्याबद्दल टेंभा मिरवावयाचा अशापैकींच हें आहे. मालकाला मारून टाकला तर अगदीं आसुरी कृत्य. मालकाला झाडू करून टाकला तर मात्र तें अगदीं दैवीपणाचें लक्षण! पण दैवीपणाचें लक्षण हेंच असेल तर युरोपांतले बहुतेक लोक दैवी संपत्तीनेंच युक्त आहेत असें दिसेल. आर्यांनीं अस्पृश्यांना ज्या सुखांत ठेवलें आहे, तितक्या सुखांत अमेरिकेंत सध्यां निग्रो आहेतच. आफ्रिकेंतल्या अनेक जातींचा संहार झाला असला तरी अस्पृश्याइतक्या सुखांत असलेल्या काहीं जाती आफ्रिकेंतही सांपडतील. आणि मुसोलिनी हबशी लोकांचा संहार न करतां त्याना झाडू इतपत मानाचें पद देऊन आर्यपणा करील याबद्दल मला तर शंकाच नाहीं. साम्राज्यविस्तार हें आसुरीपणाचें लक्षण धरलें तरी तेथेंही आर्यांची पंक्तइतच आहे. कारण पूर्वी हिंदुस्थान सोडूनही

ब्रह्मदेश, सयाम, अनाम, अफगाणिस्थान या देशांत हिंदूंचें साम्राज्य होतें असा पुरावा अलीकडे उपलब्ध होत आहे. पण अगदीं संहार केला तरच आसुरी, त्याच्या अलीकडे कांहींही केलें तरी दैवी, अशी सोईची व्याख्या मान्य केली तरीही फारसें निभत नाहीं. कारण आपल्या पुराणांतील अतिशयोक्ति काढून टाकून अगदीं अल्प हातीं लागणारें सत्य जरी पाहिलें तरी आर्यांनीं येथील रानटांचा अनेक ठिकाणीं अनेक प्रकारें संहार केला आहे, असेंच दिसून येईल. आजमितीला अमेरिकेंत रेड इंडियन लोकांची जी स्थिति आहे तीच येथें वन्य जातींची आहे. आफ्रिकेंत जसा निग्रो, किंवा अमेरिकेंत जसा रेड इंडियन तसाच येथील कात-करी किंवा संताळ हा मालक होता. पण आर्यांनीं त्याला आज गिरिकंदरांत धाडलें आहे. येथील लोकांचा पूर्ण संहार झाला नसेल तर तो आर्यांच्या शस्त्रास्त्रांचा दोष आहे. दयाशीलता. विश्वबंधुत्व वगैरे गुणांची ती महती नव्हे. माझ्या मतें आर्यांनीं केलें हेंच फार चांगलें केलें. आजचे दैवी आर्य विश्वबंधुत्व करून स्वतः-च्याच घरांत उपरे होऊन बसले आहेत, आणि आम्ही पारशांना, मुसलमानांना, जो कोणी येईल त्याला पोटांत घेतलें आहे म्हणून, त्यांतच दळभद्री ऐट करीत आहोंत. त्यापेक्षां साम्राज्य वाढविणारे, अक्षरशः पराक्रम करणारे ते आसुरी आर्य फार बरे असें वाटतें. युरोपीयांनीं आफ्रिकेच्या मूळ रहिवाशांना सुसंस्कृत केलें नाहीं म्हणून ते राक्षसी होत, मुद्दा उलटल्यास वरच्या इतक्याच गैरसोयीचा आहे. कारण, कृण्वन्तो विश्वमार्यम्। ही घोषणा करणाऱ्या आर्यांनीं अस्पृश्यांना व येथल्या गोंडसंताळांना किती सुसंस्कृत केलें, किंवा तेही सोडून चातुर्वर्ण्यांत घेतलेल्या शूद्रवर्गाला काय संस्कृति दिली हें प्रसिद्धच आहे.

यावरून असें दिसेल कीं पूर्वेची संस्कृति दैवी आहे व पश्चिमेची आसुरी आहे या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. व्यक्तीच्या व राष्ट्राच्या चारित्र्यांत उदात्तता, स्वार्थत्याग भूतदया, इत्यादि थोर सद्गुणांच्या ज्या परासीमा पूर्वेकडे दिसतात, त्या पश्चिमेकडेही तितक्याच उज्ज्वलपणें दिसतात. व लालसा, स्वार्थ, क्रूरता हे दुर्गु-णही दोन्हीकडे सारखेच दिसतात. शस्त्रास्त्रांच्या प्रचंड शक्तीच्या शोधानंतर पूर्वेकडच्या लोकांच्या नशिबीं जगद्विजय करण्याची पाळीच आली नाहीं म्हणून हा पोक्त उपदेश त्यांना सुचतो आहे इतकेंच.

प्रयोगनिष्ठा, बुद्धिवाद, समता, व्यक्तिस्वातंत्र्य ही पाश्चात्य संस्कृतीची आदिमहातत्त्वें आहेत. यंत्र, जडवाद, भोगवाद हा त्या तत्त्वांचा केवळ फुलोरा आहे. या तत्त्वांच्या आचरणानें पश्चिम आज दिग्विजयी झालेली दिसत आहे.

पूर्वेकडचे जे देश तिला जिंकता आले नाहीत त्यांनीं सर्वस्वीं जरी नाहीं तरी अंशतः यांतील कांहीं तत्त्वांचा आश्रय केला आहे. आणि म्हणूनच त्यांना यश आलें आहे हें आपणांस स्पष्ट दिसत आहे. या वरील गोष्टी एकापुढें एक मांडल्या कीं यांतून निर्णय काय निघतो, तें सांगावयास पाहिजे असें नाहीं. आपल्या प्राचीन वैभवानें पुन्हां जगांत तळपावें ही पूर्वेला इच्छा असेल तर, तिचें सर्वस्वी पश्चिमीकरण होणें अवश्य आहे. मागल्या काळाकडे थोडी दृष्टि टाकली तर असें दिसेल कीं हें पाश्चिमीकरण तिला अगदीं जड जाईल असें नाहीं. कारण जडवाद व लोकशाही हीं तत्त्वें, वगळलीं तर बाकीचीं तत्त्वें, अगदीं बोजड, व प्राथमिक स्वरूपानें कां होईना, नकळत कां होईना, प्राचीन काळीं हिंदुस्थानांत माणसांनीं आकलन करून थोडीबहुत आचरणांतही आणलीं होतीं. त्याच तत्त्वांचा आतां पश्चिमेकडे पूर्ण विकास झालेला आहे. तेव्हां नव्या व शास्त्रशुद्ध स्वरूपांत पूर्वेनें त्या तत्त्वांचा फिरून अंगीकार करून आपलें गतवैभव पुन्हा प्राप्त करून घेण्याची ईर्षा बाळगली तर त्यांत कांहीं अश्लाघ्य किंवा अवमानाचें आहे, असें मुळींच म्हणतां येणार नाहीं.

ग्रंथालय ठाणे
४८७०

